

# राहू दे घरटे

शुभांगी पासेबंद

# राहू दे घरटे

शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

राहू दे घरटे (कादंबरी)
Rahu de gharate (Novel)

लेखिका : शुभांगी पासेबंद
9869004712
scpaseband@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com
9869674820

प्रकाशन : ३ मार्च २०१६
©esahity Pratishthan®2016

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# प्रस्तावना

आज माणसं खूप बदलली आहेत. प्रगतीचा मोह कुणालाच आवरता येत नाहीय. यशाची व्याख्या दर माणसागणिक व दर दिवसागणिक बदलत चाललीय. एका पिढीने दुसऱ्या पिढीकडे काहीतरी दिलं पाहिजे, पण नेमकं काय, याची नुसती गल्लत होऊ लागलीय. संस्कार माणसाला कृतीशील अन् सजग जगण्याचे भान देतात. त्यामुळेच आपला भोवताल आपल्या जीवनावर अनेक प्रकारे परिणाम करत असतो.

साहित्यात तर आता नव्या दमाने लोक लिहू लागले आहेत. ते नुसतेच लिहीत नाहीत, तर वास्तव शब्दचित्रित करण्यावर त्यांचा भर अधिक दिसून येतो. कथा-कविता या वाङ्मय प्रकारांत स्त्री-लेखिकांनी अमीट ठसा उमटवला आहे; परंतु कादंबरी लेखनातली त्यांची अभिव्यक्ती ठळकपणे दिसून येत नाही. म्हणूनच कादंबरीचा प्रवास मांडताना अनेकांगी विचार संभवतो. ती कुशलता, सहजता अंगी असणं, हा दैवयोग आहे, असे मला म्हणावेसे वाटते. ही कादंबरी याचा प्रत्यय देऊन जाते. स्त्री मुक्ती व स्त्री भ्रूणहत्या थांबविणे यासाठी घोषणा देण्यापेक्षा याकरिता जनजागरण करणारे साहित्य आवश्यक आहे. कृती जरुरी आहे

गावाकडून शहरात आलेल्या माणसाची नाळ कायम गावातल्या मातीशी जोडलेली असते. म्हणून लेखन करताना तो काऴ गाव-गावाची भाषा-गावातले व्यवहार पदोपदी लेखनात साखर चहात, केशर दुधात विरघळावं तसे एकजीव होतात. कादंबरीतली नायिका-सारिका हिचा हा जीवनप्रवास म्हणजे ही कादंबरी होय.

प्रस्तुत कादंबरीतली नायिका, आईची लाडकी लेक, लेखिकेने तिच्या गुणवत्तेतून,

निरीक्षणातून रेखाटल्याचं जाणवतं. भोगवादाचा उच्छाद आजही स्त्रीच्या माथी मारला जातोय. कुटुंबातलं विस्कटलेपण आणि नात्या-नात्यातली बेबनावगिरी या कहाणीत दिसून येते. एकीकडे समाजात स्त्रियांच्या कर्तबगारीचे ढोल बडवले जातात असं चित्र आहे; तर दुसरीकडे स्त्री कितीही प्रगल्भ, विचारशील असली तरी तिचा मानसिक, शारीरिक छळ व शोषण अव्याहतपणे सुरूच आहे. `युज अॅण्ड थ्रो' पद्धतीनं तिच्याशी व्यवहार केला जातो. तसेच पुढारीअण्णासाहेब-आदित्य या खलप्रवृत्ती आजही समाजात गडदपणे दिसून येतात. अनेक मराठी-हिंदी चित्रपटांनी याचं व्यवच्छेदक चित्रण समाजाला दाखवलं आहे. पण त्यातून फारस काही, नवं, हाती लागत नाही. हे वास्तव, हे नागवेपण कादंबरीत चांगल्या पद्धतीनं, प्रामाणिकपणे मांडण्यात आले आहे.

लेखिकेचा कादंबरी लेखनाचा हा प्रयत्न आहे. कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलून संवेदनशील मन सतत वाचत असतं. टिपकागदाप्रमाणे त्या अनुभव टिपून गाठीशी ठेवतात. यातून त्यांना स्फुट सुचतं, कधी कवितांच्या धीरगंभीर ओळी! या कादंबरीचा शेवट हा `धक्का तंत्र' नसून जगणं किती आशादायी असू शकतं, याचा उत्कृष्ट नमुना असे म्हणता येईल. वेदनांनी कथानकात जान ओतण्याचा सच्चेपणा दाखवला आहे. त्यामुळेच वाचकालाही ही कथा मनस्वी गुंतवून ठेवेल, असे मला नमूद करावेसे वाटते.

- वासंती प्रकाश घाडगे

सातारा

# मनोगत

किती गोंधळ आहे आसपास? त्यातच मी आईची  लाडली भरकटते आहे. माणसं का सुसाट वाऱ्यासारखी पळतायेत? कुठे आहे त्यांचा मुक्काम? केवढं प्रदूषण? केवढ्या गाड्या? केवढी गर्दी? या वेगवान शहराला भावना नाहीतच का?

संवेदना खरंच गोठल्यात का? लोकं रस्ता चुकली आहेत? की उगाचंच वेड घेऊन पेडगावला चाललीयत... अचानक बाबा-बुवांना आत्ताच इतकी प्रसिद्धी का मिळत्येय? खरंच आपण जे शाळा-कॉलेजात शिकलो, ते इतकं तकलादू होतं का? लग्नापूर्वी आणि लग्नानंतर स्त्री-पुरुष यांच्या आयुष्याचे दोन भाग, संदर्भ होतात का? जगण्यासाठी काय हवे? आई-वडील, भाऊ-बहीण, काका-काकी, मामा-मामी, मावशी-काका, आत्या-मामा, आजोबा- आजी, मुलगा-मुलगी ही नाती आज कुणामुळे आणि कशासाठी बदललीयत? एकांताचा कंटाळा आलाय का? की मनातला आतला आवाज दंश करतो, म्हणून ते नको! स्त्री भ्रूणहत्या का होत आहेत? असे न संपणारे प्रश्न मला सतत छळत असतात.

या सगळयांचा एक व्यक्ती म्हणून माझ्या आयुष्यावर परिणाम होतोच होतो. कारण मी आधुनिक, प्रगतीशील स्त्री आहे. नोकरी-घर असं माझं व्यस्त आयुष्य आहे. पण यादरम्यान जे जे म्हणून अनुभव मला येतात, तेच मला लिहिण्यास प्रवृत्त करतात. पावसाच्या सरींप्रमाणे! नैसर्गिक!  लिहिणं हा माझा व्यवसाय नाही. छंद आहे, तसेच ती माझी अंतःप्रेरणा आहे. पण पोटाची टीचभर खळगी भरायला पैसा लागतोच, हे सत्य आहे. हा प्रपंच आहे. एखादा विषय डोक्यात आला. कागदावर उतरवला की माझं मलाच मोकळं मोकळं झाल्यासारखं वाटतं. कादंबरी लेखन हा अवघड प्रकार जरूर आहे, परंतु ही

कादंबरी  लिहिताना मला कुठेच थांबावंसं वाटलं नाही. यातली नायिका-सारिका हिचं जीवन रेखाटताना मला आजचे स्त्रियांचे शोषित जगणे जाणवले. तिच्याशी संबंधित व्यक्तिरेखा खलवृत्तीने वागतात किंवा समाजातील लोक, दुसऱ्याचे प्रश्न दुर्लक्षित करतात, याचं माझं निरीक्षण सत्यातील आहे. स्त्रीचे शोषण हा माझा अभ्यासाचा विषय आहे आणि स्त्री भ्रूणहत्या थांबविण्यासाठी लढणे हे माझे ध्येय आहे. एक स्त्री म्हणून जगताना मला स्वतःला अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं. तडजोड करावी लागते. संसारात एकरूप, एकजीव होणं, हा मंत्र मी आजवर जपलाय आणि म्हणूनच माझ्या लेखनाला घरातून कधीच विरोध झाला नाही. उलट माझे पती नेहमीच मला प्रोत्साहित करतात. मुळात पुस्तके वाचताना, वर्तमानपत्र वाचताना, माणसं वाचताना, जाणवते, सत्य काहीतरी वेगळं आहे. सर्जनशील आहे. चिंतनशील आहे. मला ते आकलन होतंय. भिडतंय ते लिहिलं पाहिजे, असा मनातल्या मनात सतत घोशा सुरू असतो. मग लिहिणं सुचत जातं. जलद लोकल गाडीनं प्रवास कमी कमी होत जातो, तसे विचार शब्दबद्ध होतात. कधी कवितेचं रूप घेऊन जन्मतात. कधी कधी ते नुसतं `साहित्य' वाटू लागतं. तर कधी त्यात साहित्य मूल्य येते.

कादंबरीची प्रेरणा एका अशा वाटेवर मिळाली की झपाटलेपणानं लिहिणं एवढंच माझ्या हाती होतं. (चारदोन लोकांना कथानक ऐकवलं. त्यांनी `यावर पुस्तक लिही' असा शेरा मारला. ) मग कादंबरी प्रवाहीत झाली. सारिकाचं जीवन वाचकांसमोर येताना, त्यात वेदना-संवेदनांचा जो खेळ आहे, नाट्य आहे, तेवढेच न येता आपलंतुपलं म्हणवणारी, जातपातीला घट्ट चिकटून असणारी माणसं खोटं तत्त्वज्ञान व संस्कृती जगतात, पण काही परधर्मीयांत, परदेशी नागरिकांमध्ये असा कोतेपणा नसतो. म्हणून रॉबर्ट सात्त्विक, सुसंस्कृत वाटतो. याशिवाय रॉबर्टच्या निर्णयाने सारिकाचं आयुष्य उजळून जातं. माणूसपण नुसतं गप्पा ठोकण्यापुरतं असतं का? भिंतींपलीकडची माणुसकी आपण कधी शिकणार?

मी एक कुटुंबवत्सल स्त्री आहे. लिहिणं मला मनापासून आवडतं. जागरूक

नागरिक, सुशिक्षित माणूस म्हणून समाजाचं माझ्या पद्धतीनं विश्लेषण करते. ही कादंबरी त्याच समजातून आकारास आलेली आहे. याकामी ज्यांची ज्यांची मला मनोभावे मदत झाली, त्या सगळ्यांची मी अत्यंत ऋणी आहे.

भारतीय संस्कृतीवर टीका करायची माझी इच्छा नाही. आत्मपरीक्षणाने समाजाने सुधारणा करावी, हाच सद्हेतू आहे. हे पुस्तक पूर्णपणे काल्पनिक आहे. एखाद्या सत्य घटनेशी त्याचे साम्य आढळल्यास तो योगायोग समजावा.

या कादंबरीबद्दलची आपली चांगली वाईट मते, टिप्पणी, टिका जाणून घ्यायला मला नक्की आवडेल.

शुभांगी पासेबंद

9869004712
scpaseband@gmail.com

**अर्पण पत्रिका**

महिलांचे प्रश्न, मुलींची दुर्दशा, वाढणाऱ्या स्त्री भ्रूणहत्या दाखविण्यापेक्षा त्यावर उपाय दाखवायचा प्रयत्न मी या कादंबरीत केला आहे. स्त्रीने स्वतःच सक्षम व्हावे. अत्याचाराला बळी पडलो म्हणून स्वतःला अपराधी कधीच मानू नये. घरच्यांनी जबाबदारी नाकारली तर एखाद्या सत्शील नातेवाईकाच्या मदतीने वसतिगृह, पेइंगगेस्ट, केअरटेकर, सामाजिक संस्था अशा चांगल्या सुरक्षित आधारस्तंभांचा आधार घ्यावा. शिक्षण घ्यावे. जगावे, छंद जोपासावे.

समाजानेसुद्धा अशा मुलींना वाममार्गाला लावण्याऐवजी करता येईल ती मदत करावी. दुसऱ्याच्या परिस्थितीला हसू नये. वेळ स्वतःवरही येऊ शकते. पुरुषांनी अशा स्त्रीकडे सहजप्राप्त वस्तू समजून न बघता, तिला सद्हेतूने मदत करावी. उद्या तिच्या जागी आपली मुलगीही असू शकते किंवा ती (पुरुषाचा अपमृत्यू झाला तर) आपली पत्नीही असू शकते हा विचार करावा. स्त्री सक्षमीकरणाचे वर्णन करणारी ही कादंबरी मी संवेदनशील व कृतीशील वाचकांना अर्पण करीत आहे.

या कादंबरीतील सर्व व्यक्तीरेखा, स्थळे, व घटना काल्पनिक असून त्यांचे कोणाही वास्तवातील व्यक्तींशी वा घटनांशी साम्य अढळून आल्यास तो केवळ योगायोग समजावा.

लेखिका

राह्
दे
घरटे

## प्रकरण पहिले

संघर्ष हा जीवनाचा आत्मा असतो. दुःख हे कोपऱ्यात दडी मारून बसणाऱ्या अंधारासारखे मनाच्या कुठल्या तरी कोपऱ्यात लपून बसते. कधी तरी मन, काही क्षण, आनंदाने उजळते, पण पुन्हा तो वेदनेचा काटा टोचू लागतो. आयुष्याची तिन्हीसांज होते आणि तेव्हा कळते, अरे ती व्यथा म्हणजेच प्रेम! स्वप्ने बघावी; ती पूर्ण होण्यासाठी धडपडावे. पूर्ण झाली तर आनंद मानावा, नाही झाली तर उदास राहावे, नवीन स्वप्नांमागे धावावे. स्वप्नांचं हे चक्र म्हणजे जीवन. कस्तुरीमृगाने व्यर्थ भटकंती करावी व सुगंधाचा शोध घ्यावा, तसे माणसाचे व्यर्थ शोधक फिरणे म्हणजे जीवन!

जीवनाच्या प्रवासात वेगवेगळी गावे, नवीन घरटे, नवीन पक्षी भेटतात. जागा बदलतात. गावे बदलतात. एक दिवस आयुष्य संपते. मन म्हणते. चला आता मुक्काम आला. ही गोष्ट त्या घरट्यांची आहे. त्या यात्रेची आहे. माझी लाडलीची आहे.

सीतापूर हे तसे छोटेसेच गाव मी जिथे डोळे उघडून हे जग पाहिले आहे. `राहू दे माझे घरटे तुझ्या अंगणात' म्हणायचे ते माझे घर गोमती नदीच्या काठावर वसलेले होते. तीर्थक्षेत्र म्हणून, सणवाराला गर्दी होते, पण बाकी एरवी शांतताच असे. अगदी मनातला दबलेला आवाजही ऐकू येईल एवढी शांतता सीतापूर गावात होती. माझे वडील (दादा) शेतकरी होते. सुशिक्षितपणामुळे शेतात वेगवेगळे प्रयोग करणे, वेगवेगळया जातीची फळे, फुले लावणे त्यांना मनापासून आवडत असे. त्या गावात सुरुवातीला सर्वजण शेतकरी होते. हो,

गावात पुजारी होता तो शिकलेला होता व शिक्षक म्हणूनही तो काम बघत असे. त्याची पत्नी उषा हीसुद्धा गावातील शाळेत शिक्षिका होती. गावाबाहेर 'ती' वस्ती होती. पण गाव तसा आनंदी होता. बारा बलुतेदारांचे संबंध सौहार्दाचे होते. शेती पिकत होती. माणसं खाऊनपिऊन सुखी होती. त्या गावात, त्या शेतात नारळीच्या झाडाआड एक छोटेसे दुमजली बंगलीवजा घर होते. ते माझे घर पहिलेच घरटे होते. आईवडिलांची मी लाडकी होते. आई मला लाडली म्हणत असे तर दादा तर मला `परीराणी' म्हणत असत. किंवा लेक लाडकी असा पुकारा करीतच ते घरात शिरत असत. स्वतःच्या मोठ्या थाळयासारख्या ताटातील वरणपोळी किंवा चटणीभाकरीचा घास माझ्या तोंडात भरवल्याशिवाय त्यांना जेवण जात नसे. मला एक भाऊ होता. त्याला दादा `महाराजा' असं म्हणत. त्याला त्यांनी काही दिवसांनी शहरात मोठ्या इंग्रजी शाळेत शिकायला घातले. पण आमचे बालपण सीतापूरमध्येच गेले.

भावाला लाडावून ठेवायला आमचे एक काकाही कारणीभूत होते. त्या काकांनी `महाराजा' साहेबांना इतके वर चढवले की त्यांना आपल्याला, राजघराण्यात, पोटासाठी काम करायची गरज नाही असेच वाटू लागले. भावाला आदित्य पाटील नावाचा एक मित्र होता. अर्थात तोही बनेल व भाऊही चतुर. त्यामुळे मैत्री घट्ट नव्हती. खरे सांगायचे तर फक्त ओळख होती. तोसुद्धा भावाबरोबरच शहरात शिकायला राहीला होता. त्याला सीतापूर बीलो स्टेटस वाटत असे. असे भाऊ सांगत असे. दादा म्हणत `तू तुझे विचार तर त्याच्या नावावर खपवत नाहीस ना! ' आणि हसून गांधी टोपी डोक्यावर घालून कोल्हापुरी चपला पायात सरकवून शेतात पाणी घालायला निघून जात. शिक्षण मीही घेत होते. पण भावाचे शिक्षण म्हणजे निव्वळ कौतुकाचा विषय होता. माझे शिक्षण  म्हणजे लग्न होईपर्यंत वेळ काढण्याचे साधन होते.

माझा जन्म सीतापूरच्या घरात झाला. माझे हे पहिलेच घरटे जिथे हे पिल्लू म्हणजे मी जन्माला आले. सीतापूरमधील त्या आमच्या शेतावरच्या छोट्याशा फार्महाऊसमध्ये आम्ही चौघे राहात होतो. मी, आई वडील व भाऊ! एका सुंदर वाडीमध्ये व बहरलेल्या

पिकांच्या आखीवरेखीव शेतातील ते घर हरित क्रांतीचे जणू मानबिंदू होते. मी तिथून शाळेत चालत जायची. शाळा बऱ्यापैकी लांब होती. पण ते बालपणाचे सोनेरी दिवस अवर्णनीय होते. अर्थात सर्वांचे असतात.

स्वातंत्र्योत्तर काऴात, देशाची प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली. शेतजमीन विकून प्लॉट पाडणे, बंगले बांधणे सुरू झाले. आमच्या शेतीला लागूनच रस्त्याच्या बाजूने एक रिकामा प्लॉट होता. तो फ्लॉट विकला गेला. तिथे भराभर एक सोळा फ्लॅट असलेली सहजीवन गृहनिर्माण संस्था बांधली गेली. आमच्या शेतीला माझ्या वडिलांनी त्यांच्या स्वखर्चाने बांधलेले तारेचे कुंपण होते. बाजूच्या सहजीवन गृहनिर्माण सोसायटीत फारच चिक्कू व लबाड लोक होते. त्यामुळे तिथे भिंत बांधली तर त्यांना फायदा होताच, पण आम्हालाही थोडी सुरक्षितता मिळणार होती. आमची जी प्रायव्हसी होती ती अबाधित राहणार होती. वडिलांना फारसे व्यवहारज्ञान नव्हते. त्या सोसायटीने सुचविले व ते स्वतःच्या खर्चाने भिंत बांधून घेण्यास राजी झाले. माझा भाऊ शहरात राहात असे. तो चतुर होता. त्याने सोसायटीच्या अध्यक्षांना `अर्धा अर्धा खर्च करूया' असे स्पष्ट सांगितले. अध्यक्षाला `खर्च अर्धा केला' असे दाखवून भिंत आमच्या खर्चाने बांधून वाचलेला पैसा खिशात घालायचा होता. त्याकाळी जेमतेम दोन हजार खर्च येणार होता.

अर्थात त्यावेळी सोन्याचा भाव आठशे रुपये तोळा होता. भिंत बांधणे बारगळले. त्या गावी, सीतापुरला, झालेली ती पहिली फ्लॅट स्कीम होती. सहजीवन सोसायटीतील लोक आमच्या घरी अंगणात ये-जा करू लागले. आमच्या आमराईतील आंब्यांना, वाडीतील इतर झाडांना, कैऱ्यांना दगड मारू लागले. ती मुले आमच्या विहिरीवर खेळू लागली. विहिरीत डोकावू लागली. त्या मुलांमुळे आई-दादांची झोप उडाली. विहीर बुजवा म्हणून सहजीवन सोसायटीतील लोक दबाव आणू लागले. येता-जाता ते लोक आमच्या झाडांना, फुलांना, वेलींना झोंबू लागले. सुरक्षिततेसाठी विहिरीवर झाकण आले.

हळूहळू लिंबाची झाडे, जाई, मोगरे काही वेली भुईसपाट झाल्या. सोसायटीतील लोकांना वाटायचे, आम्ही त्यांना मुक्तपणे, आम्हीच वाढवलेल्या झाडांची फुले व फळे तोडू द्यावी. आपणहून आमच्या घरी हुरडा पार्टीला, आमटी-भात खायला बोलवावे. आमच्या जांभळाच्या झाडाची जांभळे त्यांना द्यावी. आमच्या झाडांच्या कैऱ्या-आंबे त्यांना द्यावेत. लबाड व स्वार्थावर आधारित नातेसंबंध समाजात रुजू होण्याची ती सुरुवात होती. आम्ही खाऊनपिऊन सुखी होतो. आपल्यापरीने श्रीमंत होतो. तोपर्यंत तरी मी पूर्ण सीतापूरचीच लाडकी लेक होते. तरीही स्वतः वाढवलेल्या झाडाची फळे तोडताना ज्या वेदना होतात त्या तीच व्यक्ती जाणते जी झाड वाढवते. त्यामुळे आम्हाला फळे देववेना. भांड्याला भांडी लागू लागली. आमची ती झाडे व फळे त्यांच्यालेखी एक असूयेचे स्थान बनली. आईलाही हळूहळू त्या झाडांमुळे भांडणे होतात असे वाटू लागले. आधुनिकतेच्या नावाखाली पर्यावरणाची हानी व फॅशनच्या नावाखाली जंक फूड आले. टेलिव्हीजनने आमच्या घरी प्रवेश केला. माणसामाणसातील संबंध दुरावू लागले. आम्हाला ती सहजीवन सोसायटी मुळावर आली असेच वाटू लागले.

त्याचवेळी आदित्य पाटील पुन्हा त्याच सहजीवन सोसायटीत राहायला आला. बाहेर शिक्षणाला राहिल्यामुळे तो टीपटॉप होता. चांगली नोकरी होती. नवीन कोरी गाडी घेतली होती. तो आता रुबाबदार दिसू लागला होता. त्याच्या अस्तित्वामुळे मी उगीचच कॉन्शस होत असे. अर्थात लबाड पाटील कुटुंब कधीही कुणाच्याही मदतीला येत नसे. मात्र आपल्या नजरेनेच, आमच्या घराचे, माझे, वाडीचे मूल्यमापन करीत असे. आदित्य शोधक नजरेने काही शोधत होता व भेदक नजरेने माझ्या मनाची तटबंदी भेदून आत प्रवेश करीत होता.

मी तारुण्यात पदार्पण केले. माझे मन नेहमी त्या `कुणाला तरी' बघत असे. कुठे तरी राहणाऱ्या व माझ्या हृदयाची हाक ऐकणारा कुणी तरी असतो, असे मानून प्रेम शोधत असे. खरे तर असे कुणीतरी अस्तित्वात असते का? प्रेम म्हणजे एक खोटी काल्पनिक भावना, सत्याच्या कसोटीवर न उतरू  शकणारी! हे आता कळते, पण तेव्हा कळत नव्हते. नाते म्हणजे

काय? संबंध आले की सुरू होते ते नाते, की हे नाते वेगळेही असते? मला वाटते, नाते नजरेचे, स्वप्नांचे, माणुसकीचे, भावनांचे किंवा अलिप्ततेचेही असू शकते. मी अशा नात्यांच्या शोध घेऊ लागले.

तर आमची मनशांती हळूहळू नष्ट होऊ लागली. बंगल्याच्या शाहीबाजाची सवय झाली होती. अंगणात खुर्ची टाकून बसणे, ओले केस सुकवणे, मोठमोठ्या रांगोळया काढणे ही आमची आवडीची व करमणुकीची, खेळीमेळीची, आराम-विराम करायची, विहार करायची कामे होती. ती करताना ही मंडळी आपल्याकडे बघतात ही कल्पना मनात येऊन आम्ही कानकोंडे झालो. आम्हीही घराच्या चार भिंतीत वावरू लागलो. आमचा बैठा बंगला होता व त्यांचे उंच चार मजली घर व त्यातून डोकावणारे डोळे होते. आमच्या ज्या काही निर्मळ सवयी होत्या. अंगणात खुर्च्या टाकणे, अंगतपंगत करणे, शेणाने अंगण सारवणे, झाडांना पाणी घालणे, त्या गावठी आहेत अशा अर्थाचे शालजोडीतले आहेर आम्हाला तिकडून त्या फ्लॅट स्किमकडून मिळू लागले. आम्ही आमची मनशांती घालवून बसलो. कुंपणापलीकडचा आधुनिकतेचा राक्षस आम्हाला घाबरवू लागला. आमची मने दडपली. ही सहजीवन सोसायटी म्हणजे एका विशिष्ट जातीच्या लोकांचे एक कडबोळे होते. अर्थात त्यात सरकारी नियमानुसार काही एक-दोन अन्य जातीचेही होते. सर्वांच्या आपापसातल्या लोकांशी कुरबुरी, भांडणे, पुन्हा गोड होणे चालू असायचे. कंपू ग्रुप तर खूपच होते. तसे सर्वजण शेतकरी पार्श्वभूमीचे. पण आम्ही आमचा बंगला, आमची झाडे, वाडी त्यांना नको होती. `झाडे जगवा' म्हणून सरकार एवढी ओरड करते. पण आमची उंच वाढलेली, फळणारी, फुलणारी झाडेही तोडावी अशी त्या सहजीवन सोसायटीची इच्छा होती.

आमच्या अंगणात उंच नारळाची झाडे होती. पण ह्या झाडांवरून उंदीर-घुशी येतात. ह्या झाडांच्या मुळांमुळे आमची इमारत कमकुवत होते. ही झाडे तोडा, अशी ओरड त्या लोकांनी सुरू केली. आमच्या फणसाच्या झाडाला भरपूर फणसे येत. पण त्यातल्याच एका खास बाईने, फणस दारी लावणे अपशकुनी असते म्हणून आईला फणस तोडायला लावला. आमचे

एक अंजीराचे झाड त्याच मार्गाने गेले. त्यांच्या सोसायटीच्या त्या तोकड्या जागेत गाडी लावायला जागा नव्हती. त्याकाळी आजच्याप्रमाणे घरोघरी भरपूर वाहने नसत. पण `भला उसकी साडी मेरी साडी से सफेद कैसे? ' अशा त्या गृहनिर्माण सोसायटीतील लोकांच्या स्पर्धेमध्ये जवळजवळ सर्व घरी गाड्या आल्या. त्या गाड्या लावताना आमच्या झाडांच्या फांद्या, एक-दोन आंब्याची झाडे जमीनदोस्त झाली. नारळाची झाडे तोडावी म्हणून नगरपालिकेतर्फे नोटीस आली.

आदिवासी लोकांमध्ये एक प्रथा असते. एखादे झाड तोडायचे असले तरी सर्व लोक एकत्र जमतात व त्या झाडासमोर खूप आरडाओरडा करतात. त्या झाडाला शिव्या देतात. नवल म्हणजे ते झाड कितीही मोठे असले तरी ते कमजोर होऊन कोसळते. सोसायटीने ते केले. झाडांचे युद्ध फारच पेटले. अर्थात एकटे आई-वडील त्या वीसजणांच्या सोसायटीतील शंभरजणांबरोबर किती टिकाव धरणार? मी व भाऊ तसे लहानच होतो. झाडे तोडण्यासाठी शिव्या देणाऱ्या आदिवासींप्रमाणेच मोठमोठ्या ऑफिसमध्ये नकोशा कर्मचाऱ्याला हाकलून लावताना आपण हीच पद्धत, आदिवासींची वापरतो ना! त्रासाला कंटाळून तो, ती नोकरी सोडते किंवा कुठे निघून जाते, आत्महत्या करते. एकत्र कुटुंबातील नकोशा सुनेलाही आपण असेच तर करतो. तिच्या स्वयंपाकाला नावे ठेवणे वगैरे त्रास दिला की ती घर सोडून जाते. 'Call the Dog mad & Kill him' नवरा बायकोच्या धुसफुसीतूनही शेवटी आपण हेच करतो. मनाने खचून ती, तो आजारी पडतो. बिछान्याला खिळतो. त्याची मनशक्ती कमी होते. मानसिक खच्चीकरण होते व तो, ती एखाद्या रोगाला पटकन् बळी पडतो आणि जग सोडून जातो. सोसायटीतल्या लोकांनी नेमके तेच केले.

कधी वाटते आपण सर्व आदिवासीच झालो आहोत. त्या सोसायटीतील लोकांच्या कटकटीने एक नारळाचे झाड आपोआपच मेले. दुसऱ्याला भुंगा लागला. नारळाच्या झाडांवर पसरणारा हा रोग झाडाला सुकवू लागला. वर्षाकाठी दीडशे नारळ देणारे झाड फळेनासे झाले. माझ्या मैत्रिणीचे वडील कृषी विभागात होते. त्यांच्या मदतीने मी एक कृषी

सहाय्यक आणला. त्याने त्या झाडाला इंजेक्शन दिले. चुरे-सुर्र आवाज करत ते इंजेक्शनचे औषध झाडभर पसरले. जे झाड बचावले. पण त्या बचावलेल्या झाडाला बघून मला ज्यावेळी आनंद होई, त्याच वेळी दुसऱ्या मेलेल्या झाडाबद्दल वाईटही वाटे.

अशीच एक दिवस आमची आई अचानक वारली. वाडी सुनी झाली. दादा कमजोर झाले. सोसायटीतील मातब्बर लोकांनी बंगला विका, आम्ही पैसे देऊ, वर तुम्हाला फ्लॅट देऊ, अशी हाकाटी वडिलांच्यामागे लावली. आम्हा बहिणींना आर्थिक व्यवहारात रस नव्हता. तो बंगला आमचे बालपण होते. आमचे माहेर होते. आमचा वारसा होता. `ऐतिहासिक वारसा असलेल घर इमारती राखण करा' असा आग्रह सरकार कायम करते. पण प्रगतीच्या लाटेवर आरूढ होऊन आर्थिक फळे चाखण्याची चढाओढ समाजात लागली आहे. त्यात वादळाने विस्कळीत होऊन उन्मळून पडणाऱ्या वृक्षांप्रमाणे वाडे, बंगले, किल्ले, तटबंदी कोसळते आहे. आमचा बंगला किती काळ राहणारा होता? एक दिवस बाजूच्या सोसायटीच्या माणसांनी फार आग्रह केल्याने नारळ तोडणाऱ्याला बोलवले. तो तीन हजार रुपये मागू लागला. त्याला आम्ही परत पाठविले.

मी म्हणाले, `दादा झाडे नको तोडायला. मला करमणार नाही? ' दादा म्हणाले, `शेतकरी दादांची या माहेरची परीराणी आहेस तू. राजपुत्राबरोबर भुर्रकन घोडागाडीत बसून उडून जाशील. वाडीत लक्ष घालू नको. भाऊ बघेल. ' मी लाजले. माझ्या मनातील अळीचे सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर झाले. मी वयात आले. मी सुंदर दिसते असे येता जाता लोक मला व दादांना सांगू लागले. मी वाडीतले लक्ष काढले.

पुन्हा नोटीस आली. पाने पडून गाडीचे अथवा जीवाचे नुकसान झाल्यास भरपाई द्यावी लागेल. वडिलांनी भावाला सल्ला विचारला. भाऊ तेव्हा नोकरीच्या निमित्ताने शहरात राहात होता. त्याने लग्नही केले होते. मुलींना त्यांचे मत विचारायची पद्धत समाजात तेव्हाही नव्हती व आताही नाहीच. त्यामुळे `तुझी अक्कल स्वयंपाकघरात' असे

म्हणून भावाने मला पिटाळले. भाऊ म्हणाला, `पैसे द्यायचे. झाडे तोडण्यासाठी येणारा खर्च यांना देऊ दे.' भाऊ त्या सोसायटीच्या अध्यक्षांना भेटायला गेला. गोड बोलून आपलेसे करणे व दुसऱ्याचे आहे ते हडपणे ही कला त्याला चांगलीच अवगत होती. पैसेही गेले. झाडेही तोडली व लाकडेही. तो पाटील अध्यक्ष घेऊन गेला. वाडी पिकेना. शेती करायला कुणी मिळेना. गावकीच्या राजकारणाने व प्रगतीच्या चुकीच्या कल्पनांनी शेती सोडून शेतकरी शहराकडे निघाला. दादा पण शहराकडे जायच्या गोष्टी करू लागले.

वाडी भकास वाटू लागली. पहिले झाड मेले. आई गेली. दुसरे झाड तोडले. आता दादा... माझे मन अनामिक भीतीने खंगू लागले. आपल्या समाजात मुलगी सोळा वर्षाच्या वयापासून उपवर होते. म्हणजे ती वयात आल्यापासूनच आई-वडिलांबरोबरच समाजसुद्धा झुरणीला लागतो. `हिचे लग्न कधी करता?' असं लोक विचारू लागतात. सोसायटीतील काही घरांतून माझ्यासाठी प्रस्तावही आले. अर्थात `हुंडा म्हणून ही वाडी मिळावी.' अशी बेरकी व स्वार्थी खेळी त्यात असे. अर्थात माझा भाऊ बंगला, वाडी, पैसा यापैकी काहीही सोडणार नव्हता आणि जग शेवटी पैशाभोवतीच फिरते. त्याने तसे स्पष्ट सांगितले. ह्या प्रस्तावानंतर त्यामुळे व भावाच्या खुलाशानंतर माझी स्थिती द्विधा झाली. वडीलसुद्धा गप्प गप्प झाले. मला ते गाव, ती गल्ली, ती वाडी सोडावी लागली. कारण वडिलांचा मृत्यू झाला. माझे सीतापूरचे घरटे सुटले. मी दुसऱ्या लक्ष्मणपूरला घरट्यात राहायला गेले.

भावाचे लग्न झाले होते. मी तेव्हा जेमतेम अठरा वर्षांची होते. आई-वडिलांचे छप्पर हरवले. मी भावाच्या घरी शहरात राहायला आले. हे शहरातील घर वडिलांनीच घेतले होते. पण घेतानाच कायदेशीररीत्या भावाच्या नावावर केले होते. मी त्या गावी कॉलेजला प्रवेश घेतला. माझे कॉलेज जीवन सुरू झाले. छोट्या खेड्यातून जिह्यात आले. हे लक्ष्मणपूर जिल्ह्याचे ठिकाण होते. शहरापासून दहा कि. मी. अंतरावर होते.

जसे पक्ष्यांचे घरटे तसे प्रत्येक माणसाचे घर असते. हे घर, फ्लॅट हा त्याचा संवेदनक्षम विषय असतो. प्रत्येक फ्लॅटला एक बाल्कनी असते. सुंदर बंगला असला तरी

अंगणाकडे तोंड करून एक बाल्कनी असतेच. रहिवासी संकुलात मोठे गार्डन असते. क्लब हाऊस असते. पण त्या सर्वात नजरेत भरते ती बाल्कनी. सम्राट शहाजहाँसुद्धा त्याच्या महालाच्या बाल्कनीतून ताजमहालाकडे बघत अश्रू ढाळत असे. असे इतिहासात लिहिले आहे. कितीही मोठे घर असले तरी शेवटी मनाशी संवाद साधायला माणसाचा हक्क चालतो तो या दहा बाय चार फुटाच्या बाल्कनीवरच. हो! घराची बाल्कनी ही तशी खाजगी जागा असते. तरीही त्यात बाहेरच्यांनाही डोकावता येते. अंदाज घेता येतो. सामान्य माणसाचे आयुष्यही ह्या बाल्कनीप्रमाणे असते. खाजगी आयुष्यातील घटना बाहेरच्यांनाही कळतात. तर हे मध्यमवर्गीयांचे घर आहे व मी गरीबाघरची मुलगी आहे. हे बघूनही कळत होते.

तर ही माझ्या भावाच्या घराची बाल्कनी आहे. बाल्कनीत अनेक छोट्या-मोठ्या कुंड्या आहेत. त्यात बऱ्यापैकी उंच अस्ताव्यस्त वाढलेली झाडे आहेत. संपूर्ण लोखंडी जाळीने बंद ह्या बाल्कनीवर सर्वत्र एक लाल फुले येणारी गणेशवेल पसरली आहे. दुसरी एक जांभळया फुलांची गारवेल उरलेली जागा व्यापून टाकते. या दोन वेलींमुळे बाहेरून जाणाऱ्यांना बाल्कनीतले काही दिसत नाही. पण आतली व्यक्ती मात्र बाहेर बघू शकते. थंडही वाटते.

भावाचे म्हणजे माझे हे घरटे सुंदर होते. पूर्वी मी ह्या बाल्कनीत फक्त एखादा क्षणच येत असे. कॉलेजमध्ये, नदीकिनारी, रानफुलांच्या सहवासात, मोकळया हवेत गार वाऱ्यावर रानात फिरायला मला खूप आवडत असे. पूर्ण गाव काय, हे शहरच माझी बाल्कनी होती.

सीतापूरहून तर ही माझी गोष्ट लक्ष्मणपूरमध्ये पुढे सरकली. मी सारिका. एक सुंदर, आनंदी, गोड व हुशार मुलगी म्हणून प्रसिद्ध होते. माझ्याबद्दल कॉलेजमध्ये चर्चा होत असे. लेडीबर्डची सायकल घेऊन, लांब केसाचा उंच पोनीटेल बांधून मी कॉलेजला जाऊ लागले, की लोक थबकून, वळून वळून बघत असत. `सुंदर डोळयांची मुलगी' म्हणून कॉलेजमध्ये मी प्रसिद्ध होते. आनंदी बागडणारे फुलपाखरू होते मी! कथ्थक नृत्याच्या परीक्षा दिल्या होत्या. उत्तम नृत्यांगना होते मी!

ही गोष्ट पुढे सुरू झाली तो दिवस एप्रिलमधला होता. निवडणुकीचे दिवस होते. कॉलेजला सुट्टी होती. मी घरात टीव्ही बघत सोफ्यावर पसरले होते आणि दरवाजाची बेल वाजली. पलीकडच्या पाच बंगला कॉलनीतील काकू आल्या होत्या. त्या म्हणाल्या,

`वहिनी आहेत का? ' मी वहिनीला बाहेर बोलावले.

`आम्ही सर्वजणी आपल्या पक्षाच्या अण्णासाहेबांच्या निवडणूक प्रचारासाठी जात आहोत. आपल्या समाजात स्त्रिया मतदान करीत नाहीत. त्यामुळे पक्षाचे नुकसान होते. स्त्रियांची मते मागण्यासाठी जातीच्या स्त्रिया व मुली सोबत असलेल्या बऱ्या असे आम्हाला वाटते. तुम्ही याल का? '

वहिनी म्हणाली, `माझं बाळ लहान असल्याने मला जमणार नाही. '

`तुम्ही सारिकाला पाठवता का? ती बोलतेही छान! ' काकू म्हणाल्या.

यावर वहिनीला काय बोलावं तेच सुचेनासं झालं. काकू म्हणाल्या, `कबूल की लाडकी लेक आहे तुमची. आम्ही सांभाळून नेऊ हो आणि पडद्यात किती काळ ठेवणार आहात?'

अखेर नाइलाजाने मी येईन म्हणाले. वहिनीला घरावर पसरणाऱ्या राजकारणाच्या पाशाची जाणीव झाली. ती म्हणाली, `सारिकाताई सांभाळून ज़ा'

दुसऱ्या दिवशीपासून दोन महिने मी त्या प्रचारफेरीत जाऊ लागले. आम्ही दहा-बारा मुली होतो. सात-आठ महिला होत्या. अनेक पुरुष होते. आम्हाला काम म्हणजे फलक रंगवणे, पाणी, खाऊ घेणे, भेळ कालवणे, घरोघरी पत्रके वाटणे, गावातील महिलांशी थोडाफार संवाद साधणे.

या प्रचारादरम्यान काकूंच्या बहिणीचा मुलगा आदित्य पाटील जो सीतापूरला आमच्यासमोर फ्लॅटमध्ये काही दिवस राहात होता, त्याच्याशी माझी पुनर्भेट झाली.

सीतापूरला तो माझ्याशी बोलत नसे, की गप्पा मारत नसे. पण आम्हाला इथे तो जीपमधून नेत असे. लांबवरच्या पाड्यांमध्ये जायचे असले की तो गाडीत माझ्याजवळ येऊन बसत असे. कधी उशीर झाला तर मला जीपमधून किंवा चालत घरापर्यंत पोहोचवत असे. मी बाल्कनीतून त्याला हात केल्यावरच तो त्याच्या घरी किंवा काकूंकडे जात असे. त्याचा परिचय झाला. मैत्रीला सुरुवात झाली. आदित्य तसा व्हीआयपी कुटुंबातला होता तरी वेगळा होता. त्याला गर्व नव्हता. कधी कधी उगीच मागे रेंगाळून चोरटा स्पर्श करून आदित्य स्वतःच्या भावना माझ्यापर्यंत पोहोचवायचा प्रयत्न करीत असे. त्यांच्या श्रीमंत कुटुंबात माझा सून म्हणून टिकाव लागणे शक्यच नव्हते. मला आईवडील नव्हते. आमची फारशी मोठी शेतीवाडी नव्हती. गरीब सुंदर मुलीशी लग्न करणारे हीरो फक्त हिंदी चित्रपटातच असतात. हुंडाबंदी फक्त कागदावरच असते, हे मी जाणून होते. त्यामुळे मी न गुंतण्याचा प्रयत्न करीत होते. पण अठराव्या वर्षी तेवढे कळण्याची अक्कल नव्हती. मनाला कितीही बजावले तरी माझी नजर त्याला शोधत असे.

आदित्य माझ्याहून अठरा वर्षांनी मोठा होता. सुस्थितीत होता. त्याला नोकरी होती. सर्वजण त्याच्याशी आदराने वागत असत. एकदा आम्ही नदी पलीकडच्या सोनपाड्यावर एका छोट्या कसब्यात प्रचाराच्या कामासाठी गेलो होतो. परत येताना कुणातरी नातेवाईकाच्या शेतावर हुरडा खायला जायचे ठरले. मी मात्र कंटाळा आल्याने घरी जायचे म्हणत होते. अशक्त व नाजूक असल्याने खरे तर मला एवढे चालणे, फिरणे, जेवणाचे हाल झेपत नसत. त्यामुळे मी घरी जायचे म्हटल्यावर, कोणीही विरोध केला नाही. आदित्यकडे सर्व जण त्याचा विचार जाणण्यासाठी, आज्ञार्थी बघत होते. तो `जाऊ दे' म्हणाला. मी घरी यायला बस स्टॉपवर निघाले. माझ्या पाठोपाठ आदित्य स्कूटर घेऊन आला. मला पोहोचवायचे काम त्याने स्वीकारले होते. तिन्हीसांजा झाल्या होत्या. एका छोट्याशा ओढ्यापाशी त्याने स्कूटर थांबवली.

`पाण्यात पाय टाकून बसू या? ' तो म्हणाला. मी मान हलवली. त्याने ओढ्याच्या काठावर जाऊन बसताच माझ्याशी मैत्री करण्याची इच्छा व्यक्त केली.

संधिप्रकाशात, पक्ष्यांच्या किलबिल आवाजात, ओढ्याच्या खळखळीतही मला हृदयाचा आवाज ऐकू येत होता. त्याचे स्पष्टपणे विचार व्यक्त करणे मला आवडले. आदित्यने माझा हात हातात घेतला व थोड्या वेळाने त्याच्या गळयातली चेन माझ्या गळयात बांधली.

`ह्या सूर्याच्या साक्षीने मी आज तुला माझी पत्नी मानतो. ही चेन मला अण्णांनी दिली आहे. हेच तुझे मंगळसूत्र समज. ' त्याच्या अनपेक्षित कृतीने मला धक्काच बसला.

दूरवरून गाडी येण्याचा आवाज येताच आम्ही दोघे उठलो व त्याच्या स्कूटरजवळ आलो. तो मला स्कूटरवरून सोडायला घरी आला. घरात भाऊ-वहिनी होते. त्याने सरळ भावाशी लग्नाचा विषय काढला. भावाने विचारले.

`तुझ्या घरून विरोध झाला तर? गरीबाघरची मुलगी चालेल का? '

आदित्य शांतपणे म्हणाला, `आमच्या घरी आमच्या सर्व निर्णयांवर अण्णांचे अधिपत्य चालते. ह्या महिन्यातच लग्न करायचे म्हणजे ही निवडणुकांची धामधूम असल्याने अण्णा विरोध करणार नाहीत. माझ्या आईला सारिका खूप आवडते. बाबांचाही होकार आहे. मी घरची परवानगी घेऊन हा विषय काढतो आहे. फक्त अण्णांच्या मनात वेगळी मुलगी आहे. पण तुम्ही उद्या शेतावरच्या घरी आईबाबांना भेटायला या. तारीख ठरवू या. '

आम्ही दुसऱ्या दिवशी शेतावर आदित्यच्या आईबाबांना भेटलो. पंधरा तारखेला सकाळी आदित्यच्या घरी (शहरातल्या) जमून आम्ही शेतावर यायचे व तिथे साधेपणाने लग्न करायचे असे ठरले. भावाला वाटले खर्च नको म्हणून ह्या लोकांनी ही सूचना केली. वहिनी म्हणाली, `माणसे साधी आहेत. ' त्यांच्या चांगूलपणावर विश्वास टाकून आम्ही खूश झालो होतो.

स्वप्नपूर्तीचे दिवस जवळ आले होते. आदित्यच्या डोळयांत नवीन चमक आली होती. मला आदित्यचा पैसा, नाव, प्रतिष्ठा यापैकी कशातच रस नव्हता. आदित्य आवडत

होता. त्याने आपणहून लग्नाचा प्रस्ताव ठेवला होता. कुठल्याही खानदानी मुलीला अभिमान वाटावा अशीच गोष्ट होती ही. अर्थातच आम्ही निवडणूक प्रचारासाठी व्यवस्थित जात होतो. कारण आदित्यने `एवढ्यात कुणाला सांगू नका' असे म्हणून बजावले होते. त्याचे आई-वडील गुपचूप लग्न उरकायचे म्हणाले. तरीही प्रेमाच्या नशेत मला कधीही काही वावगे वाटले नाही. संशय आला नाही. गरीबाघरच्या मुलीला उच्चभ्रूंची खेळी कुठून कळणार?

आदित्य माझ्यापेक्षा खूपच मोठा होता. अविवाहित होता. पण त्याचे काम थंड होते. अनावर वासना त्याच्या नजरेत कधीही नव्हती. विवाहसंस्थेचे पावित्र्य तो जपत होता. त्याने मला लग्नाआधी कधीही ’तसा’ स्पर्श केला नाही. एकटक बघत राहणे व हात हातात घेणे त्याला फार आवडत असे. हळूहळू अबोल वाटणारा आदित्य खूप बोलू लागला.

लग्नानंतर मद्रासच्या गोल्डन बीचवर जायचे. रामेश्वरचा समुद्र पाहायचा. आपले लग्न, आपली मुले, जगण्याची उमेद, माझी आई, माझे घर, एक ना अनेक गोष्टी तो करत असे. एक दिवस त्याने मला विचारले, `मेथीची भाजी, भाकरी व शेंगदाण्याची चटणी या-व्यतिरिक्त काही स्वयंपाक करता येतो का? '

`मी नाही म्हणाले तर लग्नाला नाही म्हणशील. ' मी विचारले.

`नाही, तसे नाही. मग मीच स्वयंपाक करायला शिकेन. ' आदित्य म्हणाला. यावर आम्ही दोघे हसू लागलो. रिमझीम पाऊस पडू लागला. आम्ही शांतपणे शेतात फिरत होतो. मर्यादा व संयमाच्या रूळांवर वावरूनही ते दिवस आमच्या जीवनातले मधुचंद्राचे दिवस होते. दुसऱ्या दिवशी प्रचारसभेच्या कार्यक्रमाला मी पांढरा घागरा व लाल टॉप घातला होता. घागऱ्यावर अंतराअंतरावर लाल गुलाबाच्या आकाराची लोकरीची फुले लावली होती. केस मोकळे सोडले होते. काकू मला म्हणाल्या, `तू तर या ड्रेसमध्ये सिण्ड्रेला दिसतेस. ' आदित्य माझ्या शेजारी गाडीत बसला व कानात म्हणाला, `राजकुमार कुठे आहे? ' काकूंनी ऐकले. त्या म्हणाल्या, `काय हळूहळू बोलतोय रे तिला? ' तो गप्प बसला.

मी पपी लव्ह, फील गुड, गुड-फिल, सेव्हन्थ हेवन सर्व काही त्या काळात उपभोगले. आम्ही रोज एकत्र फिरत असू. आदित्य मला घराच्या दारात सोडत असे. मी वर गेले की गॅलरीतून, बाल्कनीतून त्याला बाय करीत असे. लग्नच ठरले म्हटल्यावर भावाला काही विरोध करण्याचे कारण नव्हते. भावाच्या लक्ष्मणपूरला त्या सोसायटीत लोकाना थोडा संशय येत होता, पण आम्ही कुणाला काही सांगितले नव्हते. आम्ही खूश होतो. आनंदी होतो.

सुट्टी संपली. कॉलेज सुरू झाले. लग्न जेमतेम पंधरा दिवसांवर येऊन ठेपले होते. माझ्या कॉलेजच्या दाराशी एक रिबन बॉलचे ब्रिटिशांच्या काळातील झाड एक मोठे होते. आदित्य संध्याकाळी तिथे येऊन बसला होता. हा इतरांना सांगतो, `सांगू नको आणि उघड येऊन बसतो इथे. ' मी मनातच करवादले. एक मैत्रीण वंदना सोबत होती. तिला `पुढे जा, मी जर्नल विसरले' असं सांगून पुन्हा वर्गात गेले. पुन्हा बाहेर आले तर कॉलेज रिकामे झाले होते. आदित्य अस्वस्थपणे नखं खात तिथे  बसला होता.

आम्ही दोघे त्या झाडाच्या दगडी चौथऱ्यावर बसलो. आदित्य गंभीर दिसत होता. मला बघताच उभा राहिला व म्हणाला, `तू बस. मी उभा राहून बोलतो. सारिका, मी तुला कधी विचारलेच नाही. तुला मी पसंत आहे ना? तुझ्या आयुष्यात दुसरे कुणी असेल तर माझा तुझ्यावर दबाव नाही. तू दडपणाखाली राहू नकोस. तुझं मन सांगेल तेच तू स्वच्छंदीपणे कर. माझ्या राजकीय घराण्यामुळे दबावात तू हो म्हणू नकोस. '

`मला तू आवडतोस. ' मी म्हणाले. बाजूला एक टिटवी पाण्याजवळ टींव टींव ओरडत होती. आदित्यचा स्वभाव नैराश्याकडे झुकण्याचा होता. माझ्याही पोटात कुठेतरी तुटत होते. काहीतरी दुरावा आमच्यात येतो की काय? मला भीती वाटत होती. अशुभाच्या शंकेने मन कासावीस झाले. आदित्य पुढे म्हणाला,

`सारिका, मी तुझ्यापेक्षा अठरा वर्षांनी मोठा आहे. मला कायमची बीपीची गोळी लागली आहे. मी तुझ्या प्रेमात पूर्णपणे गुंतलो आहे. पण मला घरून विरोध होईल का याची

मात्र भीती वाटते. मी आजपर्यंत रोज तुला घरी दरवाजापर्यंत पोहोचवले. लोक काय म्हणतात याची कधी पर्वा केली नाही. कारण तुझ्यामुळे मला माझ्यातले अस्तित्व सापडले. ताजमहालाचे महत्त्व मला कळू लागले. कबरमध्ये मुमताज. बाहेर हिरवळ, वर चंद्र, पुढे यमुना नदी असते. फक्त तोच `ताजमहाल' काय प्रेमाचे प्रतीक थोडेच असतो? हे रिबन बॉलचे झाडही प्रेमाचे प्रतीक बनू शकते ना? '

मी मान हलवली व `हो' म्हटले. त्याने मान झटकली व दूरवर दरीकडे पाहू लागला. `सामान्याहूनही साधी माणसे ह्या प्रेमाच्या शिदोरीवरच जगतात. आदित्य निराशावादी होऊ नकोस. तू मला हे मंगळसूत्र बांधलेच आहेस ना! अगदी काही झाले तरीही मी तुझीच पत्नी राहीन. ' मी दिलासा देत म्हटले.

दुसऱ्या दिवशी प्रचाराच्या कार्यक्रमात आदित्य माझ्या जवळ आला.

`सारिका, अण्णा माझे लग्न होऊ देणार नाहीत. मी आयुष्यभर त्यांचे व त्यांच्या उपकाराचे ओझे का वाहू? सारिका तुला चाईल्ड ॲब्युज माहीत आहे? मी नकारार्थी हात हलवला. एकदमच शाळकरी आहेस तू? तुझी निरागसता अशीच राहो. ' आदित्य म्हणाला, `तू एकटी कुठे जात जाऊ नकोस. स्त्रीच्या कौमार्याची, तिच्या अब्रूची किंमत कुणी कशी मोजतो, तर कुणी कशी मोजतो. स्त्रीचे कौमार्य हिसकावून घ्यायला, लहान मुलांचा गैरफायदा घ्यायला दुष्ट लोक टपलेले असतात. लहान मुलांचेही बालपण, कौमार्य हिसकावून घेतले जाते. पुरुषसुद्धा बालपणी कुणाच्या तरी अनैसर्गिक वासनेला बळी पडू शकतो; पण तो बोलू शकत नाही. '

`म्हणजे काय आदित्य? ' मी विचारले.

`मला अण्णांबद्दल काही सांगायचे आहे सारिका. ' आदित्य पुटपुटला.

तोच काकूंनी बोलावल्याने आदित्यचे बोलवणे अर्धवट राहिले. त्या दिवशी आदित्य मला घरी सोडायला आला नाही. काकूंच्या नजरेत दरारा होता. त्या मला म्हणाल्या,

`तू उद्यापासून प्रचाराला येऊ नकोस. ' माझे काय चुकले. मलाच समजेना. मी पाय ओढत घराकडे वळले. कोपऱ्यावर एक गाडी माझ्या जवळ येऊन थांबली. मला काहीतरी संशय आल्याने मी पळत जाऊन जवळच्या दगडू वाण्याच्या दुकानात जाऊन थांबले. `बलात्कार' हे हत्यार अशा नराधमांच्या हातात कुणी दिले? मी मोठ्या  संकटातून वाचले. नालायक तरुणांच्या वासनेची बळी होता होता बचावले. मी म्हणजे शरीर होते. तरुण, कोवळया मुलींच्या कथा झोपडीत वेगळया व उच्चभ्रू वसाहतीत वेगळया असतात असे अजिबात नाही. कधी मुलीच्या अगतिकतेची किंमत फक्त पायलीभर धान्यात मोजली जाते, तर कधी लाखांची, कोटींची बोली लावले जाते. कधी लग्नाची खोटी वचने देऊन कौमार्य लुटले जाते. लग्न म्हणजे तरी काय? अनेकांच्या वासनेला बळी पडण्यापेक्षा एखाद्या पुरुषाबरोबर राहावे या कल्पनेतून जन्माला आलेली  तडजोडच ना!

दुसऱ्या दिवशी आदित्य माझ्या घराखाली रस्त्यावर येऊन उभा राहिला. मी खाली आले. आदित्य खूपच निराश होता. त्याला काकू रागावल्या होत्या. `सारिका मी तुझाच आहे. मी लवकर मेलो तरीही तू शिक्षण घे. नर्तिका बन. माझे शरीर मातीत मिसळले तरीही मी तुझीच वाट पाहीन. माझे हे डोळे तू माझ्या डोळयांचा मुका घ्यावा ह्याची वाट पाहात राहतील. '

`आदित्य आता घरी जा आणि झोप. लग्नाचा दिवस जवळ येतो आहे. खूश राहा. ' असे सांगून मी त्याला घरी पिटाळले.

दुसऱ्या दिवशी देवळाच्या पायऱ्यांवर भेटायचे वचन घेऊन आदित्य गेला. मी रात्रभर अस्वस्थ होते अस्पर्शीत जीवनात प्रेम करायचीही भीती वाटते. जखमांचाही धोका असतो. मी आदित्यशिवाय कशी जगेन? नैराश्य हा रोग संसर्गजन्य असते का? आदित्यचे विचार मलाही निराश करून गेले. धुक्यातल्यासारखे अंधुक भविष्य, सत्याशी असंबद्ध विचार मला छळू लागले. मी अश्रू लपवले व माझ्या बाल्कनीत आले. माझे लक्ष आदित्यच्या घराच्या

दिशेने गेले. गांधीजींच्या पुतळयाजवळ आदित्य सिगारेट पीत उभा होता. त्याच्या बाल्कनीतून पसरणारे संदेश माझ्या बाल्कनीपर्यंत पसरत होते. दोघेही सारख्याच प्रमाणात बेचैन होतो. ऐन उमेदीची वर्षे मुलांना त्यांच्या मनाविरुद्ध लग्न करायला सांगून कुणाचे भले होते? काकूंनी, अण्णांनी, माझे व आदित्यचे लग्नही करून द्यायला, मला स्वीकारायला काय हरकत आहे? `देवदास' सिनेमात दाखवल्याप्रमाणे घरची माणसे दुसऱ्याच्या मुलीबरोबर स्वतःच्या मुलीचेही आयुष्य नकळत उद्ध्वस्त करतात.

मला असे उद्ध्वस्त करून त्यांना काय मिळाले? गरीबाघरच्या गुणी मुलींनाही काहीच किंमत नसते? हुंड्याचा शोध कुणी लावला? सेलमध्ये वस्तू खपावी म्हणून काहीतरी फ्री देतात तसे मुलगी खपावी म्हणून बंगला फ्री - मुलगी जावी म्हणून हॉस्पिटल फ्री! शेती फ्री! दागिने फ्री! काकूंनी विरोध का केला? अण्णांचे व आदित्यचे संबंध वेगळे होते म्हणतात. म्हणजे नक्की काय? काकूंनी स्वार्थासाठी लाडकेपणा, फेव्हरीटीझम दाखवला? मी कुणाचीच लाडकी का नव्हते? आदित्यने मात्र ह्या तीन महिन्यांत मला खूप प्रेम दिले. माझ्या मनातील प्रियकराच्या प्रतिमेला मिळणारे सुख प्रतिमेतच राहणार होते का? प्रियकर म्हणण्यासारखा आदित्य होता का? अजिबात नाही.

आदित्यची तब्येत तशी तोळामासाच होती. कधी पायच सुजलेले, कधी दारूच उतरलेली नसे. पण एक वेगळेच आकर्षण त्याच्यात होते. टपोरे डोळे, तरतरीत नाक, उंची, टवटवीत गोरी त्वचा व ग्लॅमरचे सत्तेचे वलयही होते. कुठल्याही मुलीला नादी लावू शकेल असे व्यक्तिमत्त्व असतानाही तो का अविवाहित होता? काळा चेक्सचा शर्ट घालून आदित्य जाऊ लागला की, बऱ्याच फ्लॅटमधल्या मुली बाल्कनीत उभ्या राहून त्याच्याकडे पाहात. एक दोघी बोलायचा प्रयत्न करीत असत. निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने मी त्याच्याशी ओळख वाढवली असा काकूंचा माझ्यावर आरोप होता. अण्णांच्या सुरक्षा कवचात तटबंदीत असलेल्या आदित्यजवळ पोहोचल्यामुळे मी त्यांच्या कुटुंबाच्या रोषाची बळी ठरत होते.

घरून विरोध होता म्हणणारा आदित्य भेटायला मात्र येत असे. नवनवीन निसर्गरम्य जागा कुठून शोधून काढी काही कळत नसे.

एकदा मला फिरायला नेताना म्हणाला, `मी लग्न झाल्यावर तुझे नाव बदलून समृद्धी ठेवणार आहे. ' मी विचारले, `म्हणजे श्रीमंती. धन, पैसा'

तो म्हणाला, `अजिबात नाही. श्रीमंती म्हणजे समृद्धी नव्हे. माणूस समृद्ध होतो तो प्रेमामुळे! तू मला आयुष्याचे वेगळे रूप दाखवले. मी जणू तुझ्याबरोबर माझ्या आयुष्याची सेकंड इनिंग वेगळया वैचारिक धारणेने जगणार आहे. लग्न झाले की सर्वजण राग विसरतील. ' गाडी घेऊन आम्ही गावाबाहेरच्या एका टेकडीवर हॉटेल होते तिथे गेलो. तरुण-तरुणी तिथे जोडीने फिरायला जात असत. गार हवा असे व हवा तो एकांत असे. आम्ही दोघे एका टेबलाच्या समोर खुर्च्यांवर बसलो.

मी पुन्हा विषय काढून म्हटले, `समृद्धी नाव का ठेवायचे ठरवले आहेस? संस्कृती का नको? ' आदित्य माझ्या डोळ्यांत बघत बसला. डोक्यावरून आकाशातून एक विमान आवाज करीत गेले. आजूबाजूने एक मुलांचा घोळका जात होता. टपोरी मुले अशीच जोडीने बसलेल्या युगुलांना चिडवायला येत असत. त्यातील एकजण माझ्याकडे बघत म्हणाला, `बापलेक बसले आहेत बघ. ' आदित्यचा चेहरा पडला.

`आपल्या मधील वयाच्या अंतरामुळे व फक्त आपले लग्न झाले नाही म्हणून ते लोक असे बोलताहेत.

आदित्य तू मनावर घेऊ नकोस? ' मी आदित्यला समजावले.

`मी तुला शोभतो का गं सारिका. ' आदित्यने केविलवाणे होत विचारले. त्याचा मूड गेला होता.

`काय वेड्यासारखा बरळतोस. चल आपण परत घरी जाऊ या. ' मी त्याला

हाताला धरून उठवले. मी त्या दिवशी साडी घातली होती. त्यामुळे माझ्या उघड्या पोटाचा स्पर्श त्याच्या हाताला झाला. तो शहारला. ती टपोरी मुले आजूबाजूने फिरत होती. मला भीती वाटू लागली. त्यातला एकजण माझ्याकडे बघत म्हणाला, `यार हे काही पहिले प्रेम नाही. शिकार चालली आहे. '

आम्ही झपझप पावले उचलत टेकडी उतरू लागलो. थोडे पुढे आल्यावर दगडावर बसलो. ती मुले आमच्या मागोमाग येत होती. पण आदित्यला भरभर चालता येत नव्हते. तो म्हणाला, `सारिका मला भीती वाटते. मी तुझ्या प्रेमापासून दूर जाईन. तू माझा हात घट्ट धरून ठेव. ही आपली शेवटचीच भेट असेल का? मला मरताना तुझ्याकडे बघत प्राण सोडायचे आहेत. ' आदित्य खाली कोसळला. ज्या मुलांना मी टपोरी समजत होते तेच माझ्या मदतीला धावून आले. त्यांनी व मी मिळून आदित्यला कसे तरी उचलले व डॉ. आकाशच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले.

डॉ. आकाश मला म्हणाले, `त्याला दोन वर्षांपासून बीपीची गोळी आहे. त्याने दोन-तीन दिवस घ्यायचे टाळले असेल. ' मी आदित्यला विचारले, `अण्णासाहेबांकडे फोन करू का? ' त्या सिंकिंग फिलींगमध्येही आदित्य नको म्हणाला. मी देवाजवळ प्रार्थना करू लागले.

`देवा, आदित्य जिवंत राहू दे, या संकटातून वाचू दे. ' त्याच्या जवळ बसले. थकव्याने व तणावाने मलाही झोप लागली. जाग आली तेव्हा आदित्यला सलाइन, आयव्ही लावले होते. नर्स त्याला चहा चमचाने पाजत होती. तो चहा त्याच्या मानेवर, चेहऱ्यावर, हातावर ओघळत होता. त्याची बुब्बुळे तरळत होती. मी विचार केला. व्हीआयपीच्या ओळखीने त्याला अधिक चांगली ट्रीटमेंट मिळेल. आदित्य माझा झाला नाही तरी चालेल. पण त्याला चांगले औषधोपचार मिळू देत. मी गोंधळून गेले होते. आदित्यशिवाय मी जगू शकेन का? या नव्वद दिवसांच्या आठवणीत मी संपूर्ण जन्म काढू शकेन?

मी त्याच्या घरी काकूंना फोन केला. व सर्व सांगितले. सर्व चक्रे फिरली. त्याच्या

घरचे लोक, अण्णा, डॉक्टर धावत आले. त्या सर्वांसमोर ग्लानीत आदित्य सारिका-सारिका बरळत होता. त्या पाहुण्यांनी माझ्याकडे  बघितले सुद्धा नाही. पण खूप त्रास होत असतानाही आदित्यने माळी मॅडमला मला माझ्या घरी पोहोचवायला  सांगितले. काकू फणकारल्या. मला उगीचच वाटत होते, आजची माझी व त्याची भेट शेवटचीच असेल का? आज निरोपाचे विचार का येत आहेत? ताटातुटीचा दिवस जवळ आला आहे का? मी जड पावलांनी घरी निघाले. दवाखान्याच्या दारात अण्णासाहेब माझ्याकडे बघत सिगारेट ओढत होते. मला त्यांची नजर भेदक वाटली. रात्र तळमळतच गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी भावाबरोबर हॉस्पिटलमध्ये गेले. सोबत शिरा नेला होता. आदित्यला स्पेशल खोलीत हलवले होते. त्याच्यासमोर बेडवर त्याची नात्यातली बहीण दीदी बसली होती. ती मला म्हणाली, `मोठे लोक भेटायला येतात. तुम्ही भेटायला येऊ नका. ' मी डबा ठेवला. तो तिने परत माझ्या हातात दिला व `जा' म्हणाली. मी तरी उभी राहिली. तिने दार उघडले व मला `निघा' म्हणाली.

मी जड मनाने भावाचा हात धरून बाहेर आले. डॉ. आकाश भेटले. मला बघताच म्हणाले, `चल माझ्याबरोबर. ' भाऊ ऑफिसला गेला. मी आत आदित्यच्या रूममध्ये गेले. तेव्हा आकाशनेच माझा हात आदित्यच्या थरथरणाऱ्या हातात दिला व म्हणाला, `तिच्यासाठी तुला लवकर बरे व्हायचे आहे. ' दीदी समोर खुर्चीत पाय हलवत बसली होती. आदित्य म्हणाला, `मी मेलो तर... ' आदित्यचे डोळे भरून आले. तो पुढे बोलू शकला नाही. मी दीदीला घाबरून हात सोडवून घेतला व म्हणाले, `आदित्य आता संकट टळले आहे. पंधरा तारीख जवळ येत आहे. त्यामुळे जगण्याची स्वप्न पाहा. तो हसला व हळूच दीदीला ऐकू जाणार नाही अशा आवाजात म्हणाला, `पंधरा तारखेला सकाळी सात वाजता माझ्या बंगला कोठीवर मी पहिल्यांदा तुझा हात हक्काने हातात घेणार आहे. '

`भविष्य कळत नाही तरी भविष्य सांगायच्या कारणाने आतापर्यंत किती वेळा

हात धरून झाला? ' मी विचारले. आम्ही हसलो. `पंधरा हं! ' आदित्य म्हणाला. दीदी कान देऊन ऐकत होती. आदित्यला बरे वाटले. तो घरी परत आला व कामावर जाऊ लागला. तसा त्याचा स्वभाव अबोलच होता.

न बोलणारी माणसे सहसा कुणात गुंतत नाहीत व गुंतली तरीही त्यांचा बोभाटा होत नाही. त्यांच्या मनात काय आहे कधीच कळत नाही.

मी पंधरा तारखेची वाट पाहू लागले. नाही तरी आयुष्य म्हणजे काय असते

कशाची तरी वाट पाहणे

कुणाची तरी वाट पाहणे एक मोठे प्रश्नचिन्ह एक बंद लिफाफा ? मी एक लाडकी लेक, जिचे पुढे काय होईल कोणालाच माहीत नसते.

पंधरा जुलैला सकाळी सात वाजता मी आदित्यच्या शहरातल्या अण्णासाहेबांनी घेऊन दिलेल्या त्या घरी गेले. गळयात आईचा नेकलेस, हातात हिरवा चुडा, मेंदी सजलेले हात-पाय, कांद्याच्या रंगाची सोनेरी काठाची रेशमी साडी होती. डोळयांत लग्नाची स्वप्ने होती. मी पळत पळत जिना चढून पहिल्या मजल्यावरच्या घराच्या त्यांच्या हॉलमध्ये गेले. समोर अण्णा व काकू आले. त्यांनी मला विचारले

`कोण पाहिजे? काय काम आहे? '

आदित्यचे आई-वडील काकूच्या मागे दरवाजाजवळ येऊन उभे राहिले. आदित्यच्या बाबांनी मला हात जोडले. त्यांचे मेहुणे `माफ करा' असे तोंडातल्या तोंडात पुटपुटले. ज्याने माफी मागायची तो आदित्य समोर झोपला होता. मला काय करावे तेच समजेना. मी, आपण फोन करायला आले होते असे दाखवायचा प्रयत्न केला. शेजारच्या काकूंकडे फोन करून घरून भावाला बोलावले व निरोप दिला.

**“लग्न मोडले आहे! ”**

वळून मी दाराकडे जाऊ लागले. आदित्यच्या नात्यातल्या दोन बहिणी पायावर पाय तिरपा टाकून मला खुन्नस देत उभ्या होत्या. जणू दोघी विश्वसुंदऱ्या होत्या व त्यांना माझा जीव घ्यायचा होता. मी गोंधळून गेले. मला कळेना आदित्यने लग्नाचे वचन देऊन मला का फसवले?

ज्याला मी आपला मानले, तो त्या लायकीचा नव्हता, की आदित्यला मी त्याची पत्नी होण्याच्या लायकीची वाटले नाही. त्याने मला वासनेसाठी फसवले, गरीब म्हणून फसवले, की फक्त खेळणे समजून फसवले. अण्णांनी आमच्यात फूट पाडली? कोणती चक्रे फिरली? की त्याचेच मन माझ्यावरून उडाले? मी प्रेमात कमी पडले का?

मी जिना उतरून खाली आले. अण्णासाहेब भराभरा माझ्या पाठोपाठ खाली आले. माझा रस्ता अडवत म्हणाले,

`खानदानी घरातील मुली नाच शिकतात का? कथ्थक नृत्याचे कार्यक्रम करते म्हणून आदित्यला नाचवलेस का? '

`माझी कला आहे - तुम्ही समजता तशी मी नाही' मी घाबरून म्हणाले. आदित्याच्या त्या दोघी बहिणी माझ्याकडे कुत्सित नजरेने बघत म्हणाल्या,

`तुझ्यासारख्या बायका आमच्याकडे कपडे-भांडी धुण्यासाठी येतात. '

मी दरवाजाच्या बाहेर जात असताना अण्णासाहेब तरातरा पुढे आले. त्यांनी सरळ माझ्या नाकावर ठोसा लगावला. मी महात्मा गांधींच्या पुतळयावर आदळून खाली पडले. `आदित्यशी लग्न करायचे काय? चल माझ्याबरोबर सुहागरात कर. ' अण्णासाहेब ओरडू लागले व मला ओढत त्यांच्या बंगल्याच्या वरच्या खास खोलीत नेऊ लागले.

अण्णांच्या पाठोपाठ त्यांचे कार्यकर्ते धावून आले. कुजबुज करू लागले. त्यातला एकजण म्हणाला,

`आदित्यसाहेबांचं लफडं? ' दुसरा म्हणाला, `जाऊ द्या साहेब, करू द्या त्याला मजा. माल बरा आहे. ' एक वयोवृद्ध कार्यकर्ता म्हणाला, `मुलगी बरी आहे. वर्षभरात मुलगा होईल. मुलगा काढून घ्या व वेडी म्हणून हाकलून द्या. नाही तरी पूर्ण घराण्यात मुलीच आहेत. मुलगा झाला की नाव-आडनाव तरी चालू राहील. '

एक फॉरिन रिटर्नड कार्यकर्ता म्हणाला, `अमेरिकेत गर्भाशय भाड्याने घेण्याची पद्धत आता आली. भारतात मुलगा हवा म्हणून वर्षाच्या करारावर मूल भाड्याने घेतात. मुलगी झाल्यावर त्या बाईला हाकलून देतात. मूल होऊ दे, नंतर वाटल्यास हिला मी ठेवून घेईन. मुलगा नाही झाला, हीला मुलगी झाली तर मुलगी देऊ या देवळात सोडून'

दीदी पायऱ्या उतरून खाली आली.

पण अण्णा म्हणाले, `हाणा तिला' एक-दोन काठ्या पुढे झाल्या. तोच आदित्यचे बाबा लंगडत पुढे आले.

`अण्णा तिला मारू नकोस. मीच त्यांचे लग्न ठरवलंय. ' अण्णांनी उगारलेला हात थबकला. मी उठले व कशीबशी ठेचकाळत त्या कोठीपासून दूर जाऊ लागले. मात्र अण्णांनी शिव्या देत मला खेचत वरच्या खोलीकडे नेत म्हटलं, “ चल तु सरळ, तुला धडा शिकवतो. ”

आदित्यच्या कोठीचा काय पत्ता होता

*सावित्री फुले मार्ग,*

*शहीद हुतात्मा चौक,*

*महात्मा गांधी पुतळ्यासमोर,*

*लक्ष्मणपूर, महानराष्ट्र*

जिन्यावरून मला वर खेचताना अण्णांच्या डोळयांत राग होता. वासना होती. तेव्हा अण्णा माझ्या गळयातल्या आदित्यने बांधलेल्या चेनकडे बघत होते. मी म्हणाले, `ही ही तुमच्या आईची चेन आहे. आदित्यला कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाले म्हणून तो तुम्हाला भेटायला आला तेव्हा तुम्ही त्याला दिली होती . मी तुमची बहीण आहे समजा. पण मला काही करू नका. मला परपुरुषाची खूप भीती वाटते. मी पुन्हा इथे कधीही येणार नाही. मी हे गाव सोडून जाईन. मला सोडा. ' लग्न ठरवणारा वर मजेत होता. मार मी खात होते.

मी आदित्यच्या बाबांच्या पायावर पडले व म्हणाले, `माझी काही चूक नाही. मला मारू नका. तुम्ही मला माराल तर तुमच्या घरच्याही मुलीही ह्या चौकात तडफडून मरतील. '

मी अण्णांना हात जोडून म्हणाले. `अण्णा, आदित्य मला लग्नापूर्वी तुमच्याकडे घरी घेऊन गेला होता. तो म्हणाला होता, `आपण अण्णांना सर्व सांगू या. अण्णा म्हणतील, माझ्या दोन बहिणींसारखी ही तिसरी आहे. आजच अण्णा आपला  साखरपुडा करून देतील. पण तुम्ही अण्णासाहेब पत्नीसह चोपड्याला गेला होता. म्हणून भेटला नाहीत. बाबा त्यांना सांगा. मला हात लावू नका. त्यांना सांगा. बोला तुम्ही बाबा. '

दीदी पुढे येत म्हणाली, `आदित्यला हार्ट ॲटॅकच्या शक्यतेने जेव्हा हॉस्पिटलमध्ये आणले तेव्हा या दोघांच्या प्रणयचेष्टा चालल्या होत्या. '

मी `नाही नाही' ओरडले. `मी दोन्ही वेळा त्याला हॉस्पिटलमध्ये नेले नसते तर बाबा तो तेव्हाच मेला असता. मी त्याचा जीव वाचवला आणि तुम्ही मला मारता? '

स्त्री असूनही दीदीला दया येत नव्हती. आदित्यकडे वर खोलीत जाऊन आमच्या प्रचारसभेच्या निवडणूक कामाच्या ग्रुपमधला आकाश म्हणाला,

`आदित्य ऊठ, बाहेर ये. नाही तर मोठा अनर्थ होईल. अण्णा सारिकाला खेचून वरच्या खोलीत नेत आहेत. ' सारिका, `पुन्हा आता येणार नाही मी; येणार नाही. ' असं ती म्हणत्येय तरी तिला खेचताहेत.

`साहेब बाहेर या' मी ओरडत होते. `अण्णा मला सोडा. कितीजणांना माराल साहेब? तुमच्या पुतण्यानेच मला लग्नाचे वचन दिले. त्यालाच जाब विचारा. तो का तुमच्या आज्ञेबाहेर जाऊन प्रेम करतो? माझा काही दोष नाही. दीदी तुम्ही तरी अण्णासाहेबांना सांगा.'

दीदीने मला दूर ढकलले. मी खाली पडले.

मी उठून रक्त पुसले. केस बांधले. आदित्य वरून ओरडत होता.

`अण्णा तिला काही झाले तर मी भुलीचे इंजेक्शन टोचून घेऊन आत्महत्या करीन. तिला आधी सोडा. ' ऐकून अण्णांनी मला सोडले. मी ठेचकाळत पुढे माझ्या घराच्या वाटेने गेले. भाऊ घ्यायला आला होता. त्याच्या मदतीने पाय ओढत मी घरी आले. हॉलमध्ये बसून रडू लागले. लग्न मोडले इतपत अन्याय तरी ठीक होता, पण त्या लोकांनी मला मारावे? सर्वांनाच ते अनपेक्षित होते. वहिनीने रक्त पुसले. भावाने ओले फडके आणून दरवाजातले पडलेले रक्त पुसले. मी शांत पडून राहिले.

मी अगतिक झाले होते. माझा संताप मी कुठे व्यक्त करणार? मी मृत्यूच्या उंबरठ्यावर उभी होते. मला वाटले, जगाला शेवटची इच्छा कळावी, ती ह्यांना सांगावी. मी वहिनीला म्हणाले, `मी मेल्यावर माझ्या अस्थी बंजर जमिनीवर टाकाव्यात. जिथे कुणीही पाऊल टाकणार नाही. माझ्यासारखे दुःख कुणालाही सोसावे लागणार नाही. मी ग्लानीत गेले. पुन्हा कधीही मुलगी कुणा मध्यमवर्गीयाच्या घरी जन्माला येऊ नये, असे मला वाटते.

जाग आली तेव्हा दारात फाटकाबाहेर लाल दिव्याची गाडी व दोन-चार कार्यकर्त्यांच्या गाड्या दिवसभर उभ्या होत्या. मला घाबरवायचे होते. मी दवाखान्यात जाऊ

नये म्हणून अडथळा केला होता. मला उचलून नेऊन, काहीतरी करून, मारून टाकायचे होते. माझे आयुष्य किडामुंगीसारखे क्षुद्र होते. अण्णांनी दीदीला किंवा त्यांच्या मुलीला असे वागवले असते का? कुठे होता तो देव? वाटले जोरजोरात ओरडावे. आक्रोश करावा.

*दरीदरीतून मावळ देवा*

*देऊळ सोडून धाव*

*अखेरचा हा तुला दंडवत!*

रात्री मी कधीतरी उठून लक्ष्मणपूरमधील विहिरीजवळ आत्महत्या करायला गेले. माझ्या पायाजवळून दोन काळया नागांची जोडी सळसळत आंब्याच्या झाडाच्या दिशेने गेली. मला वाटले, ते माझे आई-वडीलच होते व ते त्यांच्या मुलीचे रक्षण करत होते. भूतकाळ, आई-वडील, जवळचे मित्र यांच्या आशीर्वादानेच आत्महत्या न करता मी परत आले. जगण्याचा मोह मला सोडवत नव्हता.

आत्महत्येची खरी कारणे क्वचित बाहेर येतात. एखादे गरीब कुटुंब आत्महत्या करते तेव्हा त्यांची गरिबी हेच कारण असते, की त्यांना त्रास देणाऱ्यांची मुजोरी असते. कारण स्त्रीमुक्तीची विधाने करणे राजकारण्यांना. सुशिक्षितांना सोपे असते. सामान्य घरी मुलीचा जन्म म्हटले की आक्रोश असतो. श्रीमंतासारखे वारसाचे प्रश्न, वंश चालवणे, प्रॉपर्टी - मुलगा हवा हा विचार गरीबांकडे कदापि नसतो. कुणावरही सूड घ्यायचा ठरवून तो घेता येणे शक्य नसते. पुतळयाच्या पायाशी पडलेले माझे सुकलेले रक्त माझ्या शरीरातील वाहत्या रक्ताला बोलवत होते. सत्ता हाती आल्यावर माज कोण सोडतो? जिवंतपणी लोकांनी गांधीजींना सोडले नाही. या जगात त्या पुतळयाने आदित्यला, अण्णांना, त्यांच्या कुटुंबीयांना, तथाकथित कार्यकर्त्यांना सद्बुद्धी देणे कसे शक्य आहे? एका असहाय्य, फसलेल्या दुर्दैवी मुलीच्या रक्ताची या देशात काय किंमत आहे? आत्महत्या करणाऱ्या सृजनकर्त्या शेतकऱ्यांना वाली नसतो! मी तर एक नगण्य व्यक्ती होते.

कुठली तरी मिरवणूक चालली होती. कुणाचा तरी जयजयकार केला जात होता. सजवलेल्या उघड्या गाडीवर उंच उभे राहून हात वर करून तो नेता लोकांचे सत्कार स्वीकारत होता. ते अण्णा होते. गांधीजींच्या पुतळयापाशी मिरवणूक थांबली. अण्णांनी पुतळयाला हार घातला. असे जीवन जगूनही ह्या लोकांच्या प्रत्येक कामाची बातमी होते. ह्या पुतळयाच्या जागी उद्या अण्णाचाही पुतळा लागेल. कशी होईल क्रांती? अत्याचाराविरुद्ध कुणी आवाज उठवत नाही. काळजी, चिंता नको, असुरक्षित मुलींवरचे अत्याचार नको, म्हणून स्त्री भ्रूणहत्या करतात व सराईतपणे, गुप्तपणे त्या चालतच राहतात. सुखाचा सोपा मार्ग! शॉर्टकट!

त्याचवेळी मी एका स्पर्धेसाठी हुंडाबंदी या विषयावर लेख लिहीला. हुंडा म्हणजे नेमके काय? हुंडाबंदीचा कायदा, उगम, सुंदर मुली, कुरुप मुली, हॅण्डसम मुले, पैसा, करियर, फसवणूक झालेले लग्न, पूर्ण गोंधळलेल्या समाजातील परिस्थिती मांडली होती. हुंडा घेणे म्हणजे फक्त विकले जाणे तरी असते का? श्रीमंत मुलांनी लग्नाचे वचन देऊन फसवलेल्या तरुणींबद्दलचे विचार मांडले होते. हुंडाबळींना आत्महत्या करताना कसे वाटत असेल? पुरुष करून सवरून मोकळे होतात व फसलेली मुलगी मात्र हुंड्यासाठी पैसा नाही म्हणून बीजवर स्वीकारते. फसलेलीची कीव इतरजण करतात. शिवाय आपल्यालाही मजा करायला मिळेल तर बरे! अशा नजरेने तिच्याकडे बघतात. सर्व शब्दच खोटे असतात. हुंडाबंदी फक्त कागदावरच असते. हिंदी सिनेमात दाखवतात तशी 'बदलेकी आग,' तो सूड कधीच शक्य नसतो, पण वेदना असतात.

कधी कधी मला माझ्या मूर्खपणाची कींव यायची. मीच तर देवाला म्हणाले होते, `आदित्य जिवंत राहू दे. मी त्याला सोडून जाईन. ' आपल्या जातीतील पुरुष फक्त हुंड्याचीच आशा धरतात का? सौंदर्य विषारी असते म्हणतात. चंद्र सर्वांनाच हवा असतो. पण चांदण्यांमध्ये आनंद मानायला स्त्रियांनी शिकायला हवे. आदित्यने कदाचित असे अनेक जणींना प्रेमाचे वचन देऊन फसवले असेल. एकदोनदा तो मला आमच्याच सोसायटीतल्या तळमजल्यावरच्या एका मुलीबरोबर गप्पा मारताना दिसला होता. मी तरी कुठे कुणाला सांगू

शकले? लपवणुकीच्या मामल्यात फसवणूक झाली. दोन वेळा मी आदित्यला मरणाच्या दारातून वाचवले होते. तरीही त्याने कधी उघड ओळख दाखवली नव्हती. पण माझ्यासारख्या किती तरी फसल्या असतील?

आग्र्याला सम्राट शहाजहाँला जेव्हा कैद केले होते, तेव्हा तोसुद्धा बाल्कनीत बसून मुमताज बेगमच्या कबरीकडे, ताजमहालाच्या भव्यतेकडे बघत बसायचा. त्याप्रमाणे मी गॅलरीत बसून आदित्यच्या घराकडे, गांधीजींच्या पुतळ्याकडे बघत राहू लागले. आईची लाडकी लेक जखमी झाली होती.

एखादा आठवडा रडण्यातच गेला. एक दिवस दरवाजापाशी उभ्या राहणाऱ्या गाड्याही गेल्या. संधिसाधूंची गर्दी गेली. भाऊ म्हणाला, `कॉलेजला जात जा. मन रमेल इतर मुलींबरोबर. ' एकटीने कुठे आडजागेवर जायचे नाही. मी दोन घट्ट वेण्या बांधल्या. शाळेतल्या गणवेशाचा जुना पांढरा पंजाबी सूट काढला. पांढरा दुपट्टा घेतला. पोटाला लाल शाळकरी पट्टा बांधला. पाठीला दप्तराची सॅक बांधली व कॉलेजला गेले.

मला कॉलेजमध्ये बघून माझ्या वर्गातील शिरीष धावत आला. माझा चेहरा बघून त्याला थोडा अंदाज आला. त्याने मला बुडालेल्या पिरीयडचे नोट्स जर्नल्स दिले. दुपारी माझी मैत्रीण वंदना मला विचारू लागली, `कोलकत्याला ट्रीपला येणार का? ' मी वंदनाच्या डोळ्यांत पाहिले व `भावाला विचारेन', असे सांगितले. ट्रीपची तयारी सुरू केली. मी कॉलेजमध्ये मन रमवायचा प्रयत्न करू लागले. लांब केस सोडून आरशासमोर उभी राहिले की, मागे आदित्य उभा आहे असा भास होई.

मी वहिनीला म्हणाले, `मला बॉयकट करायचा आहे. ?

ती म्हणाली, `घट्ट वेण्या घालत जा. नाराज राहू नका. आयुष्याची सेकंड इनिंग

पुन्हा सुरू करा. झाले गेले विसरून जा. आजपासून तुम्ही पुन्हा पूर्वीच्या आहात असे समजा'. त्यांनी मला वर उंच घट्ट बुचडा बांधून दिला. मी विरक्तीने कॉलेजात वावरू लागले. श्रीमंत आई-वडील असते तर माझ्या आयुष्याचे असे वाभाडे निघाले असते का? तरी एक बरं असतं माणसाचं, मन बाहेरून दिसत नाही व हृदयातले गळणारे रक्त डोळयांतून किंवा डोक्यातून कपाळावर गळत नाही. आणि वरवर पाहता फक्त शरीरच दिसते. मन कुणाला कधी कळतच नाही. माझी खिन्न मनस्थिती माझ्याजवळ लपून राहिली.

# प्रकरण दुसरे

माझे घराजवळ मोठी दरी होती. ती दरी मला रोज आत्महत्या करून मेलेल्या उपवर मुलींची, स्त्री भ्रूणहत्या करून मेलेल्या लहान बालिकांच्या प्रेतांची टेकडी, खुनी दरी वाटू लागली. श्रीमंत घरच्या पुरुषाच्या वासनेला बळी पडलेल्या मुलींची प्रेतं, सांगाडे, नकोशा जीवनाचे रुदन त्या दरीत भरले होते. मी त्यातलीच एक होते. फक्त शरीर जिवंत होते. घराघरांच्या बाल्कनीत मुली असतात. त्यांच्यात एकच कॉमन गोष्ट असते. `स्त्रीचे दुय्यम स्थान'. विवाहिता, परित्यक्ता, प्रौढ कुमारिका, विधवा, वृद्धा, सर्व स्त्रियांचे अनेक प्रकारचे जीवन असते. त्यांचे असे अनेक प्रकारचे प्रश्नही असतात. पण हे सर्व प्रश्न एकाच धाग्याभोवती गुंफले जातात, गुंतले जातात. तो धागा म्हणजे `लग्न'.

दुसऱ्याची दुःखे चघळायला, चटक बातम्या घोळायला सर्वांनाच आवडते. कितीही उदारमतवादी आव आणला तरी सोळाव्या वर्षांपासून मुलीचे नकोसेपण पालकांना जाणवते. मुलाचे लग्न म्हणजे स्वप्न! पण मुलीचे लग्न म्हणजे जबाबदारीचे ओझे वाटते. स्त्रीला त्रास देणे सोपे. तिची बदनामी करणे सोपे असते. खोट्या बातम्या उठवल्या की Bad currency circulates प्रमाणे त्या पसरत राहतात. ह्या बातम्यांतील तथ्य किती प्रमाणात असेल याचा विचार समाज करत नाही. अतिश्रीमंत, सत्तालोलुप, एखाद्या भाग्यवान स्त्रीचा अपवाद वगळता लग्न म्हणजे असून अडचण, नसून खोळंबा असतो. मुंग्यांनी दंश करावा तशी बोचरी दुःखे लग्नाने मिळतात. भ्रूणहत्या ह्या कवितेत मी म्हटलंय -

*कोण म्हणते स्त्री म्हणजे बहीण व आई*
*भोगवादाच्या त्सुनामीत स्त्री म्हणजे बाई*

*वलयांकित शरीर तो नजरेने चाटतो*
*मल्लिकाच्या उरोजांवर कॅमेरा स्थिरावतो*

*एकविसावे शतक आधुनिकतेचा आव*
*नग्न चित्रीकरणापर्यंत सरड्यांची धाव*

*स्त्री भ्रूणहत्येचे शोधा खरे कारण*
*`मुलगी आली हो' घ्या घरात विनाकारण*

*मुली म्हणजे शोभेच्या बाहुल्या*
*त्यांनी सुंदर दिसलेच पाहिजे*
*चावी फिरवताच ते माकड*
*पुरुषाभोवती नाचले पाहिजे... .*

रात्री-अपरात्रीही कधीकधी मी उठून विहिरीजवळ जात होते. भावाबरोबर विहिरीच्या काठावर बसून राहात असे. माझी जगण्याची इच्छा नष्ट झाली होती. भावाने मला ट्रीपला जाण्यास परवानगी दिली. `ह्या गावाच्या वातावरणातून बाहेर पडण्यासाठी तू शिक्षण पूर्ण कर. नोकरीसाठी अर्ज कर', असे भाऊ मला समजावू लागला. त्याच त्या गावात त्या लोकांच्या डोळयांत काही भावभावना दिसतात. ज्या मला नकोशा वाटत होत्या. हल्ली समाजात समोरच्या व्यक्तीला तुच्छ लेखण्याची वृत्ती बळावली आहे. त्यामुळे काही अंदाज, काही गॉसिप यामुळे संबंध तणावपूर्ण होतात.

भावाने लग्नासाठी स्थळ पाहायला सुरुवात केली. भाऊ-वहिनी गावाबाहेरचीच स्थळं बघत होते. गावकीच्या राजकारणात त्यांना बळी जायचे नव्हते. वहिनीला मुलगा होता. बरे झाले मुलगी नव्हती. ज्या वेदना मी जन्मभर सोसल्या त्या भोगायला एक नवीन

शापित नागकन्या आली असती. आमच्या समाजात अंगारे, धुपारे, देव-देव, शांतीपाठ, उपवास, यज्ञयाग कशावरही विश्वास नव्हता. पण वाटायचे, जर त्याने नशीब बदलणार असेल व दुर्दैव पाठ सोडणार असेल तर काय हरकत आहे? पण मी अंधश्रद्धेच्या मागे लागली नाही. माझ्या मनाला ते कधीच रुचले नाही.

मी भावाच्या लहान मुलाला कायम सांभाळत असे. मला वाटू लागले, आपणही भूतकाळ विसरून लग्न करायला काय हरकत आहे. नाही तरी स्त्री मातृत्वाची भुकेली असतेच. ह्या गावातून बाहेर पडायचे ही तीव्र इच्छा त्यामागे होती.

कधी कधी आदित्य व अण्णा माझ्या कॉलेजसमोर गाडी थांबवून उभे असायचे. पण मला आता आदित्यचीही भीती वाटू लागली. कदाचित अण्णा माझी आदित्यबद्दलची भावना व प्रतिसाद पाहण्यासाठी उभे राहात तर नाही ना? किंवा दोघे मिळून मुलगी शेअर करू या, असाही लोचट विचार त्यांच्या मनात असेल का? नाही तर `सुहागरात कर' पर्यंत अण्णांनी बोलायची हिंमत का केली असती? दोघेही पिऊन तर्र असायचे. अण्णांबद्दल बोलायची हिंमत मला आजही होत नाही. शिवाय ते परकेच होते व प्रतिष्ठित होते. त्यांच्या लेखी मी एक शरीर होते. आदित्यचे खेळणे होते. आदित्यची अक्कल पण तेवढीच होती का? मी ट्रीपला जायची तयारी केली.

कोलकाता - कालीमाता ट्रीपचा प्रवास सुरू झाला. माझं मन त्या वातावरणात गुंतून गेलं. खूप सुंदर निसर्ग खुणावत होता. एवढे विस्तीर्ण पात्र असलेल्या नद्यांच्या पुढे आपण थेंबाइतके लहान असतो. एवढे मोठे आकाश, आपण फक्त ठिपक्याएवढे! सुंदर झाडे, वेडेवाकडे वळण घेणारे ओहोळ, तुऱ्यांची टोपी घातलेली शेतातील पिकांची सेना. ढगाआडून डोकावून सर्वांच्या जीवनात सोने पसरवणारा सूर्य, सोनेरी संध्याकाळी लयबद्ध हालचाली करणारे

हिरवळीचे तृण.

मी नजरेने तो निसर्ग पीत होते. ती हवा फुफ्फुसात भरून घेत होते. किती दुःख करायचे? अश्रू संपले होते. शिक्षण उरकून पुन्हा भातुकलीचा डाव मांडणार होते. त्या संसारात रमून एक दिवस  हुंदकाही व्यक्त न करता हे जग सोडून जाणार होते. एवढा मोठा सूर्य गुपचूप ढगाआड जातोच. मी तर किती क्षुद्र आहे. माझा आत्माही असा जाईल.

ट्रेनमध्ये गर्दी होती. ट्रीपच्या बोगीत खूप विचित्र माणसे चढली. शिरीष पॅनिकमध्ये आला. त्याने एक तिकीट तपासनीस गाठला व एका वातानुकूलित डब्यात मला व वंदनाला चढवले. बसून ठीक होतो न होतो एक बाई येऊन उभी राहिली. `तुम्ही 39 नंबरवर जाऊन बसा? विनंती नाही. सरळ आज्ञा! ... मी तिला माझी सीट दिली तर त्या विचित्र लोकांत बसायचे, प्रवासात भांडण नको म्हणून गुंडांच्या तावडीत जायचे वगैरे वगैरे. आदित्य देऊन टाकला व रडायची वेळ आली, आता पुन्हा ... सगळयांनाच कशा सगळया माझ्याच वस्तू हव्या असतात? दुखावलेल्या मनाला छोटी गोष्टही मनाला दुखावते. मी तिला सीट दिली नाही.

नांदेडचे गुरुद्वारा, स्तुप पाह्यला. बार्शीचे सोनारीनाथचे देऊळ पाहून मल्यागिरीली रायपूरच्या पुढे, खरगपूरला आयआयटीला सांबलपूरला गेलो. शेवटी कोलकात्याच्या कालीमातेकडे दर्शन घेतले. साधीच पण ट्रीप भन्नाट झाली. आयुष्याच्या प्रवासासाठी मी एक शिदोरी भरली होती. शरीरावरचे घाव भरत होते. हळूहळू मनाचेही भरू शकत होते.

परत येताना रात्री तीनला गाडी आली. रेल्वे स्टेशनवर बाराची वेळ होती. तीन तास गाडी लेट होती. पाहिले तर सिमेंटच्या बाकावर आदित्य झोपला होता. मला क्षणभर पोटात तुटले. हा इथे आणि यावेळी? मला सुचेना... हे कसं शक्य आहे? आदित्यने मला उतरताना पाहिले नव्हते. पण त्याला वंदना व शिरीष दिसले. त्याच्या डोळयांवरची झोप उडाली. तो धावत पायात चप्पल न घालता जिन्यापर्यंत माझ्या दिशेने आला. त्याने माझ्या

हातातली बॅग घेतली. तो रेल्वेचा पूर्वेचा ब्रीज चढून पश्चिमेचा उतरून मला पुढे शहरात जाणाऱ्या बसपर्यंत पोहोचवायला आला. त्याने माझ्या हातात एक चिठ्ठी कोंबली व गर्दीत हळूच दिसेनासा झाला. हे काय चाललंय, हेच कळायला मार्ग नव्हता. मी वाचली

*सारिका,*

*मी तुझ्या वाचून खूपच असहाय्य झालो आहे. मला काय होतेय ते मी कुणालाही सांगू शकत नाही. माझी नजर सर्वत्र तुलाच शोधत राहते. महिन्यात एकदा येणाऱ्या पौर्णिमेच्या चंद्रासारखी तू एक दिवस तरी भेटत जा. कुठे भेटावे, कुणी भेटावे काहीतरी नियम, सूचना तरी देवाने द्यावी. मी त्या दिवसाची वाट पाहीन. पंधरा दिवस मी फक्त वाटच पाहिली. स्वप्नांची, अर्धवट नात्याची, अंधुक भूतकाळाची, धूसर भविष्यकाळाची! आजूबाजूचे लोक मला दिसत नव्हते. माझी नजर फक्त तुलाच शोधत होती व शोधणार आहे.*

मी वळून पाहिले. आदित्यचे डोळे समोरच्या प्लॅटफॉर्मवरून माझ्याकडे लागले होते. वाटले, `किती सुंदर डोळे हे' पण मी निग्रहाने ती चिठ्ठी फाडून फेकून दिली.

*ऐसे कोई जिंदगी में आये न रब्बा*
*आये तो फिर वापस जाये न रब्बा*

ट्रीपवरून परत आल्यावर मी पुन्हा कॉलेजला जाऊ लागले. आदित्य जणू माझ्या परत यायची वाट बघत होता. रस्त्यावर उभा राहून तो माझ्याकडे निरखून बघत असे. शेवटी रक्त अण्णांच्या घराण्याचेच होते. त्यामुळे पूरग्रस्तांची हवाई पाहणी करणार, टीव्हीवर

मुलाखती देणार व कृती काहीच करणार नाही. असेही इतरांच्या वेदनांचे त्यांना काहीच नसते. माझ्या जखमा त्याला दिसत नव्हत्या का? मनाच्या जखमा दिसण्याची बौद्धीक कुवत त्याच्यात नव्हती. पण शरीरावरच्या तर दिसत होत्या.

कॉलेजच्या रस्त्यावर अण्णा किंवा आदित्य उभे दिसले की मी बाहेर न पडता वाचनालयात जाऊन बसत असे. ग्रंथपाल मुसलमान होता. त्याचं नाव हुसेन होते. इतर मुलामुलींबरोबर मी वाचन करत असे. त्या दिवशी मी कॉलेजच्या बाहेर पडले आणि मला आदित्य दिसला. मी वाचनालयात जाऊन बसले. तो माझ्या मागोमाग आला. त्याने हुसेनला स्वतःची ओळख करून दिली. हुसेनला विचारले, `काही सुविधा हव्या आहेत का? ' हुसेनला राजकारण्यांच्या तिरप्या चालीचा अनुभव नव्हता. तो आदित्यशी गप्पा मारू लागला. हुसेन गोरा, उंच, लाल नाकाचा देखणा होता. आदित्यला त्याची जेलसी वाटली असावी. मी तिथून पटकन बाहेर पडले. हळूहळू मी वाचनालयात बसणेही बंद केले. आदित्यची नाटकं संपत नव्हती. अजून दुसरी पोरगी पटली नसेल म्हणून की काय माझ्या मागावर राहतोय. माझ्या मनात त्याच्याविषयी उलटसुलट विचार येत होते. पैसा होता. चमचे होते. दीदी होती. दारू होती. अगदी कॉलगर्ल बोलवू शकत होता. डेटींग करू शकत होता. मग मला त्रास झाला नसता ना! काळ हे औषध असते. मी हळूहळू माझ्या दुःखातून सावरत होते. स्वतःला समजावत होती. दुसरा कोणी तरी, कुठे तरी असेल. जो या लाडलीला सुख देईल. ज्या परमेश्वराने चोच दिली तो दाणाही देईल. असा आशावाद माझ्यात आला.

*`मेरी नींदों को मेरे सपनों को*
*किसी अजनबी का इंतजार'*

या काळात वंदना, शिरीष, ज्योत्स्ना यांच्याशी चांगली मैत्री झाली. मला माझ्या मैत्रीनेच सावरले. सर्वजण माझी काळजी घ्यायचे. मला कधी संशय यायचा, यांना अंदाज असेल का? पण त्यांनी कधीही उल्लेख केला नाही. मैत्रीत खूप आनंद असतो. मी मनाने आदित्यची

होते, पण तो माझा भूतकाळ होता. वर्तमानकाळातून मी त्याला वगळले होते. आणि भविष्यकाळात माझ्या नशिबी काय लिहिले आहे, याचा मी अंदाज बांधणं कठीणच होतं!

वंदना माझी पूर्वीचीच मैत्रीण होती.

वंदनाची मोठी शेती होती. आम्ही सर्वजण तिच्या शेतात जाऊ लागलो. नारळाची रोपे आणून लावली. तांबडी माती, हिरवळ, झुळूझुळू वाहणारे ते मोटेचे पाणी, मोहरलेली आंब्यांची झाडे, मक्याची कणसे, निसर्गाच्या सृजनातच जीवन असते.

एका शनिवारी आम्ही सायकलवर शेतात गेलो. संध्याकाळी खूप पाऊस आला. पाण्याचे ओहोळ वाहू लागले. पाटाच्या पाण्यात व रस्त्यात फरक समजेना. सायकलवर येणे शक्य नव्हते. आम्ही परत चालत येऊ लागलो. पावसाचे थेंब मारा करत होते. चालणे शक्य नव्हते. कसे बसे गंगापूरपर्यंत आलो. आमच्या तिघांजवळ एक कार येऊन थांबली. गाडीत आदित्य होता. शिरीषला म्हणाला, `आत बसा. घरी सोडतो. ' मी पुढे आदित्यजवळ बसायला कचरत होते. पण मागच्या सीटवर अण्णा होते. मी पुढे बसले व तिघे मागे बसले. आदित्य पिऊन तर्र होता. गाडीत माझ्याकडे एकटक बघू लागला. शक्य असते तर त्याने मला नक्कीच जवळ घेतले असते. अण्णा त्याला म्हणाले, `आदित्य गाडी सुरू कर. ' पण आदित्य थरथरत होता. त्याला सहन होत नव्हते. अण्णांची मला खूप भीती वाटत होती. शेवटी शिरीष म्हणाला, `मी चालवतो. ' स्मशान शांततेत प्रवास पार पडला. मला आदित्यची सुद्धा भीती वाटत होती. उतरताना आदित्यने शिरीषकडे विजेरी दिली. उतरताच मी, शिरीष व वंदनाचा हात धरला व चालू लागले. मागून येऊन आम्हा तिघांना गाडीने उडवून हे लोक माझा काटा काढतील का? मला अस्वस्थता वाटत होती. भाऊ शोधायला आला होता. त्याच्या बरोबर मी घरी गेले.

आदल्याच रात्री आदित्यचे वडील वारले होते. माझे व आदित्यचे लग्न ठरले होते. पंधरा तारखेला होणार होते. याचा एक साक्षीदार गेला. मेलेली व्यक्ती कुठून साक्ष देणार? मी

जिवंत होते तरीही सांगू शकत नव्हते की, मला ह्यांनी फसवले तर साक्षीदार कुठून आणायचे? आणि इतरांच्या बाल्कनीतल्या प्रश्नांशी समाजाला काही देणे-घेणे नसते. स्वतःवर वेळ आली की सुधारणा आठवते. जगाची रीतच न्यारी!

वडिलांच्या निधनानंतरही आदित्यला दारू-मटण सुटत नव्हते. माझ्या घराच्या रस्त्यावर उभे राहण्यापर्यंत त्याने मजल गाठली. `माझ्या बाबांनी तुला पसंत केले होते, ' असे म्हणत आदित्य एक दिवस माझ्यापाठी कॉलनीत शिरला. सोसायटीत लोक माझ्याकडे संशयाने बघू लागले. पण कुणी मध्ये पडले नाही. मला घराबाहेर पडणे मुश्कील झाले. माझा संताप व्हायचा. भाऊ-वहिनी धुसपूस करायचे. साधारण दोन महिने धुसपुसण्यात गेले. निवडणुका पार पडल्या. अण्णासाहेब निवडून आले. त्यांचे अनेक सत्कार झाले. आणि एक दिवस रिबन बॉलच्या झाडाखाली आदित्यने चिठ्ठी ठेवली.

*प्रिय सारिका,*

*मी निवडणुका पार पडण्यासाठी थांबलो होतो. ह्याच जागेवर मी अनेकदा येऊन बसत असे. कधी रात्री-बेरात्री, सुट्टीच्या दिवशी! तुझ्या डोळ्यांतला अंगार मी पाह्यलाय. मी तुला पुन्हा फसवणार नाही. पुन्हा पूर्वीसारखी ती वेळ येणार नाही. स्त्रीला काय फक्त मंगळसूत्रच हवे असते का? सूर्य साक्षी आहे, आपले लग्न झालेले आहे. मी आजपासून दारू पिणार नाही. आपण लग्न करून नागपूरला जाऊ या. नवीन गावी आपल्याला कुणी ओळखणार नाही. तिथे अण्णा येऊ शकणार नाहीत. तुला आवडेल त्या जागी, गावी आपण सेटल होऊ. सर्व ऑप्शन्स तुझेच आहेत.*

*सोबत शेवंतीची वेणी पाठवते. अर्थात माझ्या शेतातल्या फुलांचा हारही सोबत आहे. मीही ते घर सोडून येणार आहे. त्यामुळे त्या घराचा अपशकुन पुन्हा होणार नाही. उद्या सकाळी सात वाजता तू गांधीजींच्या पुतळ्यापाशी ये. तू आली नाहीस तर मात्र मी हाताची*

*शीर कापून आत्महत्या करीन.*

*तुझाच आदित्य*

एकदा माझ्या लग्नाच्या दिवशी एवढा तमाशा झाला असताना मी तिथेजाऊ नये, असे माझे मन सांगत होते. पण आदित्यने जर आत्महत्या केली तर मी स्वतःला माफ करू शकले नसते. ते माझे पहिले प्रेम होते. ते मी विसरू शकत नव्हते. मनात चलबिचल चालू होती. मनाच्या द्वंद्वात रात्र गेली. तरीही मी सकाळी राहत्या कपड्यानिशी घर सोडले व त्या गांधीजींच्या पुतळयासमोर जाऊन उभी राहिले. पुतळयामागे कुणीतरी उभे होते. तोच माझ्या डोक्यावर कुणीतरी घोंगडी टाकली व मला खेचत दूर नेले. नंतर एका गाडीतून आणून मला त्या चौकात पुतळयापाशी आणून टाकले.

चुरगळलेली, कुस्करलेली, जखमी, कपडे फाटलेली, अर्ध बेशुद्ध अवस्थेत मी तिथे पडले होते. लोक बाजूने जात होते. पण दुर्लक्ष करत होते. सोसायटीतल्या एका माणसाने भावाला बोलवून आणले. व चादरीत गुंडाळून मला घरी उचलून आणले. पोलीस केस नको म्हणून घरच्या घरीच औषधोपचार केले गेले. काही दिवस तर मी भ्रमात राहायचे. आक्रमक व्हायचे. एक वेळ जखमी माझ्या शरीराला आदित्यने स्वीकारले असते. पण बलात्कारीत मुलीला कोण स्वीकारणार? जरा बरी झाल्यावर माझी रवानगी ह्या बाल्कनीत झाली. इतक्या मोठ्या संकटात नातेवाईकांनी, मित्रांनी मदत केली नाही. उलट चर्चा करून माझे दुःख मात्र वाढवले. मी आत्महत्या केली तरी चालेल. तसे माझ्यासाठी फारसे दुःख करणारे ह्या जगात कुणी नाही. पण जे जीवन आहे ते मी स्वीकारले आहे. मृत्यूला उदात्त करणे मला पटत नाही. वाटते, आदित्यने अण्णांच्या मर्जीने त्यांच्याच नात्यातील मुलीशी लग्न केले असेल का? हे कसले

प्रेम? दुसऱ्या मुलीशी लग्न करायचेच होते, तर मला कशाला बोलावले? त्या पुतळयाजवळ? निदान माझी तरी ही दुर्दशा झाली नसती. तरीही मी त्याला शिव्याशाप देत नाही. प्रेम म्हणजे काय? `आवडती व्यक्ती जिथे असेल तिथे सुखात राहावी ही इच्छा. ' तो सुखी राहू दे.

घराण्याची इज्जत, वडिलांचे नातेसंबंध, प्रेम यात बळी मात्र माझा गेला. एकदा वाईट अनुभव आला तरी मी परत का गेले म्हणून भाऊ ओरडत राहतो. पण प्रेम म्हणजे हिशेब असतो का? प्रेम आंधळं असतं म्हणतात, ते हेच का? प्रेमाची नशा इतकी अजब असू शकते? आता पश्चाताप होतो. परंतु शेवटी दुर्दैव माणसाची पाठ कधीच सोडत नाही. विधिलिखितही बदलत नाही. माझ्या नशिबातले दुःख मी दोनदा टाळले. जे सुख होते ते हातात धरायचा, उडत असताना हातात गाठायचा प्रयत्न केला. पण ते सुख निसटून गेले. मी सतत आशेने प्रयत्न करत राहिली. ते मस्तवालपणे दूर दूर जात राहिले.

सुस्त अजगरासारख्या पडलेल्या वेदनादायक आठवणी अचानक जाग्या होऊन दंश करू लागतात. बलात्काराच्या वेदना आठवतात. मग मी ओरडत राहते. चित्कारते. विस्मरण हा देवाने दिलेला आशीर्वाद आहे. पण मी हे सारे विसरू शकेन का? आंबूस वासाचे किळसवाणे स्पर्श, जखमा शरीरभर फिरत राहतात. मग मी हे सर्व लिहून काढते. थोडा वेळ मन शांत होतं. अश्रूंचे शब्द होतात. नेहमी ठरवते. आजचा दिवस त्या आठवणींचा शेवटचा दिवस आहे. इतर तरुणींनी सावध राहावे व इतरांना ही सावध करावे म्हणूनच तर मी लिहिण्याचा अट्टहास केला ना! असे म्हणून मी विसरायचा प्रयत्न करते. पण काही दिवसांनी आठवणी परत दंश करू लागतात.

जर भावाला आदित्य म्हणाला असता, तर भावानेही लग्न लावून दिले असते. बलात्काराची वेळ आली नसती. सर्व पुरुष वाईट नसतात. त्यांना घरी आई, बहीण असते. पण तरीही बलात्कार होतच राहतात. स्त्रीचा अपमान करायला, तिचा पाणउतारा करायला. तिचे

खच्चीकरण करायला, दिलेले शस्त्र म्हणजे `बलात्कार'! मी घाबरत घरात स्वयंपाक खोलीत गेले. मला बाल्कनीतही भीती वाटली. आतल्या खोलीतही वाटली. मी स्वयंपाकघराच्या ओट्याखाली गॅसजवळ मुटकुळे करून बसले.

*लेऊ लेणे गरिबीचे म्हणून लोखंडाचे चणे खाववत नाही*

*वाघावाणी म्हणावेसे धनी सहजासहजी मिळत नाहीत*

*कधी बदलेल स्त्रियांचे दैव भ्रम सत्य होत नाही.*

दुःख प्रत्येक घरी आपले दान घ्यायला जाते.

प्रत्येक घरी एक तरी स्त्री, किंवा निदान शंभर घरातील एखाद्या घरची एखादी स्त्री नामक व्यक्ती, वेदनेने तळमळत, तडफडत असते. पण हेच लोक दुसऱ्या घरच्या बाल्कनीत दिसणाऱ्या अंधुक दृश्यांची चर्चा करतात. जेव्हा ह्यांच्या घरी हे `दुःख' येते तेव्हा हे शब्द हरवतात. हीच बोलणारी तोंडे निशब्द होतात. दुसऱ्यावर केलेले वार त्यांना आठवत नाहीत. दुःखी, बदनाम, फसलेल्या, टाकलेल्या मुलींची चर्चा चघळली जाते. सीतामाता ऋषींच्या आश्रमात आसऱ्याला राहिली, पण घटस्फोटीत, परित्यक्ता स्त्रीला मात्र अनाथाश्रमातही सुख लाभत नाही. तिची तळमळ धरणीच्या पोटात गेल्यावरच थांबते. शरीराचे संस्कार व मनाचे संस्कार एकच का असू नयेत? फसवणूक व गरिबी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू का असाव्या? सुखाचे दान देवाने राजकारणी, भांडवलदार, श्रीमंत यांच्याच पदरात का टाकावे? कायदेशीर वागणारे व कुणाचे रक्त न पिणारे साधे श्रीमंत असतीलही; पण ते आपल्या मध्यमवर्गीयांच्या नशिबी का नसतात? प्रश्नांचे मोहोळ रात्रभर चांदण्यांप्रमाणे लुकलुकत राहते.

मी कधी कधी रात्रभर रडत राहाते. सौंदर्य विषारी असते का? मन उडते म्हणजे काय? नाते झुगारून पुरुष स्त्रीला एकटी सोडून का जातो? आपण जिला टाकून दिले ती कशी जगते ह्याचा जराही अपराधी भाव त्यांना का वाटत नाही?

“गांधीजींच्या पुतळ्यासमोर अपघातात मृत मुलीचे प्रेत सापडले”, अशा बातम्या आपण नेहमीच वाचतो.

शोषण काय फक्त आर्थिक, राजकीय, लैंगिक असते? ते भावनिकसुद्धा असते. शोषित समाज रडत राहातो. बंड करत नाही. देव बघून घेईल म्हणतो. श्रीमंतांच्या बंगल्याला `कोठी' म्हटले जाते. का? गरिबांना तिथे नाचवले जाते म्हणून का? परमेश्वर ह्या लोकांचा माज का उतरवत नाही. माणसाला मोह कशाचा असतो? अहंकार सुखाचा, इंद्रियजन्य सुखांचा? जे नको ते नजरे समोरून नष्ट करण्याचा? नक्की कशाचा असतो.

ज्याने फसवले तो बदनाम झाला नाही. जी फसली तिला लोक चोच मारून (कावळ्याप्रमाणे) रक्तबंबाळ करीत होते. मी घराबाहेर पडणे बंद केले. आता काही घडले तर हात जोडून पुढे येऊन, `तिला सोडा' म्हणणारे आदित्यचे वडील आता जगात नव्हते. अनारकलीला भिंतीत चिरडून मारले म्हणजे नेमके काय? आधुनिक काळात मला घराबाहेर पडणे मुश्कील होणे ही सजा तीच आहे ना! घराच्या चार भिंतीत मीही गुदमरत आहे.

अतृप्त आत्मा, न्याय वगैरे जर सत्य असते तर अशा लोकांचे सत्य कधीतरी बाहेर आले असते. पण आयुष्य फस्त करून जाणाऱ्या पुरुषांना हे आत्मे काहीच करीत नाहीत? आयुष्य म्हणजे वळणावळणाचा प्रवास... प्रत्येक वळणावर नवी माणसे, नवी तडजोड, नवी मनोभावना, नवा बुद्धिभेद. आपण तरी तेच राहातो की बदलतो? प्रत्येक घरी वाटायचे, हे आपले कायमचेच घर असेल.

मग वाटे, `हे शेवटचे घरटे, की पहिलेच घरटे' स्त्रीचे घर ही एक मेक-शिफ्ट म्हणजे तात्पुरते निवासस्थान असते. वेळ संपली किंवा वेळ भरली की काही कारणाने किंवा कारणाशिवाय ही तिला घराबाहेर काढले जाऊ शकते.

माझे संस्कार, माझे प्रेम विषारी नव्हते. पण माझ्या नशीबी लग्न नव्हते.

महालात झोपून शहाजहाँ खिडकीतून ताजमहालाकडे बघत असे. मी बाल्कनीतून गांधीजींच्या पुतळ्याकडे बघत बसते. ताजमहाल प्रेमाचे प्रतीक आहे. महात्मा गांधींचा पुतळा सत्य व अहिंसेचे प्रतीक आहे. माझ्या नशिबी प्रेमही नव्हते. सत्यही नव्हते, अहिंसाही नव्हती.

आज मी चोवीस वर्षांची झाली आहे. माझ्या अंगावर अजूनही जखमांचे व्रण आहेत. स्वतःचे स्वतः आवरता येत नाही. म्हणून वहिनी माझे केस बारीक कापते. जेवताना सांडते म्हणून एक लीनोलियम पसरवले आहे. त्यावर मेणकापडावर ताट ठेवून मी जेवते. मला उमग पडत नाही म्हणून माझे गर्भाशय काढायचे ऑपरेशन भावाने करून घेतले आहे का? माहीत नाही. कारण कुठेही दवाखान्यात आम्ही गेलोच नाही. आदित्य माझ्यासाठी हाताची शीर कापून आत्महत्या करणार होता. त्यामुळे तो ह्याही परिस्थितीत माझ्याशी लग्न करेल असा गैरसमज मी करून घेतला. भावाला मी आदित्यच्या घरी जाऊन आदित्यला सर्व सांगायची गळ घालू लागले.

एक दिवस भाऊ तयार झाला. घरातून आदित्यच्या घरी जायचे किंवा त्याला रस्त्यात गाठायचे असे ठरवून गेला. दिवस संपला. रात्र झाली. भाऊ परत आला नाही. भावाला उशीर झाला म्हणून वहिनीच्या मनात भलतेसलते विचार येऊ लागले. वहिनी रडू लागली. रागात मला म्हणाली, `मला पण रंडकी करूनच, विधवा करून आत्मा शांत होईल तुमचा! तुम्ही माझा नवराही खाऊन घ्या. ' वहिनीच्या अपशब्दाने मी रडू लागले. वहिनी रागात हात नाचवत पुढे म्हणाली, `तो काय उष्ट्या ताटात जेवणार आहे का? तो तर असा दीडशहाणा आहे. त्यानेच केला असेल त्या दिवशी बलात्कार तुमच्यावर! जरठ घोडनवऱ्याला फक्त तुमच्या शरीरातच रस होता. ' वहिनीचे ते रूप व ते वक्तव्य ऐकून मी सुन्न झाले. रात्री आम्ही दोघी रडत बसलो. आधी मी अनाथ होतेच. भाऊ होता आता तोही वारला तर... गरीबाघरची मुलगी

असण्याचा अभिशाप मी भोगला होता. रात्री उशिरा दीड वाजता भाऊ परत आला. त्याला मिठी मारून वहिनी रडू लागली. भावाने आदित्यचे लग्न झाल्याचे आम्हाला सांगितले.

वहिनी म्हणाली, `इतका वेळ कुठे होतात? '

भाऊ म्हणाला, `चांगुलपणावरचा माझा विश्वास उडाला. त्यामुळे देवळात जाऊन बसलो होतो. देवाचे डोळे उघडतात का ते बघायचे होते. अंधार पडला. तुमची काळजी वाटली म्हणून परत आलो'.

आदित्यने अण्णांच्या मर्जीने त्यांच्या नात्यातल्या मुलीशी लग्न केले होते. त्यानंतर मी कधीही आदित्यचा विषय काढला नाही. त्याने लग्न पूर्वीच केले असते तर मी 15 जुलै नंतर तर त्याचा नाद सोडलाच होता ना!

शेवटी त्यानेच पुन्हा चिठ्ठी पाठवून बोलावले नसते तर माझी दुर्दशा तरी झाली नसती. बळी माझाच गेला. त्या प्रसंगापासून मी आजारीच असते. कधी वाटते मरणही लवकर का येत नाही? माझ्या आयुष्यातून सर्व स्वप्ने कधीच निघून गेली आहेत. गेला किती काळ मी ह्या बाल्कनीतच बसते. तिथे टाकलेल्या गादीवर झोपते. खूप पाऊस असेल तर कधीतरी घरात स्वयंपाक खोलीत जाते. पुन्हा बाल्कनीत येऊन या चुरगळलेल्या चादरीवर लोळते.

दिवसभरात गांधीजींच्या पुतळ्याकडे मी बघत राहाते. मी पुतळ्याशी एकटीच बोलते. एका स्थानिक मासिकाच्या संपादिका, पुजाऱ्याची बायको उषा मॅडम येतात. मला लिहीत जा म्हणून सांगतात. वाचण्यासाठी पुस्तके आणतात. जगण्याची उमेद देतात. यांच्या कथांवरून मी प्रेरणा घेते. उषा मॅडमनी मला जगवले, जागवले.

तर ही माझी गोष्ट ज्याच्या त्याच्या घरची! खाजगी बाल्कनीतून दिसणाऱ्या घरगुती गोष्टी अंदाजाने कळतील अशीच आहे. कळली नसती तर चालले असते का? तुम्ही म्हणाल ही तर रोजचीच घराघरांमधली गोष्ट आहे. गरीबाघरच्या मुलीची, हुंडा देऊ न

शकणाऱ्या दुर्दैवी मुलीची गोष्ट त्यात आहे. सर्वसामान्यांची कथा त्यात निराळे ते असे काय असणार? हुंडाबळीची कहाणी, लग्नासाठी हुंडा मागितला, मिळाला नाही म्हणून नवरीला त्रास दिला म्हणून लग्नानंतरच सुरू होते असे नाही. लग्नाची बोलणी, बैठक मोडून लग्नाच्या वचनाला दूर सारून हुंडा देणाऱ्या मुलीशी लग्न करणारे गुन्हेगार समाजात नाहीत का? ह्या फसलेल्या मुलींनाही हुंडाबळी म्हणून मोजले गेले पाहिजे. शहाजहाँ भाग्यवान. मृत्यूनेच त्याची प्रेयसीपासून ताटातूट केली. मी मात्र ...

एकदा संपादिका बाईंना मी म्हणाले होते, `चांगल्या माणसाचे चांगले होते. हा विचार जगासमोर आला तर सकारात्मक विचार वाढीस लागतील. आत्महत्यांचे प्रमाण कमी होईल. दुःखी लोकांमध्ये आशा निर्माण होईल. सुखाची खात्री देणे शक्य नाही. पण निराशा राहणार नाही, असा संदेश मी लिहून देऊ शकत नाही. ' `मी कशासाठी लिहू? ' त्या म्हणाल्या, `ऐक, वाईट परिस्थितीत संकटावर मात करूनही जगता येते. हे सांगण्यासाठी तू लिही. '

किती स्वप्ने होती संसाराची. आई होण्याची. लोक आता 'उष्ट्या ताटात कोण जेवणार?' असं म्हणतात. आता स्थळं मिळत नाहीत. प्रस्ताव येतात; ते मला नांदवतील अशा खात्रीचे नसतात. बाई म्हणजे ताट! उष्टवलेले, खरकटे झालेले... वापरुन फेकून द्यावी लागेल अशी पत्रावळ जणू! भूतकाळातल्या फसवणुकीची आठवण, उफाळून दंश करू लागली, की मी विचार करते. जर आपण अण्णासाहेबांना जाब विचारला असता? पोलीस केस केली असती तर? काय झाले असते? साक्षीदार मिळाला असता? अब्रूचे अजून धिंडवडे निघाले असते? इतर तरुणी सावध झाल्या असत्या?

मग मी त्या गांधीजींच्या पुतळ्याकडे बघून बोलत राहते. हा पुतळा कोर्टात साक्ष देऊ शकला असता का?

कुठून तरी एक मिरवणूक आली. गांधीजींच्या पुतळ्याजवळ थांबली. कुणातरी पुढाऱ्याने पुतळ्याला हार घातला. तो पुढारी स्पष्ट दिसत होता. वाटले, ते अण्णासाहेब होते

का? नाही! तो आदित्य होता! हो, तो आदित्यचा राजकारणातील प्रवेश गाजला. अण्णासाहेबांना राजकीय वारसा मिळाला. गांधीजींचा पुतळा कधी बोलू शकेल का हो? वाचले होते, आंधळयाच्या गाई देव राखतो. आणि आंधळा काय करतो? देवावरच्या खोट्या भरवशावर जुलमी रानात, कसायाकडे गाई पाठवतो. काही मुलींचे जीवन असे कसायांच्या वाटेवरच्या गाईंसारखेच असते.

*खरे तर देवपण आंधळा...*

*तो तरी काय कुणाचे रक्षण करणार?*

*देव   दगड आंधळा*

*नाही प्रेम ना जिव्हाळा*

*नीचांच्या दारी झुले हत्ती*

*सतीचे दारी कुत्रा काळा*

गांधीजींच्या त्या पुतळयाला विचारा हवे तर! माझा बळी जाण्याची साक्ष दुसरं कोण देणार? गरीबाघरची मुलगी कसायाकडची गायच जणू! मीत्या दिवशी अण्णासाहेबांची गाडी दरवाजाजवळ थांबलेली बघितली. अण्णासाहेब घरात आले.

लक्ष्मणपूरचे घर विकायला काढले होते, गिऱ्हाईकं यायची, पण अण्णासाहेबांनी रोख रक्कम, तीन कोटी सहा खोल्या काही विशेष हक्क अशी ऑफर देऊ केल्याने भाऊ अस्वस्थ झाला. फक्त अण्णासाहेब म्हणाले, `त्या वेडीला दवाखान्यात टाका. आपल्या सोसायटीत अशी बलात्कारीत बाई! त्यात आपण सभ्य गृहस्थ आहोत. तिला हाकलून काढा. आमच्यासारखे गिऱ्हाईक मिळणार नाही. '

माझा भाऊ गप्प बसला. अण्णासाहेब जीभ लपलप बाहेर काढत, अजूनही माझ्याकडे बघत होते. ते गेल्यावर वहिनी, भावाची व इतर मतलबी नातेवाईकांची एक मिटिंग

झाली. मग वैतागून, भावाने मला वेड्यांच्या इस्पितळात टाकायचं ठरवलं. या कामी त्याला अण्णासाहेब मदत करणार होते. वहिनीही नाटक करून, गोड बोलून, मी वेडी आहे, हे त्या लोकांना पटवणार होत्या. मी ते आडून ऐकलं.

मी ओरडत होते, `मी वेडी नाही! '

तो म्हणाला, `मग घराबाहेर निघ. कुठं जायचं तिथं जा. '

मी कुठे जाणार होते?

*देव दगड आंधळा*

*नाही प्रेम ना जिव्हाळा*

*वेश्येच्या दारी झुले हत्ती*

*सतीचे दारी कुत्रा काळा*

मी भावाच्या पाया पडत म्हणाले, `ह्या माळ्याच्या खोलीत मला राहू द्या. ' आदित्यच्या वेळी झालेल्या प्रेमभंगापेक्षाही हा अपेक्षाभंग असह्य होता. आयुष्याचा दुसरा अध्याय सुरू झाला. जखमी होण्यानंतर सोपस्कार होतो तो सावरण्याचा, जखमा भरण्याचा हा काळ फारच त्रासदायक असतो. मनापासून गुंतलेल्या व्यक्तीचे दुःख फक्त फसवणुकीपुरते मर्यादित नसते. ते एखादीला आयुष्यातूनच उठवते.

मी आदित्यच्या सुखी आयुष्याबद्दल विचार करून, जळून, उसासे सोडत बसण्यापलीकडे काय करू शकत होते? कधी वाटत असे, इथे, कॉलेजमधल्या दुसऱ्या एखाद्या मुलीसाठी आदित्य उभा राहात असेल का? श्रीमंत अण्णासाहेबांना वेळ कुठून मिळतो? हॅण्डसम मुलांचे आपले बरे असते. नवनवीन मुलींना फसवणे त्यांना सोपे जाते. भोळ्याभाबड्या मुलीही फसतात. शब्दांच्या जंजाळात मेंदूतून स्त्रवणाऱ्या सिरोटोनिनच्या स्रावात त्यांना वासना, अवघड वाट व सत्य दिसत नाही. आदित्यबरोबर त्याचे इतरही नातेवाईक, कुटुंबीय

माझ्यावर अत्याचार करून मला मारून टाकू शकतात, ही भीती मला कायम त्रासू लागली. मी अधिकाधिक भीतीच्या वेढ्यात वावरू लागले आहे. मी ह्या गावात सुरक्षित नव्हते; नाहीही.

आताही भाऊ म्हणतोय, `आपण ह्या गावात सुरक्षित नाही. आपण हे घर विकू. दुसऱ्या गावी निघून जाऊया. ' चांगली गिऱ्हाईके येत होती. घर विकण्यासाठी तोही उत्सुक होता. आता माझ्या बाल्कनीतूनही मी निघून जाणार. मला ही बाल्कनी सोडायची नाही. मी पण आत्महत्या करू का? माझ्या मृत्यूने कोण रडणार? कुणीच नाही. ह्या जगात तरी माझे असे कोण आहे?

मुलीचा जन्म म्हणजे एक दवबिंदू. श्रीमंताच्या पायाखाली चिरडली जाणारी. बलात्काराच्या वेदना तर खूपच भयानक असतात. देव न्याय का करत नाही? त्या नंतरच्या पाच वर्षांत आदित्यने लग्न केले. त्याला मुले झाली. दुसरीशीच जर लग्न करायचे होते तर त्याच वेळी आदित्यने मला नाटक करून का बोलावले? मी गॅलरीतून बघते. मुले-मुली, जोडपी हातात हात घालून फिरायला जातात. या सर्वच जोडप्यांची प्रेमकथा सफल होत असेल का? यातले सर्वजण आदित्यसारखे या मुलींना फसवून दुसरीशी लग्न करतील का? या मुलींवर बलात्काराची वेळ आली तर? या मुलांच्या डोळयांतले प्रेम खरे, की स्वार्थ खरा? मला नवीन वडिलांकडे दत्तक म्हणून जायची वेळ आली. कारण भावाची चलबिचल झाली. भावाची लक्ष्मणपूर, सोसायटी पूर्ण अण्णासाहेबांनी विकत घेतली.

`सारिका, या घरात राहून तू आयती सुरक्षितता मिळवून, आमच्यावर भार होऊन राहू शकत नाही. तुला अण्णासाहेबांच्या ऑफिसमध्ये रोज एक तास काम करायला काय हरकत आहे. ' हे भाऊ मला समजवत होता.

`तुला अण्णासाहेबांनी चालविलेल्या महिलांच्या वसतिगृहात राहायला काय हरकत आहे? तुला हे घर सोडायला हवे. तुझ्यामुळे माझ्या बायकोलाही, मुलालाही, धोका होऊ शकतो. माझ्या मुलांच्या लग्नातही तू असणे, हा प्रश्न येऊ शकतो. आपले खानदानी

घराणे आहे. नव्याण्णव कुळी मराठा, म्हणून देवक बसवले जाते. नांदूरीगडावर जत्रेत पहिला मान आपल्याला असतो. तू हे घर सोड, नाहीतर अण्णासाहेबांनी चालवलेल्या अनाथाश्रमात जा. ' कंटाळून, भावाने मला बजावले.

मी मला अगदी एका सीतापूरच्या माळयाच्या खोलीत राहू दे म्हणून भावाच्या पाया पडले. पण कुणालाही माझी दया आली नाही. तरीही लग्नासाठी बरीच स्थळं येत होती. पण काहीच जमत नव्हतं. त्यातल्या त्यात भावाला जी स्थळं बरी वाटली, त्यांना भावाने मला बघायला घरी बोलावले. माझे केस बारीक कापले होते. ते थोडे वाढले होते. त्यामुळे मी लेडी डायनासारखीच दिसत होती. वहिनीने मला नटवले होते. कारण त्यात तिचा स्वार्थ दडला होता. कसेही करून, लग्न करून मी खपावे, ही तिची इच्छा होती. पण याउलट मला असं वाटायचं की माझं चांगलं व्हावं, ही खरी तळमळ सर्वांना असावी. निदान असायला हवी अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

श्री हांडे मला बघायला आला. मला त्याच्याकडे बघायला लाज वाटत होती. हिंमत होत नव्हती. बावन्न वर्षांचा तो बीजवर. पण माझ्याकडे आशाळभूतपणे बघत होता. त्याचा मोठा मुलगा माझ्यापेक्षाही वयाने मोठा होता. स्वतः श्री हांडे धिप्पाड होता. थोडा लंगडत होता. मी हबकून गेले. माझ्या आयुष्यात जर आदित्य आला नसता अन् अत्याचार झाले नसते तर ज्या माणसाची सून म्हणून मी ज्या घरी गेले असते, त्या घरी मी या बीजवराची पत्नी म्हणून जाणार होते. शिवाय मी ऐकून होते, की व्यसनांमुळे हा कधीही मरेल अशी परिस्थिती आहे. ती माणसं निघून जाताच मी साडी फेकून दिली. गाऊन घातला. मला ह्या माणसाशी लग्न करायचे नाही म्हणून रडायला सुरुवात केली. भाऊ म्हणाला,

`झाले हिचे नाटक सुरू! '

`तुम्हाला मोठा राजपुत्रच मिळणार आहे. गुपचूप लग्न करून घ्या. नाहीतर या जगात फायदा घेणाऱ्यांची काही कमी नाही. ' वहिनी रागावत हिडीसपणे म्हणाली.

`मुलगा गरीब घरचा असला तरी चालेल, पण एवढा म्हातारा अजिबात नको.' मी माझं मत मांडलं.

भावाला माझ्या या बोलण्याचा राग आला. त्याने दरवाजा उघडला आणि मला बाहेर ढकलून दिले. मी तिथेच बसून राहिले. तो इतका माझ्यावर अशा पद्धतीनं का रागावला? घरात वहिनी व भावाचे हसण्या- खिदळण्याचे आवाज येत होते. सोसायटीतली माणसं माझ्याकडे बघून न बघितल्यासारखी करीत होती. त्यांचं बरोबर होतं. मी त्यांची कोण लागत होते? परक्याची मुलगी! त्यात मला बाहेर काढणारा, माझाच भाऊ, तो तिचा भाऊ! `तिला मारो नाही तर विहिरीत ढकलो! आपल्याला काय करायचे! !' असा विचार करीत ती बाजूने जात होती. कदाचित मी वेडी आहे किंवा अजूनही काही तरी वाईट, त्यांना पटावे, इतक्या प्रकारे नाटक करून अभिनयनिपुणतेने त्यांना ते पटविण्यात कुणाला यश आले होते किंवा त्यांच्या त्या मतांचा जोगवा मागणे व निवडणुका लढणे व पुढे इतर काही करणे या अजेंडामध्ये असुरक्षित मुलींची काळजी घेणे हा मुद्दा येत नसावा. माझ्या आईदादांच्या हातचे मीठ खाल्लेले देखील मीठाला जागले नाहीत.

*दोष कुणाला देणार?*

*देवबाप्पा कुठे राहतो हो?*

*माझे काय चुकले?*

*त्याला विचारायचे आहे...*

कुणी राजज्योतिषी असेल तर त्याला विचारावे. माझा बळी का जातो? विनाकारण बदनामी होण्याचा असा कोणता ग्रह आहे?

`जगी ज्यास कोणी नाही

त्यास देव आहे' असे म्हणतात.

मी पहाटे, उषा मॅडमकडे गेले. त्या मला शहरातील एका प्रथितयश

माणसाकडे घेऊन गेल्या. तो माझ्याकडे बघून म्हणाला, `मी काय तिला असाही ठेवून घेईन. पण अशा मुलींचे लग्न होणे शक्य नसते. ' उषा मॅडम मला दुसऱ्या एकाच्या घरी घेऊन गेल्या. तो म्हणाला, `तुमची सोय करतो. '

आदित्यची बायको श्रीमंत, आक्रमक व भांडखोर होती. त्यामुळे त्यादरम्यान आदित्यचे त्याच्या  बायकोशी पटत नव्हते. एका नातेवाईकाने तर चक्क आदित्यची XX बाई म्हणून त्याच्या शेतावर राहण्याचा प्रायोजित सल्ला दिला. लग्न करायला आदित्यला मी उष्टी पत्रावळ वाटत होते. परंतु XX बाई म्हणून ठेवण्यास तो राजी होता. स्त्री सक्षमीकरण म्हणतात. मग माझे काय चुकले होते की मला ही शिक्षा दिली जात होती. आणि आताही आदित्यच्या घरच्यांना त्या श्रीमंत बाईला सोडायचे नव्हते. पण त्याचवेळी आदित्यला विवाहसुख मिळावे म्हणून व त्याच्या बायकोला घाबरवत,  धमकी देण्यासाठी मला शेतावर ठेवून दहशत निर्माण करायची होती. खेळी कुणाची होणार होती? माझी! गरीब निराधार होते ना!

अक्राळविक्राळ तोंडांची विघ्ने फिरावी तसे काही हवशे-नवशे-गवशे पुरुष माझ्याकडे वासनेने बघत होते आणि नवल म्हणजे त्या अशा पुरुषांच्या बायका मला त्या त्यांच्या सुखी संसाराच्या वल्गना सांगत होत्या. मला तुच्छ लेखत होत्या. संसार म्हणजे काय? विश्वास की फसवणूक?

त्याचवेळी गावातल्या एका भावाच्या मित्राने सांगितले.

`आम्ही तिला सून करून घेऊ. चांगले वागवू. औषधोपचार करू. ती एकदम सुखी राहील. पण तुम्हाला हे घर विकून येणारे पैसे आम्हाला द्यावे लागतील. काही दिवसानंतर

ह्या मुलगा सेटल झाला की तुमचे पैसे परत देऊ. ' पण भावाला बहिणीसाठी लक्ष्मणपूरचे घरावर पाणी सोडणे मंजूर नव्हते. त्या खानदानी उपवर तरुणाला हुंडा न घेता मुलगी करणे आपल्या स्वत्वाला, घराण्याला कमीपणाचे वाटत होते. मला वाटले होते भाऊ पटकन हो म्हणेल. मी आयुष्यात लवकर सेटल होईन. पण झाले मात्र वेगळेच.

बऱ्याच आजूबाजूच्या घरी विसंवाद होते. त्यांचे नवरे तिरसट होते. *कानाने बहिरा, मुका परी नाही,* म्हणजे नवरा आपला आवाज ऐकू शकतो, पण ऐकून न ऐकल्यासारखा दाखवतो. मात्र शब्दांच्या, जीभेच्या फटकाऱ्याने मारायला आधी पुढे येतो?

त्या बायका ट्रीप, साड्या, मुले, दागिने ह्यातच खूश होत्या. त्यांच्या त्या अज्ञानात सुखी राहण्याचा मला हेवा वाटला. संसार म्हणजे काय? छळवणूक की तडजोड? की दुसऱ्यावर दादागिरी करण्याचा परवाना? विवाह विशेष वागणुकीचा हक्क ती छळवणूकही असू शकते. अडवणूकही असू शकते! आपल्याला मोलकरीण सोडून जातानाही वाईट वाटते आणि ह्या लोकांना नाते तोडताना काहीच कसे वाटत नाही! शारीरिक व्यंग दिसते. मानसिक अपंगत्व दिसत नाही. व्यंगसुद्धा चालते, पण विकृती? मनोरुग्णांकडे आपल्या समाजात दुर्लक्ष केले जाते. घरात पत्नी व अगदी माझ्या वयाच्या जवळपासच्या मुली असलेला एक मध्यमवयीन सुद्धा `मुलगा हवा' म्हणून मला दुसरे लग्न करायचे आहे म्हणाला. त्रास सोसत, सासरी राहण्याबद्दल सन्मान म्हणून सव्वाष्णींचा एवढा सन्मान केला जात असेल का? `न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति' म्हणणाऱ्या मनूनेच मला मारले का? अर्थात त्या माणसाच्या बायकोला कल्पनाही नसेल, आपण ज्या सुखी संसाराबद्दल अभिमान बाळगतो, तो नवरा `मुलगा हवा' म्हणून मी तुझ्याशी लग्न करतो, अशी ऑफर घेऊन माझ्याकडे आला होता.

मी अजून पुरती गोंधळून गेले होते. `अमर प्रेम'मध्ये दुर्दैवी नवऱ्याने सोडल्यावर माहेरीसुद्धा अपमानित केली गेलेली शर्मिला गळयात पाण्याने भरलेला माठ भरून, बांधून आत्महत्येचा प्रयत्न करते, असे दाखवले आहे. आज इतक्या वर्षांनीही समाजात निराधार मुलींवर तीच वेळ येते. `मुंबईला चांगली नोकरी लावून देतो, ' म्हणून एकजण माझ्या मागे

लागला. पण कदाचित `अमर प्रेम' पाहिलेला असल्यानेच मला तो कुठे नेईल व माझे काय होईल याचा अंदाज आला होता. सुजाण, सुज्ञ व्यक्तीला त्याच्या त्याच्या सुज्ञपणामुळे अशा नजरा, असे धोके समजतात. अर्थात मला आदित्यच्या वेळी कुठे समजले होते? आणि खरंच जर मी अगतिक झाले असते तर `अमर प्रेम' मध्ये दाखवलेल्या त्या कोलकात्याच्या गल्लीत पोहोचायला मला कितीसा वेळ लागला असता? उत्तम कथ्थक नृत्यांगणा असल्याने मला `भाव' चांगला मिळेल, याचा अंदाज त्या मदतीचा हात पुढे करणाऱ्याला होता. एक लबाड पुरुष म्हणाला, `आमच्या समाजात अंगवस्त्र ठेवणे अगदी कायम असते. एक बायको घरात असते व एक शेतात, मळयात किंवा खळयातही राहते. ' त्याच्या या विचित्र बोलण्याने मी गप्प बसले.

`मजबूरी का नाम महात्मा गांधी' असं कितीतरी लोकांना काहीबाही बोलताना मी ऐकलं होतं. `नारी जीवन की यही है कहानी, आँचल में दूध और आँख में है पानी. ' माझे वडील असते तर ... शेवटी जर तरला काही अर्थ नसतो म्हणा! जर तरचे जरतारी फेरे जीर्ण होऊन जात असतात. समज येऊ शकलेला समाज माझी चलबिचल पाहात होता. पण तरीही दुर्लक्ष करीत होता. एका पन्नास वर्षीय बीजवराचे स्थळ आले. गर्भश्रीमंत होता तो. मध्यस्थ भावाला म्हणाला, `आमची पन्नास एकर शेती तुमच्या नावावर करू. '

भाऊ आनंदी झाला!

लक्ष्मणपूरहून ते लोक गेल्यावर अण्णासाहेब आले. प्रथमच प्रत्यक्षात ते आमच्या घरी आले होते. त्यांना दिसू नये म्हणून मी स्वयंपाकघरात जाऊन लपले. `तुमच्या घराला मी चांगली किंमत देईन. ' ते भावाला म्हणाले, `खबरदार जर त्या माणसाला मुलगी द्याल तर! तो आपल्या गावच्या राजकारणात प्रवेश करेल. सारिकाचे बलात्काराचे भांडवल करेल. याने तुमची नाहक बदनामी होईल. शिवाय मला प्रतिस्पर्धी निर्माण होईल. हवं तर तिला माझ्या अनाथाश्रमात दाखल करा किंवा सुधारगृहात ठेवा. तिथे निरीक्षक म्हणून ठेवा वाटल्यास. पगारही मिळेल. '

सर्वत्र बातम्या पसरल्या. मी आत्महत्या केली. मी घर सोडले वगैरे वगैरे. भरपूर दुर्दैवी व दुर्भाग्यपूर्ण आरोप सोसत, मी तडफ़डत असताना, उघडपणे कधीही आदित्य बोलला नाही. पण त्याला शेतावर ठेवायला, मी मिळावी म्हणून त्याने पाठपुरावा चालूच ठेवला.

एका फ्लॅटच्या किंमतीसाठी भावाने मला बेघर केले. हुंड्यासाठी एका उपवर तरुणाने मला आधार द्यायचे नाकारले. पैशाची ताकद मोठी असते. जर पैसा असता तर मी आज `त्याची' बायको असते. आमचे शेतकरी कुटुंब पडले. या देशात शेतकऱ्यालाच किंमत ती काय असते तर ती मला असणार? स्वार्थाने लडबडलेल्या नातेसंबंधात माझा बळी गेला. सोशीकपणा दाखवणेही सहन होईना झाले, तेव्हा मी घराबाहेर पडले. मला वाटते त्या दिवशी साईबाबा शिर्डीतून निघून गेले असावेत का? गजानन महाराजांनी डोळे मिटून घेतले असावेत का? माता वैष्णोदेवी काय करत होती? सिद्धिविनायकाचे डोळे सोन्याच्या कळसाआड झाकले गेले असावेत का? देव न्याय कधी करतो?

देव देऊळ सोडून गेला असेल का?

माझ्या उषा मॅडमनी माझ्यासाठी शहरातील दुसऱ्या एका घरी शब्द टाकला. वृद्ध गृहस्थांना सांभाळायचे व कंपनी द्यायची असे ते काम होते.

मला नव्या वडिलांकडे पाठविण्यात आले. ईथेतर माझा राहण्याचा प्रश्न सुटणार होता. भावाला त्या लक्ष्मणपूरचे घराला मिळणारा आकर्षक भाव ती रक्कम सोडायची नव्हती. एवढे पैसे घेऊन तो मुंबईत पॉश फ्लॅट घेणार होता. आई दादांच्या रक्तामासांच्या मुलीला लाथाडणे हा पर्याय, त्याला अण्णासाहेबांच्या आकर्षक पॅकेजमुळे हवाहवासा वाटू लागला.

*भावांना घर असते*
*पक्ष्यांना घरटे असते*
*साप बिळात राहतो*

*देव देव्हाऱ्यात राहतो*
*माझे घरटे कुठे आहे?*
*या यात्रेचा शेवटचा मुक्काम कुठे आहे?*
*वेश्यांना मंडी असते*
*नाचणाऱ्यांना माडी असते*
*सौभाग्यवतींना घर असते*
*गरीबाला झोपडे असते*
*घराच्या कपारीत कबुतरे राहतात*
*चिंचेच्या झाडावर भूत राहतात*
*मुलीचे घर कोणते असते?*

माझे घरटे कुठे आहे? संकटकाळात आधार द्यायला मोठी हिंमत लागते. सख्खा भाऊ सारिका अपशकुनी आहे, तिचे सारखे प्रॉब्लेम्स, तिची सारखी कटकट असते म्हणून अंग झटकू लागला. मुलीचे दुर्दैव, हे मुलीचेच दुर्गुण मानले जातात. पोटभर जेवलेल्याला तूप वाढले जाते व उपाशी माणसाला हाकलले जाते. तशी मला बाहेरची वाट दाखविण्यात आली. ज्या काकांनी माझेभावाला महाराजा म्हणून लाडावले होते, त्या काकांकडे उषा मॅडम मला घेऊन गेल्या. मॅडम म्हणाल्या, `जाती मंडळाने यात लक्ष घालावे. ' काका म्हणाले, `बघतो. भावाला सांगतो, तिला एका खोलीत राहू देऊ. '

मग लाजेकाजेने, काकांनी भावाला खूप सांगितले. `तिला आधाराची गरज आहे. तुम्ही तिला वाऱ्यावर सोडू नका. ' तेव्हा भाऊ म्हणाला, `तुम्ही घेऊन जा तुमच्या घरी; तुम्हाला एवढा पुळका असेल तर. ' काका मांजरासारखे चोरटेपणाने, पायात चपला घालून निघून गेले. निघून जाताना त्यांनी माझ्याकडे एक अगतिक कटाक्ष टाकला. वहिनी फारच व्यवहारी होती. भाऊ बनेल बनत होता. अण्णासाहेब ते घर खरेदी करताना त्या खरेदीला व श्रीमंतीला त्यांना विरोध करून शत्रुत्व घ्यायचे नव्हते. जेवढा भाव अण्णांनी दिला. तेवढे त्या जागेसाठी पैसे कुणीही देणार नव्हते. शिवाय त्यांना मी नकोच होते. त्यांनी मला माझ्या वडिलांचे घरातून

बेदखल केले. काही दिवस मी उषा मॅडमकडे राहिले.

त्यानंतर उषा मॅडमनी माझी सोय रामपूरला नवीन वडिलांकडे करायचे ठरवले. नोकर कम सोबती, कम मुलगी कम पेईंगगेस्ट म्हणून सोय करीन म्हणाल्या. रामपूरचे नवीन वडील उषा मॅडमच्या नवऱ्याचे मित्र होते. हे गाव आमची शेती होती त्या सीतापूरपासून चार तास प्रवासाच्या अंतरावर होते. भावाचे घर रामपूरपासूनही चार तास प्रवासाच्या अंतरावर होते. मला भीती वाटत असे. इथेही माझा इतिहास माझ्या पाठीमागे आला तर मला त्रास होईल. मनस्ताप होईल माझा काय दोष होता? ज्याने फसविले त्याचे दिवस मात्र मजेत जात होते. जगण्यासाठी मी संघर्ष करत होते.

उषा मॅडम म्हणाल्या, `एक मुसलमान कुटुंब आहे. ' माझा चेहरा पडला.

मी म्हणाले, `मॅडम मी नॉनव्हेज खात नाही. मी त्या घराला न्याय देऊ शकणार नाही. '

`अगं मुसलमानसुद्धा माणसेच असतात. सुशिक्षित असतात. तुला चांगले सांभाळतील. ' मॅडम.

`मॅडम सख्या भावाच्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवता आला नाही. मी परधर्मीयांकडे जाऊन `आ बैल मुझे मार का' करू? ' मी.

धर्म सर्व सारखेच, चांगले असतात. पण माणसे सर्व हाडामांसाची सारखीच दुर्गुण व सद्‌गुणांची मिश्रणे असतात. माझा माणूस जातीवरचाच विश्वास उडाला होता. पण राहण्यासाठी चार भिंतीचे घर हवे होते. घरटे हवे होते.

जैन धर्मीयांची एक देरासर माझ्या घराजवळ होती. मला वाटले तिथे जाऊन विचारावे किंवा त्या चर्चमध्ये जाऊन नन व्हावे. दादांची लाडली रस्त्यावर आली होती. पण माझ्या नशिबात त्या विश्वविधात्याने काय लिहिले कुणीही जाणत नव्हते. उषा मॅडमकडे पुतणीचे बारसे होते. आईचे संस्कार असे होते की, मला पाळणा म्हणायला नेहमी बोलावणे

येई. मी गाणे म्हटले. मी पाळणा म्हटला.

*लवकुशाचा हलवी पाळणा*
*वनी वाल्मिकी मुनि –*
*दैव जाणीले कुणी?*

`मी कोण, मी कोण? ' लोक विचारत होते. पण मला प्रसिद्धी नको होती. मी तो कार्यक्रम सोडून देवळात येऊन बसले.

त्यानंतर रामपूरच्या ह्या घरी नवीन वडिलांजवळ माझ्याबद्दल उषा मॅडमने विषय काढला. उषा मॅडमची मी लाडकी होते. त्यांना मुलीची हौस होती, त्या मला मुलीप्रमाणे मानत. ज्यांना मुलगी नसते त्यांना मुलीची हौस असते. ज्यांना मुलगी असते त्यांना नकोशी झालेली असते. आदित्यच्या फसवणुकीपेक्षा भावाने केलेली फसवणूक चीड आणणारी होती.

भाऊ असेही असतात? कृतघ्नतेची विषवल्ली इतकी पसरली, की घरदार, प्रॉपर्टीसाठी नाती नकोत! लाडली म्हणून वडिलानी वाढवलेली मुलगी तर नकोच नको.

`मॅडम माझी सर्व चित्रे मी तुम्हाला देत आहे. आवश्यक कपडे घेऊन मी नवीन घरी जाईन. पूर्वी नकोशा व्यक्तीसुद्धा घरात घरकामासाठी खपून जायच्या. आता सर्वांनाच माणसे नकोशी झाली आहेत. '

मॅडम खूपच पॉझिटीव्ह होत्या. त्या म्हणाल्या, `माझ्या ओळखीच्या त्या एका घरी दवाखान्यात तुझी सोय लागली असती; पण अण्णासाहेबांमुळे नको. '

संघर्ष करून करून मी खचत होते. मी खरेच नीच असते तर, मला वाईट वाटले नसते. केवळ दुर्दैवाने ही वेळ आली होती. पण मला नीतीचा मार्ग सोडायचा नव्हता. नवीन घरट्याच्या शोधात अगतिक झाले होते. मुक्कामाच्या शोधात उडणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे हा बेघर पक्षी स्थलांतर करीत होता. नवे घरटे शोधत होता.

मी नवीन घरी आले. नवीन दादा साठ वर्षांचे होते.

माझे तिसरे घरटे रामपूरला होते.

## प्रकरण तिसरे

माझी रवानगी नवीन वडिलांकडे रामपूरला झाली. हे घर प्रशस्त होते. श्रीमंती व सुबत्ता होती. पण मला पुरुषांबद्दल एक अनामिक भीती वाटत होती. रोज रात्री मी माझ्या खोलीला आतून कडी घालून दाराला टेबल लावून घेत असे. मला त्यांच्या घरातील माणसांवर विश्वास टाकायला भीती वाटत होती. मला वाटणारी ही भीती मी कुणाहीजवळ बोलू शकत नव्हते. घरातले घरकाम करायला कामवाली बाई येत असे. बाकी भाजी आणणे, फळे आणणे, स्वयंपाक व स्वच्छता, बागकाम मी बघत असे. या नवीन वडिलांना एक मुलगा होता. तो शिक्षणाच्या निमित्ताने परदेशी, बाहेरगावी राहात होता. बहुतेक त्याने तिकडेच लग्न जुळवले होते. म्हाताऱ्याची सेवा करावी लागू नये म्हणून तो इथे राहणे टाळत असे. मी ईस्त्रीचे कपडे कोपऱ्यावरच्या ईस्त्रीवाल्याकडे टाकायला जात असताना, मी ऐकले, एकदा गावातले लोक म्हणत होते.

`म्हाताऱ्याने कोवळी काकडी आणली आहे. ' ईस्त्रीवाला म्हातारा भय्या म्हणाला, ` मुलगी म्हणून दत्तक घेणार आहे. '

भय्याची तरुण बायको बाहेर आली. भय्याची दुसरी मध्यमवयीन बायको कडाकडा बोटे मोडत म्हणू लागली. `मर्दों को औरत सिर्फ उसी काम को चाहिये.'

माझ्या कानावर काही बाही पडत असे. अर्थात लोकांना वाईट बोलायला आवडतच असतं. बॅड करन्सी सर्क्युलेटस्. मी खूप हताशपणे घरी आले. जणू पायात बेडी पडली होती. मला ह्या नव्या घरी प्रेमाची, भावनिक गुंतवणुकीची अपेक्षा नव्हती. पण पुन्हा कुण्या अण्णासाहेबाने माझ्या शरीराला स्पर्श करावा ही इच्छा मुळीच नव्हती. माझी आता तेवढी सहनशक्तीही उरली नव्हती. तसे काही झाले तर आपण सरळ मुंबईला पळून जायचे असे मी मनाशी ठरवले. पण मुंबईला तरी माझे कोण होते? वर्तमानपत्रात रेल्वे स्टेशनवरचे बलात्कार

वाचून मला त्याचीही भीती वाटे. असुरक्षित तरुण मुलगी म्हणजे रस्त्यावर सापडलेली नवी कोरी नोट असते. ज्याला सापडेल तो पाकीटात ठेवून घेतो. फार थोडे अगदी क्वचित, एखादाच, ती नोट ज्याची त्याला परत करतो किंवा तिच्या असुरक्षिततेकडे दुर्लक्ष करतो. तरीही ती नोट पायदळी तुडवली जातेच.

नवीन वडील कधी कधी थोडे फार दारू प्यायचे. बंगल्याच्या वरच्या मजल्यावर त्यांची एक स्पेशल खोली होती. तिथे ते निजत असत. एकदा रात्री माझ्या दारावर थाप पडली. नवीन वडील हाक मारत होते, `सारिका दार उघड. '

मी दार उघडले नाही.

खरे तर मला रात्री अंधाराची फार वर्षांपूर्वीपासून भीती वाटत असे. रात्रीची सोबत असाही लग्नाचा अर्थ असतो का? मुलींना भित्रे का ठेवले जाते? भीती अंधाराचीच असते का? त्या दार ठोठावण्यामुळे मी बरेच दिवस हबकलेलीच राहीले. माझे हसणे मी पूर्वीच विसरले होते. आता एक, भय्याच्या बायकोने डोक्यात भरवलेली अनामिक भीती शिरली होती. लोकांचे बरे असते, संशयाचा विषाणू पेरला की मोकळे होतात. तो विषाणू मने-घरे-कुटुंब उद्ध्वस्त करतो.

नव्या वडिलांबद्दलचा संशय माझ्या मनात बसला. मी चोरून नोकरीसाठी अर्ज करायला सुरुवात केली. फसवणूक आपल्या माथी परमेश्वराने लिहिली आहे. या भीतीने मी अर्धमेली झाले. आणि एक दिवस चक्कर येऊन पडले. डॉक्टरांना बोलावले. त्यांनी औषध, गोळ्या दिल्या. मोलकरीण लक्ष्मीबाईने त्या काळात माझी व नवीन वडिलांची सेवा केली.

लक्ष्मीबाई एक दिवस रात्री घरी जायला निघाली तेव्हा मी रडू लागले. लक्ष्मीबाई म्हणाली, `ताई तुम्हाला कशाची भीती वाटते? मला सांगा? ' मी काही न बोलता अश्रू ढाळू लागले.

लक्ष्मीबाई म्हणाली, `एखादा आठवडा मी दिवसरात्र राहते! '

बस! मी निर्धास्त झाले. आठवड्यात माझी तब्येत सुधारली. माझा सावत्रभाऊ रविवारी भेटायला आला. लक्ष्मीबाईने त्याला माझ्या आजाराबद्दल सांगितले. रात्र झाली की मी थरथर कापते. घाबरते वगैरे सांगितले. त्याने मला देवघरात बोलावले.

`माझे वडील तुम्हाला मुलीप्रमाणे मानतात. माझ्या सख्ख्या बहिणीची जन्मतारीखही 3 मार्चच होती. मनात संशयाचे बीज रुजवाल तर ती विषवल्ली पसरेल. लोकांना कुणीही सुखी झालेले बघवत नाही. तुम्हाला ह्या घरी आधार आहे. मला वडिलांची काळजी नाही असे नाही. पण मी वडिलांना सांभाळणार नाही. मला ते नको आहे. म्हाताऱ्या माणसाची सेवा करणे, त्याच्याशी पटवून घेणे फार फार, अवघड असते. मुलींची असुरक्षितता सर्वच ठिकाणी सारखीच असते. मात्र माझ्या वडिलांबद्दल तुम्ही खात्री बाळगा. '

मला सख्ख्या भावाचा भरपूर वाईट अनुभव होता. मी सावधपणे गप्प बसले. ह्या सावत्र भावाने माझ्या बॅगमधील सामान स्वतःच्या हाताने माझेकपाटात ठेवले. त्या कपड्यांमधील माझा आई-वडिलांबरोबरचा, भावाबरोबरचा फोटो टेबलावर ठेवला. घुंगरू काढून खुर्चीवर ठेवले.

`तू वाटल्यास इथे कथ्थकचा क्लास काढू शकतेस. '

`रामपूरमध्ये कथ्थक कोण शिकणार? ' मी.

`मन रमवण्यासाठी काहीतरी कर. नोकरी शोध' भाऊ म्हणाला.

मध्यरात्री पुन्हा दारावर थाप पडली. माझ्या संतापाचे रूपांतर अगतिकपणात झाले. मी उशीत डोके खुपसून रडू लागले. माझ्या नशिबी सुख नाही. आदित्यवर मी का प्रेम केले? देवा तू मला फसवले? मन कठोर करून मी डोळे फुसले व बॅग भरली. सकाळी वाट नेईल तिथे निघून जायचे असे ठरवले. कुठे जाणार? कुणाकुणापासून मी स्वतःला वाचवणार? एकदा

वाटले, अनेकजणांच्या नजरांपासून स्वतःला वाचविण्यापेक्षा इथले हे सर्व स्वीकारावे. बाकीची सुरक्षितता आहे. ह्या घरी रामपूरला अण्णासाहेब येऊ शकणार नाहीत. पण नाही. नकोच... मॅडमला फोन करावा का? एखाद्या दवाखान्यात नर्स म्हणून राहावे का? एखाद्या मंदिरात जाऊन राहावे. जोगीण व्हावे.

रात्रभर मी घाबरून दरवाजाला पाठ लावून बसले होते. रात्रभर भीती वाटतच होती. दरवाजा तोडून नवीन वडील नावाचा पुरुष (म्हातारा झाला तरी पुरुषच) आत आला तर? कधी तरी पहाटे तिथेच दरवाजाजवळ मी झोपले. सकाळी जाग आली ती लक्ष्मीबाईच्या आवाजाने आली. डॉक्टर आले होते. नवीन दादांची तब्येत खूप बिघडली म्हणून ते मला रात्री उठवत होते. मी उठले नाही म्हणून शेजाऱ्यांना त्यांनी बोलावले. लक्ष्मीबाई हाक मारत होती. माझा सावत्र भाऊ आला होता.

मला माझ्या कोत्या विचारांची लाज वाटली.

लक्ष्मीबाई विचारू लागल्या, `ताई बॅग का भरली? कुठे जाणार? ' मी म्हटले, `अजून ठरवले नाही. '

सावत्र भाऊ म्हणाला, `तुमच्या सेवेची गरज आहे. नवीन दादांना बरे वाटल्यावर एखादा आठवडा रजा घेऊन कुठे जायचे तिथे जाऊन या. '

नवीन वडिलांनी मला हाक मारली.

`सारिका, रात्री गाढ झोपली होतीस. तुझी कुंडली डॉक्टरांकडे दे. डॉक्टरसाहेब, माझ्या लेकीला चांगला नवरा शोधा. ' मी गप्प बसले. डॉक्टरांनी माझी कुंडली मागून घेतली. मी नवीन वडिलांना म्हणाले, `माझा भूतकाळ फार वाईट आहे. '

यावर ते म्हणाले, `त्या हलकट अण्णासाहेबांना घाबरू नकोस. तो नराधम आता इथे, तुझा केसही वाकडा करणार नाही. आणि एखादा अपघात आयुष्यात घडल्याने काही

बिघडत नसतं. नवीन काहीतरी पुढे घडायचा पर्याय शिल्लक राहतोच. ' डॉक्टर गेले. त्यानंतर मी नवीन वडिलांचा संशय घेतला नाही. पण एका रात्री ते `छातीत दुखते' म्हणून ओरडू लागले. मी त्यांच्याजवळ गेले. मला कळले त्यांना हृदयविकाराचा झटका आला आहे. मी त्यांना इस्पितळात नेले. त्यांचा जीव वाचवल्याबद्दल ते माझे ऋणी राहू लागले.

नवीन दादा स्व. यशवंतराव चव्हाण यांचे समकालीन होते. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी ते मला घेऊन जात असत. `पाडव्याच्या शुभमुहूर्तावर मुक्ता देवीच्या हस्ते रामपूरचे पहिले कथ्थकच्या क्लासचे उद्घाटन कर' - नवीन दादा म्हणाले.

`पण कथ्थकच्या क्लासमुळे माझे नाव माहीत झाले तर अण्णासाहेब इथेही येतील. ' मी नवीन भावाला म्हणाले.

`तू आजपासून क्लास सुरू कर. नवीन दादांच्यासमोर अण्णासाहेब उभेसुद्धा राहण्याची हिंमत करणार नाहीत. ' नवीन दादांना थोडे बरे वाटल्यावर साधेपणाने आमचे बंगल्याच्या अंगणात क्लास भरू लागला. आठ वर्षांपासून पन्नास वर्षांपर्यंत वयाच्या हौशी विद्यार्थिनी येऊ लागल्या. कुणी छंद म्हणून, कुणी आवड म्हणून, कुणी वेळ घालवायचा म्हणून येत होत्या. नवीन दादासाहेबांचा बंगला माणसांनी गजबजू लागला. नवीन दादासाहेबांची दत्तक कन्या म्हणून रामपूर गाव मला ओळखू लागला. दिवस मजेत जात होते. माझ्या मनातील भीती कमी झाली. मी नोकरीसाठी प्रयत्न करू लागले. सीतापूरहून लक्ष्मणपूरहून रामपूरला गेले. तिथे नवीन दादांकडे मी एक वर्ष राहिले. खेड्यातून जिल्ह्याकडे आले होते. जिल्ह्यातून पुन्हा तालुक्याच्या ठिकाणी आले.

काही दिवस स्वप्न आयुष्यात यावे तसे उरलेले वडिलांचे प्रेम देण्यापुरते नवीन दादा आयुष्यात आले. नवीन दादा ८२ वर, त्यांचे वय पुष्कळ होते तरीही त्यांची तब्येत हळूहळू सुधारू लागली. हातात काठी घेऊन डोळयांवर जाड चष्मा लावून लेंगा झब्बा घालणारे नवीन दादा खूपच रुबाबदार दिसत असत. बागेत त्यांनी एक ख्रिसमसचे झाड आणून लावले.

येणाऱ्या-जाणाऱ्या मुली आजोबांना जाता-येता नमस्कार करू लागल्या. रामपूरगावात पेन्शनर्स मित्रांच्या त्या कंपूमध्ये नवीन दादांचा भाव वाढला. चांगली मुलगी म्हणजे किती आनंद असतो हे गाव बघत होते. `माझी मुलगी म्हणजे बेटी बचाव' आंदोलनाचे उदाहरण आहे! ' असे नवीन दादा गावाला अभिमानाने, गर्वाने सांगत असत. नवीन दादा मला लाडली म्हणत असत. खानदानी घराण्यातील मोठेपणा सांगणारे नवीन दादा हल्ली लेकीचे कौतुक सांगू लागले.

मला कधी कधी भीती वाटत असे, की मी ह्या रामपूर गावात राहते हे माझ्या पूर्वीच्या गावी, लक्ष्मणपूरला कळले तर तेथील माणसे माझ्याबद्दल बऱ्यावाईट गोष्टी पसरवतील. मला इथे जगणे मुश्कील करतील. मी मानिनी होते. जे घडले त्यात माझी काहीही चूक नव्हती व काही दोष नव्हता. पापी लोक उजळमाथ्याने वावरत होते व मी मात्र इथे घाबरून गुमनामीचे आयुष्य जगत होते. मी स्त्री आहे म्हणून मला भीतीत वावरावे लागत होते. देव कुठे राहतो हो? तरीही मिळाले तेवढेही सुख देवाच्या दयेने मिळाल्याबद्दल, मी देवाचे खूप आभार मानले.

तिथे मी टाळत होते. नाही म्हणत होते. तरीही नवीन दादांनी मला कॉलेजला घातले. माझे एकच वर्ष राहिले होते. ते पूर्ण झाले. नवीन दादा मला झाशीची राणी म्हणत असत. `तू शिक्षिका हो, माझ्या ह्या वाड्यात शाळा सुरू करू', असे म्हणत असत. सावत्र भावाला मात्र, इथेशाळा सुरु होईल, याचा राग येत असे. पण तोही चडफडत गप्प बसत असे. कारण मालमत्ता दादांची होती. पण नकळत, मी नवा शत्रू तयार करीत होते.

ह्या नवीन वडिलांकडे, नवीन घरही सांभाळावे लागत असे. रामपूर गावीही खूप राजकारण होतं. मी गप्पच राहात असे. महाराष्ट्रात परधर्मीयांनी, परप्रांतीयांनी मराठी माणसांवर अन्याय केलेही असतील, पण मराठी माणसाचे नुकसान केले ते त्याच्या आपल्या नातेवाईकांनीच केले. आपापसातील विसंवादी नातेसंबंध हे कायमच माणसाला दुःख देऊन जातात. `एकानं पडतं घ्यावं' सांगणं सोपं असतं, पण पडतं घेणारा, तडजोड करणारा,

तीकरतच राहतो. अर्थात एक दिवस, तोही बंड करतो. अर्थात हे बंड सावलीचं बंड असतं. गावातसुद्धा ती भावाभावांची भांडणे होती. शोषित व्यक्तीही करते ते बंड होते. गावकीचे राजकारण होते. बंडाळी होते. अशी कुटुंब जास्त काळ टिकत नाही. हे मी जाणून होते. कधी मलासुद्धा रामपूरचे हे घर सोडून दुसरीकडे जावे असे वाटे. पण अनामिक भीती वाटत असे. मला कुणी सहज थोडीच नोकरीवर घेतले असते? जाऊन जाणार कुठे? रस्ता नेईल तिथे? गावात एक शंकराचे देऊळ होते. मी दर सोमवारी तिथे जात असे.

जगाची रचना भगवान श्रीशंकराने केली. त्या परमेश्वराने ही पृथ्वी निर्माण केली. माणूस नावाचे अगम्य गूढ बेट आश्चर्य म्हणून बनविले. ह्या जगन्नियंत्याने वृक्षवेली बनविल्या. त्या पृथ्वीच्या पोटात शक्तिशाली असे स्रोत बनविले. झुळझुळ वाहणारे झरे, गूढ गुहा, उंच डोंगर, हिरवी वनराई, शंकराच्या जटा आपटून बनलेल्या ह्या खडकाळ गुहा. काळयाशार शंकराच्या पिंडी आहेत. निसर्गानेच ह्या पिंडींच्या भोवती वाढ होऊ दिलेली ही बेलाची झाडे. वाऱ्याने, पक्ष्यांच्या पायांनी ही बिल्वदले ह्या शंकराच्या पिंडीवर पडतात. शंकराच्या देवळाभोवती पांढऱ्या चाफ्याची झाडे असतात. विसंवादी वृक्षसुद्धा ह्या निसर्गात कधी आढळत नाही. जणू काही त्या शंकराने आपल्या अंगणात आपल्या निर्धारित विभागात आपल्या गढीत बेलफुले वाढवली. मी भगवान शंकराची भक्त झाले. शंकराची मनोमन उपासना करू लागले. दत्तगुरूने औदुंबर, पिवळा चाफा वाढवावा आणि श्रीमारुतीने आपला परिसर फक्त आपल्या आवडत्या निळया करड्या रुईच्या झाडाफुलांनी वाढवावा. मी ह्या शंकराच्या देवळाला माझे चौथे घरटे मानू लागले. ह्या वृक्षांप्रमाणे वेगवेगळया जमातीची माणसे जगात असतात. पण बेलाला ज्याप्रमाणे बिल्वदले येतात तशी जीवनातील पुस्तकांच्या पानांना असणारी तीन उपपाने म्हणजे गरिबी, अंधश्रद्धा व विसंवाद होय. देवपूजेला बिल्वदले वाहणे म्हणजे दुर्गुण ईश्वरचरणी वाहणे. मी माझा भूतकाळ वाहीला. हे घर बदलून नवीन दादा व मी नवीन घरी आलो. नौगवला आलो.

जेव्हा मला नव्या दादांकडे राहण्याचा प्रस्ताव आला होता. तेव्हा सख्खा भाऊ

म्हणाला होता - `म्हातारा रखेल म्हणून ठेवेल. ' पण परमेश्वरकृपेने त्यांनी मला मुलीसारखेच ठेवले.

मी वणवण फिरत होते. तेव्हा मॅडमनी मला ह्या रामपूरच्या नव्या घरी सोय लावून दिली. पुढे ही गोष्ट नवीन वडिलांबरोबरची साधारण 1985 साली सुरू झाली होती. ती पुढे सरकली नि नौगावाकडे  वळाली. तेव्हा मी पंचवीस वर्षांची होते. नुकतेच आम्ही घर बदलून माझ्या त्या नव्या वडिलांनी नौगावी हौशीने बांधलेल्या नौगावातील वाड्यात राहायला आलो होतो. ह्या नव्या वडिलांनी रिटायर्ड झाल्यावरही पूर्वी काही दिवस दुसरी नोकरी पत्करली होती व करीत होते. धुळ्याची ती नोकरी झेपेना म्हणून त्यांनी ती नाइलाजानेच सोडली. रामपूरचा बंगला सुंदर होता, तसेच धुळ्याचे ते क्वार्टर खूपच छान होते. मोठी गच्ची, आमराई, झोपाळा, पितळी कड्यांचे मोठमोठे दरवाजे व कमानी असलेले ते घर सोडून आम्ही नौगावी आलो. मला शेवटचे कॉलेजचे वर्ष पूर्ण करण्यासाठी त्यांनी रामपूरला कॉलेजात घातले. माझे त्या नौगावला झाले ते शिक्षणाचे शेवटचे वर्ष (पदव्युत्तर)होते. जुन्या घरांची ओढ संपत नव्हती. नवीन घराचे आकर्षण मनाला गुदगुल्या करीत होते. काहूर उठून मन बेचैन होत होते. शरीर घायाळ होतेच.

माझा नवा सावत्र भाऊ नव्या वडिलांना म्हणायचा, `का रामपूरसुद्धा घर चांगले होते. आपण राहते घर सोडून ह्या गावी आलो? ' नवीन दादा गप्प बसले. पुढे त्यावर तो म्हणाला, `खरे तर त्या धुळ्याच्या घरात थाट होता. ' त्याला त्या आईवेगळा म्हणून जीव लावणाऱ्या मामी, शेजारणी आठवत होत्या. वडील म्हणाले, `माणूस म्हणजे एक पक्षीच असतो. उडत उडत नवीन गावी जायचे. तिथे घरटे बांधायचे. कधी ते वाऱ्याने कोसळते, कधी ते साप अंडी खाऊन टाकतो. तर कधी पक्षीच ते गाव, ते घरटे सोडून दूरच्या यात्रेला निघून जातो, तर कधी घायाळ पक्ष्याला देवाघरी जावं लागतं. आपलं ते घरटं सुटलं आता हेच नवेघर आपलं.'

मी त्या नवीन घराला जीव लावला. सुंदर झाडे लावली. अंगण बनवले. मोठे

तुळशी वृंदावन केले. गच्चीत बसून तारे बघायला नव्या दादांना आवडते म्हणून देखरेख करून गच्चीत एक खोली बांधली. एका वर्षाने त्या घरात, घरट्यात मी रमले. त्याकाळी मुली फारशा नोकऱ्या करीत नसत. तरीही नव्या वडिलांनी मला कॉलेजचे शिक्षण पूर्ण करायला सांगितले होते. चांगले शिक्षण दिले होते. मार्चमध्ये  कॉलेजची परीक्षा संपली. तेव्हा सुटल्यासारखं वाटलं. ठरवलं आता सुट्टीत मनसोक्त बागडायचं. गाणी ऐकायची, वाचन करायचं, लांबवर फिरायला जायचं. माझी मजा करायची तेवढीच संकल्पना तेव्हा होती. कॉलेज जीवन संपल्याची ती खंतही मनात होती. एक ऊपयोगी डिग्री त्या कॉलेजने दिली. आयुष्यात उपयोगी पडणारी की न पडणारी? पण त्या कॉलेजने संस्कार दिले. समाजात वावरायचा आत्मविश्वास दिला. चारित्र्याचे महत्त्व, नैतिक मूल्ये, मित्र-मैत्रिणी, हा अनुभव ही शिदोरी घेऊन आज मी व आम्ही सर्वच आयुष्याची वाटचाल करणार होतो. मी घरी आले.

प्रत्येकालाच नवीन मित्र मिळतात. जुनं संपून जातं. आणि आयुष्य नव्याने सुरू होते. पण मला परक्यांची भीती वाटे. त्यामुळे मला मित्र-मैत्रिणी नव्हत्या. खरे तर कॉलेजचे ते फुलपंखी दिवस कधी संपूच नये असंही वाटतं. चांगले असो की वाईट तसे तेही दिवस संपले. फक्त संपले नाही ते संस्कार व ती स्वप्नं. जुन्या अनुभवांमुळे मी नाराज असायचे व कुणातही मिसळत नसे. माझे नवीन दादा रोजच संध्याकाळी फिरायला जायचे. हल्ली जसा ज्येष्ठ नागरिकांचा असतो तसा पंचेऐंशी सालीसुद्धा त्यांचा एक मैत्रीकट्टा होता. तिथे संध्याकाळी सर्व वृद्ध मित्रांबरोबर हळूहळू शिळोप्याच्या किंवा अन्य गप्पा मारत असत. अगदी आजारी माणसेसुद्धा नोकरांचा, नातवांचा/मुलांचा हात धरून त्या कट्ट्यावर येत व  ताजेतवाने होऊन परत जात.

आजारी असूनही त्या दिवशी नव्या दादांनी मला त्यांच्या त्या कट्ट्यावर सोबत नेले. `माझी दत्तक घेतलेली मुलगी'

“वा, छान” जोशी काका म्हणाले. दादांनी लेक म्हणून अभिमानाने ओळख करून दिली. चांगले स्थळ असल्यास सुचवा असंही सांगितलं. नेहमीप्रमाणे कट्ट्यावर न बसता दादा

माझ्या बरोबरच घरी आले. परत येताना ते नेहमीप्रमाणे मावळतीचे रंग रसिकतेने व चोखंदळपणे निरखून पाहात नव्हते. गप्प गप्प होते. मीच विचारलं. `काय झालं दादा? '

नवीन दादा म्हणाले, `बेटा एवढ्या मोठ्या साम्राज्याचा राजा तो सूर्य सुद्धा मावळेल. जो जन्माला येतो तो मरतो. उद्या मीही असाच मरून जाईन तेव्हा तुला कोण बघेल? ' मी गप्प बसले. दादांना नेमकं मला काय सांगायचं होतं? सगळीकडून अंधार दाटून आला होता. दर सहा महिन्यांनी सावत्र भाऊ येऊन वडिलांचे पेन्शन घेऊन जात असे. त्याने तिकडेच लग्न केले होते. मागेच, आईचे दागिने बायकोसाठी म्हणून तो घेऊन गेला होता व तिकडेच सेटल झाला. मला आठवलं. कॉलेजातील माझ्या वर्गातला एक मित्र मला कायम सांगत असे.

`म्हाताऱ्या वडिलांची सेवा करायला त्याला नर्स हवी आहे. त्यामुळे तो भाऊ तुझं लग्न होऊ देत नाही. नवीन वडील वारल्यावर तो तुला घराबाहेर हाकलून देईल. आजपर्यंत किती स्थळं त्याने तुला पाहिली? तो स्थळ बघायला जातो की तुझं लग्न मोडायला जातो? त्यांना तुझं लग्न होऊ नये असंच वाटतं. तू लग्न कर, कुणाशीही कर किंवा तू स्वतःच्या नावानं छोटं घर तरी घे! तुझ्या नवीन वडिलांच्या मृत्यूनंतर तुझ्या पाठीवरून फिरणाऱ्या हातांमध्ये प्रेम, आधार आहे, की वासना आहे हे कळल्याशिवाय कुणालाही जवळ करू नकोस. अगं सख्खे विचारत नाहीत. सावत्र आणि दत्तक भाऊ काय विचारतील? '

शेजारीपाजारी सांगत, `नव्या दादांची सेवा करत राहशील आणि दादांच्या मृत्यूनंतर तुझ्याकडे वाईट नजरेने बघणारे तुझा गैरफायदा घेतील. तू सुरक्षित आहेस का? '

मी ऐकून सोडून देत असे. पण आज नव्या दादांनी मला भविष्याची सूचना दिली होती. भूतकाळात खूप वाईट अनुभव मी घेतले होते. पण नवीन गावी रामपूरला हे माहीत नव्हते. नव्या वडिलांना सर्व माहीत होते. त्यांना आधार हवा होता. ते गप्प झाले. त्यानंतर आम्ही दोघेही दृष्टावल्याप्रमाणे गप्प गप्पच झालो. एक दिवस दादांनी मला सांगितलं.

`बेटा मला मरण्यापूर्वी तुझ्याकडे एक मागणे मागायचे आहे. तुला माहीत आहे

माझे शिक्षण बडोद्याला झाले. मला मरण्यापूर्वी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांच्या राजवाड्याला पुन्हा भेट द्यायची आहे. ' माझी परीक्षा संपली होती. त्यामुळे माझ्याकडे वेळच वेळ होता. आगगाडीचे रिझर्व्हेशन केले आणि जायची वाट पाहू लागले. बडोद्याच्या राजघराण्याच्या आठवणी, नवीन दादाच्या, सुन्या आयुष्यात पुन्हा रंग भरू लागल्या. सयाजीराव गायकवाड मूळचे नाशिकचेच होते. दत्तकपुत्र म्हणून बडोद्याच्या गायकवाड घराण्याचे नाव त्यांनी अजरामर केले.

आम्ही बडोद्याला पोहोचलो. भावाने त्याच्या एका मैत्रिणीकडे राहायची सोय केली होती. नवीन दादा खूश होते. बडोद्याला, सयाजीराव गायकवाड राजवाडा बघणे हा आमचा एकमेव कार्यक्रम होता. पहिल्या दिवशी आम्ही राजवाड्यातले वस्तुसंग्रहालय बघितले. श्रीमंत सयाजीरावांच्या राजेशाही काळातील वैभवाचे साक्ष देणारी मोठमोठी तैलचित्रे, त्यांचे शस्त्र-भांडार, हिरे-सोन्याने मढलेली तलवार, राजा रवी वर्माने काढलेले श्रीमंत राजघराण्यातील भव्यदिव्य चित्रे, राजा गायकवाड यांची विविध कलात्मक चित्रे दादा तल्लीन होऊन बघत होते. त्याबद्दल माहिती सांगत होते. हिंदुस्थानातील एका आदर्श राजाचा राजवाडा होता तो!

दुसऱ्या दिवशी मुख्य राजवाडा बघितला. दरबारी हॉलमध्ये ती सुंदर अप्रतिम कलाकुसर, फ्लिंट ग्लासवरची हिंदू देवतांची चित्रे बघून मन मुग्ध झाले. तिसरा दिवस बग्गीखाना पॅलेस बघितला. आम्ही पुन्हा राजवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ आलो. दादा म्हणाले, `बेटा तुला समजले का मी तुला हा राजवाडा का बघायला आणले? ' मी प्रश्नार्थक नजरेने पाहिले. काहीच बोलले नाही. दादा पुढे म्हणाले, `राजेरजवाडे हे काळाच्या ओघात नष्ट होतात. वैभवाच्या पाऊलखुणा गतवैभवाची साक्ष देत उभ्या राहतात, पण ते वैभव तसे राहात नाही, जे गेले ते तर परत येत नाही. तुला मी दत्तक घेतले आहे आणि मला तुझा लळा लागला आहे. तुझ्यात मला माझी मुलगी दिसली. सयाजीरावांनी जसे गायकवाड घराण्याचे नाव रोशन केले तसे, तूही माझी दत्तक कन्या, माझे नाव रोशन करशील.

बेटा, मला पैलतीर दिसू लागला आहे. माझ्या पश्चात तुझं कसं होईल याची मला खूप काळजी वाटते. '

मी म्हणाले `दादा, माझा भाऊ आहे की आणि बेघर होऊन फिरण्याची वेळ पुन पुन्हा आणण्याइतका देव निष्ठुर नसावा. '

`बेटा माझ्या माघारी लोक तुझ्याशी कसं वागतील ते काही सांगता येत नाही. द्रष्ट्या राजेसाहेबांच्या दोन मुलांमध्येही फारसा सुसंवाद नाही. भारतीय कुटुंबव्यवस्थाही हल्ली ढासळत चालल्या आहेत. आपल्याला न सांगताच तुझ्या भावाने लग्न केले. तो तुझ्या लग्नासाठी काही करणार नाही, कुणीही खटपट करीत नाही. असुरक्षितता तुझी पाठ सोडत नाही. तू नोकरी पकड. ' दादा म्हणाले.

`दादा मला देव बघेल. '

`बेटा जास्ती आशा धरू नकोस. '

`मी होस्टेलवर राहीन.'

यावर दादा म्हणाले, `होस्टेलवर दिवस घालवता येतात. जन्म काढता येत नाही.'

नवीन दादा म्हणत, नोकरी कर. पुढे तब्येतीचे प्रश्न निर्माण होतात आणि मी विचारी "नवीन दादा तुम्हाला कोण बघेल? '

`दादा तुम्हाला नक्की काय म्हणायचं आहे? '

`तू नोकरी करावीस. तू जर स्थिरस्थावर झाली नाहीस तर तुझ्यात माझा जीव गुंतून राहील. तरुण मुलीच्या काळजीने माझा आत्मा स्वर्गातही तळमळत राहील. कर्ज व

मुलगी ज्याच्या त्याच्या घरी गेलेली बरी. लग्न तरी कर. नाही तर नोकरी तरी पकड. लग्न होणं सोपं नाही. त्या काळी नोकरी करणाऱ्या स्त्रियांचं प्रमाण अगदी तुरळक असे. त्यामुळे माझ्या जुन्या जुन्या काळात वाढलेल्या नवीन दादांनी, या वडिलांनी मला नोकरी कर म्हणून सुचवावे याचं मला खूप आश्चर्य वाटलं. प्रश्न सुटण्याऐवजी बदलतील. एवढाच विचार करून मी तूर्त गप्प बसले. तरीही मी उघडपणे अर्ज करायला सुरुवात केली!

मी जाती मंडळाच्या कॉलेजमध्ये अर्ज केला. नोकरी मिळणं सुवर्णपदकधारक असल्याने अवघड जाणार नाही, असं वाटलं होतं. पण राखीव जागा, राखीव व्यक्ती, ओळखीच्या चिठ्ठ्या यातून निवड व्हायची होती. ज्या दिवशी माझी मुलाखत होती त्या दिवशी नवीन वडीलसुद्धा माझ्याबरोबर येण्यास तयार झाले. मला याचं हसू आलं. मुलीला शाळेत घेऊन जसे ते गेले होते तसेच ते आता मला, लाडक्या लेकीला मुलाखतीला घेऊन जात होते. फक्त मला पहिलीत शाळेत सोडताना, माझा बालीश गोबरा हात माझ्या वडिलांनी त्यांच्या मजबूत हातात घट्ट धरला होता. दोन वेण्या उडवत मी पळत होते. आता नवीन दादांचा कृश, सुरकुतलेला, थरथरणारा हात मी माझ्या हातात धरला होता. दादांचे चांगल्या चांगल्या घराण्यात संबंध होते. ते शब्द टाकू शकत होते.

जातीचे, ओळखीचे, असले तरीही हे कॉलेज मोठे होते. दोन्हीकडे खोल दरी होती. वरून लहानशी वाट. मुलाखत चांगली झाली. दादा मला घेऊन त्या विशाल कॉलेजच्या प्रांगणात गेले. गर्द हिरवीगार झाडी होती. आम्ही कट्ट्यावर बसलो. फिरकीच्या तांब्यातून आणलेले पाणी मीही प्यायले. त्यांनाही दिले. त्यांचा चेहरा गंभीर झाला. दादा मला म्हणाले, `इथे बस. ग्लोबल व लोकल हा फरक तुला कळतो ना? '

`हो लोकल म्हणजे त्या गावचे. ग्लोबल म्हणजे पूर्ण जगाचे. '

`बेटा आज ह्या दादांची गोष्ट ऐक'.

`बेटा आपण जेव्हा एका लहान गावातील एखाद्या संस्थेचे सभासद होतो. तेव्हा

लोकल रूप असते. मोठ्या सरकारी नोकरीत आपण जातो तेव्हा ते राष्ट्रीय होते. परदेशी गेले की आंतरराष्ट्रीय होते. ग्लोबल होते. तू स्पर्धा परीक्षा द्याव्या व अधिक चांगली नोकरी मिळवावी. मिळेल त्या माफक यशाने फुशारून जाऊ नये. शिवाय इथे तुझा भूतकाळ पुढे अडचण निर्माण करू शकतो. जातीच्या भिंतीच्या येणाऱ्या काळाचा, त्या बदलाचा सत्कार करून स्वागत कर. काळाच्या पुढे उभ्या त्या प्रकाशाकडे बघ. साठलेले पाणी संपून जाते. पैशांची किंमत कमी होते. व्याजावर जगणं शक्य होत नाही. चांगलं राहण्याची सवय असते. तू नोकरी करावीस. मोठा भाऊ त्याचं त्याचं कमवतो व तू स्वतःचं कमवावं. '

तुला एक गोष्ट सांगतो बेटा

`आमच्या राजघराण्यात वतनदारीचे पैसे वर्षातून एकदा यायचे. त्या पैशाचा हिशेब व त्याला फुटणारे पाय, वर्षभर आधीच तयार असत. खूप खर्चाचे प्लॅनिंग तयार असे. एकदा आमच्या घरी श्रावणपाटीचा कार्यक्रम होता. फार जुनी, १९१० सालची गोष्ट आहे ही. मी दहा वर्षांचा होतो. त्या काळी नव्या नवरीला श्रावण महिन्यात पाटीभर खाऊ पाठवत. अनेक प्रकारच्या मिठाया, लाडू, चकल्या, पापड, चिवडे, गोड- तिखट दशम्या, बर्फ्या असा खाऊ पाठवला जाई. पाटी पाठवायची म्हणजे घरच्यांसाठीही हवे. शिवाय शेजारीपाजारी, नोकरचाकर, सांगावा धाडणारे, पालखी उचलणारे, सर्वांचाच शेर त्यात असे. त्यामुळे भरपूर खर्च येत असे. गोड जेवण, खारे जेवण, खर्चच खर्च होता.

श्रावणपाटीचे सामान आणायला मला माझे आजोबा गावातील वाण्याकडे घेऊन गेले. मी टणटण उड्या मारत वाण्याकडे गेलो. वाण्याकडे सामानाची यादी दिली. सोबत नोकर भीमा होता. वाण्याने माल दिला व पैसे मागितले. आजोबा म्हणाले

`सरकारकडून तनखा आल्यावर देऊ. '

वाण्याने सामान हिसकावून घेतले व म्हणाला, `सामान तेव्हाच न्या. ' आजोबांचा खूप मोठा अपमान झाला. आम्ही परत चालू लागलो तेव्हा आजोबा गप्प होते.

येताना त्यांनी मला सोनाराच्या दुकानात नेले. सोनाराकडे बोटातील एक तोळयाची अंगठी त्यांनी विकली. आम्ही पुन्हा वाण्याकडे गेलो. सामान खरेदी केले. श्रावण पाटी जोरात झाली. पण आजोबा नाराजच होते. मला घरी शिकवायला शिक्षक येत असत. आजोबा माझ्या शिक्षणात लक्ष घालू लागले. जूनमध्ये आजोबांनी मला बडोद्याला नेले. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या वाड्यात गरजू हुशार मुलांना शिक्षणासाठी ठेवायची सोय होती. आजोबांनी मला त्या राजवाड्याच्या दारात सोडले. शिक्षण घे. सुखी राहा. मला तिथे सोडून ते परत गेले.

राजवाड्याच्या दारात, शिक्षणासाठी, त्यांनी मला इथेच सोडले.

बडोद्याच्या त्या राजवाड्याच्या दरवाजाकडे बोट दाखवत नवीन दादा म्हणाले, आजोबा मला जिथे सोडून गेले तो हाच दरवाजा आहे. त्यावेळी, कितीतरी वेळ मी ह्या रस्त्याकडे बघत उभा राहिलो. कधीमधी नंतरही येऊन वाट बघत उभा राहात असे. जाणारी व्यक्ती परत येत नसते. किंबहुना फिजिकल फॉर्ममध्ये प्रत्यक्षपणे जाण्यापूर्वीच ती मनाने गेलेलीच असते, हे मी जाणले. गावात परत जाण्याचे दार बंद झाले होते. मी पुस्तकावर प्रेम करू लागलो.

बेटा मी शिकलो. स्वतःच्या पायावर उभा राहिलो. लग्न झालं. पहिला मुलगा झाला. मला फार आनंद झाला. त्याकाळी `मुलगा होणं' म्हणजे फार मोठं कौतुक होतं. अर्थात अजूनही आहेच. मी आनंदाने मुलाला चांगल्या शाळेत घातलं. दुसऱ्या मुलीच्या वेळी आईला दिवस राहिले तेव्हा मी आईला म्हणालो `दुसराही मुलगाच हवा. ' मुलगी जन्मली. म्हणून मी नाराज झालो. मी आईला घालून पाडून बोललो. मुलगीच झाली. आता धनाची पेटी घेऊन जाईल. आईची तब्येत बिघडली होती. तरीही मी लक्ष दिले नाही. धोधो पाऊस पडत होता. त्या छोट्या गावात डॉक्टरही नव्हता. तुझ्या आईचा बाळंत रोगाने मृत्यू झाला. सुईणीने विचारलं,

`साहेब या मुलीचं काय करायचं? ' मी म्हणालो, `घेऊन जा तुला. '

ती म्हणाली, `साहेब आहे त्या मुलांना खायला पैसा नाही. हिला कुठून नेऊ? '

मी म्हणालो, `काहीही कर. ' सुईणीने बाळीला टोपलीखाली झाकून ठेवले व गेली. ती जोरजोरात रडत होती. मी तुझ्या भावाला घेऊन बाहेर रडत होतो. अचानक जाणवलं, बाळीचं रडणं क्षीण झालं आहे. थोड्या वेळानं रडूनरडून ती गप्प झाली होती. आवाज बंद झाला. अचानक मला जाणवलं आपलं काहीतरी, कुठेतरी चुकतं आहे.

मी उठलो. टोपलीखालून बाळीला म्हणजे मुलीला बाहेर काढलं. तिच्या अंगाला मुंग्या लागल्या होत्या. ती अर्धमेली झाली होती. वाटलं, दुधात बुडवून मुलींना मारणाऱ्या लोकांमध्ये व आपल्या संस्कृतीत काही फरक नाही. किती चुकत होतो मी. मी तिला गरम पाण्यानं अंघोळ घातली व जवळ घेतलं. लुकलुकत्या डोळयांनी ती माझ्याकडे बघत होती. माझा हात चोखत होती. दूरवर कुत्रा भुंकल्याचा आवाज झाला. बाहुली सारखी नाजूक ती दचकून मला चिकटली. तेव्हापासून तीची आईपण मीच झालो. वडीलपण मीच झालो. मी तरुण होतो. दुसरं लग्न करावं असं नातेवाईकांनी सुचवलं. पण त्या दोघा भावंडांना सावत्र आईचा त्रास नको म्हणून मी दुसरं लग्न केलं नाही.

`दादा ती मुलगी? '

`ती मुलगी वारली. ' दादा रडू लागले. `तिला अण्णासाहेबांनी मारले. तुझ्याबाबत जे झालं, तेच तिच्याबाबतही झालं'.

नवीन दादा बोलतच होते.

माझे डोळे विस्फारले, `म्हणून मॅडमनी तुझी गोष्ट सांगताच मी ठरवलं तुला मरू द्यायचं नाही. शिवाय माझ्याकडे तू अण्णासाहेबांपासून सुरक्षित राहशील. '

मुलगी मेल्यावर मी कोर्टात केस टाकली. पण हरलो. साक्षीदार मिळाले नाहीत. माझी लाडकी लेक अण्णासाहेबांनीच मारली. नवीन दादांना भावनांचा आवेग आवरेना. मला समजेना मॅडमनी ह्यांना माझ्या बाबतीत अण्णासाहेब जे वागले ते नक्की सांगितले आहे की नाही.

बहीण असून मेली मानणारे भाऊ कुठे व मेलेल्या मुलीसाठी रडणारे नवीन दादा कुठे? की जिवंतपणी त्रास दिल्यावर हताश झाल्यावर ती व्यक्ती मेल्यावर रडून अपराधीपण कमी होत असेल?

"तिची व तुझी जन्मतारीख एक आहे म्हणून मी तुला दत्तक घेतले. मी तुला माझीच मुलगी मानतो. तुझी जबाबदारी मी स्वीकारली आहे. "

थोड्या वेळाने दादा सावरले व पुढे बोलू लागले. आम्ही गोल्फ क्लबवरच्या कट्ट्यावर बसलो.

`ज्याकाळी आजोबांनी मला बडोद्याला शिक्षणासाठी ठेवले तेव्हा त्यांची ती कृती आधुनिक होती. राजघराण्यातील असूनही मी नोकरी केली. तेव्हा खानदानातील ती कृती ही आधुनिक होती. आज मी तुला नोकरी कर म्हणतो ही माझी सूचना ग्लोबल समज. '

आम्ही गावी परत आलो. मला दुसरीकडे नोकरी मिळाली. ही माझी पहिली नोकरी. एका इलेक्ट्रिकच्या वस्तू बनविणाऱ्या कारखान्यात होती. साधारणपणे आठ ते चार पर्यंत काम करून व लांब जाऊन, शिवाय घरचेही करण्याची माझ्यात शक्ती नव्हती. चहा व जेवणाची सुट्टी याव्यतिरिक्त उसंत नसे. मला थकवा येई. कॉलेज जीवनानंतर हे जीवन त्रासदायक वाटे. नवीन वडिलांना मी या तक्रारी सांगायचे. त्यावर ते म्हणायचे, `झाशीची राणी आहेस तू. घाबरायचे नाही. मला तुला वाऱ्यावर सोडायचे नाही. '

त्यानंतर मला सरकारी नोकरी मिळाली. नवीन दादांना खूप आनंद झाला. माझी ही नोकरी घरापासून लांब होती. त्याकरिता दादांनी मला स्कूटर घेऊन दिली. मी स्कूटरवरून ऑफिसला जाऊ लागले. मला त्या नोकरीत खूपच आनंद मिळू लागला. चांगल्या मैत्रिणी मिळाल्या. सोबतच्या कर्मचाऱ्यांचे संबंध सौहार्दाचे होते. त्या नौगावातील वाड्यात मी व

दादा आनंदात राहात होतो. त्याचवेळी माझ्या सोबतच्या एका मित्राने माझ्या समोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला.

सावत्र भाऊ म्हणाला, `सख्ख्या भावाला विचारा. '

दोघे म्हणाले `सोन्याचा पिंजरा आहे. तो तुझ्या पगारासाठी तुझ्याशी लग्न करू इच्छितो. '

तो मित्र माझ्या भावाला भेटला. म्हणाला, `प्रत्येक घरी हल्ली, नवराबायको नोकरी करतात ते काय पैशासाठी केलेले लग्न असते? ' पण माझ्या भावाने त्याला अपमानित करून हाकलून दिले.

तो सांगे, लग्नाचा खर्च मी वाचवला. मला भीती वाटे, माझ्या इतिहासाबद्दल ह्याला काही कळेल म्हणून मग माझ्या लग्नाचा विषय, मी मागे टाकला. माझा मित्र पुन पुन्हा येऊन मला सांगत असे, `तू या पिंजऱ्यातून बाहेर पड. सावत्र वडिलांच्या मृत्यूनंतर, तुला या घरात स्थान नाही. ' आणि ती वेळ लवकरच आली.

नवीन वडिलांची तब्येत बिघडली. जेमतेम आठवडा जगतील अशा वेळी सावत्र भाऊ, वकीलाला घेऊन आला. वडील मरायचीही वाट न बघता, सावत्र भावाने ते घर बंद केले. पैसा व आजारी वडिलांना, तो घेऊन गेला. माझी रवानगी गावातल्या होस्टेलवर झाली. माझ्या नवीन दादांनी फार पूर्वीच काळाची पावले ओळखली होती. बरं झालं, मी नोकरी करीत होते. फक्त वाडी विकून पैसे मिळावे म्हणून, दोन्ही भावांनी जिवंत बहिणीला आयुष्यातून उठवलं. माझ्या लग्नाचा प्रश्न पूर्णच संपला. नौगावचे, त्या गावातले घरटे मोडले. सावत्र भावाच्या घरी, परगावी, पुण्याला पंधरा दिवसांतच वडील वारले. भावाने मला कळवलं सुद्धा नाही.

`खरे खांदेकरी इथेच होते. ' असे तो म्हणाला. मला सुरेश भटांची कविता आठवली.

*अंत्ययात्रेला बरीच गर्दी जमली.*

*ज्यांनी खांदे दिले ते माझे खुनीच होते.*

मी बदली करून नवीन गावी आले.

*ममता का आंचल*
*गुडियों का कंगना*
*छोटी बड़ी सखियां*
*घर गली अंगना*
*छोड़ चली*
*छोड़ चली*

माझे, दुसरे नवीन दादाही वारले. होस्टेलवरून शहरात व शहरातून मी, मुंबई महानगरात पदोन्नतीवर आले. माझी नोकरी ठीक चालू होती. माझी संस्था भरभराट पावत होती. पुन्हा माझी प्रमोशनवर बदली झाली. मी नवीन जागी हजर झाले. नवीन दादांची झाशीची राणी होते ना मी. मला लढायलाच हवे होते. नवीन घरी घरटे मी, आनंदाने सजवीत असे. बदली होताच जुने घर सोडून जात होते. ऑफिसेस बदलत होती. घरेही बदलली जायची. सुदैवाने मला ऑफिसचे क्वार्टर मिळे. पाचवी-सहावी- सातवी अशी अनेक घरटी झाली. पुढे, मी घरट्यांची गणती सोडली, इतक्या बदल्या झाल्या.

पुन्हा बदली. पुन्हा घर बदलणे. सजवलेली घरटी सोडून जाणे. अर्थात हरलेल्या घायाळ पक्षिणीचे एकटीचेच घरटे; अंडी नाही, पिल्लं नाही, काड्या जमवणारा जीवनसाथी नाही. कासवाचे बिऱ्हाड होते! (विंचवाचे म्हणायला मी विषारी नाही. ) जोपर्यंत शरीर साथ देत होते, तोपर्यंत नोकरीचे, दगदगीचे फारसे काही वाटले नाही. ऑफिसमध्ये वेळ जात असे. माझ्या कामाबरोबर मी इतरांचेही काम करून स्वतःला बिझी ठेवत असे. माझे कथ्थक मात्र मी पार विसरून गेले.

*आईच्या गर्भात उमजली झुंजाराची रीत...*

अशी दहा वर्षे गेली. उत्कृष्ट नोकरी केल्याबद्दल मला चांदीचं पदक मिळालं.

आणि आज अचानक आरशासमोर उभे राहिले. जाणवलं, आपल्या केसातले अर्धे केस पांढरे झाले आहेत. आपले उतारवय चालू झाले आहे. मी म्हातारी झाले आहे. काळाच्या प्रवाहात वाडे-पूल, राजवाडे, संस्थानेच्या संस्थाने गुडूप होतात. त्यात माणसांची काय कथा! मोठमोठे प्रथितयश व्हीआयपीसुद्धा मृत्यूनंतर विस्मृतीच्या पडद्याआड जातात. `जन पळभर म्हणतील हाय हाय, मी जाता म्हणतील, कार्य काय ' ... एक दिवस मीही जाईन. माझ्या मृत्यूची कुणीही दखल घेणार नाही. जगण्याची तरी कुठे घेतली होती. कुणाची घेतली जाते का?

कंपनीत नवनवीन पद्धती झाल्या. आधुनिक यंत्रणा आली. कामावर असलेली माणसं अतिरिक्त झाली. स्वेच्छानिवृत्तीच्या गोष्टी सुरू झाल्या. गोल्डन शेकहॅण्डच्या योजना येऊ लागल्या. एकेक मैत्रीण निवृत्त होऊ लागली. बरोबरीच्या नातेवाईकांमधलेही एकेक मोहरे गळू लागले. अनारोग्याच्या तक्रारी कानी येऊ लागल्या. भावाला अजून सूनमुखाचे वेध लागले नव्हते. पण भावाचा मुलगा मोठा झाला. खऱ्या वडिलांच्या घरातच मला हक्क नव्हता तर सावत्र भावाच्या घरात कुठून येणार? मी स्वेच्छानिवृत्ती घेऊन काय करणार? कुठे जाणार? पण स्वेच्छानिवृत्ती न घेणाऱ्यांवर अनिच्छा निवृत्तीचीसुद्धा गदा आदळू शकते. तरुण वयात आम्ही ह्या संस्थेला आमची बुद्धी-शक्ती-श्रद्धा दिली. अर्थात त्या बदल्यात, त्या संस्थेने आम्हाला पगार दिला हे मान्य आहे. आम्ही संस्थेवर उपकार केले नाहीत. उलट संस्थेनेच केले. संस्थेने आम्हाला अंगाखांद्यावर खेळवले, मोठे केले. पण या उतारवयात, म्हातारपणात जीवनाच्या उतारावर, नाही म्हटले, तरी तारुण्य ओसरल्यावर कंपनीला मात्र आम्ही नकोसे झालो आहोत, ही गोष्ट फारच दुखावते. दुखावलेल्या मनाला इतर छोट्या गोष्टीही दुखावू लागतात.

वाटायचं मुलं-बाळं नाहीत, तर निदान म्हातारपणी दुःख नाही. मुलांना आपण नकोसे झालो, हे शल्य नाही. मुलांनी आपल्याला गावी सोडून दिले. वृद्धाश्रमात टाकले. ही खंत नाही. वृद्धाश्रमातल्या वृद्धांची दुःख नकोसेपणाचीच असतात. तसेही नाही. पण या संस्थेने आम्हाला नकोसेपणाचं दुःख द्यावं? खरेतर ह्या शरीरातील रक्त ह्या संस्थेचंच आहे. पण स्वेच्छानिवृत्तीचे वारे वाहू लागले. मला नोकरी सोडावी लागेल अशी लक्षणं दिसत होती.

आमच्या संस्थेच्या अध्यक्षा अविवाहित होत्या. असं वाटलं की, त्या मला समजून घेतील.  म्हणून मी त्यांना भेटले.

`मॅडम मी अविवाहित असून मला नोकरीची गरज आहे. ' - मी.

`बायकांनी एम्पॉवरड राहावे. दयनीय राहू नये. का म्हणून तुम्ही अशी विनवणी करता आहात? दुसरी नोकरी शोधा. 'अध्यक्षा

काय करू नका म्हणणं, सांगणे, सोपं होतं. पण नोकरी मिळणं सोपं असतं का?

`मॅडम विचार करा प्लीज. मला छोटं कामसुद्धा चालेल. ' मी.

`बघू. यू मे गो. ' त्या म्हणाल्या. वय चाऴीस वर्षांवरील सर्वांनाच गोल्डन शेकहॅण्ड घेऊन संस्था सोडायची वेळ आली. मी संस्थेच्या डायरेक्टरच्या खाजगी सचिवाला भेटले. तो तिरसटपणे म्हणाला, `आम्हाला तरुण हवेत. शिवाय... पुरुष...,  स्त्रियांनी लग्न करावं. मुलं वाढवावी. त्यामुळे पुरुष बेकार फिरणार नाहीत. भारत देशाच्या बेकारीचे कारण आहे, की स्त्रिया नोकरी करू लागल्या. ”

`सर पण माझं लग्न झालेलं नाही. ' मी.

`ओह! करियर हवी. स्वातंत्र्य हवे म्हणून तुम्हा स्त्रियांना आता लग्नही नको का? पण तुम्हाला बघून कधी तसं वाटलं नाही. '- कुत्सित नजरेनं पाहात म्हणाला.

`सर, नीट बघाल तर अजूनही काही गोष्टी कळतील. ' मी गयावया करीत म्हटलं. जास्तीचा फाजील गर्व, अभिमान मला परवडणारा नव्हता. नोकरीसाठी मी अगतिक झाले होते.

`म्हणजे काय म्हणायचं आहे तुम्हाला? ' त्याने जरा दटावूनच विचारलं.

`सर मी प्रौढ अविवाहिता आहे. मला नोकरीची अत्यंत गरज आहे. '

त्याने मला आठवड्यानंतरची, अध्यक्षा मॅडमची अपॉइंटमेंट दिली. निराश

मनानं मी बाहेर आले. खुर्चीत बसले. खरी गरज, खोटी गरज, असा फरक कुणी ठरवायचा? खरंच ब्रेडवर अधिक बटर हवं म्हणून नोकरी करणाऱ्या, काही स्त्रियांमुळे, गरजू नोकरी करणाऱ्या स्त्रिया बदनाम झाल्या का? हुंड्याला पर्याय म्हणून व पुरवठा पुरवणी म्हणून, हप्त्याने हुंडा म्हणून, स्त्रियांची नोकरीही समाजाने स्वीकारली. मात्र अगतिकतेची खरी गरज लपून राहिली.

गेल्या दोन वर्षांत मी नवी साडी घेतली नाही. एकेक ग्रॅम जमवून खरेदी केलेले दागिने भाऊ घेऊन गेला होता. माझे फंडाचे पैसे कर्जाऊ घ्यायला लावून, त्याने पूर्वीच हडपले. रक्त देऊन पैसे कमवायला, शरीरात रक्त तर हवे ना! मी पोट कसं भरायचं? कुणाकडे तरी असेच रखेल राहायचे? स्वयंपाकीण म्हणून राहणाऱ्या तरुण मुलीकडे सुद्धा समाजात वासनेने बघणारे जास्त असतात. मी कुठे जायचे? ढासळत्या कुटुंबव्यवस्थेने खऱ्या निराधारांवर किती अन्याय केला? भाऊ-वहिनींकडे धुणे भांडीही केली असती. फक्त आता या काऴात रस्त्यावर, बाहेर व्हरांड्यात, झोपणं शक्य नव्हतं. म्हणून आधार हवा. परमेश्वरानं स्त्री व पुरुष असे दोन लिंगी मानव का बनवलं? त्यांच्यातील शारिरिक आकर्षण उगीच दिले. मानवालासुद्धा देवाने पक्ष्यांप्रमाणे अंडी उबवणारा प्राणीच ठेवायला हवे होते. मला काही सुचेनासं झालं. पर्समधून मी औषधाची गोळी काढली. पाण्याबरोबर घेतली, पाणी भरुन, पाय ओढत, काचेचा दरवाजा ओढून तिथून बाहेर आले.

ऑफिसच्या आत वातानुकूलित यंत्रणा होती. त्यामुळे जाणवलं नाही. पण बाहेर खूप कडक ऊन होतं. आता उघड्या डोक्याने उन्हात चालावंच लागणार होतं. मी पुन्हा आत आले. तिथल्या अनोऴखी स्वागतिकेला म्हणाले,

`मॅडम तुमच्या पाहण्यात एखादी नोकरी असेल तर मला प्लीज तसं सांगा. मी कथ्थक कलाकार आहे.'

ती माझ्याकडे विचित्र नजरेनं बघू लागली. पण नंतर दया येऊन म्हणाली,

`वासंतिक कला ॲकॅडमीत, तुम्ही नृत्यशिक्षिका म्हणून जाऊ शकता. माझी मुलगी तिथे शिकते.' देवानं एक दार बंद केलं, पण दुसरं उघडलं.

मी त्या वासंतिक कला ॲकॅडमीच्या दिशेनं चालू लागले. ॲकॅडमीत कोणता तरी कार्यक्रम होता. तिथे माझे दुर्दैवाने, अण्णासाहेब पाटलांच्या हस्ते, बक्षीस समारंभ चालू होता. मी उलट पावली कुणाला दिसू नये अशा रीतीनं तोंड लपवत घरी आले. हे क्वार्टरच माझं घर होतं. खोलीतील त्या गणपतीच्या रंग उडालेल्या फोटोजवळ बसून रडू लागले. `दादा तुमची झाशीची राणी, लाडली हरली हो.' असे म्हणू लागले.

एखाद्याचं आयुष्य असं खडतर का असतं? देव कुठे राहतो? त्याला खरेच जाब विचारायला हवा. देवकीची अनेक मुलं कंस मारतो. तशी माझी अनेक स्वप्नं, अनेक जणांनी, भंग केली. श्रीकृष्णाचा जन्म कधी होणार? माठातील पाणी पिऊन मी उपाशीच झोपले. मध्यरात्री जाग आली तेव्हा वाटलं, बेगॉन पिऊन मरून जावं.

मला सकाळी जाग आली ती वॉचमनच्या हाक मारण्याने व पक्ष्यांच्या आवाजाने! म्हणजे मी अजूनही जिवंत होते. वॉचमन जाळीजवळ आला. त्याने मला निरोप दिला. `वासंतिक कला ॲकॅडमीतील बाईंनी बोलावलं आहे.'वाटलं, तिथे अण्णासाहेब बसले असतील. मला पुन्हा काहीतरी करतील. तरीही, मी त्या ॲकॅडमीत गेले. पोटाचा प्रश्न मोठा होता. माझ्या मते मी पापी नव्हते.

त्या मॅडमनी, माझी चौकशी केली. संध्याकाळी 6 ते 8 मुलींना नृत्य शिकवायला या, असं सांगितलं. मी जाऊ लागले. आठ वाजता, सर्वजणींसाठी नाश्ता असे. तो मलाही मिळू लागला. रात्रीच्या जेवणाचा प्रश्न सुटला. कंपनी बंद पडू नये म्हणून मी, न पावणारे देवाला साकडे घातले. तरीही कंपनीत स्वेच्छानिवृत्तीची सूचना आली. चाळीस वर्षे वयावरील सर्वच कर्मचाऱ्यांना एकरकमी नुकसानभरपाई देणार होते. कर्मचारी गृहिणींचं, घराचे, स्वप्न बघणं सुरू

झालं. मी एकटीच त्यांच्यात अविवाहित होते. प्रौढ कुमारिका ह्या संबोधनाची मला सवय झाली होती. चाळीसचे वर वय झाल्याने लग्न न झाल्याची खंतही संपली. तब्येतीला मलाही नोकरी व प्रवास झेपत नव्हताच. असे वाटलं डाळ-भात जेवायला असा कितीसा खर्च येईल? कपडे आहेत ते आयुष्यभर पुरतील. अनपेक्षित आजारपण आल्यास  औषधोपचाराला मात्र खूप पैसा लागतो. तो कुठून आणायचा? ठीक आहे... पैसे नसतील तर येणारा मृत्यू आपण स्वीकारूया.

पण आपल्या मानसिक भुकेचं काय? निवृत्तीनंतर वेळ कसा घालवायचा? कुणाशी बोलायचं? कुणाशी संवाद साधायचा? पोट कसं भरायचं? चेअरमन अध्यक्षा पण बाईच होत्या. कदाचित मला समजून घेतील. म्हणून पुन्हा त्यांना भेटून सांगितलं. `बघू' म्हणून त्यांनीही मदत करणं टाळलं. पण मला,  सहा-आठ महिने मुदतवाढ दिली. परदेशी नोकरी मिळविण्यात मदत करायची तयारी दाखवली.

स्वेच्छानिवृत्ती असो की अनिच्छा निवृत्ती, निवृत्त तर व्हायलाच हवं. दोन महीने झाले, नोकरीला सहा महिने उरले. आणि बदली झाली. पुन्हा घरटे - घर बदलले. ह्या घरात काहीच सामान नव्हतं. कंपनीनंही दिलं नव्हतं. माझ्या कपड्यांच्या बॅगा व भांड्यांचं एक पोतं, एक गादी! मरण आले, सरण आले. तरीही कुणाला अडचण होईल एवढे मोठे माझे सामान नव्हते. पण तरीही पुढे, भावाकडे जाण्याचा ऑप्शन ओपन नव्हता. सहा महिन्यांनी काय करायचं, कुठे जायचं ह्या विचाराने रात्र रात्र झोप येत नव्हती. शेवटची पोस्टिंग आहे. निवृत्तीनंतर कुठेतरी आश्रमात जावे लागेल असं पत्र, मी दोन्ही भावांना (सख्ख्या व सावत्र) पाठवलं. अर्थात त्यांनी उत्तर दिलं नाही. सख्खा असा होताआणि सावत्रा कडून कसची अपेक्षा नव्हती. तो आलाही नाही.

सहा महिने सरले. मी निवृत्त झाले. सहनशील कर्मचारी म्हणून सर्वांनी माझी खूप स्तुती केली. सहनशील म्हणजे काय? सहन न करून कुणाला सांगणार? अध्यक्षानी

क्वार्टरच्या चाव्या मात्र परत मागून  घेतल्या. सेकंड होम म्हणून सर्वांचे लोणावळा, नाशिक येथे बंगले होते. मला मात्र एकही घर नव्हते. त्यांच्या सेकंड होममध्ये, कुणीही, मला काही दिवस, दोनदिवस सुद्धा राहा, असे तोंड देखलेही म्हणालं नाही.

ह्या संस्थेनं मला खूप आनंद दिला. मला पायावर उभं केलं. माझ्या रंगहीन जीवनात थोडे रंग आणले. वाटत होतं, निवृत्तीच्या दिवशी, आजच मरण यावं. पण मरण आपल्या इच्छेनं येत नाही. आजची झोप ही अल्पविराम, स्वल्पविराम, अर्धविराम की पूर्णविराम आहे कुणीही सांगू शकत नाही. नक्की आयुष्य किती उरलं आहे. कुणीच जाणत नाही. खरे तर देवानं ते सांगायला हवं ना? मृत्यूची तारीख कळली तर माणूस, निदान आपण त्याप्रमाणे बेत आखू शकतो ना? मुंबईतच मी मातोश्री आश्रमात एकरकमी पैसे भरले. भांडीकुंडी नोकरांना देऊन टाकली. फक्त कपड्यांची बॅग हातात घेऊन दादांची झाशीची राणी नव्या घरट्याच्या दारात उभी राहिली. हे माझं पंधरावं घरटं. अर्थात निदान आता इथून कुठं जायचं नव्हतं. इथेच जगायचं, इथेच मरायचं. त्या आश्रमाच्या पायरीला नमस्कार केला. जसा रोज ऑफिसच्या पायरीला करते तसाच!

वास्तू देवते सुख दे, जखमी होऊन आले आहे, तुझिया रे दारात! चाळीशीत बायका किती नटतात, ईथे लाडली - झाशीच्या राणीचा प्रवास, बेबी मावशी बनण्याकडे वळला. पण मन रमेना. तीन महिने झाले. मातोश्री वृद्धाश्रम ज्या सेठचा होता ते वारले. त्यांचा मुलगा ती जागा विकून, पंचतारांकित हॉटेल बांधू इच्छित होता. त्याने साम-दाम-दंड भेदाने सर्व प्रकारे, खूप प्रयत्न करून, सर्व आश्रमवासीयांना, इतर आश्रमांमध्ये बदली करून दिली. मला तो म्हणाला, `वृद्धाश्रमात राहायचे तुमचे वय नाही. तुमची सोय बघा. '

माझं तेही घरटं तुटलं. मला, बेबीमावशी म्हणून काही दिवस बांधकाम चालू होते, तेथील एका खोलीत त्याने राहायला परवानगी दिली. पण पूर्वीचा अनुभव जमेस होता. इथे उपकारांच्या बदल्यात शरीर मागितले तर? मी वयानं तशी लहान होते व बारीक असल्यानं

अजूनच लहान दिसायचे.

मी भावाला फोन केला. `मी तुझ्याकडे राहते. मला दुसरी नोकरी मिळेपर्यंत आधार दे. मला पैसे नको. फक्त तुझ्या घरी, कोपऱ्यात झोपायची सोय होऊ दे. मला भिती वाटते, कुणीतरी पुन्हा माझ्या असुरक्षिततेचा गैरफायदा होईल.'

त्याने फोन बंद केला. दहा-बारा वेळा हेच झालं. माझे कातड्याचे जोडे करून पायात घातले, तरीही उपकार फिटणार नाहीत, अशा पाठीराख्या उषा मॅडम होत्याच. मी त्यांना फोन केला. खरं तर, त्याही अपमान करतील की काय,  म्हणून खूप घाबरले होते. अर्थात आता पर्यायही नव्हताच. ठोकर खायची तयारी होतीच. माझी नकार पचवायचीही तयारी झाली होती.

`मॅडम तुम्ही म्हणाल. कायमचा मला ह्या मुलीचा त्रास; पण मॅडम माझे नवे दादा वारले. नवा भाऊही मला हाकलून घर विकून गेला. कंपनी बंद पडली. सख्खे असे वागले, तर सावत्रांच्या अशा वागण्याचं काय दुःख करायचे! मॅडम मी तुमच्याकडे राहायला येऊ का?' मी खूप आशावादी नजरेनं म्हटलं.

मॅडम म्हणाल्या, `माझ्या मुलाचं लग्न झालं आहे. नवी सून आली आहे. या घरात सर्व तिचंच राज्य चालतं. त्यापेक्षा तू होस्टेलवर राहा. मी तुला कलाकार, कामासाठी, अमेरिकेचा व्हिसा मिळवण्यासाठी चिठ्ठी देते. तू कॉलेजमध्ये कथ्थक चांगले करायचीस. कथ्थकच्या नृत्याच्या ग्रुपबरोबर काही दिवस जा.'

`मॅडम मी ते विसरून गेले.' मी.

`काही नाही प्रॅक्टिस केली की येईल. कथ्थकच्या नृत्य ग्रुपमधल्या मुलींना उद्या भेट. आज, इकडे, माझ्याकडे ये.' उषा मॅडमनी दिलासा दिला. मी बॅग घेऊन त्यांच्या घरी गेले. पुन्हा घरटे कुठे मिळेल? माझी व्यर्थ भटकंती कुठल्या मुक्कामावर थांबेल?

# प्रकरण चौथे

कथ्थकच्या ग्रुप बरोबर अमेरिकन व्हिसाचे काम झाले. मला त्या अमेरिका भेटीत, एक छान मैत्रीणही मिळाली. तिथे, दोघीजणी खोली घेऊन राहायला लागलो. अमेरिका मला खूपच आवडली. आयुष्याच्या चाऴीशीत, मुक्कामहीन व्यर्थ भटकंतीत मला वाटले, मी इथेही घरटे बांधू शकते. माझ्या आयुष्याचे दोन्ही अध्याय, मागे टाकून पुढे जाण्याची संधी, मला इथे होती. मी तिथे नृत्यानिमित्त गेल्यावर, महाराष्ट्र मंडळातील कार्यक्रमाला आलेल्या केटी नावाच्या एका अमेरिकेतील सिटिझन व्यक्तीशी बोलले. अनुभवामुळे, शिक्षणामुळे मला कायम नोकरी मिळाली. केटीच्या मदतीने मी अमेरिकेला नवीन घरी आले. माझे नवीन घरटे ऑस्टीन या गावी बर्फाच्छादित डोंगराच्या कुशीत होते. आयुष्याचा वेगळाच अध्याय सुरू झाला.

माझ्या ह्या नोकरीतही मला घर मिळाले. महाराष्ट्र मंडळात वरवरच्या मैत्रिणी मिळाल्या. नवीन मिळालेली, एक मैत्रीण केटी तिचे सुखवर्णन सांगत असे, तेव्हा तिचे सुख पाहून मला हेवा वाटे. पण मग मी तिच्याशी घट्ट मैत्री केली. तिला एकदा सांगितलं, `तुझ्याच कंपनीत नोकरी बघ. माझ्या आयुष्यात सांगण्यासारख्या आनंदी घटना नाहीत. उलट जुन्या आठवणी आल्या, की मन सैरभैर होते. विचित्र भास होतात. '

ती म्हणाली, `प्रत्येकाकडे, भूतकाऴात, झाकण्यासारखं काही तरी असतंच. माणूस दुसऱ्याबद्दल चर्चा करतो. बेसिक सर्वांचं सेमच असते. जेव्हा दुसऱ्याबद्दल चर्चा करतो तेव्हा माणूस आपल्या अव्यक्त भूतकाळातील घटना चाचपतो. या व्यक्तिच्या जागी आपण असतो तर, काय घडले असते, तेही पर्याय चाचपतो. आपण तिच्या जागी नाही, म्हणून आनंद मानतो पण विसरतो, की वेळ त्या क्ष नावाच्यावरही येऊ शकते.

मी तिला म्हणाले, `व्हाय मी?' ती म्हणाली, `खंबीर हो. अनामिक भीतीने घाबरू नकोस. घडणारे घडून गेले. दुःख मांडले की लोक चर्चा करतात. तू तुझी कथ्थक नृत्यसाधना चालू ठेव. दुःख दाबले की मनोकायिक आजारात ते उमटते. ऐक. मन आनंदी ठेव. परमेश्वराने तुझ्यापुढे नवीन रस्ता मांडला आहे. आमच्या देशात `लोग क्या कहेंगे' हा प्रकार नाही. जे घडायचे ते घडतच राहणार आहे. ते तू-मी कुणी टाळू शकत नाही. आजपासून तू माझी बहीण. डोण्ट वरी.'

मी म्हणाले. `खरंच बहिणीचं नातं किती चांगलं. भाऊ म्हणजे घेणेकरी. भाऊ म्हणजे वसुली. भाऊ म्हणजे दलाल!'

केटी म्हणाली, `बहिणींमध्येही हेवेदावे असतात. नातं हे कधीही चांगलं किंवा वाईट नसतं. ते टिकवावं लागतं. स्वार्थाबरोबर संयमाचा लगाम बांधला, तरच नात्यांचा रथ व्यवस्थित चालू शकतो.'

परदेशात मी रमले.

केटीबरोबर शेअर केलेले अपार्टमेंट माझे सतरावे घरटे होते. पण नंतर मला स्वतंत्र राहण्याची जागा मिळाली. परदेशात स्वतंत्र राहणं अगदीच कॉमन असतं. माझ्या भारत देशात डाव्या बाजूने चलावे असे म्हणायचे. गाडी डाव्या लेनने चालवायची सवय होती. इथे उजव्या बाजूने चालावे, वाहन चालवावे लागे. माझी जीवनाची गाडी उजव्या लेनने धावत होती. इथेखूप थंडी होती. सुबत्ता होती. स्वयंपाकाची कटकट नसायची. फास्टफूड असायचे. त्यामुळे वेळ भरपूर मिळत होता. कथ्थकची प्रॅक्टिस करता येत होती. कधी कधी मन निराश झालं की मी कम्युनिटी सेंटरमध्ये, वृद्धाश्रमात जाऊन, समाजसेवा करीत असे. शरीर थकेपर्यंत बागकाम, स्वच्छता, शारीरिक कष्ट करीत असे.

केटी म्हणाली, `चाळीशीत आयुष्य असंच असतं. तू उगीच दुःख करतेस. आमच्या देशात जरा वय वाढलं की, कधी वयात आले की किंवा कधीही कळायला लागलं की मुली,

काम करणाऱ्या महिलांच्या होस्टेलवर राहायला जातात. काळ बदलला, देश बदलला. तूही बदल. '

माझ्या भारत देशाला मी कधीही विसरले नाही. टीव्हीवर भारताच्या बातम्या पाहणे, मराठी पुस्तके वाचणे, सण साजरे करणे, देवळांत जाणे असा मराठमोळा कार्यक्रम माझा कायमच होता.

कुंडली, ज्योतिष, पत्रिका बघणे ह्या किरकोळ कलाही मी शिकून घेतल्या. मंडळाच्या, मंदिराच्या कार्यक्रमात भाग घेऊ लागले. मी फारशी कुणालाही, माझ्या खाजगी आयुष्याबद्दल सांगत नसे. त्यांनाही खाजगी गोष्टी विचारीत नसे. मात्र विवाह मंडळाच्या जाहिराती वाचायचा छंद मला लागला.

कधी कधी भूतकाळ आठवून, रडू येत असे. कोवळे वय, वेदना, आत्महत्या केलेले शेतकरी, आई वडील, फसविणारा आदित्य, दुष्टपणाने, स्वार्थाने बहिणीला घराबाहेर काढणारा भाऊ, ही मेली तर बरं म्हणणारी वहिनी, अत्याचारी, दुष्ट अण्णासाहेब वगैरे आठवून झोप येत नसे. माझेनष्टचर्याचा दुसरा अध्याय म्हणून मानलेले वडील, दुसरे नवीन दादा ही वारले. ते सर्व आठवत असे. खरे तर त्या नवीन वडिलांनी मला सुरक्षित ठेवलं नसतं तर माझं आयुष्य पुन्हा अण्णासाहेब, भाऊसाहेबांच्या टाचेखाली चिरडलं गेलं असतं. पण त्यांचाही मृत्यू व्हावा? मी पुन्हा उघड्यावर यावं? उषा मॅडमचे खूप उपकार होते. त्यांच्यामुळे मी अमेरिकेत आले.

पण कधी कधी आयुष्यच ओझ्याप्रमाणं वाटायचं. नागिणीच्या विळख्यासारखी रात्र खायला उठे. माझी राहणी मी साधीच ठेवली. अमेरिकेत इथेही सुसंस्कारी माणसे आहेत. भारतीय सण जसे पंजाबी लोहडी बैसाखी, मद्राशांचा ओनम, महाराष्ट्रीयनांचे पाडवे, गणपती साजरे होतात. मी आता परदेशात छानपैकी रुळले. दहा वर्षे पूर्ण झाली. क्वचितच मला कुणाची पत्रं, फोन यायचे. तेसुद्धा परदेशात कसे यावे अशा चौकशीचे असत. असो मला कुणाचीही वाट

पाहायची नव्हती.

*दिवस असे की*
*कुणी माझे नाही!*
*मीही कुणाची नाही.*

मी पाच वर्षे अशी काढली, माझा ४५ वा वाढदिवस होता, आणि आज माझ्या पहिल्या सख्या भावाने बोलावलं, म्हणून मी भारतात सीतापूरला जायला, मनानं निघाले होते. भारतात, शरीराने जायचा विचार करीत होते. विमानाचे तिकीट रिझर्व्हेशन करायचं म्हणत होते. व्हिसाची तयारी करत होते. मला पुन्हा भारतात जावंसं वाटत होतं. माझं घर, माझे भाऊ, या अशा खोट्या प्रेमाच्या खोट्या ओढीनंही, मन क्षणभर आनंदी झालं होतं. भावाने माहेरी बोलावलं होतं.

सीतापूर-लक्ष्मणपूर-रामपूर-नौगाव-मुंबई-अमेरिका कुठेही राहिले तरी माझी स्टाईल सर्वत्र काकूबाईच होती. मेकअप नाही. रंग पिवळसर गोरा होता. केसाची घट्ट जाड वेणी व कपाळी कुंकू. असा माझा भारतीय अवतार होता. आधी मी अमेरिकेतही साड्या घालीत असे, पण ब्लाऊज शिवणं, परकर मिळवणं अवघड होतं. हळूहळू मीही ऑफिसमधल्या मैत्रिणींप्रमाणे मिडीफ्रॉक घालू लागले. केसाचा बॉयकट करून घेतला. त्यांच्या पद्धतीनं इंग्रजी बोलायचा प्रयत्न करू लागले. ह्या ऑफिसेसमध्ये कागद, कामचोरी, कर्मचारी हा प्रकार कमी होता. गॉसिप होते, पण कमी प्रमाणात. माणूस सर्वत्र इथून तिथून सारखाच असतो. तरीही कुणी कुणाच्या खाजगी आयुष्यात जास्त डोकावत नसे.

ऑफिसमध्ये रॉबर्ट म्हणून नवीन साहेब आले. साधारण माझ्याच वयाचे ४५ चे होते, असे वाटे. एकदा सर्वजण बाहेर गेले असताना मी एकटीच काम करीत होते. केटी ख्रिसमससाठी बाहेर गावी गेली होती. रॉबर्ट सरांनी बेल वाजवली. मी आत गेले.

`तुम्ही ऑफिसर आहात. असे शिपायाप्रमाणे आत येणे शोभत नाही. ' तो गरजला.

`सर काम ऑफिसचे आहे. महत्त्वाचे असेल, असे मला वाटले म्हणून आले'. मी उत्तरले.

`थँक्स' सर म्हणाले. तरुण वयाच्या मुलांमध्ये जो उत्साह असतो तो त्यांच्यात नव्हता. पण तो तरुण दिसत होता. पचेचाळीसावे वर्षी मी म्हातारी होते. मात्र तो तरुण होता. अमेरिकेतील या ऑफिसमध्ये अलिप्त बेटाप्रमाणे स्वतंत्रपणे वावरणारी बेटे बरीच होती. पण मला तसं वागणं जमत नसे. पण हळूहळू सवय करून घेतली. कुणाकडे जावं वाटत असे, पण हिंमत होत नव्हती. जेवायला लंचमध्ये मी कॅण्टीनमध्ये रांगेत उभी असे. तेव्हा रॉबर्ट सर, तिथेच जेवत असत.

`अजूनही अविवाहित आहेत. ' केटी मला म्हणाली. तेव्हा मला हसू आलं. माझं लग्न व्हावं, ही केटीच्या मनातील इच्छा अजून जिवंत होती. वर्तमानपत्रातील इंटरनेटवरील, शादी डॉटकॉम, वरच्या जाहिरातींनुसार पुरुषांना तर साठीसत्तरीलाही, सहचरी हवी असते. मी मात्र पन्नाशीआधी विरक्त झाले होते. वसुंधरा वाचवा संस्थेतच पूर्णवेळ घालवू लागले.

केटी कायम गप्पा मारत असे. एकदा ती म्हणाली, `मोठमोठी थाटात केलेली लग्नं यशस्वी होतातच असं नाही. आवडनिवड जुळवून, प्रेमविवाहातून झालेली लग्नं यशस्वी होतातच, असंही नाही. शेवटी आयुष्य म्हणजे एक जुगारच असतो. ' केटी तशी वरकरणी बिनधास्त वाटत होती. तिच्या मनात काय चाले, काय जळत होते हे तिलाच माहीत. बूट कुठे चावतो, ते बूट घालणाऱ्यालाच कळते.

मी तिला चिअर-अप करायला म्हटले, `चल् डिस्कोत जाऊ. ' आम्ही दोघी डिस्कोत गेलो. मला त्यावेळी भारतातील वाक्य आठवले.

*`नाच नहीं आता जिसको, उसको कहते हैं डिस्को. '*

डिस्कोत मी एका कृत्रिम धबधब्याजवळ बसले. वेडेवाकडे, अर्थहीन, शब्दहीन गाण्यावरचा नाच तिथे चालू होता. परदेशाला नावं ठेवायची गरज नव्हती. कारण मी पूर्वीसुद्धा कफ परेडच्या एका मैत्रिणीकडून मुंबईतील डिस्कोचा `आँखों देखा हाल' ऐकला होता. केटीची तबियत त्या डान्सनंतर खूश झाली.

डिस्कोतून बाहेर आलो तर समोर रॉबर्ट व ग्रेसी दिसले. क्षणभर मला त्यां दोघांचा हेवा वाटला. पण मी विचार केला. मीसुद्धा आनंदाने डिस्कोत आले आहे. परंतु माझे मन त्या वातावरणात रममाण होत नव्हते. खूप गर्दी आजूबाजूला होती. पण मी मनाने एकटीच होते. कदाचित माझ्याप्रमाणे, रॉबर्टचीही अवस्था हीच असू शकेल का?

मला डिस्कोत पाहून रॉबर्टला नवल वाटले. मीच म्हणाले, `केटीला जरा बरे वाटावे म्हणून मी आले. ' त्यावर तो म्हणाला, `गुड! मग मला बरं वाटावं म्हणून तू कधी येणार? '

`शटअप! ' मी मनात म्हणाले.

आम्ही चौघे, नंतर उगीचच गाडीतून भटकलो. रॉबर्टने माझ्या घरासमोर गाडी थांबवत म्हटलं, `तू मोबाईल घे ना. म्हणजे... '

`मला फोन कुणाचा येणार? ' मी म्हणाले.

ते दोघे निघून गेले. मला एकाकी विस्थापितासारखे वाटू लागले. मला कुणाचाही फोन येणार नाही, ह्या विचाराने माझे सर्व आनंदाचा विचका झाला. पुन्हा मी एकटीच माझ्या निवासस्थानी आले आहे. छताला डोळे लावून बसले. कशीतरी वाकडी झोपले.

सकाळी जबरदस्त पाठ दुखू लागली. ऑफिसला जायचं नाही असं ठरवलं. त्याऐवजी काहीतरी वाचता वाचता निजले.

दुपारचे बारा वाजले. आता चहाची वेळ झाली असेल. सर्वजण चहा घेत असतील. मग घरी मीच चहा करून प्यायले. एक वाजता वाटले, आता सर्वजण जेवत असतील. मी पापड भाजले. तेलमीठ मसाला टाकून ब्रेडच्या दोन स्लाईसेस मधे टाकले. सॉस ओतला व खाणार, इतक्यात बेल वाजली. मी दार उघडले. रॉबर्ट सर आले होते. आत शिरत ऑरडले `म्हणत होतो ना मोबाईल घे म्हणून! '

`सर माझी पाठ दुखत होती. म्हणून ऑफिसला आज दांडी मारली. '

`दरवाजातच बोलणार आहेस का; की घरात या म्हणून बोलावशील! ' त्यावर मी हसले. माझ्या पाठोपाठ त्यानाही हसू फुटलं.

`पण... पण मी म्हणतो, जर नाचायला येत नाही तर डिस्कोत माणसाने का नाचावं?, आजारी पडायला? '

मी खात असलेल्या सॅण्डवीचवर त्याची नजर गेली. मी त्यानाही माझे सॅण्डवीच खाण्यात, शेअर करून घेतले. त्यानी येताना बिर्याणी आणि दही आणले होते. दोघांनी बिर्याणी खाल्ली. मग त्याचा पाय घरातून निघेनासा झाला. ते थोडे लाडात येऊन म्हणाले, `मी इथेच झोपू शकतो का? '

`अहो, आता ऑफिसमधून इथे आलात ना रिटायरिंग रुम आहे तिथे... मग हे काय? ' मी टाळत म्हणाले.

`सरळ सांग ना, तुमझ्या घरी जा म्हणून. ' त्याना माझा राग आल्याचे, त्याच्या चेहऱ्यावरून दिसून आले. तोच फोन वाजला. त्याना ऑफिसमध्ये जायचे होते. ते बाय करून निघाले. दारात म्हणाले, `मी डिस्कोत जायचे प्रपोजल आणले होते; पण तुझी पाठदुखी आडवी आली. ' त्याच्या बोलण्यातली नेमकी खोच माझ्या ध्यानात आली. मी हसले. `तुला जर माझेसोबत यायचं नसेल, यावेसे वाटत नसेल तर मला तसं पब्लिक बूथवरून फोन करून

निदान सांग. तुला शोधून शोधून डोळ्यांना उगाच त्रास होतो. बरं रात्री जेवण आणू? '

मी हो म्हणाले.

साधारणतः प्रत्येक ऑफिसात पगाराच्या दिवशी बॅचलर पार्टी असते. त्यामुळे आज ते येणार नाही असे वाटले होते. पण ते थोडावेळ आले व मित्राकडे स्लीप ओव्हर पार्टीला गेले. ही बॅचलर पार्टी म्हणजे हिंदीत ज्याला `पाजामा पार्टी' किंवा मराठीत `कोजागिरीची रात्र जागवणे' म्हणतो तसे मित्रमैत्रिणी एखादी रात्र, गप्पा-खेळ, मस्ती करतात. भारतात काय, परदेशात काय, शेवटी तरुणाईचा जल्लोष सर्वत्र सारखाच असतो.

पुढच्या आठवड्यात ऑफिसमध्ये पार्टी होती. साहेब म्हणाले, `आम्हाला भारतीय मराठी मुलीचा कथ्थकचा कार्यक्रम हवा. '

मी म्हणाले, `मी साधेच नृत्य करेन. ' मी साधेच नृत्य केले. त्यांच्यासाठी गाणं म्हटलं.

*`मुसुमुसू हासी यूँ मलई लाई मुसुमुसू हासी यूँ,*

*जरा मुस्करा दे जरा मुस्करा दे जरा मुस्करा दे तू,*

*कम फासले हो दिल के,*

*दिल को सतानेवाली सपनों में आती क्यों हैं? '*

खरंतर माझा प्रांत आरती व भजनांचा होता. ४५ वय, मी अध्यात्माकडे वळू लागले होते. आध्यात्मिक वृत्तीतही मला कधी कधी ऑफिसतर्फे कुठे कुठे जावे लागत असे. वेगवेगळे देश पाहावे, पुरातत्त्व खात्यातर्फे जतन केलेले ऐतिहासिक वारसे असलेल्या वस्तूंना भेट द्यावेसे वाटे. असे फिरायला रॉबर्ट सराना खूप आवडत असे. त्यानी व्हेनिसला पिकनिक ठरवली होती. व्हेनिस शहराची रचना व वास्तुशास्त्र फारच आकर्षक होते. सेंट मार्को प्लेट्रा

किंवा सेंट मार्क बॅसिलीया हे रॉबर्टचे व्हेनिसमधले फेव्हरिट स्पॉट होते. व्हेनिस शहर नदीच्या किनारी वसलेले आहे. त्यामुळे जलमार्गाने वाहतूक चालते. पाण्यातून चालणाऱ्या बोटी त्यांना `वॉटरटॅक्सी' म्हटले जाते. मुंबईचे व्हेनिस झाले म्हणून 26 जुलैच्या2005 चे जलप्रलयावरून खूप टीका झाली होती. पण खरे व्हेनिसचे सौंदर्य अवर्णनीय आहे. संस्कृतीचे व समाजाचे वसणे, राहणे नदीतीरीच सुरू झाले. आर्य-अनार्य आले, ते नदीकिनारीच वस्ती करून राहिले. व्हेनिस शहर मला खूप आवडले.

मंदिरात भजन म्हणायचे होते. नेहमीचे प्रवचनकार आले नव्हते. मी भजन म्हटले.

*पोटापुरते देई देवा पोटापुरते देई*

*आता लई नाही लई नाही मागणे*

मला उगीचच ह्या भजनाच्या वेळी काहीतरी वेगळे वाटत होते. कुणीतरी माझ्या जवळपास वावरते आहे, असे वाटले. भजन पूर्ण झाल्यावर मी देवाला मनोभावे नमस्कार केला. मी मीराबाई झाले होते. श्रीकृष्णाच्या भक्तीत बुडाले होते. खरेच भगवी वस्त्र घालून, हातात एक तारी घेऊन श्रीकृष्णाचे भजन करणारी मीराबाई निरपेक्ष प्रेमाचे, भक्तीचे एक आगळेच रूप आहे ना!

मीरेचे भजन आहे

*चाहे तो कुसुंबी रंगनी साडी दे*

*या दे भगवा बेस*

*चला वाही देस*

मंडळातील माताजींनी निरुपण केले, माझ्या भजनानंतर माझ्या भजनाचा अर्थ सांगत होत्या. तुला काय द्यायचे ते दे. कुसुंबी साडी दे (प्रेम), नाहीतर भगवा वेश दे (विरक्ती दे), मीरा काळाबरोबर वाहत जाईल. माझ्या मनात आले, आदित्यच्या प्रेमामुळे मी कुठेकुठे वाहत

आले. त्याला माझं नावसुद्धा आठवत नसेल. तो त्याच्या विश्वात रमलेला असेल.

मी माताजींना म्हणाले, `प्रेमात पडणे, हा शब्द किती खरा, किती खोटा आहे? प्रेमात उंचावणे हा शब्द वापरला जावा. '

माताजी म्हणाल्या, `तू कुठे तरी खूप जखमी झाली आहेस. कधीही मदत लागली तर ये. ' क्षणभर मला त्या उषा मॅडमसारख्या वाटल्या. असे अनेक मदतीचे हात जगात होते म्हणून मी जिवंत राहिले ना! त्या म्हणाल्या, `गोरी लोकं स्मार्ट नसतात असे नाही, पण तू इथल्या एखाद्याशी लग्न जमव. मीही तुझ्यासाठी चांगला जोडीदार मिळाला तर बघेन. '

मी म्हणाले, `माताजी आता ह्या वयात लग्न? '

त्यावर त्या म्हणाल्या, `ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी विठ्ठलपंतांनी संन्यासाश्रम सोडून पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारला होता. भल्याभल्यांना संसारसुखाचा मोह सुटला नाही. तू तर जेमतेम पंचेचाळीशीची आहेस. ' मी म्हणाले, `तरीही मॅडम मला संन्याशीणी झाल्यासारखेच वाटते. कुबडी व त्रिशूळ घेऊन सज्जनगडावरच्या गढीत आपण भजन करतो आहोत, असे वाटते. तर कधी नवनाथांप्रमाणे `भिक्षांदेही' म्हणत भारतभ्रमण करतो आहोत असे वाटते. सज्जनगडावरील मंदिरातील घंटा मला आवाज देते आहे. ' त्या म्हणाल्या, `कुठेतरी काहीतरी चुकते आहे. गफलत होते आहे. अध्यात्म म्हणजे इहलोकीच्या सुखामध्ये थोडेफार प्रभुनाम घेणे अशी हल्ली फॅशन आली आहे. दूरदर्शनचे चॅनल बघ. प्रभुलीलेच्या कार्यक्रमात कपडे, साड्या, दागिन्यांच्या जाहिराती दिसतात. त्या का? कारण वृद्धांनासुद्धा ऐहिक सुखाचा मोह सुटत नाही. तुझे तर अजून मजा करायचे वय आहे. '

मी वाद घातला नाही. मी त्यांना नमस्कार केला. विचारांच्या नादात बसस्टॉपवर चालत आले. भगव्या कपड्यात व उंच घट्ट बांधलेल्या बुचड्यातही माझे वय लपत नव्हते. मी तरुणांतही परकी व वृद्धांमध्येही उपरी! सगळीकडेच मिसफिट! आयुष्याच्या गणितातला एक हातचा चुकला व पूर्ण गणित चुकले. आयुष्याची शाल विणताना एक टाका

सुटला व शाल उसवली. वीणा वाजवताना एक तार तुटली व गीत वाजेना. आयुष्यात एकदाच मी चुकीच्या व्यक्तीवर प्रेम करायची चूक केली. ती मला सुधारता येईना.

जाऊ दे. दिवस भराभर जातात. अनाकलनीय घटना घटत राहतात. एकदिवस आयुष्य संपूनही जाईल. माहीत तरी कुठे असते, आयुष्याच्या सिनेमाचा दी एण्ड... शेवटी कसा कधी येणार?

मी बसस्टॉपवर बराच वेळ उभी राहिले. मागून माताजी आल्या. मघाशी भजनाच्या वेळी असलेल्या माताजी व आता समोर ह्या माताजींचे रुपात त खूपच अंतर होतं. त्यांनी भरजरी साडी परिधान केली होती. ओठांवर लिपस्टिक होती. गळयात पाचूचा सेट होता. त्या म्हणाल्या, `इजिप्त टुरला येणार का? आमच्या बरोबर ये. मन रमेल. तिथेही तुझे प्रवचन ठेवू. म्हणजे खर्च देवळातर्फे आणि संस्थेतर्फे होईल. बघ, विचार कर. ' त्या गेल्या.

`अलकेमिस्ट' ह्या माझ्या लाडक्या पुस्तकात इजिप्तचे, पिरॅमिड्स वर्णन आहे. त्यामुळे मला त्यांची ही ऑफर सूचक स्वप्नाप्रमाणे शुभ वाटली. मी तिथल्याच एका बूथवरून रॉबर्टसराना फोन केला. `रॉबर्टसर, मी ज्या देवळात गेले होते, त्या तिथल्या माताजी मला त्यांच्या सोबत इजिप्तला नेणार आहेत. ' त्यानी पलीकडून नुसतेच हूं केले.

मी पुढे म्हणाले. `रॉबर्टसर`अलकेमिस्ट` ची ती जागा... '

मी हवेत तरंगत होते. त्या भजनालाही एक लय होती. ते सर्व वातावरण श्रद्धेने भारल्याप्रमाणे होते. जेवण साधेच होते. पण तरीही मी खूश होते. वरणभात, अळूची पातळ भाजी व ब्रेड असा फ्युजनचा मेनू होता. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वजण आपापल्या गाड्यांतून घरी गेले. मला कार्यक्रमासाठी जाताना घ्यायला गाडी आली होती. पण परत जाताना सोबत कुणी नव्हते. मी भावूक झाले होते. त्यामुळे थोडावेळ देवळात बसून राहिले. अंधार दाटला. हवा थंड झाली.

माताजींनी मला त्यांच्या गाडीतून घरीसोडले नाही. कारण त्यांच्याबरोबर त्यांचे कुणीतरी नातेवाईक होते. मी एकटी बस स्टॉपवर उभी राहिले. टॅक्सीला पैसे नव्हते. टॅक्सीची चैन परवडणारी नव्हती. रात्र झाली. बर्फ पडू लागला. तसतशी थंडी वाढू लागली. मी ओढणी  शालीसारखी पांघरली. वेळेवर घरी जाऊ म्हणून मी सोबत गरम कपडेपण आणले नव्हते. अचानक बर्फाचे थरच्या थर जमले. रस्ता, घर, झाडे, देऊळ सर्व काही दिसेनासे झाले. मला भीती वाटू लागली. त्याचवेळी वाटले, जाऊ दे मरण आले तर येऊ दे. 26 जुलैच्या जलप्रलयात मुंबईत अनेकजण अडकले होते. तशी मी त्या बर्फवृष्टीत त्या बस स्टॉपवर अडकून पडले. बर्फाच्या माऱ्याने उत्तर ध्रुवावर राहणाऱ्या एस्कीमोंच्या घरासारखे त्या बस स्टॉपचे गोलघर बनले. मी एक हात व एक पाय लांब तंबू बाहेर काढून, बर्फातही श्वास घेता यावा अशी व्यवस्था केली. रात्रभर बर्फ पडत होता. मी जीव मुठीत घेऊन, त्या एस्कीमोचे घरासारख्या तयार झालेल्या, बर्फगुहेत बसून राहिले. पहाट झाली. बर्फवृष्टी थांबली. पूर्वेला सूर्यामुळे उजेड आला. ऊब आली. बर्फ वितळू लागला. तरीही बस किंवा टॅक्सी मिळणे शक्यच नव्हते. चालत घरी जाणे, हेही शक्य नव्हते.

मला दादा नेहमी रागवत असत ते आठवलं. घरात पूजा करावी. देव देवळात नाही. कर्म करणे हाच देव. मी ठरवले, यापुढे देवळात जाणे बंद करायचे. समोर अमलासाडच्या पिवळया चाफ्याच्या फुलांचा पिवळा सडा पडला होता. अचानक हाक ऐकू आली आणि बघते तर मोबाईलवरच्या, माझे फोन नंबरवरून, माझा पत्ता, शोधत शोधत रॉबर्टसर कार घेऊन मला शोधत आले होते. मला खूप आनंद झाला.

माझी काळजी करणारा मित्र, कलीग मला मिळाला होता. मला `दोस्ती' चित्रपट आठवला.

*`प्रेम का है एक ही नाम,*
*कहीं मीरा कहीं है घनश्याम,*
*दोस्ती का यारों नहीं कोई नाम, '*

रॉबर्टने मला त्याच्या हाताने हातपाय चोळून ऊब दिली. कॉफी आणली होती ती दिली. कारमध्ये वॉर्मर लावले होते, मला घरी पोहोचवले. मैत्री म्हणजे त्याग असतो. कधी वाटते, देवाने दोन लिंगी मानव न बनवता फक्त पुरुष किंवा फक्त स्त्री बनवायला हवे होते. निरपेक्ष मैत्री, वासनाहीन नाती अधिक सार्थ बनू शकली असती. अर्थात एवढा आध्यात्मिक विचार समाजाला परवडत नाही. एका कवीने म्हटले आहे.

*जन विषयाचे कीडे*
*त्यांची धाव बांधाकडे*
*आपण करू शुद्ध*
*रसपान रे!*

अजुन एक,  आणि हो विषयसुखाशिवाय पक्ष्यांप्रमाणे अंडी उबवून बाळं जन्माला आली असती तर किती बरे झाले असते. मला माझ्या विचारांचे हसू आले.

रॉबर्टसर म्हणाले, `का हसलीस? सांगितल्याशिवाय गाडी चालूच करणार नाही.
'

मी म्हणाले, `रॉबर्ट तुझे डोळे किती छान आहेत. मला वाटलं, तुझ्या डोळयांत दिसणारा तो आकाशाचा निळा तुकडा मला आवडतो. हैदराबादी मोत्याप्रमाणे चमकणारे तेजस्वी किरण हसतात. माशांच्या जोडीप्रमाणे  सुळळकन फिरणारी बुब्बुळे साद देतात. त्या काळया लांब ओलसर पापण्या जणू भुंगाच वाटतात. जणू रात्री दाटून येणारा अंधार त्या दूर करतात. ती न बोलता कळणारी भाषा ते डोळे बोलतात. त्या डोळयांत एखादी गुहा असावी. थोडावेळ मी निरखून पाहिले की रस्ता हरवतो. भटकणाऱ्या मुसाफिराप्रमाणे मी, मग मलाच शोधत राहते. व्यर्थ भटकंतीत भटकत राहते. आणि जास्त वेळ पाहिले तर काय शोधतेय तेच विसरून जाते. काही हरवलेली वर्षे त्या डोळयांत आहेत. मंदिरात समई लावल्यावर पडतो तसा प्रकाश आहे त्या डोळयांत आहे. त्या नजरेत आहे. मला खूप अभिमान वाटतो की, हे डोळे माझा

पाठलाग करतात. हा माझा सन्मान आहे की, हे डोळे माझ्याशी बोलतात. '

रॉबर्टसरानी माझ्या डोळयांसमोर चुटकी वाजवली व म्हणाले, `बर्फात राह्यल्याने भ्रम झालाय का तुला? ' रॉबर्टने गाडी चालू केली. मी गाडीतच गाढ झोपले. घर आल्यावर रॉबर्टनी उठवले व म्हणाले, `मीहीएक कविता केली आहे.

*मी म्हणजे एक वाहक,*
*तिला घरी पोहोचवणारा.*
*मी रामा गडी,*
*तिचे काम करणारा.*
*मी तिचा बॉडीगार्ड,*
*तिचे रक्षण करणारा.*
*मी तटरक्षक दल,*
*तिला तटावरून बघणारा.*
*मी मुंबईचा डबेवाला,*
*तिला जेवण पोहोचवणारा.*
*मी तिचा बॉस,*
*तिलाच घाबरणारा.*
*मी तिचा मित्र,*
*तिच्या मागोमाग फिरणारा.*
*मी तिचा भक्त,*
*ती दिसली नाही तर अस्वस्थ होणारा.*
*मी एक पक्षी,*
*तिच्या होकाराची वाट बघणारा.*
*मी एक घरटे बांधणारा,*

*तिच्या येण्याची तयारी करणारा. '*

मी म्हणाले, `काय बडबडताय सर हे! '

`अगं ही कविता आहे. तुला आवडली नाही का? '

रॉबर्ट माझ्याजवळ येत म्हणाले, `बाईसाहेब, ब्रेड व पापड हा फारच फाईव्हस्टार मेनू आहे; पण शरीराला बाकीही पदार्थांची गरज असते. '

मी म्हणाले, `पोटापुरते देगा देवा पोटापुरते देई, आता लई नाही लई नाही मागणे. '

रॉबर्टने जाऊन जेवण आणले मला वाढले . `मॅडम तुम्ही नको असेल तर नोकरी सोडू शकता, पण मला जायचे आहे. मी ऑफिसमधून आलो आहे. आपण दोघांपैकी एकाने नोकरी करणे जरुरीचे आहे. '

मी त्याला, `थँक्स डीअर फ्रेंड' म्हणाले.

खरंच मैत्रीचं नातं फारच सुंदर असतं. मी आदित्यची मैत्रीण म्हणूनच राहायला हवे होते. अशक्याची हाव धरूनच तर माणूस दुःखी होतो. खरेतर काजव्यासारखे क्षण उजळून टाकण्याएवढेच आयुष्य असते. आपण तर सामान्य माणसं. आपल्या आयुष्यात असे विशेष काय घडणार; पण सामान्यांची गोष्ट, ही समाजाची प्रातिनीधिक गोष्ट होत नाही का? माझ्या गोष्टीत कुणालाही रस नव्हता. मी काय करते, कुठे जाते, कुणीही काळजी करणारे नव्हते. फक्त रॉबर्ट व केटी तेवढेच जिव्हाळयाचे होते. पण कधी कधी खूप भीती वाटे. चांगली वाटणारी नातीही, कालांतराने अपेक्षा वाढल्यामुळे, तुटू शकतात. अहंभावामुळे वादविवाद सुरू होतात. त्यामुळे मी शक्यतो सहवासात हात राखून ठेवत असे. आदित्यच्या आठवणीत रडत असे.

नुसते खोटे शब्द, समाधान न देऊ शकणारे, की शब्द म्हणजे, निखारे, स्फुल्लिंग पेटवणारे?

शब्द म्हणजे काजवे, क्षणभर चमचमणारे की शब्द म्हणजे बाण, घायाळ करणारे? नाराज मनाला समजावून उपयोग काय? शब्द म्हणजे औषध, उपाय न आणणारे शब्द म्हणजे चंद्राचे चांदणे शीतलता देणारे की शब्द म्हणजे तुषार, तहान वाढविणारे! दुसऱ्याला दुखावू नये हे मलाही कळते. पण ते माझे विचारही न टिकणारे? सहनशीलता, सोशिकता सर्व खोटे शब्द. डोळयांतल्या अश्रूंचे एक नाव फसवणारे, नशीबातले लिखित.

मी फारच नकारात्मक होतेय असे मला वाटू लागले. पण होकारार्थी व्हायला काहीतरी चांगले नवीन घडायला हवे होते.

ऑफिसमध्ये असते तशी टिपिकल ट्रीप ठरवायचे काम, ग्रेसीवर होते. मलेशियाला जायचे असे तिने ठरवले. रेन फॉरेस्ट ह्या मलेशियातील घनदाट जंगलातील पर्यटनाबद्दल ऐकले होते. जगभरातील पर्यटकांचे ते लाडके स्थान आहेच. खळाळत्या नदीतून बोटीचा प्रवास, जंगल ट्रेकिंग वगैरे आकर्षण असते. त्या सोबत लांगकावीचे वर्ल्ड जीओ पार्क म्हणजे अभयारण्य, तमनेगारा अशी सहल ठरविण्यात आली.

मलेशियातील स्ट्रॉबेरी हॉलीडेज्चा कार्यक्रम ठरत होता. ट्वीन टॉवर्स ॲम्युझमेंट पार्क, गरुड पक्षी, तमनेगाराचे नॅशनल पार्क, पण ती फिस्कटली. चायनाज पॅन हॉंगकॉंग टुरवर सर्व ऑफिसमधील लोक जाणार होते. योजनेत एक सरकार मुंबईचे शांघाय बनविणार होते, म्हणून ते आधुनिक शहर बघावे अशी इच्छा होती. `मादाम तुसा म्युझियममध्ये भारतीयांचेही मेणाचे पुतळे आहेत. ' ग्रेसी म्हणाली.

रॉबर्ट म्हणाला, `हिरोशिमाला पीस मॉन्युमेंट (शांती स्मारक) आहे. महायुद्धाच्या काळात हिरोशिमा व नागासकी ही दोन शहरे बॉम्बस्फोटात उद्ध्वस्त झाली होती. आता शांततेचा संदेश देणारे ते स्मारक तिथे बनवले आहे. '

`आधुनिक तंत्रज्ञानाने स्वच्छ शहर बघायला चल. ' केटी म्हणाली.

पण माझ्याकडे पैसे नव्हते. त्यामुळे मी नाही म्हणाले. मला ते आठ दिवस खायला उठतील असे वाटले. शिवाय एकटीवरच सर्व काम पडेल म्हणून मी सुचवले, `जवळच कुठे जाऊ शकाल तर बरे. म्हणजे जाण्या-येण्यात वेळ जाणार नाही. ' ग्रेसी मागे एकदा म्हणाली होती, `हिला परवडणार नाही. ही त्या भारतातील, महाराष्ट्रातील, एका स्लममध्ये (झोपडपट्टी) राहणारी असेल. ' मी गप्प झाले. पण हळूहळू सर्वच कर्मचारी गळाले.

शेवटी साऊथ अमेरिकेतील ब्राझील, अर्जेंटिना, चिलीपेरू व बोलिव्हिया अशी चार प्रदेश व अकरा मोठ्या शहरांना भेट देण्याची ट्रीप करायची ठरली. ब्राझीलच्या कार्निव्हल (जत्रा) पासून सुरुवात करायची. बीचवर सांबा नृत्य करून उद्घाटन करायचे ठरले. ब्राझीलच्या शहरातील टुरमध्ये गव्हर्नर पॅलेस, इपीरंगा मॉन्युमेंट, वैद्यकीय शाळा डाऊन टाऊन बघून दीड तासाच्या विमान प्रवासाने जगप्रसिद्ध इग्वासू फॉलला जायचे ठरले. ब्राझीलमधील रायो द जानेरो शहरात उत्तम हॉटेलात मुक्काम करून शुगरलेक माऊंटनवर केबलकारने जायचे. पुढे कोरकोवादो येथील हात पसरून कवेत घेणाऱ्या क्राईस्ट द रिडीनर हा जिझस क्राईस्टचा पुतळा बघायचा, हा त्या सर्वांचा प्लॅन होता.

रॉबर्टसरानी मला तो क्राईस्टचा उंच पांढरा पुतळयाचा फोटो दाखवले व म्हणाले, `येशील ना? 'मी मनाने तर सिद्ध झाले होते. पण खर्चाची काळजी वाटत होती. `अर्जेंटिनाला अवेनायडा नाईन दे जुलिओ हा अॅव्हेन्यू आपण बघूया. तिथे टँग शो आहे. त्या दिवशी माझा वाढदिवस आहे. ' रॉबर्टसर म्हणाले.

`तिथून मग चिली देशाची राजधानी सॅन्टिएगोला जाऊया. `ला मोनेदा' हा सरकारी राजवाडा आहे. सॅन क्रिस्टोबलहिल बघूया. पोर्टिलोला स्कीईंग करूया. (बर्फावर लोखंडी पट्ट्यांच्या साहाय्याने खेळणे व पडणे. ) लगून ऑफ इन्कामध्ये समुद्रात खेळायचे. पुढे पेरू देशात तर ऐतिहासिक वारसा सांगणारे अनेक राजवाडे इन्का पॅलेसच भग्नावशेष आहेत.

माच्चुपुच्चुला खंडहरमध्ये तर तू पूर्वजन्मी गेली असशील. ' तो मला चिडवत म्हणाला.

`पेरू नंतर कुठे जाणार? ' मी विचारले.

ते म्हणाले, `बोलिव्हिया या देशात ला पाझ असे लहान लहान गल्ल्यांचे भारतीय ठिकाण वाटावे असे आहे. या बोलिव्हियात मून व्हॅली बघण्यासारखी आहे. '

मी विचारले, `खर्च किती येणार? ' त्याने सांगितले, `चाळीस हजार डॉलर्स. '

त्याने माझ्या नजरेतून नकार ओळखला. पैशाचे सोंग आणता येत नाही. सर्वजण ट्रीपला गेले. मी माझी आवडती कादंबरी `ययाति' वाचायला घेतली. ती वाचून झाल्यावर पुन्हा `अलकेमिस्ट' वाचत बसले.

कातरवेळी तिन्हीसांजेला आठवणारी, जिच्यामुळे डोळे पाणावतात ती खुपणारी, त्या रात्री भेटलीस ती तूच का? आज हुरहूर देणारीही ती तूच ना!

*तू कालपण माझ्या जवळच होतीस*
*आज दूर जाणारी ती तूच का?*
*दूर कितीही गेलीस,*
*दुसऱ्याची झालीस तरी*
*आपलीशी वाटतेस,*
*अशी ती तूच ना!*
*खाली पापण्या झुकवून लाजताना*
*दात न दाखवता ओठात हसताना*
*माझ्याचबद्दल विचार करतेस*
*माझीच असतेस,*
*ती तूच ना!*
*मला आता गप्प राहवत नाही*
*खरंखरं सागंतो, होय! ती तूच आहेस! !*

*माझ्या स्वप्नांमध्ये दरवळणारी*
*कस्तुरीमृगाप्रमाणे मी शोधतो जिला*
*व्यर्थ  भटकंतीही सार्थ करणारी सांग,*
*ती तूच ना! हो, ती तू ना!*

ऑफिसमध्ये जाणे-येणे, नवनवीन कर्मचारी येणे, बदलीवर जाणे चालूच असते. लीली व डेझी या दोन तरुणी आल्या. त्या सर्वजणी मला `ब्लॅक इंडियन' म्हणून माझी टर उडवत असत. एक दिवस मला अंडरडेव्हलप्ड म्हणजे अप्रगत म्हणून हसत होत्या. लंचमध्ये एकदा रॉबर्ट  समोरच त्या मला अपमानास्पद बोलल्या. माझी अशी अपेक्षा होती की रॉबर्टने माझी बाजू घ्यावी. पण सर काहीच बोलले नाहीत. मला वाटले तेसुद्धा मनातून मला परकीय, काळ्या लोकांमधली समजत असेल का?

मला राग आला. अपमानाने मी लालेलाल झाले. पुन्हा कधीही रॉबर्टशी बोलायचे नाही, असे मी मनोमन ठरवले. काळ्या देशातली असो किंवा अविकसित देशातील असो, मला माझ्या भारत देशाचा अभिमान होताच व आहेच. मी रॉबर्टकडे कटाक्षही न टाकता घरी निघून आले.

मला त्या दिवशी रॉबर्टसरांचा रागच आला होता. रात्री ऑफिस सुटल्यावर रॉबर्ट घरी आले. तेव्हा मला खूप थकल्यासारखे वाटत होते.

मी त्याच्यासाठी चहासुद्धा केला नाही.

कितीही थकून आलात तरीही स्त्रीने पदर खोचून उभे राहिलेच पाहिजे... कामाचा फडशा पाडायला वाघ व्हायलाच पाहिजे... मृत्यूपूर्व जबानीत पुरुषाला मोकाट सोडलेच पाहिजे... पुरुषाने त्याचा उद्वेग आपल्यावर का विस्थापित केला पाहिजे? अर्थात, माझ्या नादमय शब्दांतल्या विचारांचे, त्या वर्णनाचे कौतुक करणारे कुणीच नव्हते. कारण `अति

परिचयात अवज्ञा'.

फारसे काहीही न बोलता रॉबर्टसर निघून गेले. मला त्याच्या जाण्याने वाईट वाटले. मग मी विचार केला. तो माझा मित्र आहे. त्याला ही तर अतिपरिचयात अवज्ञा होणारच. त्यालाही स्पेस हवी. मोकळीक हवी. पण जाताना त्याने माझ्याकडे एक तिरका कटाक्ष टाकला. त्या नजरेत मला सर्व काही लाभले. एक नजर काय करू शकते, वर्षांची अतृप्ती दूर करते. खूप शांतता देते. म्हणूनच तर आपण पदयात्रा करून पंढरपूरला जातो.

रॉबर्टसर माझ्यात गुंतले आहेत की गुंतत आहेत?

त्या भांडणामुळे म्हणा किंवा त्या अबोल्याने मी माताजींना, म्हणजे ज्या गणपती मंदिरात भजन करायला जात असे, त्या अमेरिकन मंडळातर्फे चालवल्या जाणाऱ्या मंदिराच्या त्या कार्यकर्त्या बाईंना मी इजिप्त टुरला येण्यास हो म्हणाले. माझा होकार कळवला, पण ऑफिसमधल्या त्रासामुळे मी वैतागले होते व पर्यायाने पिरॅमिड स्फिंक्स गिझोच्या त्या पुरातन आकृतींचा आनंद व आकर्षण अचानकच कमी झाल्यासारखे वाटले. ऑफिसमध्ये यापूर्वीही आपल्याला काळया वंशाचे म्हणून हिणवले गेले असेल, पण भाबडेपणामुळे, बावळटपणाने किंवा मूर्खपणामुळे समजले नाही. ह्या माझ्या अशा अज्ञानी वागण्यामुळे मला स्वतःचीच कीव येऊ लागली. मी खूपच देवदेव-कर्मकांड, जपजाप्य, मंत्रतंत्र याकडे वळू लागले.

पंधरा दिवस असेच गेले. रॉबर्टनेही मला समजवायचा प्रयत्न केला नाही. अर्थात प्रत्येकाचाच अहंभाव असतो. तरी बरे झाले ट्रीपच्या निमित्ताने इजिप्तच्या ट्रीपची तयारी झाली. ऑफिसच्या प्रश्नांपासून, अपमानांपासून सुटका म्हणून मी खूश झाले. ट्रीपमध्ये सर्वांबरोबर मीही वावरत होते. प्रवास चांगला झाला. पण वाळवंटातले इराणमधले हवामान म्हणजे खूपच टोकाचे असते. खूप थंडी किंवा खूप गर्मी असते. जाऊन दोन दिवस झाले.

गिझोच्या पिरॅमिडजवळ आमची गाडी थांबली होती. माताजी व आम्ही सर्व कार्यकर्ते भजनाच्या कामाबरोबर पर्यटन, स्थलदर्शन करत होतो. आणि परिचित हाक आली. `सा'.

रॉबर्ट माझ्याजवळ पळत आला व म्हणाला, `बास, इनफ ना राग! किती राग धरायचा? ' सर्व कंपूच्या नजरा माझ्याकडे वळल्या. कंपूतील काहीजणांच्या चेहऱ्यावर समाधान होते, तर काहींच्या नजरेत  असूया होती. माझ्या बरोबर त्यादिवशी मनोहरी दृश्य दर्शनाला रॉबर्ट पण होता. पिरॅमिड बघून झाल्यावर रॉबर्ट थोडावेळ लॅपटॉपवर काम करत बसला व नंतर मला रात्रीच्या विमानाने जायचे आहे, असे सांगून जायला निघाला. पिरॅमिड हे शक्तीस्रोत मानतात. पिरॅमिडचा शुभशकुन मला लाभला. आमचे भांडण मिटले.

माझे क्वार्टर्सच्या सी विंगच्या विलात (पॉश बंगल्यात) रॉबर्ट सर राहायला आले. एक दिवस त्यांनी मला ऑफिसमध्ये विचारलं, `रात्रीचं डिनर आपण शेअर करू या का? ' रात्रीचं डिनर आम्ही अर्धे अर्धे जेवू लागलो. तरीही मी एका अलिप्त नजरेनेच त्यांच्याकडे पाहात असे. एके दिवशी त्यांनी मला विचारलं. `तू पुन्हा कथ्थक डान्सचा क्लास का लावत नाहीस? ' माझं आवडतं पुस्तक कोणतं हेही त्यांनी विचारून घेतलं. मॅडमवरून हळूहळू ते मला `सा' म्हणू लागला. मी सांगितलं `अलकेमिस्ट. ' व माझी पुस्तकाची कॉपी त्याला दिली. लांडे कपडे घालणाऱ्या स्त्रियांची कमतरता कधीच नव्हती. पण रॉबर्ट माझ्याशीच बोलत असे.  रॉबर्ट, मी व केटी आमच्यात चांगली मैत्री जमू शकते असं मला वाटलं. सुरवातीला मी रॉबर्ट सरांना `अरे' म्हणायला कचरत असे. पण त्यांनी आग्रह केल्याने `अरे-कारे' म्हणू लागले.

रॉबर्ट सर व मी मॉलमध्ये खरेदीला गेलो की रॉबर्टसर आठवणीनं आमरस आणत असत. मी  त्याच्यासाठी स्ट्रॉबेरी आणत असे. रॉबर्टच्या घरी आम्ही कधीही गेलो

नव्हतो. पण रॉबर्टच्या घरासमोर झोपाळयाजवळ परदेशात (स्वींग कॅनॉपी म्हणतात. ) एक उंच झाड होतं. त्याच्यावर एक सुंदर सुगरणीचं घरटं होतं. दोघेजण श्री व सौ. सुगरण दिवसभर त्या घरट्याभोवती रेंगाळत असायचे. मी थांबून ते घरटे निरखून पाहात असे. पुढे पुढे देवदर्शनाइतके नियमितपणे ते घरटे मी बघून येई. एकदा रॉबर्ट सर म्हणाले, `माझी आई भारतीय होती. ' तरीही रॉबर्टला माझे घरटे प्रकाराचे आकर्षण व ऑबसेशन समजायचंच नाही. मी घरटं बघायला लागले, की तो माझ्या डोळयांकडे एकटक बघत राहायचा. मी एकदा त्याला विचारलं.

`तुला मी वेडी वाटते का रे? क्रेझी, स्टुपिड सारखी वागते का मी? '

तो हसून म्हणाला, `नाही `सा' तू खूपच भोळी, निर्व्याज वाटते. असं वाटतं तुला कुणी तरी रक्षणकर्ता हवा. ' त्याचवेळी आलेली केटी त्याला म्हणाली, `तुझ्या मित्रांमधील त्या भारतीय मित्राला तिच्यासाठी विचार ना तिचा रक्षणकर्ता कम नवरा होतो का म्हणून? '

रॉबर्ट गप्प बसला. रॉबर्टच्या विलाच्या अंगणातील संत्र्याच्या झाडाला मोहोर आला. रॉबर्ट मला तो मोहोर ते फळ ती पक्ष्यांची घरटी बघायच्या निमित्ताने `सा' अशी जोरात हाक मारून त्याच्या बागेत बोलवत असे.

एक दिवस रॉबर्ट मला व केटीला म्हणाला, `माझ्या बंगल्याच्या गच्चीतून ते घरटं खूप छान दिसतं. चला बघायला येता का? ' मला भीती वाटली. केटी पिऊन ढेर होईल आणि याने मला काही केलं तर...

मी, `नको पुन्हा कधी तरी, तुझ्या वाढदिवसाला येऊ, ' असं म्हणाले.

ते म्हणाला, `पक्कं'. त्यानी हात पुढे केला. त्याच्या हातावर मी माझा व माझ्या हातावर केटीने, तिचा हात ठेवला. त्यानंतर रॉबर्टसर घरट्यांचे फोटो आणून मला ऑफिसमध्ये दाखवत असत. मी हळूहळू रॉबर्टसराना अरे तुरे करु लागले, बऱ्याच ओळखी होत होत्या. तरीही

त्यानंतर आम्हा तिघांना घरटी बघायची हौस जडली. वसुंधरा बचावच्या पर्यावरणविषयक भेटी व सहलींतही आम्ही तिघे एकत्र जाऊ लागलो. तिथेही आम्ही घरटी बघत असायचो. कधी कधी रॉबर्टची कंपनी खूप बरी वाटे, तर कधी कधी बोअर वाटत असे.

तसे कचनारला देशी ऑर्किड म्हणतात तशा फुलांच्या ऑर्किडच्या बागा बघायला आम्ही गेलो. त्या पर्यावरणाच्या  कार्यक्रमासाठी आम्ही गावाबाहेरील एका पडक्या वाड्यात गेलो होतो. तिथे त्या बागा होत्या. महाराष्ट्रातील तमनसारखी गुलाबी, जांभळी फुले होती. तिन्हीसांजा झाल्या. तिन्हीसांजा या नेहमीच काहूर उठवतात... मन कातर करतात. कुणीतरी अजनबी आपल्याला आवाज देतोय... साद घालतोय... बोलवतोय, शोधतोय असे वाटते. रॉबर्ट सर चिडवत होते.

`इथे या कुटुंबातील पूर्ण कुटुंबाने विषारी विष खाऊन आत्महत्या केली. त्यांचे भूत इथे वावरते. ' अशीही मी भित्रीच आहे. त्यात हे सांगितल्यावर अजूनच घाबरले. अचानक एक काळे मांजर माझ्या अंगावर उडी मारून आले. मी खूप घाबरले. रॉबर्टला चिकटले. खरेतर माझी ती प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया होती. काय झाले ते कळताच मी दूर झाले. पण रॉबर्ट चेष्टामस्करी विसरला. कुठे तरी हरवल्यासारखा वागू लागला. केटी व ग्रेसी त्याला म्हणाल्या-

`वाड्यातले भूत तुला लागले का रॉबर्ट? '

केटी ट्रेनमध्ये परत येताना म्हणाली, `माझ्यासारखी स्मार्ट मुलगी सोडून, त्याला तू म्हातारी आवडलीस वाटतं. तुझ्यात हरवून गेलाय. तुझ्या स्पर्शात काही जादू वगैरे आहे का? '

`अगं तो व ग्रेसी टेरेसवर गेले होते. तिथेच काहीतरी घडले असेल. ' मी उत्तरले. केटी म्हणाली, `लक्ष ठेवून असतेस वाटते, तो काय करतो, कुठे जातो? '

मी तिला पाठीत धपाटा मारण्याचे नाटक केले.

आदित्य पुढे मी लहान, गोरी, देखणी दिसायचे. उजवी दिसायचे. तरुण दिसायचे. माझ्यापुढे रॉबर्ट गोरा दिसतो. उजवा दिसतो. तरुण दिसतो. आदित्यही माझ्या स्पर्शाने अस्वस्थ व्हायचा. रॉबर्टही हऴवा झाल्यासारखा वाटला. नात्यांमधले साम्य कोणते? भूतकाळात व वर्तमानकाळात साम्य कुठले? रिकाम्या पोटाचा आवाज खोट्या घोषणांपुढे ऐकू येत नाही? की आपणच तो दाबतो? मला आठवले, लहानपणी दरवाजावर भिक्षा मागायला एक तेजस्वी ब्राह्मण यायचा. आई त्याला पीठ, कैऱ्या, अंगणातली मक्याची कणसे देत असे. तो आईला म्हणाला, `तुमची लेक शापित नागकन्या आहे. ' माझ्या वडिलांना भिकारी, बैरागी घरी येणे, अजिबात आवडत नसे. एक दिवस वडिलांनी त्याला हाकलून लावले. मला वाटते त्यानेच मला शाप दिला असेल. एकटेपणी, बैराग्यासारखी अन्नासाठी वणवण फिरेल म्हणून हातावर पोट घेऊन नोकरी करत, एकटे जगायची वेळ आली. अचानक आई-वडील वारले. अनाथपण पदरी आले. शाप देण्याची शक्ती माणसांना असते. शाप पटकन लागतात, मग आशीर्वाद का लाभत नाहीत?

पूर्वजन्मी मी कोणते पाप केले असेल? आयुष्याचा पूर्वार्ध अत्याचाराने नासला, मध्यंतर परक्यांच्या घरी, भीतीत, दडपणात गेला व आयुष्याचा तिसरा अंक परदेशात असा एकटेपणाच्या आयुष्यात गेला. शेवट काय होईल? मृत्यू हा तर प्रत्येकच कथानकाचा अंत असतो. पण परदेशात बेवारस मृत्यू? का? एका अयोग्य व्यक्तीवर प्रेम केल्याची व एका मदांध व्यक्तीच्या नजरेत भरण्याची शिक्षा? माझ्यापेक्षाही कितीतरी सुंदर मुली गल्लीत फिरताना दिसतात. मी सुंदर नाही तरीही माझ्यावरच `त्या' कुटुंबाची नजर का पडली?

रॉबर्ट हॅण्डसम होता. तरी त्याला मी का आवडले? मी आणि आदित्य कधीही फिरलो, की आदित्यला भीती वाटे की, लोक आम्हाला मुलगी- बाप म्हणतील. आता मला भीती वाटे, मी व रॉबर्ट कुठे गेलो तर लोक आम्हाला आई व मुलगा म्हणतील. परदेशात वयाचे अंतर, फारसे विचारात घेतले जात नाही; पण मलाच उगीचच गंड वाटत असे. संकटकाळी माझे पाठीशी जी अंधूक आकृती उभी आहे असे वाटत असे, तो रॉबर्ट तर नव्हे? डाकोरनाथच्या

मंदिरात, पालीथान्याच्या डोंगरावर, सोमनाथाच्या पिंडीपाशी श्रीकृष्णाच्या द्वारकेत जी सावली मागे आहे असे वाटत होती, ती सावली म्हणजे रॉबर्टचा सुवास होता का? माझ्या विचाराने मी चमकले.

आजूबाजूला रस्ता वाहत होता. बोलण्याने माणसाचे नुकसान होते म्हणतात, पण मी तर किती अबोल होते. तरीही माझे नुकसान झाले. उलट न बोलून मनात दाबलेल्या ज्वालामुखीने मलाच, स्वतःला खाल्लं. माझी जगण्याची उमेद खाल्ली. करियर, घर कुठेच चमकले नाही. परदेशातही मी लग्नासाठी नवीन स्थळ पाहणे, ही खोटी उमेद, खोटी आशा वाटावी इतकी स्थळे पाहिली. तसे कधी ह्या देवाचे करायचे. कधी त्या मंत्राचे पठण करायचे. देवळांची शताबधी केली, पण देवाला जाग आलीच नाही. गेलेली व्यक्ती हाक मारते आहे असे वाटते. पण ती परत येणे शक्यच नाही, हे माहीत असते. एक हुरहूर मात्र राहाते. पालखीत बसून सुरू झालेले आयुष्य आता अध्यात्माच्या दिंडीकडे चालू लागले आहे. काही दिवसांनी `त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे', अंतिमयात्रा... आत्महत्या का नको? कुठला पाश मागे खेचतो? जगणे आपोआप संपावेसे वाटते. पूर्णविराम नको? किती दुःख माणूस सोसू शकतो? बाऊन स्ट्रीटवर होली ॲव्हेन्यूजवळ, ऑरनेट ब्ल्यू टॉवर्सजवळ महावलल्भ गणपती देवस्थान आहे.

प्लॅशंगच्या हिंदू देवळांमधील प्रसिद्ध देऊळ म्हणून ते नावाजले जाते. मी तिथे दर मंगळवारी जाऊ लागले. रॉबर्टला वाटे मी कुणाबरोबर तरी डेटींग करते. एक दिवस मी परत यायला बसस्टॉपवर बसले तेव्हा मला जाणवले रॉबर्ट कारमध्ये बसून मला बघतो आहे. `मी दर मंगळवारी इथे येते. ' मी त्याला बकुळीची फुले हातात देत म्हटले. `आत यायचे? ' `नको. पुढच्या मंगळवारी जाऊ. ' तो म्हणाला. अमंलताशच्या पिवळया फुलांच्या झाडाखाली उभे असताना मला जाणवले रॉबर्ट माझी काळजी घेतोय. मला आदित्यने केलेली फसवणूक आठवली.

मी रॉबर्टचा हात पकडून मनाशी म्हटले- `जा आदित्य, माझी लढाई मी एकटीच लढू शकते. ' पण मग धरलेला हात झटकन सोडून दिला. ती वाटसुद्धा बदलली. गाडीत गाणे

लागले होते.

*चलो अच्छा हुआ अपनोमें कोई गैर तो निकला*
*अगर होते सभी अपने तो बेगाने कहाँ जाते.*

याचा अर्थ रॉबर्ट मला विचारत होता. माझ्या अर्थ सांगण्यानं तर त्या गाण्यावर रॉबर्ट म्हणाला. `उलटे व्हावे बेगान्यांमध्ये एकतरी अपना निघावा. ' तरुण आकर्षक ग्रेसी, केटीच्या पुढे मी मध्यमवयीन गावठीबाई रॉबर्टला आपलीशी का वाटत होते? कोणते मैत्रीचे बंध भाग्यविधाता बांधत होता? मी आदित्यला सोडून पुढे जात होते. सोडता येत होते का? कधीच मागे पडलेला भूतकाळ स्क्रीन-सेव्हरसारखा पुढे येतच असतो. प्रत्येकाची चौकट वेगळी असते. प्रत्येकाचा स्क्रीनसेव्हर वेगळा असतो. तो बदलतो. बदलताही येतो, पण खिडकी बदलत नाही. समोर असूनही दिसतेच असे नाही. आणि कधी बघायची इच्छा असूनही दिसतेच असे नाही. आयुष्य संपत आले की जुने चेहरे बघावे. आयुष्याचे पुनरावलोकन करावेसे वाटते. भावाने क्षमा मागावी असा मूर्ख अंदाज मी का केला? किंवा का करू नये? वयोमानाने सर्वांनाच प्रगल्भता येते असे नाही. मरणाच्या दारातसुद्धा दुष्ट माणसे दुष्टच राहतात, हे मी विसरले होते. जास्त काळ गेल्यावर नाती सडतात. वाटले हे लिहावे. लिहिले नाही तर माझ्याबरोबरच हे संपेल, पण लिहून वाचणार कोण? प्रेमाचे संबंध, वर्षावर मोजतात का? की प्रेमाच्या गहराईवर मोजतात? खरेतर एकाकीपण कोणते परिमाणात मोजतात. माणूस तुकड्या-तुकड्यांतच वावरतो. स्त्री म्हणजे सृजन असते. पण मी म्हणजे वांझोटी? सुलभ आकर्षण संपले! वय उतरले. वाळू निसटून गेली आता... शरीराच्या मागण्या कधी नव्हत्याच! पोटासाठी संघर्ष करण्यातच आयुष्य गेले. उलट परलिंगीयांशी, शारीरिक संबंधांची, एक भीतीच वाटते. कधी वाटते एकटेपणच बरे! होस्टेलवरच्या महिलांमध्येच बरे वाटे, तर कधी पूर्णपणे एकटीला बरे वाटे.

स्त्रीला काय हवे? अशी एक स्पर्धा ऑफिसतर्फे मध्यंतरी घेण्यात आली. मी उत्तर दिले, सुरक्षितता!

मला बक्षीस मिळणे शक्यच नव्हते. त्या स्पर्धेनंतर रॉबर्ट मला भेटायला माझ्या क्युबिकलमध्ये आला.

म्हणाला, `सुरक्षितता कुठे? ' काय हवे? '

मी म्हणाले, `एक घरटे जिथे तिचे संरक्षण होते. एक घरटे जिथे ती हवीशी असते. एक घरटे जिथे तिचे स्वागत होते. एक घरटे जिथे विनाकारण किंवा कारण ही न देता किंवा खोटे कारण शोधून तिला बाहेर काढले जात नाही. ती नकोशी नसते. एकच व्यक्ती जिला ती स्त्री हवी असते खेळणे म्हणून नव्हे, तर सहचारिणी म्हणून, एक माणूस म्हणून, एक बहीण म्हणून, मैत्रीण म्हणून, पत्नी म्हणून... ' आणि पुन्हा मला वाटले आपण उगीच इतके बोललो आणि पुन्हा माझ्या कोशात गेले.

रॉबर्ट म्हणाला, `घरटे ही इतकी निकडीची गोष्ट असते? '

मी म्हणाले, `जर तसे नसते तर आदिमानव गुहेत का राहिले असते? ती गुहा त्यांचे घरटे, घरच असते ना! '

रॉबर्ट म्हणाला, `घटस्फोटित महिलांचे घर, पुनर्विवाहितांचे,  बेघरांचे घर, ते त्यांचे घरटे बनू शकते का? वेश्यांची माडी त्यांचे घर असते का? घर हरवलेली माणसे उत्तम राजप्रसादात राहूनही दुःखी का होतात? शुभवास्तू,  अशुभवास्तू हे फरक म्हणजे काय? घर तर नेहमी शुभच असते. मग बेघर होणे हा भयानक शाप का असावा? गल्लीबोळात अर्धे फ्लॅट न विकले गेलेले किंवा खरेदीदारांनी राहायला न येता अडवलेले असतात. त्या रिकामया घरांचे काय? '

`ते मला समजत नाही. घरटे ही जगातली प्रिय आणि निकडीची गोष्ट असते, हे मला समजते. ' मी म्हणाले.

रॉबर्ट सर विचारमग्न झाले व म्हणाले, `घर म्हणताच आठवते ते काय? ' मी म्हणाले, `प्रेम व पिल्लं माया. ज्या घराचे दरवाजे कायम आपले स्वागत करतात असे घर, असा जीवनसाथी हवा. ते सोपे नसते'

रॉबर्टचा ऑफिसनिमित्त येणारा संबंध संपला. कारण एकदिवस रॉबर्ट सरांची अचानक एका दुसऱ्या दूरवरचे ऑफिसला बदली झाली. मला बरेच वाटले. मनात कुठेतरी खोल, मला आपण, कुणात कुठेही, गुंतायचे नाही, हा संदेश अस्वस्थ करत होताच. आदित्य काय व रॉबर्ट काय? पुरुष शेवटी शोषणकर्ताच असतो. अशा अनुभवांनी, विचारांनी मी पुरुषद्वेषीच झाले होते. तसा ऑफिस स्टाफ हा बराचसा, मांजरीप्रमाणे स्थळनिष्ठ असतो. त्या खुर्चीशीच त्याचे सख्य असते. तो खुर्ची भोवती घोटाळतो. आमचा ऑफिसातला संबंध संपला. पण निवासस्थाने (घरे) समोरासमोर असल्याने रॉबर्ट संबंध टिकवू शकत होता. बघू.

एकदा रॉबर्टने माझ्या निवासस्थानात आलेले असतांना मला विचारले, `इतक्या वर्षांनंतरही ऑस्टिनमध्ये वडील आठवतात? ' मी होकारार्थी मान हलवली.

एखादी व्यक्ती आयुष्यातून निघून जाताना काय सोबत नेते? रिकाम्या हाताने गेली काय व सामान, दागदागिने घेऊन गेली काय; ती खरंतर प्रत्यक्ष जाण्यापूर्वीच, मनाने कधीच गेलेली असते. अनेक भावना, अनेक आठवणींची हंडी भरून घेऊन गेलेली असते. तर कधी प्रत्यक्ष मेल्यावरही, ती व्यक्ती मनात रेंगाळत राहते. '

मी आईने दिलेल्या डेंचकीत खिचडी केली होती. कणकेच्या गोळयाने झाकणाचे काठ बंद केले व रॉबर्टबरोबर गप्पा मारत फ्लॅटच्या खिडकीच्या काठावर बसले होते. बाहेर अवेळी धो धो पाऊस पडत होता. पावसात झाडे झुलत होती. फुलांच्या पाकळ्या व जुनी पाने जमिनीवर पडत होती. निसर्ग रूप बदलत होता.

`रॉबर्ट ही झाडे इथेच राहतील; पण मी भारतात जाईन. त्यानंतर हे घर इथेच राहील. नवीन कुणीतरी इथे राहायला येईल. फक्त त्यावेळी मी इथे नसेन. पण माझ्या प्रत्यक्ष जाण्यानंतरही, काही काळ माझ्या आठवणी ह्या कॉम्प्लेक्समध्ये राहतीलच ना! '

`हो, मी तुला कामाच्या नादात, काही दिवस विसरेन. पण एखाद्या दिवशी तुझ्या आठवणीने बेचैन होईन. ' रॉबर्ट म्हणाला.

`मग नवीन मैत्रीण मिळेल. ' मी म्हणाले.

`नवीन मैत्रीण नको. मीच येईन भारतात व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून. ' रॉबर्ट.

`ठीक आहे, समज. वर्षातून चार वेळा येशील. पण उरलेले 361 दिवस ह्या आठवणी इथेच पडून राहतील. ' मी.

`प्रत्येक क्षण मी तुझ्या बरोबर घालवू इच्छितो. ' रॉबर्ट म्हणाला.

त्याचवेळी दरवाजाची बेल वाजली. ग्रेसी व डेझी या ऑफिसमधील नवीन मैत्रीणी आल्या होत्या.

रॉबर्टला `चल डिस्कोत जाऊ. ' म्हणायला लागली. रॉबर्ट म्हणाला, `माच्छेर भात खायचा आहे. ' ती बसली व म्हणाली, `खा. मग जाऊ. ' मी व रॉबर्टने एकाच ताटात भातखिचडी वाढून घेतला व लिंबूच्या लोणच्या बरोबर खाल्ला. आपली लाडकी व्यक्ती भरपेट जेवली, याची तृप्ती स्वयंपाक करणारीपर्यंत पोहोचते. हे भारतीय चांगले जाणतात. भांड्यात थोडा भात उरलेला असताना, डेझी प्लेट घेऊन आली व न सांगताच तिने तो भात वाढून घेतला व संपवला. रॉबर्ट म्हणाला, `सा, तुला आता उपाशी राहावे लागेल. '

`त्या झोपडपट्टीतील देशात बरेचजण उपाशी असतात. ' ग्रेसी म्हणाली. डेझी म्हणाली, `सत्ता कुणी कुणाला आनंदाने देत नसते. ती हिसकावून घ्यायची असते. ' बहुतेक ती मला इंडियन म्हणून हिणवत असे. ती काहीतरी तिचे भाषेत बोलली असावी किंवा माझी काळी, स्लममध्ये राहणारी अशी काहीतरी टीका करून हसली असावी.

ते दोघे डिस्कोत निघून गेले व मी वाचत पडले होते. पुन्हा बेल वाजली. हिरवळीसारखी मऊ उशी, मी विकत आणली होती. छान वाटत होते. नाइलाजाने उठले. दार उघडले. रॉबर्टने माझ्यासाठी, जंकफूड खाऊ आणला होता. तो त्याने दिला व माझ्या गालावर चापट मारून तो गेला. मला चलसुद्धा म्हटले नाही. मला थोडा राग आला. नकोशा व्यक्तीला टाळण्याची, खड्ड्याप्रमाणे बाहेर फेकण्याची, स्वार्थी वृत्ती समाजात, इतिहासकाळापासून आहे म्हणा! माझा राग व्यक्तीवर नाही; प्रवृत्तीवर आहे.

जगात मानवाला गोड साखरी वर्खातील गोळी औषधी हवी. प्रेमाची गोड सुवर्ण

वर्खी जादू सर्वांवरच चालते. अडाण्यांपासून उच्चभ्रूपर्यंत सर्वत्र, शरीरात आकर्षण निर्माण झाले की मेंदूत द्राव स्रवतो. अनेक घंट्या वाजू लागतात. ट्युलिप/गुलाब बागेतील फुले उमलू लागतात. हजारो नायगरासारखे भावनांचे धबधबे कोसळतात. लग्नाचे दिवस येतात. पुढे वयोमानानुसार शरीरात बदल होतात. आयुष्य मोनोटोनस होते. हवीशी वाटलेली जबाबदारी नकोशी होते व नकोशा व्यक्तीला बाहेरची वाट दाखवली जाते. पुढे मग शारीरिक आकर्षण, तृप्ती या मार्गाने मातृत्व-पितृत्वाचा आनंद येतो. आपण पाहतो, झाडाच्या ढोलीतील कुठल्या तरी अनाथ पिल्लाला तो पक्षी किंवा पक्षीण जीव लावेल का? त्यांचेही घरटे बनू शकते का? माणूस तर पक्षी व प्राण्यांपेक्षा प्रगत जीव आहे. मग तो अनाथ पिल्लांना जीव का लावत नाही? हो-नाही करत, स्वतःशी, नातेवाईकांशी संघर्ष करत, दत्तक मुलालाही माया लावली जाते. घरकाम व देहधर्मात वर्षे उलटून जातात. काहीही न करता आयुष्य जातेच. मग येते ती निवृत्ती. कशातच मन लागत नाही. पूर्वीप्रमाणे मन उमलत नाही. काम-क्रोध-मद-मत्सराची धार बोथट होते. मध मधुर वाटत नाही. जहर पचू लागते. कडवट, तुरट चव सर्वत्र रेंगाळू लागते. पण वाद-विवाद, भांडणे नको वाटतात. माणूस अबोल होतो.

पुढे येते मंगेशाची ओढ! परमेश्वर चरणी लीन होण्याची ओढ लागते. मृत्यू जवळपास दिसू लागतो. नेत्र पैलतिरी लागतात. जीवनाची साठा उत्तरी कहाणी ह्या पाच उत्तरातच सफल, संपूर्ण होते. मी नाराज झाले होते. तरीही काय करू शकत होते? आंधळयाला दृष्टी नसते. पण एहसास असतोच. मग आंधळ्या देवालाच का बरे माझ्या दुःखाचा एहसास नाही.

दुसरे दिवशी, सकाळी गुलमोहोराच्या पाकळयांचा सडा, झाडाखाली पडला होता. मी वर झाडाकडे बघत उभी होते. रॉबर्ट परत आला आणि एका झाडाच्या फांदीवरचा पक्षी अचानक उडाल्याने ती फांदी हलली व फुलांच्या पाकळया आम्हा दोघांच्या डोक्यावर पडल्या. रॉबर्ट हसला. मी अजूनही कालचा राग धरूनच होते. रॉबर्ट म्हणाला, `हे बघ ऑफिस हे असेच असते. त्रास देणाऱ्यांकडून आपण स्वतःला त्रास करून घ्यायचा नाही. त्रास करणे न करणे, हे तर आपल्या हातात असते ना. आपण चांगले वाईट काहीही त्रासदायक व्यक्तीबद्दल

बोलू नये. त्या दिवशी ईद होती. ऑफिसमधील अन्यधर्मीय सोबती, चिरागन, संदल मुबारक असे सांगत होते. माझा वाढदिवस ईदला असतो. पण तो कुणालाही आठवण सुद्धा नव्हती. '

मला वाईट वाटले. डोळयांत पाणी झरत असताना सर्वच ऋतू पावसाळेच वाटतात. नोकरी म्हणजे `दिंडी'? वाजत गाजत प्रभुनाम घेत पंढरपूरला दर्शनाला जाणाऱ्यांची, की नोकरी म्हणजे शवयात्रा कर्मचाऱ्यांची? अहोरात्र, जिवापाड काम करणाऱ्या भाबड्यांचे शव वाहून नेणारे कामचोरही या यात्रेत असतात. नोकरी म्हणजे तुरुंगवास? पण तुरुंगात चांगल्या वर्तणुकीबद्दल शिक्षेतून सूट मिळते. इथे चांगले काम केले की अधिक लादले जाते.

*जो तो खातो कष्टाची मीठ भाकरी*
*प्रत्येकच करतो छोटी मोठी चाकरी*
*असतो पिवळा चाफा प्रत्येकच्या दारी*
*छोटासा आभाळाचा तुकडा देतो उभारी*
*कधी स्वतःला छळणारे शब्दनिखारे नशिबी*

मी नदीकिनारी जाऊन बसले व अंधार पडल्यावर घरी आले. रॉबर्टने माझा राग ओळखला होता. तो म्हणाला, `तुझी लढाई तू कधी लढणार? मी का तुझ्या वतीने बोलू? '

मनातल्या मनात मी म्हटले, हासुद्धा इतरांसारखा स्वार्थीच आहे.

तो पुढे म्हणाला, `प्रत्येक वेळी प्रत्येकाला गॉडफादर मिळत नाही. आपले युद्ध नेहमी आपण लढायचे असते. '

मला असे वाटले की हा मला उघडपणे, मैत्रीण मानायला टाळतो आहे. हा पण आदित्यच्याच जातीचा स्वार्थी, चोरून मैत्रीचे नाटक करणारा?

मग दुसऱ्या दिवशी तो उघड माझ्या काम करायच्या जागेजवळ आला, बसला, चहा पिला. अर्थात मला तेही खटकले. तो उघडपणे येऊन इथे, हक्क दाखवतो आहे असंही मला वाटलं. `कष्ट करून पुढे ये. गॉडफादर का हवा?'

रॉबर्ट मला म्हणाला. मी मनाला समजावले.

`कठोर परिश्रमाला पर्याय नाही. ' मी कामात मन रमवू लागले.

ऑफिसमधल्या एका अंध मैत्रिणीचा, अचानक मृत्यू झाला. एका व्यक्तीने सांगितले की अपघातात, मला रस्त्यावर मृतदेह सापडला. मला वाटू लागले हिच्याही आयुष्यात कुणी अण्णासाहेब आले असतील का? तिचा मृत्यू खरेच अपघातच असेल का? मी खूप अस्वस्थ झाले. माझी तिची थोडीशीच मैत्री होती. चकचकत्या त्वचेची, निर्जीव डोळ्यांची शव होवून पडलेली, ती मला दोन-तीन दिवस आठवत होती.

पुढे, एक दिवस ऑफिसमध्ये, उघडपणे रॉबर्ट माझ्या काम करायच्या जागेवर आला व म्हणाला, `आपण संध्याकाळी ख्रिस्ती दफनभूमीत जाऊया. ' मी होकारार्थी मान हलवली.

संध्याकाळी आम्ही फुले घेऊन स्मशानात गेलो. त्या अंध मैत्रिणिच्या थडग्यावर ती फुले वाहिली. मेणबत्ती लावली. आणि बसून राहिलो. घरी येताच मी रडायला लागले. रॉबर्टने मला जवळ घेतले. जणू तो माझ्या प्रत्येक अणूरेणूतून, माझे मैत्रीण वारल्याचे दुःख, दूर करत होता. मला म्हणाला, `माझ्या स्वप्नात तुझी मैत्रीण आली व म्हणाली `सा' ला सांभाळ. '

टेलिपथी अशी असते का? अतिंद्रिय शक्ती, मृत्यूनंतर बोलणारे आत्मे असतात का? आपण विश्वास ठेवू न ठेवू ती शक्ती जरूर असते.

रॉबर्ट म्हणाला, `मी इथे राहू? ' मी त्याला नको म्हणाले.

मध्यरात्री अचानक जाग आली. दरदरून घाम फुटला होता. पाणी प्यायला उठायचीही भीती वाटत होती. आई स्मशानात जाऊ द्यायची नाही आणि मी मात्र ख्रिश्चन दफनभूमीत जाऊन आले होते. मी शंकराचा मंत्र म्हणायला सुरुवात केली. मला सतत वाटत होते की, ती मैत्रीण आसपास आहे. मला काहीतरी सांगू इच्छित आहे. तिचे ते सांगणे माझ्यापर्यंत पोहोचलेच नाही. तिचे रहस्य तिच्या बरोबरच संपले. जसे माझ्यावरील अत्याचाराचे रहस्य माझ्या बरोबर संपले असते तसे किंवा संपणार आहे तसेच. मला रात्रभर झोप आली नाही. दुसऱ्या दिवशी मी ऑफिसमध्ये रॉबर्टची केबिन शोधत गेले. तो बऱ्याचदा

माझ्याकडे माझ्या विभागात येई. मी त्याच्या ऑफिसमध्ये कधीच गेले नव्हते. मी रॉबर्टला म्हणाले, `रॉबर्ट, माझ्यासाठी तुझ्या ओळखीच्या त्या काम करणाऱ्या महिलांच्या वसतिगृहात जागा बघ. मला घरी एकटीला भीती वाटते. '

रॉबर्ट मला म्हणाला, `घे. जिझसचा क्रॉस गळयात घाल. '

मी तो क्रॉस असलेली चेन गळयात घातली. तो म्हणाला, `आपण इकडेच जेवूया. ' आम्ही त्याच्या ऑफिसच्या म्हणजे, जी आमच्याच ऑफिसची दुसरी संस्था होती. त्या ऑफिसच्या कॅण्टीनमध्ये जेवलो. त्याच्या ऑफिसमध्ये सर्वजण माझ्याकडे बघत आहेत असे मला वाटले. मी त्या भावनेकडे दुर्लक्ष केले. काहींच्या नजरेत शब्दहीन कौतुक होते. काहींच्या नजरेत कोरडेपणा होता. रॉबर्टने ह्युमॅनिटी हेडकडे मला नेले व ततो म्हणाला, `नोकरी करणाऱ्या महिलांच्या हॉस्टेल, शांतीमध्ये तिच्यासाठी चांगली सोय सांगा. ' ते सर रॉबर्टचे मित्र होते. ते रॉबर्टला म्हणाले, `गेट मॅरीड. ' व हसले. पण नंतर अगदी कार्यालयीन भाव आणून 'बघेन' म्हणाले. रॉबर्टने हाफ डे घेतला. आम्ही ऑफिसमधून निघालो.

मला रॉबर्टने भ्रमंतीला नेले. ती भेट म्हणजे एक दिलखुलास मेजवानी असे. नदीच्या काठी गाडी लावली. तिथे एक पक्षी अभयारण्य होते. माझ्या इतकाच रॉबर्टही पर्यावरणप्रेमी व निसर्गमित्र होता. त्याने तिथे रेड स्पर फाऊल, सफस वुडपेकर हॉर्नबील (धनेश) ग्रेनाईट जार, एमराल्ड डव्ह (कबूतर)असे दुर्मीळ पक्षी दाखवले. पिंजऱ्यात किंवा छोट्याशा बंद नैसर्गिक वाटणाऱ्या, कृत्रिम कोठडीत हे पक्षी ठेवले होते. त्यांचे दिसणे व मध्येच कधीतरी आवाज करणे, जाणवत होते. पण त्या पक्ष्यांनी तिथे घरटे बांधले नव्हते. मी रॉबर्टला म्हणाले, `रॉबर्ट हे पक्षी इथे सुरक्षित आहेत. त्यांना अभय आहे. मग त्यांनी घरटे का बांधले नाही? '

रॉबर्ट म्हणाला, `मला पक्ष्यांची भाषा येत नाही. नाही तर त्यांना, मी विचारले असते. '

मी त्याला म्हणाले, `भारतात ब्राह्मणी घार बहुतांशी समुद्रकिनारी किंवा

जलाशयाजवळ आढळते. मासे खाते. वड-पिंपळ, काटेसावर नारळ अशा उंच झाडांवर ही घार काड्यांचे घरटे बांधते. शिक्रा पक्षी म्हणजे शिकारी पक्षीही असतो. एक फूट लांब हा पक्षी शेतात घरटे बांधतो; जिवंत शिकार (उंदीर, सुरवंट) खातो. काड्यांचे व पानांचे घरटे बांधतो. कमरेवर पांढरा ठिपका व शेपटीखाली लाल पिसांचा झुपका असलेला लालबुड्या व त्याच्याबरोबर तलवारबाज हे बुलबुल असतात. सुगरण पक्षी गवताचे, नरसाळ्यासारखे घरटे असते. टेलर म्हणजे शिंपी पक्ष्याचे, पाने शिवून बनवलेले घरटे असते. नवल म्हणजे ते घरटेसुद्धा त्याच्या सारखेच लाल-हिरवे रंगाचे, असते. '

रॉबर्ट मन लावून ऐकत होता.

मला शिंपी पक्ष्याचे रंगीत घरटे आठवले. माझ्या मनात आले. माझे घरटे कुठे आहे? त्याचवेळी वाटले रॉबर्टला तरी स्वतःचे घरटे कुठे आहे... पण पुरुषांना घर-घरटे एवढे आकर्षण वाटत नसावे, असे मला वाटते. शेवटी परमेश्वराने नर-मादी हा फरक निर्माण केला आहे. पुरुषांत एक प्रकारचा भटकेपणा टाकला आहे. घरट्यांचे प्रेम आणि आकर्षण मादीला असते. शिवाय घरट्याबद्दल प्रत्येकाची आवड वेगळी, भावना वेगळी व मानसिक गुंतवणूक वेगळी असते. पण त्या निसर्ग पर्यटनाने मला खूप खूप छान वाटले. त्याच दरम्यान एका महिला हक्क रक्षण समितीच्या कार्यकर्त्याशी ओळख झाली. मी कधी तेथे जाई. . रॉबर्ट एकदा माझ्या फ्लॅटवर आला असताना, रॉबर्टने मला, त्या कार्यकर्त्याच्या कारमधून उतरताना पाहिले. रॉबर्ट माझ्याबाबत पझेसिव्ह झाला होता. खरेतर परदेशात कामानिमित्त एकत्र येणे व एकमेकांच्या गाडीतून येणे, टॅक्सी शेअर करणे कॉमन असते. पण रॉबर्टला माझे ओनरशीप राइट्स हवे होते.

रॉबर्ट म्हणाला, `माझे वडील म्हणतात, हे कार्यकर्ते ढोंगी असतात. खोटे शब्द चालवतात. कागदी घोडे नाचवतात. ' थोडा वेळ गप्पा मारून जाताना टेक केअर... त्याच्यावर फार विश्वास टाकू नकोस, असे बजावून गेला. तरा तरा जाताना त्या माणसाच्याकडे एक तुच्छ कटाक्ष टाकून गेला.

एक दिवस त्या कार्यकर्त्याने आदित्यचा संदर्भ सांगितला व म्हणाला त्यांच्या संस्थेतर्फे भारतातही कार्यक्रम करावे अशी आदित्यची इच्छा आहे. मी सावध झाले.

रॉबर्टने एकदिवस लॅपटॉपवर `मेसी'ची गोष्ट दाखवली. दोन्ही पाय नसलेल्या मेसीला फूटबॉल खेळायचा होता. प्रत्यक्षात अपंग मेसीला पायच नव्हते. फूटबॉल मागे तो लपला जात होता. इतका छोटा होता. लोखंडी पाय लावून तो फूटबॉल खेळू लागला. स्वप्न पूर्ण होण्यासाठी मेसीने कष्ट केले. `मेसी'ची गोष्ट ऐकून मला जीवनाबद्दल आशा वाटू लागली. एका फॅन्सी ड्रेस स्पर्धेत रॉबर्टने मला महाराष्ट्रीयन नऊवारी साडी, नथ, गजरे असा वेश करायला लावला. मला पहिले बक्षीस दोनशे डॉलर मिळाले. मी त्या पैशातून नवा टीव्ही विकत घेतला.

एकदा, तो समाजसेवक सांगू लागला. भारतात स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण खूपच वाढले आहे. मुलगी म्हणजे दुर्दैव म्हणून तिला कोसायचे. मेली मरेल तर बरे, असे म्हणायचे. तिची सारखीच कटकट असते. दुर्दैवी ती! तिला मदतबिदत करायची का, तिची साथ सोडायची? तिला सक्षम करायचे. तिला आधार द्यायचा, की तिला गर्भातच मारून टाकायचे? स्त्री भ्रूणहत्या हे पर्यवसान कशाचे? आधार द्यायची हिंमत नाही म्हणून दाखवल्या जाणाऱ्या षंढपणाचेच द्योतक आहे. मी संघर्ष करत जगले. पण खचले. मला चांगल्या प्रकारे आधार, संरक्षण भाऊ, नातेवाईक, समाज देऊ शकत होता. पण प्रत्येकाने जबाबदारी नाकारली. का? त्या सामाजिक कार्यकर्त्याशी मैत्री करू नये असे मला उगीचच अंतर्मन सांगू लागले. पण एकदम तोडायला नको म्हणून मी वरवरचे संबंध ठेवले. कारण एका नात्याचा मृत्यू म्हणजे मनातल्या एका कोपऱ्याचा, अनेक आठवणींचा मृत्यू असतो. तो फारच दुखदायक असतो.

त्या दिवशी मनस्तापामुळे घरी गेल्यावर खूप आजारी पडले. वाटले या आजारातून मी जगणार नाही. मी ठरवले परदेशातील गाशा गुंडाळून भारतात पळायचे. इथे बेवारस मरण्यापेक्षा तिथले होस्टेल काय वाईट आहे? न बोलण्याचा, न व्यक्त करण्याचा व संवादाच्या अभावाचा ताण मला सहन होईना. रात्र रात्र झोप येईना. मी भारतात परत जायचे ठरवले.

माझे दादा, माझी आई मला `लेक लाडकी' म्हणायचे. कुठे तरी त्यांचा आत्मा भारत देशात माझ्यापाठीशी उभा राहील. कधीतरी समदुःखी मैत्रीण मिळेल. आता या वयात

तरी चांगला निवारा, वृद्धाश्रम मिळेल. भारतात जायचे ठरवले आणि डोळा लागला.

माझी तब्येत तोळामासाच होती. पण रॉबर्ट हौशीने फॅन्सी ड्रेस स्पर्धेत माझे नाव देत असे. दुसऱ्या वेळी त्याने बंगाली नववधू म्हणून माझे नाव नोंदवले. मी रॉबर्टला म्हटले, `माझ्याजवळ बंगाली वस्तू नाहीत. ' त्याने संध्याकाळी शंखाच्या लाल-पांढऱ्या बांगड्या, आणल्या. पांढरी, लाल काठाची नववधूची साडी आणली. ब्रोकेडची ओढणी आणली. सोनेरी चांदीचा मुकुट स्वतःच खटपट करून बनवला. मला सजवले आणि माझ्याकडे हरवल्यासारखा बघत बसला. फोटो काढून तो वडिलांना मला पाठवला. माझ्या कपाळाचा मुका घेऊन, मी छान दिसते, असा संदेशसुद्धा पाठवला. मला तिथेही बक्षीस मिळाले.

मी मेसीप्रमाणे धडपड करत होते. मी मायक्रोवेव्ह ओव्हन घेतला. रॉबर्ट मला त्या नव्या जगात आत्मविश्वास देत होता. इथे कायम फुल बाह्यांचा शर्ट व पॅण्टमध्ये बघायची सवय असलेला रॉबर्ट सकाळी जॉगिंग ड्रेस, टी शर्ट, हाफपॅण्टमध्ये दिसे. मात्र बदली झाल्यापासून तो थोडा टेन्स वाटे. रॉबर्ट जास्ती हॅण्डसम दिसे. कामामुळे कधी कधी तो बरेच दिवस मला भेटतसुद्धा नसे. फोनवरसुद्धा गप्पा होत नसत. पूर्ण दिवस कामात असे. कधी कधी रात्रीसुद्धा तो उशीरापर्यंत, त्याच्या टेरेसवर बसून काम करताना आढळत असे. वरिष्ठ, उच्च पदावरच्यांना कामाचा ताण असतोच, म्हणून मी त्याकडे दुर्लक्ष करीत असे. मला रॉबर्टच्या न भेटण्याचे काही विशेष वाटत नव्हते.

आयुष्याबाबत मला अपेक्षा नव्हत्या. मी कोण होते? मी स्त्री म्हणजे नक्की काय, हे आजपर्यंत शोधते आहे. स्त्री म्हणजे बंद लिफाफा?

एकदा तो कार्यकर्ता म्हणाला, `इथे अमेरिकेत प्रेम म्हणजे खोपडी व्हायरस, टाइमपास. इथे इतकी सुबत्ता. तिथे भारतात लोक उपासमारीने मरताहेत. ' मी म्हणाले, `कसला अभिमान बाळगतो आपण? भारतीय संस्कृतीचा? जन्मापूर्वीच मुलींना मारणाऱ्या

भारतीयांचा? की अशिक्षित, अडाणी, अर्धपोटी मुली खड्ड्यात फेकून देणाऱ्या अगतिकतेचा? मॅचेस बघत गतीहीन व कार्यहीन वेळ घालवणाऱ्या समाजाचा? आपले रोल मॉडेल काय? मुलगी वाचवा मोहिमेचा, की न वाचणाऱ्या मुलींचा? '

तो म्हणाला, `काही तरी हवे म्हणून भारत देशाचा,  एक काल्पनिक गुण मानलाय. '

मी म्हणाले, `इथे आपल्या संस्कृतीचा अथवा भारतीयांचा अपमान करायचा अजिबात हेतू नाही. आत्मपरीक्षण करून सुधारणा व्हावी हाच उद्देश आहे. कुणाचे चांगले करता आले नाही तर गप्प बसावे. पण वाईट करू नये, हा संदेश मला या संस्थेतून द्यायचा आहे. मी ठरवले आहे मुलगी वाचवा मोहिमेत सहभागी व्हावे. सुख म्हणजे मोठी स्वप्ने पूर्ण होणे नव्हे तर छोटी स्वप्न पूर्ण झाली, यात आनंद मानून मोठी स्वप्ने पाहणे. त्याने आग्रह केला. त्यामुळे मी स्वतः मुलगी वाचवा मोहिमेची, लेक लाडकी या संस्थेची सभासद झाले. लेक लाडकी, सभासदांची पत्रके, साप्ताहिके वाचू लागले. पर्यावरण जागरुकते सोबत, मुलगी वाचवा मोहिमेचेही उत्तरदायित्व मी स्वीकारले. अर्थात मी त्याला लायक होते का? रॉबर्ट मात्र त्या कार्यकर्त्यांवर चिडू लागला.

एकदा माझे खोलीवर आलेला,  रॉबर्ट म्हणाला, `भारतीय पक्ष्यांबद्दल सांग ना काही तरी. काहीही. '

मी उत्तरले, `इथे होक होक असा आवाज करत एक पक्षी ओरडत असायचा. मला वाटे जवळपास कुठेतरी गिरणीच किंवा मसाला कांडपायचा, कुटायचा डंख असेल. किती ऊर्जा या पक्षात आहे. तो आक्रोश करतो आहे की साद घालतो आहे. ज्याला साद घालतो आहे त्याच्यापर्यंत तो आवाज का पोहोचत नाही. भारतात ज्याप्रमाणे जंगलातल्या वाटसरूला खंड्या पक्षी भेटतो. तसाच पक्षी इथेही झाडावर दिसतो. भारतात खंड्या वाटसरूला `खंड्या ऊठ विडी पेटव, ' सांगतो अशी सांगोपांग कर्णोपकर्णी पसरलेली कहानी आहे. अंधाऱ्या रात्री आपण जंगलात वाट चुकलो तर म्हणे एक लांब शेपटीचा छोटासा पक्षी व लांब झुबकेदार शेपटीची एक खार आपल्यासोबत वेशीपर्यंत येते. आपल्याला योग्य मार्गाकडे नेते. रस्ता चुकू देत नाही

की निराशेने, एकटेपणाने खचू देत नाही. पर्यावरणातसुद्धा किती प्रकारे एकमेकांना समजून घेतले जाते. '

रॉबर्ट म्हणाला, `तू म्हणजे गोष्टीवेल्हाळ आहेस. अ स्टोरी टेलर! मला तुझ्या मैत्रीत खूप शिकायला मिळते. '

मी म्हणाले, `मलाही. '

रॉबर्ट म्हणाला, `देश, जात, धर्म यापलीकडे चांगला माणूस होणे महत्त्वाचे असते. ' रिमझिम पाऊस सुरू झाला. रॉबर्ट उठला. पॅण्ट झटकून निघाला. मीही पाठोपाठ निघाले. आम्ही चालत चालत मुख्य रस्त्याला लागलो. तिथे रॉबर्टने गाडी लावली होती. त्याच्या गाडीशेजारी दुसरी गाडी उभी होती. ती गाडी त्या भारतीय सामाजिक कार्यकर्त्याची होती. रॉबर्टच्या चेहऱ्यावर नाराजी उमटली. त्याने गाडीच्या बॉनेटवर हाताची मूठ मारली व म्हणाला `शीट्'. त्या कार्यकर्त्याने मला दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाचे आमंत्रण दिले व नाराजीतच निघून गेला. रॉबर्टने मला माझ्या अपार्टमेंटच्या दारात सोडले. मी वर जाऊन फ्रेंच विंडोच्या खिडकीशी येऊन त्याला बाय केले. रॉबर्टच्या पाठोपाठ त्या कार्यकर्त्याची गाडी आली. मी घरातले दिवे मालवले व झोपल्याचे सोंग केले. फोन खणखणला. तो कार्यकर्ता म्हणाला, `तुमचे असे रॉबर्टबरोबर जाणे मी आदित्य सरांना सांगू का? ' मी फोन बंद केला. मला उदास वाटू लागले. पुन्हा हा आदित्य इथेही जीव घ्यायला का आला? रिमोट कंट्रोलने मला नाचवतो आहे.

एकदा पर्यावरणाच्या कार्यक्रमाला मी रॉबर्ट व केटी बरोबर गेले होते. वाटेत ऐतिहासिक पडक्या वाड्यात गेलो होतो. `काही वस्तूंचा, काही व्यक्तींशी जुना संबंध असला की आपल्या मनालाच कशाचाही संबंध कशाशीही जोडायची सवय लागते. ' मी.

`ही वृत्ती असते. मेंदूचे एक कंडीशनिंग त्या जुनवस्तूशी होते. आणि बरोबर ती वस्तू दिसली की मेंदू तसे संदेश देतो. ' रॉबर्ट.

`संवेदनशीलता हवी, पण अतिहळवेपणाही घातक असतो ना! ' मी.

`आता आपण जिथे गप्पा मारत बसलो आहोत ते एक स्मशान आहे. ' रॉबर्ट म्हणाला. मी चमकले. तो पुढे म्हणाला, `इतका वेळ तुला भीती वाटली नाही. आता नाराज झालीस. कारण स्मशानाची जागा, शवदर्शन मृत्यू, भूतखेते यांच्याशी संबंधित मानले जाते. हे मेंदूचे, मनाचे कंडीशनिंग म्हणजे संबंध जोडणे चूक आहे. 'रॉबर्ट.

`अगदी लहानपणी, आपल्याला जर कुणीतरी रागावत अंधाराची भीती घालत असतो तर त्यामुळे मुले आयुष्यभर अंधाराला घाबरतात. ' मी म्हणाले.

रॉबर्ट म्हणाला, `हो बरोबर आहे. तसे करायला नको. '

स्त्री हे परक्याचे धन. लाडकी लेक परक्या घरी जाणार हे लहानपणापासून का मनावर कोंदले जाते. भावांवर मालकी हक्काचे संस्कार करून मुलींना परके मानणे आपण बालपणापासूनच का करतो? केटी म्हणाली, `कशाला भारताचे एवढे कौतुक करायचे. काही सिनेमानट्या बघा. काय वागतात, काय बोलतात, काय त्यांचा तो ड्रेससेन्स. शी! '

मी गप्प बसले. खरेच भारतीय चित्रपटांचे काय चालले आहे? आमच्या गप्पा वाद, ती म्हणजे स्मशानात चर्चा चालली होती. रॉबर्टला म्हटले, `चल निघू या. ' आम्ही तिघे गाडीच्या दिशेने चालू लागलो . मला खूप भीती वाटत होती. मी दोन्ही हातांची घडी घालून हात, छातीशी धरले. केटी, बिनधास्त सर्वात पुढे सारस पक्ष्यासारखी टांगा टाकत चालत होती. मी पाय ओढत मागून येत होते. रॉबर्ट थांबला. माझ्या खांद्याभोवती हात टाकून म्हणाला, `चल की, उचलून घेऊ? ' मी अजूनच कानकोंडी झाले. याचवेळी जंगलातील गोमीसारखा वळवळणारा एक किडा माझ्या हातावर पडला. झटकल्यावर तो अंगावर पडला. मी जोरात ओरडले. रॉबर्टने पटकन दगडाच्या टोकाने तो किडा ठेचून दूर केला, पण माझ्या अंगाला खाज येऊ लागली. अगदी डोक्यातील केसाच्या मुळापर्यंत आग होऊ लागली. कानात वाफा निघू लागल्या. रॉबर्टने मला उचलून तसेच कारमध्ये ठेवले. केटीला म्हणाला, `आपण शहरात परत जाऊया. हिच्या शरीरात विष भिनतेय. ' आम्ही शहरात रात्री पोहोचलो. तेव्हा माझ्या संपूर्ण अंगावर गांधी उठल्या होत्या. डॉक्टरांनी फटाफट इंजेक्शन दिले व त्या किड्याचे विष

आटोक्यात आणले.

ते रॉबर्टला म्हणाले, `तुमची पत्नी आहे का? '

रॉबर्ट म्हणाला, `नाही. मैत्रीण आहे. '

`टेककेअर. असे अवेळी जंगलात जाणे सेफ असते का? पर्यावरणालासुद्धा राग येतो. किड्यांना अपरात्री त्रास दिल्याचा, त्रास आपल्याला होतो. जंगल हे घर किड्यांचे असते. त्या किड्यांच्या घरांवर पाय पडला असेल किंवा मधमाशीच्या पोळयातील माशांना वाटले असेल त्यांच्या त्या घरावर शत्रू आक्रमण करतो आहे. त्यामुळे किडे चावले असतील. जंगलात विषारी झाड असतात. जीवसुद्धा जाऊ शकतो. ' डॉक्टर समजावत होते.

दुसऱ्या दिवशीच मला बरे वाटले. पण स्मशानात, गर्द जंगलात अवेळी जाणे व नेणे रॉबर्टने थांबवले. किडेसुद्धा स्वतःचे रक्षण करतात. किड्यांनासुद्धा घर असते. मुंग्यांना वारूळ असते. मधमाशा पोळयात राहतात. आपले घर कुठे आहे? मी नकोशी, मी मुलगी म्हणजे किड्याहूनही क्षूद्र का? मुलगी, तिला स्वतःचे घर नसावे?

जर मुलगी बाई, पुरुषाची मर्जी पाळेल त्या घरात तिला आधार मिळतो. नाहीतर...

खिडकीच्या समोरच्या झाडावर एकटा पक्षी येऊन बसत असे. मी त्या खिडकीत पक्ष्यांना खायला घालायचे. एक संयंत्र (बर्ड फीडर) टांगले, पण तरीही त्या झाडावर येणारा तो एकमेव पक्षी होता. इतर पक्षी आले नाही. एकटा तो पक्षी, घरटे बांधतो का? एकाकी पक्ष्याचेही घरटे असू शकते का? मी रोज बघत असे. घरटे म्हणजे संरक्षण! मग एकट्या पक्ष्याने का घरटे बांधू नये? असेल काही कारण किंवा त्यामुळे त्याच्यावर एकटे राहायची वेळ आली. घरटे तर बांधायला काय हरकत आहे? पण पक्ष्यांचेही काही नियम, काही संयम, असतील. त्यामुळे एकटा पक्षी घर बांधत नसेल. तो पक्षी एक दिवस घरटे न बांधताच, तसाच जगत जगत झाडाखाली मरून पडलेला दिसला.

रॉबर्टकडे, अजून एक मैत्रीण ग्रेसीसुद्धा यायला लागली. ती रॉबर्टवर आकर्षित,

अनुरक्त वाटे. रॉबर्ट श्रीमंत होता व श्रीमंत बॉयफ्रेंड पटविण्याची जणूकाही स्पर्धाच होती. केटी मला रागवत असे. `ग्रेसी त्या रॉबर्टला पळवेल, तू आधीच त्याला बुक कर. ' मी `शटअप' म्हणून केटीला डोळे मोठे करून चिमटा काढून रागावले. खरंतर ग्रेसी विशीची होती व रॉबर्ट पंचेचाळीशीचा होता, पण हल्ली वयाचं अंतर फारसं विचारात घेतलं जात नाही म्हणा. मला रॉबर्टचं तिच्यात गुंतणं पाहून आदित्यची आठवण येत असे. पण मी पुन्हा गप्प बसण्यापलीकडे काही करू शकले नाही. आणि तो रॉबर्ट माझा फक्त मित्रच होता.

लंचमध्ये मी केटीला म्हणाले, `रॉबर्ट, मला रात्रीचे भोजन एकत्र घेऊ या का म्हणाला? कॉम्प्लेक्स कॅण्टीनमध्ये. '

`त्याची आई बंगाली होती. बंगालीत भजनला भोजन म्हणतात बरं! भजन करायला बोलावलं असेल. ' केटीने चिडवले.

ग्रेसी म्हणाली, `भारतीय मुलींमध्ये एक तीव्र बुद्धिमत्ता आणि भावनांचं अपील असतं. आम्हाला नाही कधी बोलवलं त्या रॉबर्ट नं'

`रोटेशनने टर्न बाय टर्न एकेकीला बोलावणार आहे. ' मी हसत म्हणाले व बस पकडून घरी आले.

कुणाकडेही जाताना रिकाम्या हातानं न जाण्याचे माझे गावठी संस्कार अजून तरी टिकून होते. मी गावाहून कधीतरी आणलेल्या आंबे मोहोर तांदळाची खिचडी सोबत घेतली. एक पापलेट तळून घेतले व कॉम्प्लेक्स कॅण्टीनमध्ये गेले. `मच्छी भात' म्हणून त्याने खुशीत खाल्लं.

`तू तर नॉनवेज खात नाही! ' रॉबर्ट.

`नाही तुझ्यासाठी बनवलं' मी .

`का? इंप्रेशन मारायला की ट्रेनिंग सेंटरमधे जाणे, बदल सहल,  हवं म्हणून. ' रॉबर्ट.

मला राग आला. ह्या रॉबर्टला मी इतकी स्वार्थी वाटले?

`अजून काही विकल्प नाहीत का? ' मी.

`आहे ना! तू माझ्याशी मैत्री करू इच्छिते. ' रॉबर्ट.

`तसं समज. ' मी.

`आतापर्यंत कितीजणांबरोबर फिरलीस? ' रॉबर्टच्या बोलण्यानं माझा चेहरा पडला. आयुष्य जसं समोर आलं त्याला तोंड दिलं. दोन पर्याय असताना सुद्धा, पर्याय निवडायचे सुख फारसं नव्हतेच. मुंबई- पुणे-नाशिक-गोवा-अहमदाबाद याच्या पलीकडे पर्याय नव्हते. पण मी आले (ऑस्टीनला अमेरिकेत) अर्थात पर्याय सारखेच कमी-अधिक प्रमाणात त्रासदायक होते. प्रवासात भेटणारी स्थानके सुखदायी ठरतील, याची शाश्वती आजपर्यंतच्या नशिबाच्या प्रवासावरून तरी वाटत नव्हती. शेवटी काय घडणार ते, त्या भाग्यविधात्याने पूर्वीच ठरवलं होतं. माझ्या नशिबी सटवाईने लिहीलेलं ते कुणीही बदलू शकत नव्हतं.

फक्त एक वाक्य रॉबर्ट म्हणाला, `नशिबाचा दरवाजा उघडण्यासाठी पण धक्का द्यावा लागलो. मुळूमुळू रडायचं नसतं. '

`माझ्या नशिबाचा दरवाजा आता उघडेल, मग उघडेल म्हणत आयुष्याची संध्याकाळ झाली. वाट बघितली. थोडा फार धक्काही मारला. पण नशीब उघडलं नाही. ' मी.

`माझं पण तसेच झालं. ' रॉबर्ट.

`प्रेमभंग झाला का? ' मी.

`नाही. असं वाटायचं अशी मुलगी आयुष्यात यावी, जिला बघताच काही तरी वेगळं वाटेल. तिच्यात काहीतरी आर्जव असेल. कपड्यांपलीकडे, शरीरापलीकडे व शैक्षणिक पात्रतेपुढेही वेगळं काहीतरी, वैचारिक, आत्मिक व्यक्तिमत्त्व असेल. माझा शोध चालूच राहीला. ' रॉबर्ट.

`म्हणजे तू भेटतच राहीलास? ' मी.

गाणी ऐकू येत होती, टीव्हीवर कुणीतरी भारतीय नटी लाज यावी अशी नाचत होती व अर्धनग्न अवस्थेत विभ्रम करत होती.

`नाही! मी दुरूनच किनाऱ्यावरूनच खोलीचा अंदाज घेत राहीलो व तुला जो

डेटींगचा, संशय येतो ना तसं काही केलं नाही. ' रॉबर्ट.

`म्हणजे तू अजूनही तुझ्या स्वप्नातल्या राणीची वाट बघतो आहेस तर! ' मी.

`हो! तुझं काय सा? तू कुमारिका आहेस? ' रॉबर्टने विचारले.

माझे डोळे भरून आले. अण्णासाहेबांचे अत्याचार, आयुष्यभर पाळलेला संयम, स्वतःचं रक्षण करण्याची धडपड... माझ्या नजरेसमोरून झर्रकन फिरलं. मी कुमारिका होते? बलात्कारीत स्त्री कुमारिका कशी होणार? मी रॉबर्टला खोटंही बोलू शकत नव्हते. माझे डोळे झरू लागले. मी गप्प बसले.

रॉबर्ट उठला व म्हणाला, `कमॉन! भूतकाळ आज संपत असतो. म्हणून तर वर्तमानकाळ व भविष्यकाळ मोठे ठरतात. चल तुला घरी सोडतो. '

रॉबर्टने मला कारमधून माझ्या घरी सोडलं. ऑफिसमधल्या एका प्रतिनिधीने मला रॉबर्टबरोबर गाडीत पाहिलं. दुसऱ्या दिवशी ग्रेसी म्हणाली, `गावठी दिसते, पण डेटिंग करण्यात हुशार आहे. ' मला तिचे ते शब्द खटकले. पण मी त्याकडे दुर्लक्ष केलं. त्या दिवशी माझे पर्यावरणविषयक पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन होते.

`कोकणला कॅलिफोर्निया म्हणतात. आपल्या गावात स्ट्रॉबेरीचा फिलाडेल्फिया क्यूबा म्हणायला काही हरकत नाही. ही थंडी, हे निसर्गरम्य पर्यावरण, हिरव्या झाडांनी सजलेले डोंगरमाथे, हे आपली शान आहेत. डोक्यावरची झाडी उडाली तर मग केशसंभार झडलेल्या युवतीप्रमाणे, निसर्ग कळाहीन होईल. हिरवळ उडाली तर लहान बाळाच्या अंगावर असलेल्या कोवळया लवीचा मुलामा निघून जाईल. हे पर्यावरण आपण जपायला हवं. मग भरपूर झाडी लावणार ना! जगवणार ना!

एक दिवस आपण सर्वजणच आपलं औटघटकेचं साम्राज्य पुढच्या पिढीकडे सोपवून, हे सुंदर जग सोडून जाणार आहोत. `त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे' म्हणत सर्वांनाच इच्छा असो, की नसो जावंच लागणार आहे. मग ह्या पर्यावरणाची हानी कशासाठी करायची? वर जाताना किती पैसा, किती घरं व किती दागिने घालून स्वर्गाच्या वाटेवर प्रस्थान करणार आहोत? मग ही हाव कशासाठी धरायची? झाडे तोडून रस्ते उजाड करून प्रगती

झाली. पण समाजात कुणासाठी रस्त्याच्या दुतर्फा झाडं लावणं व जगवणं आपण विसरलो.

त्या पृथ्वीचे, त्या वसुंधरेचे रक्षण करूया. वेळ निघून गेल्यावर काहीच उपयोग होणार नाही. ' माझे भाषण गाजले.

महाराष्ट्र मंडळात मला सर्वांनी मराठी गाण्याचा आग्रह केला. मी ग्रामीण भागातील मराठमोळे गाणे म्हटले.

*जशी चंद्र सूर्याची जोडी*
*डौल मोराच्या मानेचा रे माझ्या माणसा*
*अरे मराठी माणसा अरे माणसा*

माझे गाणे संपताना काही मराठी लोक चर्चा करू लागले. `मी मराठी' मोठे जोरात आहे. परप्रांतीयांना मुंबईतून हाकलून लावत आहेत. दुसरा इंग्रजी म्हणाला, `ती मराठी आहे! वाव! साधी आहे'

`शस्त्रांनी मारायची तिला गरजच नाही. डोळ्यानेच कत्तल करेल. '

रॉबर्ट अस्वस्थ होत होता. चिडकेपणात त्याला मी गुरगुरताना पाहिले होते.

रॉबर्टला राग आला की त्याच्या कपाळावरची शीर टम्म फुगायची. त्याने केस लांब वाढवून केसाचा मागे बो बांधला होता. त्यामुळे अशीही मी त्याला चिडवत होते. आणि त्याचा पारा चढत होता. रॉबर्टने मला रागाने हाक मारली. `दादांची लाडली चल घरी जाऊया. ' मी आज्ञाधारक मुलीप्रमाणे त्याच्याबरोबर घरी जायला निघाले. मला त्याने घरी सोडले. तो गेल्यावर मला रंगपेटीतील काही रंग हरवले आहे. असे वाटत होते.

शेवटी रंगांनीच इंद्रधनुष्य बनते व त्यात काळा, पांढरा मिसळून नवरंगी जीवन बनते. माझ्या आयुष्याचा रंग कोणता? मी रॉबर्टमध्ये गुंतू लागले की काय याची मला भीती वाटली. ऑफिसच्या पिकनीकची तयारी व माझी भारतात जायची तयारी एकदमच सुरू झाली. मनाने मी तो परदेश, ते ऑफिस सोडून कधीच भारतात पोहोचले होते. त्यामुळे मला त्या पिकनिकमध्ये अजिबात रस नव्हता. केटी म्हणाली, `तू भारतात जाणार. पिकनिकला नक्कीच ग्रेसी रॉबर्टला पळवेल. तू बसशील ओरडत, रडत! ' मी गप्प बसले.

रात्री रॉबर्ट केटीच्या फ्लॅटमध्ये भेटायला आला व नाश्ता करताना म्हणाला, `ट्रंक खरेदी केली का? ' मी म्हणाले, `हो. सामान खूप आहे. ' तो खोखो हसला व म्हणाला, `ट्रंक म्हणजे स्वीमिंग पुलमध्ये, पोहण्यासाठी पाय असलेली चड्डी होय. सामान भरायची बॅग नाही, सामान खूप नाही. ' आम्ही दोघे हसलो.

पण रॉबर्ट एकदम गंभीर होत म्हणाला, `भारतातून नक्की परत यायचे हं. कुणीतरी तुझी वाट पाहणारं आहे. '

मी विचारले, `कोण कुणाची वाट पाहत नाही. '

तो म्हणाला, `केटी वाट पाहणार आहे. आणि मीही वाट पाहणार आहे. '

एकदा स्त्री भ्रूणहत्येच्या निषेध कार्यक्रमात तो कार्यकर्ता म्हणाला, `मला भाषण लिहून दे. ' मी दिले- वाढत्या स्त्री भ्रूणहत्यांना जबाबदार फक्त मुलगी मारणारे पालकच आहेत का? पूर्वीच्या पिढीतील मुलींना लग्नाचे वचन देऊन फसवणारे प्रियकर, घरदार, सांपत्तिक वाटेकरीण नको म्हणून घराबाहेर काढणारे भाऊ, मुलगा-मुलगी भेदभाव करीत वाढविणारे कुटुंबीय आणि मुलींवर अत्याचार होत असताना, तो त्यांच्या घराचा खाजगी प्रश्न आहे. आम्ही मध्ये कसे बोलणार, म्हणत गप्प बसणारा निष्क्रिय समाजही जबाबदार आहे.

या भाषणावर त्याला भरपूर टाळ्या व इतर आमंत्रणं मिळाली. मी रॉबर्टला म्हणाले. `स्वार्थीपणाने प्रत्येकानेच जबाबदारी नाकारली. त्यातूनच ही स्त्री भ्रूणहत्येची राजरोस प्रथा जन्माला आली आणि भाषणे देऊन स्वार्थ साधणारी पोटभरू जमातही जन्माला आली का? '

`त्या संस्थेच्या अध्यक्षपदासाठी दोन दावेदार भांडत होते. संस्थेचे ऑफिस व राखीव रक्कम, संपत्ती यासाठी वाद चालू झालाय. ' मी रॉबर्टला सांगितले. `किती अशी लागते टीचभर पोटाची खळगी भरायला? मग ही संपत्तीची भांडणे का? संपत्तीच्या वाटणीवरून सुरू होणारी अहंभावाची टक्कर कितीतरी दमदार कुटुंबांना खाऊन टाकते. `

मी म्हणाले, `बत्तीस दातांनी माणूस अन्न चावून चावून खातो. पण परमेश्वराने दिलेले हे बत्तीस दात आपण इतरांना चावे घ्यायला वापरतो. दुखावणाऱ्या शब्दांनासुद्धा

बत्तिशीच म्हणतात. कधी कधी तर हे दात आपल्याच जीभेला चावतात. '

तो कार्यकर्ता म्हणाला, `सख्खे पुढच्या दातांनी लचके तोडतात. प्रियकर सुळयांनी चिरफाड करतात. समाज दाढांखाली धरतो. निराधार स्त्रीची शिकार व्हायला कितीसा वेळ लागतो. शिवाय शिकारीला श्रद्धांजली दिली की संपले. शिकार करणारा मात्र शूरवीर रणबीर ठरतो. दुबळया हत्यारविहीन, निराधार स्त्रीची शिकार करण्यात कसला आला पुरुषार्थ? स्त्रीचा रक्षणकर्ता शिबीराजा कुणी नाही का? मुख्य रस्ता म्हणजे पुरुष आणि फूटपाथ म्हणजे स्त्री. असे का? ' पण कितीही चांगले विचार मांडून त्या कार्यकर्त्याने प्रभाव पाडायचा प्रयत्न केला, तरीही रॉबर्ट त्याचा रागरागच करीत असे.

एक दिवस तो कार्यकर्ता म्हणाला, `रॉबर्टला सांग अविकसित देशांतील सामाजिक संस्थांना जी देणगी तुमच्या कंपनीतर्फे दिली जाते ती आमच्या संस्थेला द्या! ' मी गप्प बसले. मला पुन्हा मैत्रीच्या बुरख्याआडचा स्वार्थाचा राक्षस दिसू लागला. रॉबर्टकडून पैसे मिळवण्यात मी मध्यस्थ हवी म्हणून हे मैत्रीचे नाटक चालू आहे का? मी पुन्हा माझ्या कोषात शिरले. परत ऑफिसमध्ये पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनचे काम आले. त्याचवेळी मला प्रचंड नैराश्य आले. मन रमवायला मी उगीचच कुठल्या तरी देवळात जाऊ लागले. माझ्याकडून कामात चुका होऊ लागल्या. ऑफिसमधल्या ह्यूमॅनिटी विभागातर्फे मी औषध घेतले. पण मला त्याने खूप झोप येत असे. प्रश्नांना तोंड द्यायला हवे. पण लढायला सुद्धा साथ हवी असते. मी डीप्रेशनमध्ये जात होते.

वाईट प्रसंगांनी माणूस टणक होतो, वाढतो. प्रगल्भ होतो म्हणतात. पण चतुर, लबाड लोक तर सुखी राहूनही प्रगल्भतेने दुःख, संकटे टाळत राहतात. तरीही वाटेला आलेल्या आभाळाच्या तुकड्याला हृदयाशी धरत, आयुष्याशी लढत, दादांची झाशीची राणी लढतच होती. मृत्यू अटळ होता. हार अटळ होती. पण लढायला हवेच होते. मी लढत होते.

ऑफिसात नवीन साहेब आला. हुशार होता, पण काळया वंशाचा होता. काही तरी शोधत बसणे व काय शोधतोय हेच विसरणे हे या साहेबाचे वैशिष्ट्य होते. वृद्ध व कुरूप

होता. ऑफिसमधल्या रॉबर्टच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वावर खूश असलेल्या बायका नाराज झाल्या. आपण किती प्रकारे बाह्य व्यक्तिमत्त्वावर भुलतो ना! सत्याकडे डोळेझाक करतो. वरवरचे रूप-रंग पाहतो. काळ्या रंगाला तर समाजाने नेहमीच वेगळे पाडले आहे. मराठीत तर म्हटलेच आहे. `अंगाने गोरी हजार गुणचोरी. ' त्यामुळे त्या साहेबाला आदराने मदत करू लागले.

त्याच दरम्यान एक दिवस केटी माझ्याकडे राहायला आली. केटी गरोदर राहिली होती. परदेशात गर्भपात अवघड नसतो. एक गोळी घेतली की गर्भ गळून पडतो. पण तिला चार महिने लक्षातच आले नव्हते. नंतर तिने ती गोळी घेतली तेव्हा गर्भ चांगलाच पोसला होता. रात्री तिला प्रसूतिसारख्या वेदना सुरू झाल्या आणि अपरात्री सहन होईना. मी तिचे पोट दाबून धरले तो मुलीचा गर्भ पिशवीसह व नाळेसह बाहेर आला. केटीला साफ करून मी झोपवले. त्या गर्भाचे काय करावे मला कळेना. एवढासा होता, पण  हात, पाय, डोके सर्व अवयव तयार झाले होते. जुन्या कपड्यात गुंडाळून मी तो झाडाखाली पुरून टाकला. एकदा वाटले, बरे झाले आपल्यासारखे अगतिक आयुष्य जगायला एक अजून मुलगी जगात येऊन काय मोठा उजेड पाडणार होती. मला अचानक भारतात जावेसे वाटू लागले. त्या प्रसंगाने मी खचले. मला वाटले मुलींचे पहिले घरटे म्हणजे तर गर्भाशयच असते. त्याही घरट्यावर तिचा काही दिवससुद्धा हक्क नसावा.

मी ऑफिसला गेले नाही. संध्याकाळी रॉबर्ट आला. मला त्या सर्व घटनेचा खूपच ताण आला आणि कधी नव्हे ती मी रॉबर्टचा हात पकडून रडू लागले. रॉबर्टने मला शांत केले. वाचायला खूप पुस्तके आणली. गप्पा मारल्या. कॅरीअवे पॅकमध्ये रॉबर्टने जेवण आणले. जेवून गेला. माझे काय बिनसले त्याला समजेना.

काय झाले विचारू लागला. `तू ती मीच का ग? मी तीच का? '

’तुझी गोष्ट की माझी गोष्ट? भारतात का जायचे? तुझा प्रश्न का माझा प्रश्न? काय झाले सांग ना. ' असे विचारू लागला. शेवटी रॉबर्ट कंटाळून निघून गेला. खडतर आयुष्याचा

अनुभव तोकडा होता म्हणून मी पुन्हा भारतात या लोकांच्या तावडीत आपणहून निघाले होते.

माझ्या दुःखाच्यावेळी चार ओळीचे, Get well soon, म्हणणारे पत्रसुद्धा कधी आदित्यने मला पाठविले नाही. कधी कुणी अण्णासाहेबांविरुद्ध ब्र उच्चारला नाही. कुठलाही नातेवाईक मदतीला आला नाही. पण लोकांच्या नजरेत माझ्याबद्दल दया दिसत असायची. या लोकांनी आदित्यचा निवडणुकीत पराभव केला असता, तरीही त्यांची सद्सद्विवेकबुद्धी शाबूत आहे, असे म्हणता आले असते. पण हल्ली म्हणे लोक मतदानालाच जात नाही. सुट्टी मिळाली म्हणून ते पिकनिकला जातात. आणि मध्यंतरी कुठेतरी पाहणीचा निष्कर्ष वाचला. त्यात म्हणे असे निष्पन्न झाले की या देशातील नागरिकांचा मतदानातील रस संपला आहे. कुणीही निवडून आले तरी या परिस्थितीत बदल होईल असे लोकांना वाटत नाही.

पण असे म्हणून तर ... म्हातारी मेल्याचे दुःख नाही. काळ सोकावतो आहे. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवायला हवा. निकाल काहीही लागो. अंकुश कुणावरही कुणीही ठेवू शकते का? की अंकुश नावाची वस्तू नामशेष झाली आहे. कायदेसुद्धा निष्प्रभ ठरू लागले आहेत का? माझ्यावरील त्या अत्याचारांचा सूड कुणीही घेतला नाही. मी पुन्हा नैराश्यात गेले.

दुसऱ्या दिवशी लालसर तांबूस लख्ख सूर्यप्रकाश पडला होता. मला भरपूर वाचायची आवड होतीच. त्यामुळे सूर्यप्रकाशामुळे नैराश्य जाते, हे मी वाचले होते. मी कॉम्प्लेक्सच्या बागेत झोपाळयावर जाऊन बसले. सूर्याची पूजा हिंदू धर्मात का करीत असतील ते मला जाणवले. नकळत मी हात जोडले.

ॐ भुः भुव स्व तत् सवितुर्वरेण्यं
भर्गो देवस्य धीमही धीयो योन प्रचोदयात

रॉबर्ट ब्रेकफास्ट घेऊन आला. आम्ही त्या झोपाळयावरच तो नाश्ता खाल्ला. रॉबर्ट म्हणाला,

`मी तुझा खाजगी सचिव झालो आहे.'

मी म्हणाले, `मित्र म्हणजे त्यात सर्वच आले.'

तो हसला व म्हणाला, `मला मित्र मानलेस हा मी माझा मोठा सत्कार समजतो.

'

आम्ही आइक्रीम खायच्या इराद्याने आइसक्रीम पार्लरमध्ये गेलो. तिथे तो सामाजिक कार्यकर्ता पाठोपाठ हजर झाला. फुकटचे खाऊन पिऊन निघून गेला. रॉबर्ट म्हणाला, `थोड्या फायद्यासाठी माणसे आपल्या स्वत्वाला किती क्षूद्र जागेवर आणतात. '

मी म्हणाले, `रॉबर्ट पोट मोठी वाईट गोष्ट असते. पोट भरण्यासाठी अन्न लागते. अन्नासाठी माणूस अगतिक होतो. ही जीभसुद्धा माणसाला चटक लावते आणि साध्यासुध्या अन्नापेक्षा चमचमीत अन्न खाण्यासाठी माणूस पळू लागतो. जास्ती गोड मिठाई, चमचमीत तेलकट तूपकट खाऊन त्याला साधे अन्न आवडेनासे होते. मेजवानीची ओढ लागते. '

रॉबर्ट म्हणाला, `त्याचा परिणाम काय होतो? डायबेटीस होतो. मग खाण्याचा मोह का? '

मी म्हणाले, `मोह होतो हे सत्य आहे. पण प्रत्येक सजीवाला तो चुकत नाही. '

त्याक्षणी मला उगीच वाटले मी ह्याच्याकडून फुकट खाते. हे पण बंद करावे. मी त्याला म्हणाले, `रात्री मी पार्टी देईन. ' तो म्हणाला, `नको. ' पण मी त्याला घरी बोलवले व कढी खिचडी खायला केली. तो खूशहोऊन म्हणाला, `तू माझ्या सर्व पार्ट्यांची परतफेड केलीस'

मी चकित झाले.

`स्वतःच्या डोळयांना विचार! काहीही लपवता येत नाही. हिशेब मिटवायचे म्हणून मला जेवायला बोलवलेस ना. ' मी हसले.

येताना सोबत आणलेला सर्व आनंद व प्रकाश व पॉझिटीव्हिटी तो घेऊन गेला. मी घरात एकटीच राहीले.

ज्याची वस्तू त्याने नेली.

माझ्या हाती साईची झोळी, म्हणजे थोडक्यात काहीच नाही. थोड्या वेळाने ऑफिसमधून नवीन साहेबांचा फोन आला. `तुम्ही बनविलेली ती तालिका व स्टेटमेंट अजिबात कुठेही ताळमेळ नाही. ऑडिटर रागावत आहेत. वगैरे... ` मी त्यांची चिडचिड ऐकून

घेण्यापलीकडे काय करू शकत होते. '

काही गोष्टी शांतपणेही समजावता येतात, हे काही जणांना समजतच नाही का? की मलाच उगीच साहेबांचे रागावणे टोचते? विक्षिप्त व चिडके लोक सवयीने खेकसतात. पण त्यामुळे समोरची व्यक्ती खचते हे त्यांना कळत नाही किंवा कळण्याएवढी बौद्धिक पातळी त्यांची नसते. खरे तर आपणच निगरगट्ट व खंबीर व्हायला हवे. पण ते शक्य होते का?

मला नोकरी सोडून द्यावी असे वाटू लागले.

`परदेसी परदेसी जाना नही... ' हा संदेश भारतात का दिला गेला, त्याचे कारण परदेशात होणारे अपमानही असू शकते का? भारतात तरी कुठे सन्मान होता? बाई ही स्वयंपाकीण किंवा शोभेची बाहुली, भोग्य वस्तू हीच तर तिची किंमत बऱ्याच ठिकाणी होत होती. मला भारतात जायची इच्छा तीव्र झाली. मी भारतात जायचा ध्यास घेतला. मी पाच वर्षांनी होमसिक झाले. एक चमत्कारीक ओढ भारताबद्दलची, आपलेपणाची भावना मला खेचू लागली. परदेशातील राहणी, अर्थहीन भविष्यकाळाची व बेवारस मृत्यूची भीती मला भारताकडे बोलवू लागली. भौगोलीक अंतर मला बोचू लागले.

पुरस्कार, प्रसिद्धी, सत्कार यासाठी माझे नाव कधीच पुढे नव्हते. भारतातील मातीतसुद्धा मला स्थान नव्हतेच, पण मला तो देश हाक मारू लागला. `भारत छोडो' म्हणत भारतीय परदेशात यायला लागले ही गोष्टही आता जुनी झाली. मला वाटते आता परत भारतात येण्याची फॅशन आली आहे. माणसे त्यांचे गुणावगुण सर्वत्र सारखेच असतात. आपण स्वतःच स्वतःला बदलणे आवश्यक आहे, हे भारतीयांनी ओळखले आहे. काही वर्ष परदेशात काढून परत भारतात येणाऱ्यांची संख्या वाढते आहे. पगार जास्त मिळतो, पण औषधोपचार महाग म्हणून उतारवयात परत येणारेही भरपूर आहेत. मी परदेशात आले ती नाइलाज म्हणून व दुसरा पर्याय नव्हता म्हणून! मी खरेतर अमेरिकेत आले होते. भारतातील असुरक्षिततेतून पळण्यासाठी आल्यावर दहा वर्षे अगतिकतेने राहिल्यावर आता आयुष्याची तिसरी शेवटची इनिंग म्हणून मी भारतात जावे असे मला वाटू लागले. मी भावनांची भुकेली झाले. गावातल्या शंकराच्या देवळातील घंटेचे स्वर आरतीची किणकिण मला आवाज देऊ लागली. मी पुरुष

सहवासाची भुकेली नव्हते. मला आधार हवा होता. प्रेम हवे होते. भक्ती हवी होती. मी विरक्त संन्याशीनी होते. विरक्त तरी शरीराने, मनाने मात्र मी अभिसारिका बनले होते. या श्रावणात भारतातील घरी पावसात भिजायचे मनाने ठरविले होते. माझ्या गावाच्या त्या काळया मातीवर माझे प्रेम होते. त्या मातीचा वास मला घ्यायचा होता. मला भारतातील मातीची ओढ लागली. भारतात जायचा माझा विचार मी मैत्रिणींना (ज्या होत्या त्या मैत्रिणी नव्हत्या, खरेतर ओळखीच होत्या. ) सांगितला. पण पुन्हा या परदेशात परत यायचे नाही हे माझे गुप्तपणे ठरविलेले गुपित मी अगदी, केटी व रॉबर्टपासूनही लपविले.

आठवडाभर एक गरोदर मांजर आमच्या संकुलात ओरडत म्यँव म्यँव करत अस्वस्थ फिरत होते. तिने आमच्याच बिल्डिंगच्या तळाशी जिन्याखाली पिल्लं काढली. मांजरपण वयाने शरीरयष्टीने लहान होते. पिल्लंही छोटी छोटी होती. जनावरांमध्येही लग्नपद्धती असेल का? मांजरीच्या आयुष्यात कुणी अण्णासाहेब आले असतील का? केटीसारखी सुशिक्षित बाई गर्भपात करून घेते आणि ती एकटी मांजर कुणाच्याही मदतीशिवाय जिन्याखाली बाळंत होते. जनावर, मादी उजळमाथ्याने बाळांना वाढवते. मानव प्रगत म्हणायचा की अप्रगत? जनावरांमध्येही बलात्कार होत नाहीत. मग मानव एवढा जनावरांच्याही खालच्या पातळीवर का? तरी मांजरीमुळे व त्या पिल्लांमुळे माझा वेळ चांगला जात होता. शिवाय माझी नजर सातासमुद्रापलीकडील भारत देशातील महाराष्ट्रातील सीतापूरच्या खेड्यातील नदीच्या पैलतीरावर लागली होती. मी स्वतःलाच हरवून बसले होते.

ऑफिसमध्ये एक कथ्थकचा कार्यक्रम झाला. मी राधेचे अभिसारिकेचे भाव फारच सुंदर पेश केले. मला त्या नृत्याबद्दल संस्थेतर्फे प्रशस्तीपत्र मिळाले. सर्वजण पार्टी मागू लागले. पण माझी आर्थिक परिस्थिती सो-सो अशीच असल्याने मी टाळले आणि मनात तर मी ठरविलेच होते, की या देशाला कायमचा रामराम ठोकायचा. परत यायचे नाही. काही काळच उत्कटतेने उपभोगलेल्या प्रेमासाठी, त्या प्रेमभंगासाठी, त्या अपमानांसाठी, बदनामीसाठी ते सीतापूर डावलावे, असे मला वाटेना. इतके सर्व होऊनही आज कित्येक वर्षांनी माझ्या मनाचा आवाज मला त्या गावाकडे खेचू लागला.

आज सहा वर्षांनी भावाचा फोन आला. त्याच सोसायटीतील कुणा पाटील नावाच्या लबाड व्यक्तीने माझे भावाला फोन केला. त्याच्यानंतर भावाने मला भारतात यायचे निमंत्रण दिले. आग्रह केला. भाऊ मला म्हणाला, मी जागा कधीच विकली व पैसेही घेतले; पण त्या लोकांची अट आहे. त्यांनी जी ऑफिसेस त्या जागी काढली आहेत, त्यात कुठले तरी एक `वसुंधरा वाचवा' ह्या संस्थेशी संबंधित आहे. तू जर आलीस तर त्यांना भरपूर प्रसिद्धी मिळेल. तुला जाण्यायेण्याचा खर्च तुझ्या कंपनीकडून मिळेलच ना! ये जमले तर! शिवाय दादांची मृत्युपत्रानुसार इच्छा आहे तु यावेस, सहज तरी तू एकदा गावी यावं. '

*अजूनही मन माझे घोटाळते आहे.*
*पिवळ्या फुलांचा सडा पाडणाऱ्या त्या वेलीपाशी*
*मला वाटले काही क्षण गजरे गुंफण्यापुरती मी तिथे होते.*
*पण चार नजरांची दौलत ओच्यात भरली.*
*तुला तर कल्पनाही नसेल काय जादू झाली.*
*अजूनही मन घोटाळते आहे.*
*बघ त्या चार आठवणींच्या खंडहरमध्ये श्वास रमतोय.*
*परदेशात जीव गुदमरतोय.*
*आज न जुळलेल्या नात्यांमध्ये पैलतीर दिसतोय.*
*आज तेल संपलेल्या दिव्यामध्ये तरीही*
*मन घोटाळते आहे. बघ स्वप्नांमध्ये*
*पुन्हा, कधी भेटू न भेटू, अशा त्या वळणांवर*
*तरीही मन घोटाळते आहे बघ.*
*त्या मंदिराच्या कळसांपाशी.*

भारतात जायचा निश्चिय केला. वाटे की, मी रॉबर्टला भारतात जाण्याबद्दल सांगून टाकावे. पण मी कधी ते बोलले नाही.

ह्या माझ्या विचारांवर रॉबर्ट खूपच गंभीर होत म्हणाला -

`मी चार दिवस वडिलांना भेटायला टेक्सासला जाणार आहे. कुठे पार्टीला जाऊ नका बाईसाहेब. त्या दिवशी मी खेचून अभयारण्य बघायला नेलं म्हणून बरं झालं. नाही तर बाईसाहेब प्रोग्रॅम कुठे जाण्याचा होता? ' - रॉबर्ट चिडला.

`कधी येणार? मला काय आणणार? ' मी लहान बाळाप्रमाणे हट्ट करत, तोंड वेडंवाकडं करत विचारलं.

`कलिंगड आणि घरटे आणीन. ' रॉबर्ट.

मी म्हणाले, `कलिंगड आण, पण घरटं आणू नकोस. तू घरटे आणले तर त्यामध्ये राहणारे ते पक्षी कुठे जातील? बेघर होतील. ' रॉबर्ट `बरं' म्हणाला. त्याने माझ्या हाताचा मुका घेतला. परदेशात असं वागणं हे शिष्टाचाराचं रूप असतं व शिष्टसंमत असतं. त्यामुळे मला काही वेगळे किंवा वावगे वाटले नाही.

रॉबर्ट बहुतेक ग्रेसीबरोबर लग्न करणार किंवा राहणार असे आम्हाला वाटले. ऑफिसमध्येही तसेच वाटत होते.

रॉबर्टने एकदा मला विचारले, `तुझं स्वप्न काय? '

मी उत्तरले, `माझी सर्व स्वप्नं मी गंगार्पण केली. '

`मला वाटायचे मी फारच निगेटिव्ह आहे, पण तूसुद्धा तशीच आहे. ' तो.

`निगेटिव्हीटी नशिबात असते, ती तिथून मनात येते. ' मी.

एके दिवशी केटीने आम्हाला दोघाना (मला रॉबर्ट बरोबर)जेवणानंतर आमच्या क्वार्टरच्या बागेत बसून गप्पा मारताना पाहिले. केटी म्हणाली, `जोडी चांगली आहे. फक्त तो चिडका, तू रडकी; मुलीचे नाव ठेवावे लागेल `चिकी'.

मी म्हणाले, `केटी मी ४५ ची आहे, मला मूल होऊ शकणार नाही. माझी प्रजननशक्ती संपली. ' हल्ली परदेशात लहान वयातच स्त्रियांना रजोनिवृत्ती येते.

माझ्या पाठीवर थोपटत म्हणाली,

`तुम्ही दत्तक घेऊ शकता आणि आज इतक्या वर्षांनी तुला हा खेद जाणवला

याचा अर्थ तू रॉबर्टमध्ये गुंतली आहे. '

`नाही. ' मी म्हणाले.

`रॉबर्टने मनात आणले तर वाटेल तेवढ्या मैत्रिणी त्याला मिळतील. पण त्याचा स्वभाव वेगळा आहे. त्याचे संस्कार चांगले आहेत. ' केटी

`केटी मला हल्ली किचनमध्ये जाणं, काम करणं नकोसं वाटतं. खरं सांगू, नोकरीसुद्धा नकोशी वाटते. '

`मग तुला काय करावंसं वाटतं. ' केटी.

`मला कथ्थक नृत्याचा क्लास काढावा, पुस्तके वाचावी व निवृत्त आयुष्य जगावंसं वाटतं. '

केटी म्हणाली, `मेनॉपॉज आलाय. '

'मेन होतंच कुठं पण पॉज म्हणायला?'

केटी मी व रॉबर्ट एक वेगळेचअसे मैत्रीचे नातेबंध आमच्यात तयार झाले. केटी धुसपुसायची, `तू मुखदुर्बल, तो राखीव मनाचा आहे. कसे सांगणार एकमेकांना? नाही तर सत्तरीला, डेथबेडवर रॉबर्ट तुला `आय लव्ह यू' म्हणेल. ' आम्ही हसलो.

रॉबर्ट मला `सा' म्हणत असे. परदेशात मोठी नावं आवडत नाहीत. छोट्या नावानं हाक मारतात.

माझ्या वाढदिवसाला एकदा मी व केटीने कॅण्डल लाइट डिनर केक कापणे व वाईन पिणे हा कार्यक्रम ठरवला होता. जुनी गाणी लावून रडके वातावरण करून मी बसले होते. जुने फोटो अल्बम काढले होते. केटी खूप प्यायली होती. अपरात्री बेल वाजली. मी कॅमेराद्वारे कोण आहे ते पाहिलं. दार उघडलं. रॉबर्ट बुके घेऊन आला होता. त्याने बुके दिला. मी आत बोलवावे म्हणून तो रेंगाळू लागला. मीही त्याला टाळण्यासाठी बोलावलं नाही.

मी त्याला आत बोलवायला कचरत होते. पण तरीही शेवटी तो हिंमत करून मला ढकलूनच आत शिरला. मला माझ्या घरी ॲलाइन, परकी व्यक्ती नको होती. त्याचे अतिक्रमण मला थोपवायचे होते. पण तो शिरलाच आणि भारतीय पद्धतीचा जमिनीवर

टाकलेला, जो एकमेव बेड होता त्यावर बसला.

वाढदिवसाचा केक आम्ही पूर्वीच कापला होता. तो बेडवर बसून केक खात माझे तिथे पडलेले अल्बम बघू लागला. माझ्या कथ्थकच्या फोटोंना डोळे मोठे करीत होता. माझ्या मयुर नृत्याच्या फोटोला निरखून पाहात म्हणाला,

`मोरपंख म्हणजे काय? '

`मी भारतात गेले की आणीन. ' मी.

`भारतात जाऊन लग्न करायचं आहे? ' रॉबर्टने विचारले.

मी तोंडाने नाही म्हणाले. पण मान नकारार्थी हलवली. लग्नाळूपण मी व्यक्त करीत नव्हते. पण जीवनसाथी मिळावा, ही तीव्र इच्छा होती. ती माझ्या डोक्यातून बहुतेक रॉबर्टने जाणली.

`माझा भाऊ वडिलांची शेवटची इच्छा म्हणून बोलवत आहे. भेटायला जायचं आहे' - मी.

`मी पण येऊ तुझ्याबरोबर? ' रॉबर्ट.

मी गप्प बसले. माझा भूतकाळ, माझे विचित्र नातेवाईक, माझ्या नजरेसमोर फिरू लागले. शिवाय त्या भारत देशात मी ह्याला सुरक्षितपणे कुठे कुठे नेणार? भारतात परदेशी पर्यटकावर हल्ला झाला तर?

रॉबर्टने माझी नाराजी ओळखली. मी त्याला कपाटातले मोरपीस दाखवले व म्हणाले `वाढदिवसाची ही रिटर्न गिफ्ट समज. '

रॉबर्टने मला त्याच्या आईची साडी वाढदिवसानिमित्त दिली व पुन्हा म्हणाला, `माझी आई भारतीय होती. 'रॉबर्ट हळुवार झुळकीप्रमाणे आला, वादळाप्रमाणे आत घुसला व शांतपणे जिरणाऱ्या लाटेप्रमाणे निघून गेला. मी रॉबर्टने दिलेली साडी कपाटात ठेवून दिली. भारतात जायची तयारी झाली. माझी रजा मंजूर झाली. उतारवयात आता मी पुन्हा भारतात जाणार होते. भाऊ राहा म्हणाला तर, सरळ पोस्टाने नोकरीचा राजीनामा पाठवणार होते.

मला माझ्या `वसुंधरा वाचवा' संस्थेचे काम,  भारतातूनही पाहाता येईल. मी ते तसे पाहणार होते.

माझा भाऊ आता म्हातारा झाला असेल. मरण जवळ आल्यावर माणसे मॅच्युअर होतात. वैरी पैलतीर दिसायला लागला, की शत्रुत्व विसरून जातात. शेवटी मरणाच्या दारात सर्वच सारखे ठरतात. कदाचित भाऊ माझी माफी मागेल. कदाचित माझेसाठी, एखादा बीजवर बघेल. मला लग्न करून जा म्हणेल. मी तशी थोड्या दिवसांसाठी जाणार होते, पण केटीला माझ्या जाण्याचं फारच दुःख झालं. मी ट्रेनिंगला जाताना मला एअरपोर्टवर सोडायला ती रॉबर्टबरोबर आली. रॉबर्टला म्हणाली, `तुला सा ला काहीतरी सांगायचं आहे ना! '

रॉबर्ट म्हणाला, `ती परत आल्यावर सांगेन. `सा फोन कर. ' तो मला म्हणाला.

माझ्या डोळयांसमोर फोनचा खर्च आला. मी गप्प बसले. तो म्हणाला, `तिथे घरटे शोधून,  तू तिथेच राहून, आम्हाला इथे एकटेच सोडून राहणार तर नाहीस ना? '

मी म्हणाले, `घरटे म्हणजे काय? फक्त काड्या? घरट्यात माया हवी. ती मिळाली तर राहीन. '

रॉबर्टचे निळे डोळे बदलले. त्याला काहीतरी बोलायचं होतं. रॉबर्टने पूर्वी एकदा मला घरटे शब्दावरून खूप चिडवलं होतं. पण हल्ली तोही बहुधा त्या विषयावर विचार करू लागला होता. माणसाचे छंदसुद्धा संसर्गजन्य असतात. एकदा पार्टीमध्ये एक परदेशी प्रतिनिधी माझ्याशी जास्तीच गप्पा मारत, सलगी करू लागला. रॉबर्ट अस्वस्थ झाला. पण काही बोलू शकला नाही. पण ते लोक थोडे थोडे दूर जाताच, त्याने मला हाताने खेचून बाहेर आणले. मला घट्ट स्कर्टमुळे पळवत नव्हतं. तसा दारु रॉबर्टही प्यायलेला होता. बाहेर येताच त्याने मला कारमध्ये कोंबून, उगीचच कारमध्ये फिरवले. झूमध्ये प्राणिसंग्रहालयात, पक्षी विभागात पिंजऱ्याच्या कॉरिडॉरमध्ये व्हिजिटला नेले.

शेवटी मी म्हणाले, `रॉबर्ट मला आता अगदी चालवत नाही. घरी चल. मी मान्य करते, ऑफिसमधल्या कलिग्जपेक्षा हे झू मधले, ॲनिमल खूपच चांगलं आहे. पण मी आता पार

थकले. ' तरीही त्याने तिथून ऑपेराला नेले.

`तू खूपच चतुर मनकवडी आहेस. ' रॉबर्ट म्हणाला.

खरं तर तो बरंच काही फास्ट इंग्रजीत बोलला. मला त्यातले काही म्हणता काही कळले नाही. मी त्याला म्हणाले, `पुन्हा सांग हळूहळू. ' रॉबर्ट गप्प बसला. रात्री ऑपेरानंतर रॉबर्ट घरी सोडायला आला. अपार्टमेंटच्या दाराशी ग्रेसी व ऑफिसचे एकदोन जण होते. ग्रेसी मला रॉबर्टबरोबर बघून वैतागली. मी तिला तोंडदेखले `चल घरात, माझ्यासाठी थांबलीस का? ' विचारले. मला उगीचच अपराधी वाटत होते. शेवटी मी मनाची समजूत काढली की थोड्याच दिवसात आपल्याला पुन्हा भारतात जायचेच आहे. ऑफिसच्या गॉसिपचा भाग मी कधीच नव्हते. पण आज माझे नाव चर्चेत येणार होते.

*टाळू म्हणून टाळता येत नाही*
*घडू दे म्हणून बिघडणे थांबत नाही*
*श्वासनिःश्वास परमेश्वरानेच दिले.*
*आपण घेतले म्हणून आपले होत नाही*
*पडताना कळते दगडाची ठेच होते*
*संगमरवरी पायरीसुद्धा डोक्यावर खोच देते*
*कुठे जाऊ कशी जाऊ वाट समजत नाही*
*भाग्यविधात्याचे मनोगत उमगत नाही*
*कोण आपले कोण परके?*
*कोण तरंगणारे कोण बुडते?*
*भाग्यविधात्याच्या हाती लेखणी नाही*
*आणि त्या लेखणीची भाषाही कळत नाही.*

जायचा दिवस उगवला

भारतात परत जायचे होतेच. मी अजून गॉसिप नको म्हणून रॉबर्टला टाळू लागले. रॉबर्टच्यापासून दूर राहू लागले. कुणी कुणाला फसवत नसते. माणसाचे नशीब त्याला

फसवते. तरीही मरण्यापूर्वी, मला भारतात मातृभूमीला, भेट द्यायला मिळेल याचाच मी आनंद मानत होते. रॉबर्टचे एक बरे होते. ऑफिसमध्ये तो पूर्ण कार्यालयीन असे. खाजगी गोष्टी बोलत नसे व दाखवीतही नसे. उगीचच आपण रॉबर्ट नावाच्या साहेबाशी मैत्री केली असे मला वाटू लागले. ज्या प्रसंगाला तोंड द्यायचे, तो प्रसंग मी पुढेपुढे ढकलत होते. एक हवीहवीशी मैत्री व नकोनकोसे गॉसिप यात मी पिचत होते. केटी म्हणाली, `खरगपूर आयआयटीच्या आमंत्रणावर रॉबर्ट उद्या येईलच तुझ्या पाठोपाठ भारतात बघ' तिने मला `त्या' सुंदर यात्रेसाठी वरून खूप चिडवलं. अमेरिकेहून, त्या देशाकडून,  मी ह्या देशाकडे आले. मी आतगाठी बाई आहे, सुंदर यात्रा म्हणजे भारतात हनीमून का असे एकीने विचारलं? एअरपोर्टवर रॉबर्ट गप्पच होता.

केटी म्हणाली, `हा पुढच्या विमानाने भारतात येईल. '

मी म्हणाले, `व्हिसाचे काय? '

केटी म्हणाली, `टुरिस्ट म्हणून येईल. '

विमानाच्या शिडीवरून मी त्या परदेशाकडे पाहून घेतले. परत पुन्हा यायचे नाही, असे मी ठरवले होते. मी तिघांना बाय केले.

## प्रकरण पाचवे

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान उतरले, तेव्हा त्या झगमगाटात, माझी मराठी, आमची मुंबई हरवल्यासारखी वाटत होती. पण टॅक्सी केली आणि खिडकी बाहेर दिसणारे उड्डाणपूल, एकीकडे उंच टॉवर्स, दुसरीकडे, सरपटणारी झोपडपट्टी, चाळी, ती विषमता, ट्रॅफिक सिग्नलला धावत येणारे भिकारी, फेरीवाले, भडक स्त्री देहाचे प्रदर्शन करणारी सिनेमाची पोस्टर्स पाहिली आणि वाईट वाटलं. चंगळवादाने प्रगती केली. सामान्य माणूस अर्धपोटीच राहिला. बरीच वर्षे परदेशात काढून आज मी पुन्हा भारतात आले होते. तेही फक्त काही दिवसांसाठी. टॅक्सीतून येताना दादरच्या चाळीतून भांडणाचे आवाज येत होते. मी मराठी माणूस शोधत होते. त्यातच दूरदर्शनच्या संचांचे विविध आवाज गोंधळकारी बेसूर वाटत होते. कुठून तरी लता मंगेशकरचा आवाज ऐकू आला. मराठी सुरेल भावपूर्ण भावगीत चालू होते. मुंबईतून नामशेष होणारा मराठी माणूस तगून राहिला होता. बहुतेक त्याच्या घरातून ते सूर येत होते.

*`या चिमण्यांनो परत फिरा रे।...*

*घराकडे अपुल्या... तिन्हीसांजा जाहल्या... '*

माझ्या डोळयांत पाणी आलं. खरंच मी सहा वर्षे परदेशात घालवली. आयुष्याची तिन्हीसांजच झाली आहे. आणि हो, मी पण चिमणी, माझ्या देशात माझ्या भावाकडे, माझ्या गावी निघाले होते. आयुष्याच्या तिन्हीसांजी माझ्या घरट्याचे दर्शन घ्यायला परत आले आहे. माझ्या मातीचा सुगंध मला हुंगायचा होता. माझ्या गावातील वेगवेगळया देवळांचे दर्शन घ्यायचे होते. सिद्धिविनायकाच्या देवळाचा कळस दिसला. मी हात जोडले.

*तुझे गीत गाण्यासाठी सूर लागू दे!*

*त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे...*

सहा वर्षांत मी परदेशात चांगलीच रुळले. तरीही नवल म्हणजे, अजूनही मला माझ्या गावाची ओढ आहे. कधी वाटतं परदेशी राहून, पुष्कळ पैसे कमवून गावी जावे. गावासाठी काहीतरी करावं. त्या मातीचे ऋण फेडावे, पण भीतीही वाटे. मॅकडोनल्डचा बर्गर खाताना मला आत्महत्या करणारे शेतकरी आठवतात. किटी पार्टीत मजा करताना वावरताना, वारंवार मुले होऊन, बाळंतपणात मरणाऱ्या बायका आठवतात. अशिक्षित लोक, भारतीय स्त्रियांवरचे अत्याचार आठवतात. पण भारतात माझ्या लायक नोकरी तरी मिळेल का? म्हणून गप्प बसे.

तरी मलाही त्या परकीय देशात बेवारस मरणाची भीती वाटत होती म्हणून गावी जावंसं वाटले. गावातली माणसं अजूनही तशीच असतील का? भाबडी, जीव लावणारी, 'चहाच्या घोटाला कुंकवाच्या बोटाला ताई नाही म्हणू नये,' म्हणत आदरातिथ्य करणारी? जुनी माणसं चांगली होती, म्हणून वाईट वाटतं की, मागून आलेल्या नव्या माणसांनी जुन्याचे नामोनिशाण मिटवले म्हणून वाईट वाटते. असो. सुरांच्या पोटी असूर आले असतील? मातृभूमीला भेट देण्याची तळमळ प्रत्येकालाच वाटते. त्यामुळे सहा वर्षांनी भारतात पाऊल टाकले. किती तरी वर्षांनी मी सीतापूरला आले. पुन्हा भारतात आले. तरीही कालच गाव सोडल्यासारखं वाटत होतं.

नवीन वर्ष सुरू झालं की एखाद दोन दिवस जुने साल लिहिले जाते. नवीन साली तारीख लिहिताना सुरुवातीला चुकणारा नंतर सरावतो. नवीन जागी बदली झाली, की दोन-तीन महिने कसं तरी वाटतं. नंतर माणूस समायोजित (ॲडजस्ट) होतोच, की ॲडाप्ट पण होतोच. मीही विदेशाला अशीच सरावले होते. खरंच सरावले होते का?

आयुष्याची सहा वर्षे अमेरिकेत काढून मी आज भारतात आले. तेसुद्धा माझ्या वडिलांच्या मृत्युपत्रातील ह्या कथित अटीप्रमाणे, भावाने बोलावले. वीस वर्षांपूर्वीच वडील वारले होते. नंतर काकांचा मृत्यू झाल्याचा फोन शेजारच्या एका शेजाऱ्यानेच केला. विमानाचे तिकीट मिळून मी येईपर्यंत प्रेत बर्फाच्या खोलीत किंवा शवागारात ठेवायची तयारी नातेवाईकांनी दाखवली. पण जी नाती पूर्वीच संपली होती, त्या नात्यांच्या मृत्यूची आता मला

दखल घ्यावीशी वाटली नाही. मी यायचं टाळलं. खरंतर त्या गावातून, त्या नात्यांतून माझं मन फार पूर्वीच विटलं होतं.

जी गोष्ट आपल्याला मिळाली नाही, ती इतरांनाही मिळू नये म्हणून असंस्कृतांमध्ये जी पद्धत असते ती पद्धत माझ्याही काही नातेवाईकांनी दाखवली. मला चांगलं स्थळ मिळू दिलं नाही. आई-वडील नसलेली मुलगी होते मी, पण माझं आयुष्य असंच गेलं. सिण्ड्रेलाच्या आयुष्यात येणारा राजपुत्र माझ्या आयुष्यात आलाच नाही. किंबहुना राजपुत्र म्हणून आलेला राक्षसच होता. आम्हीही मनानं खंबीर नव्हतो. मी झाले गेले विसरून जावे म्हणून भारतातच नवा अध्याय चालू करू शकत होते. भूतकाळाने भुतासारखे मानगुटीवर बसायची गरज नव्हती . पण... साध्या माणसांना जे जमतं ते आम्ही केलं. दुःख-खंत! कॉम्प्युटरचे सर्व पाट्र्स बदलता येतात. नव्या जगात ॲसेम्बल नावाने ते करता येते. पण आम्ही आमच्या आयुष्यातील काहीही बदलायचा प्रयत्न केला नाही.

स्वीकार हा जखम भरायची पहिली पायरी असते. गेलेले वैभव, गेलेला वारसा कधीही भरून येत नाही. पर्यावरणाची हानी कधीच भरू येत नाही, हे मी जाणलं. माझी वाडी, माझा बंगला मी वाचवू शकले नाही. हे मी स्वीकारलं. पण पर्यावरणाबद्दल माझी असलेली तळमळ पूर्ण करण्यासाठी, नाईलाजाने, नशीबाने, मी परदेशात आले. ह्या Save the Environment वसुंधरा वाचवा' प्रकल्पावर काम करायला सुरुवात केली. शिवाय मला चित्र काढण्याची खूप आवड होती. मी माझी माझी चित्रं काढत राहिले. कथ्थक करीत राहिले. जगायचा आटापिटा करत राहिले

काहि काऴामागे, पाटील साहेबांनी सोसायटीची भिंत बांधताना, नारळाची झाडे तोडताना ज्याप्रमाणे फुकट काम करून समाजाचे, सोसायटीचे हित साधले होते, तसेच आताही केले. मी पुन्हा त्यांची आज्ञा ऐकली. मी माझ्याच खर्चाने, त्यांच्या फायद्यासाठी त्या गावी निघाले होते. खरंच माझ्या जाण्यानं, वडिलांच्या आत्म्याला शांती लाभेल का? त्या जन्मगावी मरण्यापूर्वी एकदा भेटून यावं, म्हणून मी आज पुन्हा त्या सीतापूरला निघाले. भारतात पाऊल टाकल्यावर मन उचंबळून निघालं. जुन्या आठवणी जाग्या झाल्या. त्या

सुखाच्या होत्या, पण त्यांना करूण किनारही होती. त्या प्रेमाच्या होत्या, पण त्यात वंचनेचे विष होते.

भारतातील इथल्या लोकांना मी नकोशी होते. मला हा भारत देश हवा होता. मला माझी माणसं हवी होती. मी माझं आयुष्य कुठं घालवावं ? मी कसं जगावं हे माझ्यावर भावाकडून लादलं गेलं होतं. मी मुलगी होते म्हणून मला सर्व हक्क नाकारले गेले होते. आर्थिकदृष्ट्या कोती दरिद्री वृत्ती माझी कधीच नव्हती. मला पैसा नको होता. पण वडिलोपार्जित ती वास्तू विकावी, तिथे मॉल बांधावा, डान्सबार व्हावा अशी माझी इच्छा मुळीच नव्हती. तिथे एखादी आर्ट गॅलरी, कथ्थक डान्स स्कूल व्हावे, एखादे मंगल कार्यालय, एखादी अभ्यासिका, वाचनालय व्हावे. म्हणून मी पूर्वीही खूप प्रयत्न केले. बऱ्याच जणांना विनंती केली. भावाच्या पायाही पडले. त्याला पैसा हवा होता. तो जिंकला. मी काहीच करू शकले नाही. मी हरले. कारण मी मुलगी होते. मुलींचा सगळयात जो संवेदनाक्षम भाग असतो, तो म्हणजे त्यांची अब्रू, त्यांचे चारित्र्य! त्यावर घाला घालायला अनेक नराधम टपले होते. मी अजुन विरोध केला असता तर मला अधिक मातीमोल केले गेले असते.

भावाने वडिलांचे नावे असलेला, सोसायटीतील प्लॉट विकून किती बरे वर्षे झाली? मी आठवायचा प्रयत्न केला. मला कधी हक्क नव्हताच. आज मरताना वाटतं, पुन्हा त्या गावी जावं, बघावं जिथे आपण जन्मलो, जगलो, ती जागा आता कशी आहे! ती मातीची ओढ मला तिकडे खेचत होती. वास्तवाच्या नात्याकडे जायला मला फार मानसिक तयारी करावी लागली. मी मुंबईतच दोन दिवस राहिले. भाऊ निरोप पाठवत होता. मी टाळत होते. दिवस-रात्र समुद्राकडे बघत होते. शेवटी एक दिवस हिय्या करून सीतापूरला जायला बस पकडली. कारण भावाने सांगितले की, त्या कार्यक्रमाला मोठमोठे लोक येणार आहेत. माझ्या अशा, या तिथे न येण्याने त्यांचा अपमान होईल. मी तिथे कुठे राहणार होते? भाऊ धड वागेल का? की काकांच्या मृत्यूचा, दवाखान्याच्या खर्चाचा अर्धा खर्च मागण्यासाठीच त्याने मला बोलावलं? भावाला, त्यांच्या मुलांना साधारणपणे टीनएजच्या भारतीय मुलांना वाटतं, तसे अमेरिकेतील

आकर्षण वाटत होते म्हणून आता त्यांना माझी आठवण आली, असेल का?

दुसरे मन म्हणाले, मला तरी जगात कोण आहे? लग्न झालेलं नाही. मुलं-बाळं, नातेवाईक, मैत्रिणी कुणीच नाही. त्यामुळे त्याला माझ्याकडून पैसे मिळतील ही अपेक्षा वाटली. त्यात त्याचे काही चूक नव्हते. जगरहाटीने सेवा मुलीकडून करून घ्यायची, पैसा मुलाला द्यायचा, हे तत्त्व समाजात चालत आले आहे. भावाकडे जायचे म्हणजे त्याच्या सीतापूरच्या घरी, की लक्ष्मणपूरच्या घरी जायचे. मला समजेना. तशी दोन्ही घरे फारशा अंतरावर उरली नव्हती. पूर्वी ते अंतर जास्त वाटे.

मी सीतापूरच्या स्टॅण्डवर उतरले तेव्हा मला स्वदेसमधल्या एनआरआयसारखं वाटत होतं. अर्थात मी साडीच घातली होती. त्यामुळे व स्वतःची गाडी आणली नसल्याने भाऊ खट्टू झाला. कपाळावरचे केस उडालेला, पाठीला पोक आलेला भाऊ त्याच्या आर्थिक निराशेच्या भावना लपवू शकला नाही. मी ड्रायव्हरला पेट्रोलपंपावर गाडी न्यायला सांगितली. पेट्रोल भरले. अगदी टाकी फुल केली. अजूनही हा असाच कंजूष-कोटीची प्रॉपर्टी मिळाली तरीही पेट्रोल बहिणीच्या पैशानेच भरायचं आहे. जाऊ दे, स्वभाव बदलत नाहीत. माझ्या आई-वडिलांनी याच्यावर चुकीचे संस्कार केले की तो जन्मतः तसा होता?

गाडी वाड्याच्या दिशेने धावू लागली. गार वारा सुटला होता वळणावळणाचे रस्ते होते. रस्त्यावर धोतर पागोटे घातलेली माणसे, ग्रामीण बाजाचा स्वर, बैलगाड्या, कच्चे रस्ते, आंब्याच्या मोहराचा वास माझ्या मनाला उगीचच हळवा करत होता. माझ्या पहिल्या घरट्याकडे मी पुन्हा निघाले होते. पिल्लू अंड्यातून आले ते पहिलं घरटं! माझे बालपण, माझे जीवन... मी अरण्यश्वरच्या रस्त्यावर उतरले. कुठे अमेरिकेचे ऑफिस, कुठे भारतातील छोटे गाव.

बसथांब्यावर तुरळक जाग होती. त्यापलीकडच्या लिंबाच्या झाडाखाली एक म्हातारी पोटाशी पाय घेऊन डोक्यावर पदर घेऊन टोपलीत द्राक्षे व करवंद विकत बसली होती. एक शेंबडा पोरगा पेरू, भेळभत्ता, चणे, सुकलेली द्राक्षे, मनुका विकत होता. समोरचे ते वाण्याचे दुकान तसेच होते. फक्त त्याच्या शेजारी एका हातगाडीवर भय्या केळी विकत होता.

वाण्याच्या दुकानात दरवाजावर टांगलेले सुतळीगुंडी, वेफर्सची पाकिटे वाऱ्याने हलत होती. पोत्यांमध्ये साखर, गहू, तांदूळ धान्ये भरलेली होती. लाल काचेच्या पेटाऱ्यात लाल रंगाची गोड गाठी व पिवळी शेव नजरेत भरत होती.

आता वाण्याकडे वीज आली होती. एक सार्वजनिक टेलिफोनचा डब्बाही लावला होता. पुढच्या वेळी येईन तेव्हा कदाचित इथे रिलायन्स फ्रेशचे दुकानही दिसेल.

कित्येकदा पहाटे एकट्याने झपझप पावले टाकत पाऊलवाटेने येताना ह्याच वाण्याच्या दुकानातील त्या उजेडाचा व बाहेर खोकत बसणाऱ्या वाण्याच्या अस्तित्वाचा किती आधार वाटायचा. इथे पोहोचलं की हुश्श वाटायचं. वाण्याची म्हातारी चूल फुंकत बसलेली असे. ह्या बसथांब्यावर मी व माझा भाऊ शहरात परीक्षा देण्यासाठी जेव्हा जायचे असायचे तेव्हा तासन्तास बसची वाट पाहात असू. आता लोकल गाडीच्या 8. 36 व 8. 40 च्या युद्धात मला त्या `सकाळी एक व रात्री एक बस' ह्या आठवणीचंही हसू आलं. वेळेला सोन्याहून जास्ती महत्त्व येण्याचे व सेकंदासाठी युद्ध करायचे ते दिवस नव्हते.

मी चालू लागले. आता मेट्रोतून उतरताच पावले आपोआप ऑफिसला धावू लागतात. तशीच किंबहुना त्याहूनही जोरात पूर्वी मी ह्या चौकात उतरले की पावले झपाझप पडत असत. वळणावळणाच्या त्या वाटेवर चालायला सुरुवात केली. पुढे पाऊलवाटेच्या टोकाशी ते मोठे वडा-पिंपळाचे जुळे झाड होते. पिंपळाच्या पारावर गांधी टोपी, धोतर किंवा पायजमा, बंडी घातलेले प्रतिष्ठित गृहस्थ शिळोप्याच्या गप्पा मारत होते. कुणी बाजूला बसून चणे खात होते. थंड वारा सुटला होता. शाळकरी मुली दोन घट्ट वेण्या घालून वडाच्या पारंब्यांना लटकत होत्या. पाणवठ्यावरून डोक्यावर हंडे घेऊन जाणाऱ्या बायका लयबद्धपणे चालत होत्या. पिंपळाच्या मागच्या मारुतीच्या देवळासमोर काही शाळकरी मुले पाढे-परवचा म्हणत होती.

काही मुले शाळेच्या अभ्यासाबद्दल बोलत होती. मारुतीच्या देवळाच्या काजळीने कळकटलेल्या भिंतीवर उजेड पडणारी ती ढणढणती ज्योत पेटली नव्हती. नाही तर रात्री इथून येताना वेड्यावाकड्या सावल्या हलल्या आणि वाऱ्याने ती ज्योत फडफडली तरीही काळीज

लक्कन हलत असे व माझी वडिलांच्या हातावरची पकड घट्ट होत असे.

चालत चालत पुढे गेले. तिथे ती मुकीची टपरी लागली. मुकी म्हणजे, बोलता येत नाही म्हणून त्या मुक्या बहीण-भावंडाचे नाव त्यांच्या आई-वडिलांनी मुक्ता व मुकेश ठेवले होते. गंगापूरकडे जाणारे ते वाटसरू ह्या टपरीवर हमखास क्षणभर विश्रांती घ्यायचे. चहा व नानकटाई अशा शाही नाश्त्यासाठी वडील कधीतरी आईला बरं नसेल तर आम्हाला त्या हॉटेलात नेत. त्या मुक्या मुलांना गावाने किती जीव लावला. मुक्याने गावातल्या सगळया मुलांना नदीत पोहायला शिकवलं, तर मुकीकडून आम्ही सुसंस्कार घेतले. या टपरी जवळ आलं की घर जवळ आल्याचं वाटे. एक मुसलमान पाववाला टपरीवर बटर-पाव विकत असे. त्याकाळी पाव-बिस्किटांचे किती अप्रूप वाटायचं. घरी सुग्रास आईच्या हातचे पक्वान्न जेवूनही आम्ही त्याच्या नरम पावाबद्दल आकर्षण बाळगायचो. नरम पाव खात मी व भाऊ त्या रस्त्याने सायकल दामटत असू. तिथे मुकीची टपरी होती, पण मुकी दिसली नाही. कदाचित ... आता... वयोमानाने. ती दूरच्या यात्रेला गेली असेल.

पुढे चिखलमय रस्ता होता. दोन्ही बाजूला गव्हाच्या ओंब्यांनी लगडलेला शेत तुकडा होता, उसाच्या चार. आमराया होत्या. रस्ते म्हणजे खड्ड्यातून जाणारी एखादी वाट! पदपथ म्हणजे ती गवताची झुडपे आणि गाई-बैलांची शेणाची पोळे. पुढे ती टेकडी होती. उतारावर सायकल सुसाट जात असे. स्पीडब्रेकर म्हणजे रस्त्यातून फटकन सळसळत रस्ता क्रॉस करणारा साप असे. खूप चिखल असला की मी व भाऊ आळीपाळीने सायकल उचलत खांद्यावर घेत असू. कधी सापांची भीती वाटली नाही. शंकराचे मफलर म्हणून आम्ही नागा-सापांशी दोस्ती केली होती.

कधी कधी रात्रीही या रस्त्याने यायची वेळ आली होती. त्या वेळी हा रस्ता अंधारातूनही आपलाच वाटे. त्या वेगवेगळया आंब्यांच्या झाडांचा वास त्यांची आपली ओळख सांगत असे. मधेच रातराणीचाही वास आला की समजायचे, उसाचे शेत संपले. आंब्यांची झाडे मोहोराने लगडली होती. हे माझे गाव!

आता माझे घर येणार! परदेशीच्या धावपळीच्या आयुष्यातून आले ते मी ह्या

एका तासासाठीच ना! `चार पल की खुशियाँ' त्यासाठी किती त्रास काढत मी इथे आले आहे. पुढच्या तिकाटण्यावर ते वाचनालय आले आणि मी तिथे फुललेल्या त्या एप्रिलफूलच्या फुलांकडे बघतच राहिले. (मराठी नाव माहीत नाही. )

बुचाचे झाडही तसेच फुलले होते. तो रस्त्याच्या कडेचा दगडी चौथरा तसाच होता. चालून थकलो किंवा सायकलची चेन पडली की आम्ही ह्या चौथऱ्यावर बसायचो. खिशातले चणे-शेंगदाणे, चिक्की खाऊन फिरकीच्या तांब्यातले पाणी पिऊन शाळेकडचा प्रवास सुरू व्हायचा. भाऊ-बहिणीचे प्रेम, मैत्री, लग्न-किती क्षणांच्या किती आठवणी ह्या चौथऱ्याच्या सोबतीने चघळल्या.

बालपणातून जेव्हा तारुण्याच्या उंबरठ्यावर पाऊल टाकले तेव्हा गर्द हिरव्या पानांच्या त्या बुचाच्या झाडावर पांढरी शुभ्र फुले, भुंगे, फुलपाखरे, पक्षी त्या अबोल भावना जागवू लागली. खिशात पैसे नसले तरी डोळयांतली स्वप्ने घेऊन ह्या चौथऱ्यावर आम्ही खास मैत्रिणी खेळत असू. स्वप्नांचे दिवस संपले. परिकथेतील अबलख घोड्यावर बसून येणारे राजकुमार फक्त त्या पुस्तकांतच असतात, हे कळू लागले. `सारी दुनिया की दीवारे तोड़कर आनेवाले हीरो' सिनेमातच असतात, हे सत्य सांगोपांगीतून इथंच कळलं. हा चौथरा म्हणजे अंगणाची लक्ष्मणरेषाच होती. आलेल्या पाहुण्यांना पोहोचवायला ह्या चौथऱ्यापर्यंत येणे. नेहमीचंच असायचं ते! मैत्रिणीला घरी सोडायला जायचे आणि तासन्तास इथंच बोलत बसायचं. मग कंटाळून आईच मला शोधत यायची. (आज मला मोठी झाल्यावर कळतं, ती किती काळजी करायची व का करायची. ) तिच्या नऊवार साडीच्या ओच्यात, बुचाची फुले, दुर्वा भरून घ्यायची. कधी कधी तिथेच बसून बुचाच्या फुलांची वेणी, गजरे बनवायची. आपल्या अंबाड्यावर माळून घ्यायची. म्हणायची, `चल, नाही तर आता दादा आपल्याला दोघींना शोधायला येतील. मला पण येऊन बराच वेळ झाला. '

त्या वाचनालयावरून पुढे गेले की, ते आमराईचं फाटक दिसे. आईला आंब्याचे खूप वेड! घरी झाडे पण आंब्याचीच होती. पदार्थ पण नेहमी आंब्याचेच बनवायची. `आंबा बर्फीवाली आजी' म्हणून गावातली जनता सर्व लहान-थोर आईला नावाजायची. अकराव्या

वर्षी आईचं लग्न झालं होतं. लग्नामुळे तिचं बालपण अर्धवटच संपून गेलं. त्यामुळे सर्वांबरोबर ती मुलांत मूल होऊन रमून जाई. तिच्या खेळायच्या, बागडायच्या, गाणी गायच्या इच्छा ती आमच्या बरोबर येऊन गप्पा मारून पूर्ण करीत असे. माझी आई माझी मैत्रिणच होती. झुळझुळत्या झऱ्याकाठी, मङ्डुमच्या डोहापाशी, शंकराच्या मंदिरात, लेण्यांमध्ये, देवळांमध्ये ती नेहमीच माझ्याबरोबर यायची. वर्गमैत्रिणी म्हणायच्या, `तुझी बॉडीगार्ड आली. ' मला मैत्रिणींचा राग येत नसे. कारण ती मला सदैव मैत्रीण वाटायची. तर आले, असे हे आमराइतले, आता बदलत असलेले, माझे माहेरचे घर जवळ आले.

पुढे साबरी बोरींची झाडे होती. हिरव्या बांगड्या घातलेली लाल आलवण घालणारी चुडेल भूतीण झाडावर इथे राहते. तिला आंबे फार आवडतात म्हणून आंब्याच्या झाडावर गात बसते. अशी एक वदंता होती. एक बकऱ्या चरणारी मेंढपाळीण फिरत असे. त्याकाळी स्कूटर, रिक्षा नव्हत्या, की बायका नोकरी करीत नव्हत्या. बाळंतपणात बाई अडली की तिला टांग्यातून सरकारी दवाखान्यात नेत किंवा एक `सायकल चालवत येणारी नर्स' म्हणून बाई येत असे. बाई सायकल चालवते म्हणून ती फारच आधुनिक अशी वदंता होती. खरे तर तिची सोय होती.

पुढे एक मिशनऱ्यांचे चर्च होते. दगडी बांधणीचे, त्रिकोणी लाल रंगाचे छप्पर असलेले ते चर्च मला फार आवडत असे. जिझस क्राईस्ट म्हणजे भगवान येशू, म्हणजे प्रेम-माया असे सांगत एक शिक्षिका घरोघरी स्त्रियांना स्वच्छता, आरोग्य याबद्दल महत्त्व सांगायची. तिचे घरही त्या चर्चच्या मागे होते. साबरीच्या काटेरी जंगलातून मधोमध एक सरळ पिवळी मळलेली पाऊलवाट चर्चच्या दारापर्यंत जाई. तिथे एक क्रॉस होता. त्याला आम्ही `होली क्रॉस' म्हणत असू. समोरून पाटाचे पाणी वाहत असे. इथून पुढे गेल्यावर माझ्या घरच्या वाटेवर तो फाशीचा आंबा होता. त्या पाटाला `अपघाती पाट' म्हणत. त्यामुळे आई तिथे जाऊ देत नसे. अर्थात त्या पाटाच्या पाण्यात जबरदस्त आकर्षण होतं, जे आम्हाला बोलवत असे.

कुठेतरी फसलेल्या व केविलवाण्या झालेल्या कुणीतरी अबलेने त्या आंब्यावर साडीचा गळफास लावून घेतला होता. म्हणून तो `फाशीचा आंबा' म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचं

नाव असं पडल्यामुळे त्याचं फळ कुणीही खात नाही. तरीही निरपेक्षबुद्धीने कुणाची तरी वाट पाहणाऱ्या कन्याकुमारीपणे तो आंबा फळत राहतो. आजही मोहोरला होता.

चालून चालून पाय दुखायला लागले. आता माझी माहेरची वाडी जवळच आली आहे. म्हणून मी पाय ओढत राहिले. माझ्या आमराईत वाड्याभोवती किती तरी प्रकारची आंब्याची झाडे आहेत. दरवाजाच्या समोरच द्वारपालासारखे राजापुरी हापूसचे मोठे झाड आहे. पाण्याच्या मोठ्या तांब्याएवढ्या आकाराचे फळ, फिकट पिवळे पांढरट रंगाचे असे. फारसा गोड नाही, आंबटही नाही, असा हा आंबा साखरांबा बनवायला उपयोगी पडायचा. शुभशकुनी अशी भारद्वाज पक्ष्यांची जोडी त्या झाडांवर कायमच बसत असे व हूक हूक असा बेसूर आवाज करून ओरडत असे. पुढे शेंदरी

हापूसचा उंचचउंच तो वृक्ष होता. बूड असूनही वर टोपी घातल्याप्रमाणे शेंदरी. वाटीएवढे वळलेल्या मुठीसारख्या आकाराचे फळ गोड व रसाळ होते. आमरस पुरीसाठी याचे फळ राखीव असे.

दगडी वाड्याच्या उजव्या बाजूला माझा लाडका आम्रवृक्ष होता. त्याला दोऱ्यांचा झोका बांधून आम्ही भावंडं खेळत असू. त्याच्या कैऱ्या, मेथ्यांबा व लोणच्यासाठी राखीव होत्या. बाकी राजाभोवती शिपाई सेना उभी असावी तशी इतर कमी महत्त्वाची आंब्याची झाडे आहेत. वाड्याच्या प्रमुख दरवाजावरून पुढे गेलात, की मागच्या दारी तर डोळे विस्फारलेलेच राहतात. विहिरीच्या काठी उभा हा लंगडा हापूस जणू विहिरीत आपले प्रतिबिंब डोकावून पाहतो. वरून काळपट हिरवे फळ पिकले तर मऊ होते, पण रंग मात्र बदलत नाही. आत मात्र केशरीधम्मक गर, आमरस खावा व आंबावडी - बर्फी खावी ती ह्या झाडाच्या आंब्यापासून बनवलेलीच!

पुढे तो तुरट आंबा गडी माणसांसाठी राखीव होता. जेवण आणलं नाही, की कैरी काढायची. तेल-मीठ मसाला लावायचा. चुलीवरच्या भाकरीसोबत खाऊन टाकायची! मोठ्या आमराईच्या शेवटच्या टोकाला साखरी खारकेच्या आकाराचे फळ येणारा तो आंबा होता. त्याच्या पलीकडे ते बिट्ट आंबे, गावठी आंबे, देवगढ हापूसची रोपे, पेरूची झाडे आहेत. त्यातच

ती दोन उठून दिसणारी उंच नारळाची झाडे आहेत. दूरवरूनच `आली हो वाडी आली' असा संदेश देणारी ती उंच झाडे वाड्याहूनही दुप्पट उंचीने ताडमाड वाढली आहेत.

त्या झाडांच्यामागे इतरांची शेते आहेत. कधी कधी तिथे काळी नागांची जोडी येते. तिथेच कोयते, फावडी, कुदळ असे सर्व साहित्य पडलेलं असतं. मीच उन्हाळ्यात आंबे तोडण्यासाठी झिले बनवून घेतले होते. त्याला पुढे टोकाशी कोयता होता. कोयत्याने तोडलेले आंबे पुढे जोडलेल्या पिशवीत साठत असत. मधू नावाचा गडी व राखणदार भीमा होता. ते तिथेच राहात असत. मागील दारी केवळ पेटीकोट घातलेल्या मुली व फक्त बनियनवर मुलं असायची आम्ही मनसोक्त आंबे खात असू. जांभळाच्या झाडावरचे मुंगळे चावतात म्हणून आई त्या झाडाभोवती कडुलिंबाच्या रसाची औषधी फवारणी करत असे. अंगणातल्या शेवग्याच्या शेंगांची आमटी व भात, रसपोळी, आंबाबर्फी हा रोजचाच स्टॅण्डर्ड मेनू . रस संपला की आंब्यांच्या पोळया, आंब्याचा गर, साटा लोणचे चालूच राही.

विचाराच्या नादात मी चालतच राहिले. अरे इथे होते ते मोठे आंब्याचे झाड कुठे गेले? आणि ही सिनेमाच्या जाहिरातीची, मोबाईल कंपनीच्या जाहिरातीची पाटी कुठे आली? समजलं, या पाट्या टांगता याव्या म्हणूनच तर तो डेरेदार आम्रवृक्ष पार जमीनदोस्त केला वाटतं? नैसर्गिक रंगांनी सुखावणाऱ्या झाडाच्या जागेवर ती `कर लो दुनिया मुठ्ठी में! ' सांगणारी पाटी माझ्या लाडक्या झाडाला `मिट्टी में' मिसळून गेली? श्रीमंताच्या शेजेवर कोवळया कळया कुस्करून टाकाव्या असे मला वाटते. माझं मन खट्टू झालं. आता त्या झाडावरचे ते भारद्वाज पक्ष्यांचं जोडपं कुठं गेलं असेल! मी पुढे चालू लागले. काही दिवसांनी पक्षी व झाडे म्युझियममध्येच बघावे लागतील. धुराने ढणढणत्या स्वयंपाकघरात चुलींवर स्वयंपाक करण्याचे पूर्वीचे दिवस गेले. भडक्या स्टोव्ह आला. पूर्वी पालापाचोळा, काटे-सरपण गोळा करून अंगणात ठेवलेले असायचे. आई नोकरांकडून तेही व्यवस्थित रचून घ्यायची. त्यामुळे ते घर कधी गचाळ दिसलेच नाही. झाडाची पाने जमिनीवर पडली व वाऱ्याने उडू लागली म्हणजे समजायचं पानगळ सुरू झाली. मग मधूचे काम वाढायचे. नंतर भावाने मागे

त्याला खोली बांधून दिली आहे. तो सर्व कामं करतो.

त्याकाळी स्वयंपाकासाठी गॅसवर स्वयंपाक करणारी जी थोडी घरं होती, त्यात आईचं नाव चौसष्ठ सालीच जोडलं गेलं. कधीतरी तिने ते पांढरे कपाट (फ्रीज) घेतलं. मोदकपात्रात कुकर लावणाऱ्या आईने फार पूर्वीच कुकर व मिक्सर घेतला होता. आता सन आठवत नाही, पण तिची खरेदी गाजली. तो फ्रीज एक्सचेंजमध्ये देऊन भावाने आता मोठा फ्रीज घेतला आहे. माझं घर थोडं मॉडर्न झालं. वस्तूचे आणि वास्तूचे प्रेम, माया जडते. घर सोडणं जीवावर येतं. रंग उडालेल्या भिंती असल्या तरीही ते आपले घरटे असते. पंखाची ऊब देणारे आई-वडील तिथे असतात. कोपऱ्यावर एका हुशार कुटुंबाचा बंगला आहे. हौशीने मुलांना शिकवलं. मुलं अमेरिकेला गेली. आता त्या कुटुंबातील वृद्ध `संध्या-छाया भिवविती हृदया' म्हणत अंगणात बसलेले असतात. जावं का भेटायला? येताना बघूया म्हटलं गावात. डास चावू लागले. देशाने प्रगती केली. पण त्या भारत देशातील छोट्याशा डासांचा नायनाट कधी होणार कोण जाणे. रस्ते, पाणी, वीज प्रत्येक गावी कधी पोहोचतील?

वाटले एखादी स्कूटर, गाडी येताना दिसली तर मला लिफ्ट मागता येईल. मी दूरवर पाह्यले, कुठेही पाह्यले तरीही, कुठेही माणसांची जाग नव्हती. वेड्या राघूंची व पोपटांची एक टोळी (थवा) आकाशातून उडत आली व एका उंच मोठ्या पळसाच्या झाडावर बसली. घामाने मी थबथबले होते. झाडाखाली बसून मी माझी बिस्किटे खाऊन घेतली व चालू लागले. कारनेच यायला हवं होतं असं मला वाटू लागलं. भाऊ घ्यायला येईल तर बरं असंही वाटू लागलं.

भावाने मला बोलावलं आणि कुठे गायब झाला? मी करवादले. तिन्हीसांजा होत आल्या होत्या. वेगवेगळया देवळांच्या कळसावर पक्षी घोटाळू लागले. डोंगरावरून सूर्य कलू लागला. शाळा सुटून घरी परतणारी मुले परतू लागली. घरी जाण्यासाठी व्हीटी स्टेशनवर गर्दी करणाऱ्या प्रवाशांप्रमाणे पक्षीही कोलाहल व कलकलाट करू लागले.

पूर्वी नऊवारी नेसून आई तुळशीवृंदावनाजवळ दिवा लावत असे.

दादा बाहेर व्हरांड्यात बसून पुस्तक वाचत असलेले. भाऊ-वहिनी झोपाळयावर बसून गप्पा मारत बसलेले. वहिनी धावत येईल. दूधपाणी ओवाळून म्हणेल का?

`अगं बाई! राहा आता चार दिवस! किती बारीक झालात? तुमची तिकडची हवा- ती दगदग... '

ते अंगण माझी वाट पाहात असेल. पूर्वी आई म्हणायची, `मोठी रांगोळी काढ बघू! तुझ्यावाचून अंगण सुनेच वाटते. '

पूर्वी आईला मदत करायचे. तशी मी वहिनीलाही मदत करीन. रोज लोणच्याच्या कैऱ्या फोडीत, साखरांब्यासाठी किसून देईन, आंब्याच्या मीठ लावून सुकवलेल्या आंबोशीच्या फोडी चोखत खाईन. मला आईच्या हातचं ते लोणचं आठवलं. कॉलनीत कुणीही स्त्री गरोदर राहिली, की आठवणीनं आई तिला लोणचं पाठवायची.

वहिनी, जाताना मला म्हणेल, बरणी भरून ने. झाडांना खतपाणी घालायला मी तिला मदत करेन. अजूनही तो मातीचा गंध नाकपुड्यातून शिरून मेंदूला मोहीत करेल का? लिंबोणीच्या व लिंबाच्या झाडाचा फुलोरा, आंब्याच्या मोहोराच्या वासात मिसळून जणू नशाच चढवत असेल. त्या घराच्या पडवीवरून कधीही कुणी सव्वाष्ण हळदकुंकू, चहा, वानोळा लिंबाचे लोणचे घेतल्याशिवाय व बाळाच्या टाळूवर तेल टाकून घेतल्याशिवाय जात नाही. मी तर लेक. माझा थाटच थाट असेल. माझं मन मोहरून गेलं. महाशिवरात्रीला शंकराच्या पिंडीवर आंब्याचा मोहोर वाहावा असं गावात सांगत होते. पण आई म्हणायची, मोहोर खुडू नये. त्या मोहोरातूनच बाळकैऱ्या जन्माला येतात. देवाला अशी फुले वाहावी ज्यांची फ़ळं बनत नाही.

पर्यावरणाची किती जाण आईला होती. त्याऐवजी आई आंब्याची, पेरूची, सर्व झाडांची हळदकुंकू वाहून पूजा करीत असे. आता संक्रांतीच्या हळदीकुंकवाचे दिवस, महाशिवरात्री शंकराच्या पूजेचे दिवस आहेत. वहिनीबरोबर हळदीकुंकू करूया. मजा करूया. बरेच दिवस झाले गावाची खबरबात नाही. आई वारली त्याला वर्षे झाली. तपं उलटली.

*`वेगवेगळी फुले उमलली, वेचून त्यांचे झेले*

*एकमेकावरी उधळले, गेले ते दिन गेले. '*

मी आतुरले. धावत जाऊन वहिनीला, भावाला भेटावं म्हणून मी पुढे गेले आणि वाडीच्या दाराशी उभी राहिले.

मला शब्द फुटेना. पूर्णपणे प्लॉट रिकामा होता. खंडहर वाटावं अशी परिस्थिती होती. ती झाडे, ती वाडी, नारळे, पोफळी, बंगला, सर्व कुठं गेलं? नारळाच्या खोडांच्या लहानलहान चकत्या केल्या होत्या. त्या प्लॉटच्या कडेकडेने कंपाऊंड वॉलप्रमाणे रचल्या होत्या. माझ्या अश्रूंनी भरलेल्या डोळयांप्रमाणे तुडुंब भरलेली ती विहीर ही एकमेव ओळखीची वास्तू उरली होती. बिल्डर्सचा बोर्ड लावला होता.

वॉचमन पुढे आला. मला म्हणाला, `कोण पाहिजे तुम्हाला? तुम्ही कोण? '

न कळणाऱ्या भाषेतील वर्तमानपत्र पुढे यावं व बातमी कळत नाही म्हणून वाचायचा प्रयत्न करावा, तशी मी गोंधळून गेले. दरवाजाच्याही बाहेर बेवारस पडलेल्या माझ्या वाडीतील झाडांच्या एका चकतीवर मी मटकन बसले. पूर्वी तिथे जाईचा वेल होता, त्या वेलीच्या थडग्यावर बसून मी त्या खंडहरमध्ये माझ्या आठवणी, माझ्या कविता, माझे माहेर, तो मोहोर कुठे दिसतो का ते शोधू लागले. किती स्वप्नं पाहून मी गावी आले आणि अनपेक्षितपणे दैवाने मारले. सख्ख्या आई-वडिलांची शेती पिकेना म्हणून हाय खावून मृत्यू झाला. शेती सावकाराकडे गेली. मी काही करू शकले नाही. आता वाडी बिल्डरांकडे गेली. ज्या वडिलांनी दत्तक घेतले होते तिथे मला हक्क नव्हता. बापाचे होते तेही घर सावत्र भावाने विकून टाकले. मी भारतातही उपरी; अमेरिकेतही!

माझा भाऊ मागून कारने आला. म्हणाला, `तुला सांगायचं राहिलं, वाडी विकली. '

मी गप्प बसले. `वसुंधरा बचाव'च्या ऑफिस उद्‌घाटनाचा कार्यक्रम जोरात झाला. त्या गर्दीत मला `तो पाटील' दिसला. माझ्या वडिलांशी `झाडे तोडा' म्हणून भांडणारा

आमच्या घरी फूट पाडून वाडा हडप करण्याची तीव्र इच्छा बाळगणारा पाटील आणि आताही त्याच्या डोळयांत तीच निर्लज्ज भावना होती.

त्याची नजर बोलत होती. `बघ, अविवाहितच राहिलीस ना! ' मी नजरेने उत्तर दिले, `सुख काय, लग्न होण्यावरच अवलंबून असतं? ' पण माझे डोळे बदलले व म्हणाले `की सुख असतेच का जगात? ' माझ्या `परदेशगमनाचा व फॉरिनर एनआरआय' स्टेटसचा फायदा भावाने भरपूर घेतला. दोन कॉलेजमध्ये व्याख्यान होते. मी ज्या शाळेत माजी विद्यार्थिनी होते तिथे खेळ दिवस होता. तो कार्यक्रम झाला. दोन-तीन उद्‌घाटने होती. प्रत्येक ठिकाणी बिदागीचा चेक तो गोळा करत होता. एका सद्‌गृहस्थाने `परदेशी शिक्षण - व्हिसा-पासपोर्ट' अशा मेळाव्याचे आयोजन केले होते. जणू काही मीही त्याच्या प्रयत्नांनी व प्रेरणेने परदेशी गेले असा प्रचार तो करत होता. त्याच्या त्या संस्थेत भावाच्या मुलाची 25 टक्क्यांची भागीदारी होती. माझं मन आक्रोश करत होतं. उगीच भारतात आलं असे वाटून मला अधिकाधिक निराश वाटू लागलं. डोळे मिटून मी सीटवर मान मागे टेकवली. विमान प्रवास व जेट लॅगमुळे असेल किंवा थकव्याने असेल किंवा मानसिक कारणामुळे असेल. मला झोप लागली.

जाग आली तेव्हा गाडी थांबली होती व एका सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉक्टरचा, जाहिरात एजंट माझ्या भावाला सारिका बाईना आमच्या हॉस्पिटलमध्ये ठेवा. आमचीही जाहिरात होईल असं म्हणत होता. भाऊ बहुतेक जास्ती पैसे मागत होता आणि तो फक्त फुकटात ट्रीटमेंट घ्यायच्या गोष्टी करत होता. मी भावाला हाक मारली व ओरडले. `मला काही झाले नाही. हॉस्पिटल नको. ' तो जवळ येऊन म्हणाला, `गप्प बस. आर्थिक व्यवहार मी बघणार आहे. वाटल्यास तुला पन्नास टक्के देईन. ' गावोगाव स्टेज शो करणाऱ्या ज्युनियर आर्टिस्टप्रमाणे माझा `भाव' लावणे चालले होते. भाऊ शब्द `भाव' शब्दावरूनच आला का? माणसाचा भाव(विचार) महत्त्वाचा की भाव (रेट), पैसे? भाऊ म्हणजे कोण? सर्व शिव्या `भ' ने का (भावना) सुरू होतात? मेडीया नावाच्या बहिणीने भावाला मारलं अशी ग्रीसमध्ये भावाच्या शत्रुत्वाबद्दल एक गोष्ट आहे.

चांगल्या भावांची मी क्षमा मागते. परदेशात राहूनही मी माझे भारतीय संस्कार

जपले होते. स्वदेशात राहूनही बहिणीचा भाव करण्याइतपत तो तयार झाला होता. वास्तवाशी नातं जोडणं मला अवघड जात होतं. ते गाव माझ्या स्वप्नांचं होतं, पण आज तिथेही बाजारच दिसत होता. माझ्या सख्या भावाने मांडलेला बाजार! माझ्या परदेशी राहण्याचा पुरेपूर फायदा तो घेत होता.

दुसऱ्या दिवशी कथ्थकचा कार्यक्रम होता. नंतरच्या त्या एजंटशी कदाचित भावावरून फिस्कटलेले दिसले. कारण भावाने मला त्या अरण्येश्वर मंदिरात नेले. नदीकिनारी कन्याकुमारीचे निसर्गरम्य मंदिर गावाबाहेर होते. सर्वत्र जग सुधारणेकडे गेले असताना सुदैवाने ते मंदिर तसेच राहीले होते. बदलत्या काळात स्पर्श न झालेले... कन्याकुमारीप्रमाणे कुणाची तरी वाट पाहणारे ते मंदिर दोन्ही हात फैलावून मला बोलवत होते. आई लहानपणी रागवायची. कारण या मंदिराला शाप आहे. या मंदिरात कुमारिका गेल्या तर आजन्म अविवाहित राहावे लागते व सवाष्ण, विवाहिता गेली तर विधवा होते. कळसावर झेंडा फडकत होता. कपारीत कबुतरे गुटर्गू करत होती. पूर्वी मी व भाऊ खूप भटकायचो. लहानपणी एकदा सर्वांची नजर चुकवून आम्ही तिथे गेलो. मला मुलगी म्हणून लग्नापासून -लग्नासाठी-लग्नापर्यंत वाढवलं होतं. त्यामुळे अविवाहित राहणे, बाप रे! असं वाटून मी बाहेरच मंदिराजवळ बसले. भाऊ ओढत `आत चल' म्हणत होता, पण मी ऐकलं नाही. भाऊ आत गेला. मी बाहेरच थांबले. अंधार पडला. आईवडील शोधायला येणार व मार पडणार या भीतीने मी अस्वस्थ झाले. बराच वेळ झाला तरी तो काही बाहेर येईना. आत अनेक हिरवे, पिवळे साप आहेत असे लोक म्हणत असत. याला साप चावला तर काय होईल. या भीतीने मला घाम फुटला. जेमतेम दहा वर्षांची होते. भाऊ घरी लाडका होता. मी फारशी नव्हते. त्यामुळे आई-वडील काय करतील या भीतीने मी त्या मंदिरात दरवाजातून आत गेले. गाभाऱ्यात जाऊन स्तिमित झाले. आत भाऊ त्याच्या एका मित्राबरोबर हसत बसला होता. मी अचंबित होऊन ते मंदिर, आतील कलाकृती पाहात बसले. शंकराची मोठी पिंड होती. अनाकलनीय अशी अनेक चित्रं होती. माझा पाय मंदिरातील कासवावर पडला. मी दचकले. मी पाप केलं होतं.

मी म्हणाले, `भाऊ,  चल, आई रागवेल. ' तो हसला व म्हणाला, `चल, तू आत कधी येते, त्याची वाट पाहात मी थांबलो. आता तुझं लग्न होणार नाही. तू अशीच राहशील आणि हुंडा द्यावा लागणार नाही. खर्च नाही. ' तो हसू लागला.

त्याच्या सोबतचा मित्र म्हणाला, `जाऊ दे. बिनलग्नाची राहिलीस तर मलाच नवरा समज. '

मी त्या अंधश्रद्धेने गांगरून गेले. वाटलं भावाने कायमच मला फसवलं. मला लुबाडलं. मी मुलगी आहे म्हणून गप्प बसले.

आईकडे तक्रार करायची सोय नव्हती. देवळाचा शाप खरा झाला. आजतर त्या देवळात मी आत गेले. आता तर मी प्रौढ अविवाहित कुमारिका होतेच! त्यामुळे मला कुठलेही बंधन नव्हते की कुणी अडवणार नव्हतं. भाऊ पाठोपाठ आला. त्याच्या पाठोपाठ तोच `तो पाटील' होता. `ओळखलेस! मीच तुला या देवळात म्हणालो होतो; `अविवाहित राहिलीस तर मला नवरा समज. ' भाऊ चतुरपणे बाहेर निघून गेला. पाटीलाला त्याचेही पैसे दिले गेले होते की काय? मी म्हणाले, ` नवरा असे समज म्हणायची वेळ का आणलीस? सरळ मागणी का घातली नाहीस? ' त्यावेळी का पळपुटेपणा दाखवलास?

तो म्हणाला, `तुझा भाऊ म्हणाला होता. तुझी पत्रिका चांगली नाही. तुझ्याशी मी लग्न करू नये, मरण येईल, असं त्याने सुचवलं. तुझ्या वडिलांजवळ वहिनींजवळ तरीही मी हा विषय काढला होता. पण त्यांनी सांगितलं, `तिला लग्न करायचं नाही. ' जे घडलं ते अकल्पित होतं. खाली बसून मी रडू लागले. `तुम्ही विचारलं नाहीत, सारिका का लग्नाला नाही म्हणते ते? '

तो म्हणाला, `नाही. आम्ही वारंवार येऊ लागल्यावर तुझा भाऊ म्हणाला, `या स्थळात खोट दिसते. सारखी मागं लागतात. '

नंतर त्यांनी उठवलं, की आम्हाला तो वाडा हवा आहे. आदित्यसाहेब वेडेवाकडे सांगू लागले. नंतर भाऊ म्हणाले, `फक्त मुलगी व नारळ देऊ. '

माझ्या आईला हुंडा नको होता, पण लग्न थाटात करून द्यावंसं वाटत होतं. त्यामुळे मी काहीही बोलू शकलो नाही'

`तुम्ही माझ्याशी तसे का बोलला नाहीत? '

`तुम्ही मला चीप समजला असता. ' तो नजरेला नजर न भिडवता म्हणाला.

`आजही बोलला नसतास तर बरं झालं असतं. ' मी रडत म्हणाले. तो निघून गेला.

पाठोपाठ आदित्य पाटील आत आला. पायरीवर तो मुजोर नजरेने बघत पाय पसरून निरीक्षण झाल्यावर म्हणाला,

`आयुष्यभर मला माझी अपराधीपणाची भावना खाते. महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये जाणाऱ्या परदेशी मित्रमैत्रिणींकडून मला तुझी माहिती मिळत होती. मी माझ्या संसारात सुखी आहे. पण मला वाटतं, माझं काहीतरी चुकलं. चारचौघांसारखा तुझा संसार झाला असता तर आनंद झाला असता. '

तो त्याच्या मनातलं बोलत होता. खरं बोलत होता, असं निदान त्यावेळी त्याक्षणी तरी वाटत होतं. थोड्यावेळानं मी सावरले. रडणं थांबवलं. चित्रपटाच्या पद्धतीने आधी त्याने शंकराच्या पिंडीजवळचे कुंकू उचलले व माझ्या दिशेने वळला. पौराणिक कहाण्यांत दर राजाला दोन राण्या असतात. लोककलांमध्येही स्त्रीचे दुय्यम स्थान दाखवले जाते. नजर पडलेल्या स्त्रीला आपलेसे करणे हे पुरुषाच्या अभिमानाशी निगडित दाखवले आहे. त्याचा हेतू मी जाणला. पण प्रत्यक्ष आयुष्यात वेगळं असतं.

मी त्याला थांबवत म्हटलं, `मला काही सांगायचं आहे. '

त्याने विचारले, `तू परदेशात कुणाबरोबर लीव्ह-इन रिलेशनमध्ये राहतेस का? '

मी नाही म्हणाले.

पण त्याच्यापासून दूर उभी राहिले.

`माकडीणीच्या पिल्लांसारखी मुलं छातीला कवटाळून फिरायचे दिवस गेले.

माझी बायकोसुद्धा फक्त आठवड्यातून एकदा मुलांना भेटायची. आम्हीसुद्धा अमेरिकेप्रमाणेच मॉडर्न आहोत. आमच्यात वाढदिवसांना पार्टीत डिस्प्लेपुरता मुलं होऊ देतात. वाढवताना ती मुलं नोकरांकडे किंवा हॉस्टेलवर वाढतात. ' मी ह्याला जवळजवळ पंचवीस वर्षांनी पाहात होते. पंचवीस वर्षांत हा ठार म्हातारा दिसू लागला होता. पण सौंदर्य लपत नव्हतं. ययातिप्रमाणे त्याला चिरतरुण राहायचं होतं. मला परदेशी राहते म्हणून तुच्छ लेखून, शिवाय भारतीय संस्कृतीच्या महान तत्त्वाच्या थापा मारणारा आदित्य माझ्याबरोबर लीव्ह-इनच्या गोष्टी करत होता. तर आधुनिकता म्हणजे मुलांना दूर ठेवणे असं मानत होता. प्रगती म्हणजे मुक्त स्वैराचार समजत होता.

`माझी पत्नी किटी पार्टी, श्रीमंतांचे गेट टुगेदर यातच खूप बिझी असते. ' तो.

`म्हणजे प्रगती फक्त भावनांचा त्याग, चंगळवाद, भोगवाद व मुक्त उपभोग. ' मी.

`उगीच पत्रकाराप्रमाणे टीकास्त्र सोडू नकोस. मजेचं वय आहे. या तारुण्याचा पुढे काय उपयोग? किती दिवस दादांची लाडली म्हणून राहणार आहेस? ' तो जवळ येत म्हणाला.

`प्रत्येक गोष्टीचा उपयोग हवाच का? ' मी त्याला टाळत म्हटलं.

`हो, हायर अॅण्ड फायरचे तत्त्वज्ञान ग्लोबलायझेशनमुळे आलं ना! ते तुमच्या देशाकडूनच आले. गरज सरो वैद्य मरो. ' तो.

`मी नाही म्हणाले तर. ' मी.

`प्रत्येक जण सुखासाठीच जगतो. टीचभर देहाचे सोहळे पुरविणे म्हणजेच तर आयुष्य असते. साधुसंत तरी अन्नावाचून राहू शकतात का? उगीचच प्राचीन देवळात उभे आहोत म्हणून पुराणकालीन विचार दाखवू नकोस. जग कुठं चाललं आहे, तुला सांगायची गरज नाही! ' तो तिरस्काराच्या भावनेतून बोलला.

`हो! मी सर्वांची प्रगती बघतेच आहे. ' मी फुटफुटले.

`कुंकू वगैरे भांगात भरलं की बायका थोड्या भावूक होतात. तसं नको असेल तर राहू दे. ' तो जणू मला समजावत होता. त्याचा ड्रामा फेल गेल्याचा त्याला खेद वाटला. पूर्वी या ट्रीकने यश मिळालेले होते वाटते. प्राचीन देवळाचे ढासळते बुरुज आणि त्याचं उद्दाम, माजोरं

बोलणं मला सारखंच वाटलं. सांस्कृतिक वारसा कसा ढासळतो आहे व नष्ट होतो आहे, याचं ते द्योतक होतं. माणसांनी माणसांना विकाऊ केलं आहे. अधपाताची वाट आपण प्रगतीच्या नावाखाली धरली आहे. मी झपाझप पावले टाकत देवळाच्या बाहेर निघाले. देवळापेक्षा मला त्या उघड्या पटांगणावर सुरक्षित वाटलं! हा माझा प्रियकर याने मला, तू आली नाहीस तर मनगटाची शीर कापून घेईन, असं म्हटलं होतं. हा मला नाटकी पद्धतीने आपलंसं करू इच्छितो आहे.

या देवळाचे काही कडे कोसळू लागले होते. जिर्णोद्धार करूनही ते जीर्णच दिसत होते. इतिहासाचा तोरा मोठा, की ढासळलेले बुरुज सांगतात ते केविलवाणे सत्य मोठं असतं. काळ सर्वांना पोटात कसा घेतो, ते सत्य आव्हानात्मक आहे. मृत्यू तर येणारच असतो. कधी हवा असताना, कधी नको असताना.

मग चार दिवसांच्या भातुकलीच्या खेळातही लोक दुष्टपणा का करतात? लिमिटेड सहवास, लिमिटेड अधिकार, सामान्य जीवन, त्यातही आवडते, नावडते असे भेदभाव व बळी देणे चालतं. शेवटी काय? पंतप्रधान असो, की रस्त्यावरचा भिकारी, त्याला पुढच्या प्रवासास जावंच लागतं. मृत्यूच्या अनभिज्ञ प्रवासातील यात्रा, मी जिकडे जाणार आहे ती यात्रा... आत्म्याची यात्रा... मरणाच्या वाटेवरची यात्रा अटळच असते.

देवा, त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे.

आणि त्या यात्रेत स्थानकं नाहीत?

चिमूटभर कुंकवाची आस प्रत्येक स्त्रीला असते. पण आता मी त्याची पत्नी होऊ शकणार नाही. फक्त एक ठेवलेली बाई हेच माझं स्थान राहील! हे मी जाणले.

मला शरीरसुख हवं, असं ह्याला का वाटतं? कारण त्याची विचार करण्याची दृष्टी तशी होती. खऱ्या प्रेमाची उंची सामान्य माणूस गाठू शकत नाही का? पाच फूट देहाचे रक्तमांसाचे शरीर मिळवणं म्हणजे

प्रेम? जर प्रेम त्याहूनही निराळं असतं तर मी लग्न झालं नाही म्हणून खंत का करते? नक्की प्रेम म्हणजे काय?

तो माझ्या मागोमाग आला. दाढीवाला पुजारी भगवा झगा सावरत उठला व मुकाट्याने टेकडी चढू लागला. डोंगरावरची वळणाची वाट पार करून तो टेकडीच्या टोकावर ध्यानस्थ बसला. त्याने कळूनही न कळल्याप्रमाणे दाखवलं.

मला त्या पुजाऱ्याचा हेवा वाटला व दयाही वाटली. विरक्ती झाली. तरीही तडजोड तीही अशा व्यक्तींशी? देवळाची जागाही अशा कामासाठी वापरली जाते? साधूचे, कलाकाराचे जीवन, कलंदराचे जीवन वेगळे व ह्या अशा म्हणणाऱ्या आदित्यसारख्या बाजारू गणितकारांचे वेगळे असते. मी आदित्यला एवढा तरी भाव का दिला? हे नाटक हा पैशासाठी करतअसेल का? पुरुषांची जात लबाडच असते. ऑफिसमधील अनेक मैत्रिणींचे विसंवादी संसार आपण पाहतोच की! मला ऑफिसात मित्रमैत्रिणी होत्या. पण माझे कुणाशीही असे खास संबंध नव्हते. शारीरिक तर नाहीच! वरवरचे हॅलो, हाय म्हणायचे संबंध होते. मी लग्नाचा विषय संपवलाच होता.

फक्त काही तरी हवं म्हणून खोटं नाटक करणारा आणि पत्नीला फसवून माझ्याजवळ येऊ इच्छिणारा आदित्य माझा नवरा झाला असता तरी असाच बाहेर उद्योग करीत राहीला असता का? त्या मानानं रॉबर्ट अगदी संयमी, सहनशील होता. वडिलांची कोट्यवधींची इस्टेट सोडून तो स्वतंत्र राहात होता.

स्वतःच्या वडिलांच्या दौलतीचीही इच्छा न ठेवणारा रॉबर्ट कुठे आणि पैशासाठी अन्यत्र लग्न करून मला फसवणारा आदित्य कुठे?

अर्थात माझ्या तुलनेला अर्थ नव्हता. रॉबर्ट माझा मित्र होता. आदित्य माझा भूतपूर्व प्रियकर होता.

ज्या कौटुंबिक पार्श्वभूमीत आदित्य होता. त्यात त्याचं असं वागणं फिट बसत होतं. लुबाडणूक ही त्याची वृत्ती होती. तरीही त्याचे या खालच्या पातळीवर उतरणे खटकले.

ड्रायव्हर पुढे येऊन आदित्यकडे किल्ली देऊन जाऊ लागला. त्याला आदित्यने थांबवलं. माझ्याकडे बघत म्हणाला, `इथल्या फार्महाऊसवर राहायचं? ' मी नाही म्हणाले.

आदित्याच्या सुखांची मलासुद्धा असूया वाटायची. पण ज्याच्यावर प्रेम केले, त्याचा कितीही राग आला तरीही सूड घ्यावा. त्याला त्रास द्यावा. ब्लॅकमेल करावेसे वाटावे असं विकृत प्रेम माझे नव्हते आणि तुम्हीच सांगा असे प्रेम काय प्रेम असतं?

तू अगर मेरी नहीं हो सकती तो किसी की नहीं हो सकती, म्हणत आपल्या प्रेम अव्हेरणाऱ्या प्रेयसीला पिस्तुलाने उडविणारे विकृत हीरो समाजात कधी आले? आणि शिवाय ते आपले रोल मॉडेल कधी बनले?

त्याच्या बोलण्यावरून मी अनुमान काढले की माझे रॉबर्ट बरोबर लग्न होईल की काय ह्या भीतीने ह्याने मला भारतात बोलवले? वीस वर्षे हा सुखात होता व आहे; `पण मी सुखी होणार', `तेसुद्धा कदाचितच सुखी होणार`, या आशंकेने हा मला त्रास द्यायला माझा खजिना हिसकवायला आला.

`मेंचट, गोऱ्या चमडीवाल्याबरोबर लग्न करायचे नाही. मी करतो तुझ्या बरोबर लग्न. `आदित्यने मला दम दिला.

प्रेम म्हणजे इच्छा, जपणूक, वेदना की मालकी हक्क? अर्थात प्रेम म्हणजे काय हे कळायला जी उच्च अभिरुची लागते तीसुद्धा त्याच्याकडे नाही, हे मला उमगले.

मी मुद्दाम विचारले, `तू तुझ्या बायकोला घटस्फोट देणार का? '

तो उत्तरला, `छे. '

मी म्हणाले, `मग त्याला लग्न म्हणतात का? ' तो गडबडला.

`तू खूपच बदलली आहेस. ' तो गुरगुरला.

`मी साधी राहिली होते म्हणून जगाने मला मोडून विकून खाल्ले. मी अजूनही तसेच राहायला हवे होते का आदित्य? ' मी विचारले. तो गोंधळला. मीही निराश झाले. माझा भारताने अपेक्षाभंग केला होता.

फिलगुडचे फुगे घेऊन वावरणाऱ्या ह्या जगात मी मिसफिट होते.

माझ्या नीतीमुळे व संस्कारामुळे मला एका लक्ष्मणरेषेपुढे जाऊन तडजोड करणे जमत नव्हते. मी म्हणजे एक देह आहे, जो देहच हवा. मी म्हणजे एक गरम बटाटा, जो हाताला

लागताच जबाबदारी झटकून फेकून द्यावा, असे सर्वांनी का वागावे.

मला समजत नव्हते. मी म्हणजे मन ही आहे ना!

स्त्री देहात एक संवेदनक्षम मन पण असते.

स्त्रीच्या पदराआड मातृत्व पण असते.

स्त्रीचे शरीर मुलाला जन्म देण्यासाठी काही विशिष्ट प्रकारे बनवलेले असते वासनेसाठी नाही. हे सत्य समाज का स्वीकारत नाही? की हे सत्य नाहीच? फिलगुडच्या नशेत हे सत्य समाज विसरू इच्छितो आहे, असे तर नाही ना! तो पुढे म्हणाला,

`तुझ्यावर पहिला हक्क माझा आहे. '

मी हसले व म्हणाले, `माझ्यावर प्रत्येकानेच हक्क सांगितला. कर्तव्य कुणीच केले नाही. '

आदित्य म्हणाला, `विसर आता. लग्नाच्या बाजारात किती स्थळं येतात, किती मुली बघतो आपण. पुढे ते लोक आठवतात तरी का? '

मी म्हणाले, `फसवणुकीने मन खचते रे. आणि बघायला आलेला प्रत्येक मुलगा उपवर तरुणीचे स्वप्न असते रे, जे मनावर ओरखडा ओढून जाते. दोष फक्त माझाच होता का? '

तो गप्प बसला. पुन्हा लगट करू लागला.

हे लबाड लोक, आम्ही कुणाच्या अध्यात मध्यात नाही, असे म्हणत असत व आम्ही फसत होतो.

खरंतर खरा कार्यकर्ता म्हणजे त्याने तळागाळात कार्य केले पाहिजे. पण हे राजे-महाराजे व ह्यांनी चालवलेले हे राज्य म्हणजे लोकराज्य आहे म्हणे.

`इतका त्रास मी काढला. आदित्य माझे चांगले व्हावे असे तुला वाटते का? ' मी विचारले.

तो गप्प बसला. कारण त्याच्याकडे या प्रश्नाचे उत्तर नव्हते. एखाद्या चौसोपी वाड्याची, शेतीची मालकीण झाले असते. स्वतःचे घरटे असते. स्वर्गात तरी काय मिळेल ते देव जाणे?

भाऊ म्हणायचा, आपण राजघराण्यातील. आपल्याकडे सतीची समाधी आहे. आणि माझे हे असे काय झाले? मी कुठून कुठे आले? मी कोण होते? आपण कोण होतो? कोण झालो?

माझं मन कटू आठवणींनी भरलं. इथल्या फॉर्महाऊसवरच कदाचित अण्णासाहेबांनी माझ्यावर अत्याचार केले असतील.

`तू अण्णासाहेबांना विरोध का केला नाहीस. ' मी भूतकाळात डोकावून विचारलं.

`जुनं गंगार्पण झालं. आज बघ ही सुंदर रात्र आहे. तू आहेस, मी आहे. आता ह्या आयुष्याच्या संध्याकाळी आपल्याला एकत्र येण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. ' तो `त्या' मूडमध्ये येत म्हणाला.

`शरीर मिळणं म्हणजेच सुख का? ' मी.

`तुझी आठवण काढून बायकोवरच्या प्रेमाचे खंडन करून मी झुरलो तरच सुख असतं का? ' - असं

म्हणत त्याने दारूची बाटली काढून तोंडाला लावली व थोडं पिऊन पुन्हा ती बाटली लपवून टाकली.

`समाजात कुठे असतात त्यागमूर्ती. ' तो बडेजावपणे म्हणाला.

`अण्णासाहेब कुठे असतात? ' मी खोदून विचारलं.

`ते वारले. ' तो.

`तू सूड का घेतला नाहीस? ' मी.

`मेलेल्या माणसाची आता ह्या क्षणी आठवण कशाला? मी त्याचा सूड घ्यायला हवा होता का? आणि का घ्यायचा? मी जीवनाशी तडजोड केली. ' तो नशेत म्हणाला.

ह्या साडे पाच फूट देहासाठी याच्या प्रेमासाठी आपण इतकं सहन केलं आणि हा किती सहजतेनं त्या स्वार्थात लडबडत राहिला.

`पैसा नसला की माणूस दुःखी होतो. ' - तो.

`तू आता सुखी आहेस का? '- मी.

`हो. खूप सुखी आहे. ' तो.

`पंधरा वर्षांपूर्वी तू कसा होतास. आता कसा झाला आहेस बघ. ' मी.

अस्मिता मेलेल्या, मनाचा आवाज दबलेल्या आदित्यकडे बघून मला वाटलं, हा कुणीतरी दुसराच आहे. हा तो तेव्हाचा आदित्य नाहीच. त्याला मोबाईलवर फोन आला.

तो म्हणाला, `मी बिझी आहे. तुम्ही उद्या फोन करा. '

`आपण मनाने फार दूर निघून आलो आहोत. ' मी.

`मी तुला मदत केली नाही म्हणून तुझा माझ्यावर राग आहे. पण माझ्या स्टेटसला ते शोभलं असतं का? ' तो.

`तुला काय शोभलं नसतं? मैत्रिणीला मदत करणं? ' मी.

`बलात्कारीत मुलीला मी मैत्रीण मानायचं? ' तो.

`काय हरकत आहे! त्यात बळी गेलेल्या स्त्रीचा काय दोष असतो? ' मी.

`समाजात माझी किंमत कमी झाली असती. ' तो.

आदित्यला मी रागात म्हणाले, `मदत करायला शोभत नव्हतं आणि आता हा व्यभिचार शोभतो? तुम्ही पुरुष किती सहजपणे अविवाहित स्त्रीला गृहीत धरता ना! तू तुझ्या पत्नीची परवानगी काढली आहेस? '

`छे। ती तिच्याच कामात मग्न असते. पंधरा दिवस दिल्लीला गेली आहे. शिवाय तू सहा दिवस राहणार व निघून जाणार. कुणाला काही कळायचा प्रश्नच नाही. काही दिवसांपुरता शारीरिक संबंध, थोड्या गप्पा, थोडा सहवास... . ' तो सांगता सांगता थांबला आणि आशाळभूत नजरेनं बघू लागला.

परदेशी संस्कृतीच्या वाईट गोष्टी आपल्या समाजाने पटकन स्वीकारल्या आहेत. तरीही असे संबंध लपवून ठेवून आपले संस्कार, आपले एकपत्नीव्रत अशा भ्रामक दागिन्यांनी तो आपल्या भारतीय संस्कृतीच्या ऐतिहासिक वारसाला सजवू इच्छित होता! खरे सांगायचे तर

स्वतःचे लग्न टिकवू पाहात होता. तेही लपवणुकीच्या आधाराने!

`तुझी पत्नीही असेच वागते का? ' मी खोडकरपणानं विचारलं. तो चमकला, पण मुखवटा पांघरून म्हणाला, `काही कल्पना नाही. आम्ही मुलांसाठी एकत्र राहतो. आम्ही सुखी आहोत. आमच्यात फारसा सुसंवाद नाही. विसंवादही नाही; ही तडजोड आहे. जगात असे किती हॉटेलर्स मोठं हॉटेल काढू शकतात. जगात असे किती डॉक्टर आहेत जे एवढं मोठं हॉस्पिटल काढू शकतात? कष्टाचा पैसा कमवत तत्त्व उराशी बाळगणाऱ्यांची काय गत होते, हे तू त्या अमुकतमुकला विचार. मी पैशासाठी लग्न केलं. तिने शरीरसुखासाठी एक प्रकारच्या स्थैर्यासाठी केलं. ती बिनधास्त आहे. मीही मुक्त शैलीत चैन करतो. '

मी `पण माझी इच्छा नाही. मी तशी बाई नाही. काही क्षणिक सुखासाठी माझ्या घराण्याचं नाव व माझा आत्मविश्वास माझे शील मला खराब करायचं नाही. आणि नाही म्हणजे नाही! ' मी ओरडले. त्या शांततेत तो आवाज घुमला. या माणसाने आपल्याला त्रास दिला. त्याच्यावरच्या प्रेमाची परतफेड केली नाही. कधीही मदत केली नाही. पैशासाठी अण्णासाहेबांच्या मुलीशी लग्न केले. मला वाऱ्यावर सोडले. आधारसुद्धा दिला नाही. मी ह्याच्याबरोबर काही क्षण राहून त्याला मिळणारे समाधान मिळवू देणार नाही.

मी अशीच मरेन. जशी पूर्वी मरणार होते. हा माणूस मला उद्ध्वस्त करायला का आला? मी बेफिकीरी दाखवत म्हणाले.

`पिंजऱ्यातून उडून गेलेल्या पक्षाप्रमाणे भूतकाळ परत येत नाही. ' अदितय

`तू पैशाने आज फक्त माझी डेट विकत घेऊ शकतोस. पैसासुद्धा तुझ्या कष्टाचा आहे का? ' मी.

तो चिडला, चडफडला. गप्प बसला आणि चतुरपणे पुढे म्हणाला, `तिकडे तर डेटींग करत असतील ना! परदेशी संस्कृतीत काय चालतं हे सगळयांना माहीत असतं. '

मी `नाही ' म्हणाले. `माझ्या नशिबी कायम खोटे आरोप का येतात? ' मी विचारलं.

तो म्हणाला, `संशयाला जागा असते. ' पुढे चतुरपणे जीभ ओठांवरून फिरवत म्हणाला, `कुणाला कळणार नाही. '

मी रागात उत्तर दिलं.

`मी अजूनही कुमारिकाच आहे आणि मला तसंच मरायचं आहे. तू तुझ्या संसारात सुखी आहेस. मग उगीच मला का डागाळतोस? मी जशी आहे तशी आहे. नातं लादू नकोस! '

मी पटकन सभामंडपातून बाहेर आले व भावाला शोधू लागले. सर्वत्र नजर फिरवली. संध्याकाळ संथ पाण्याच्या हलक्या लाटांवरून रेंगाळत होती. इंद्रधनुष्यी रंग पसरले होते. झाडांच्या कुरणांतून पक्षी वेगवेगळे आवाज काढत होते. गार वारा सुटला होता. तो पुढे आला व म्हणाला, `काही क्षणातच ही रंगाची रांगोळी पुसली जाईल. पूर्ण जग अंधारात बुडेल. अजून पाच-दहा वर्षांत तूही राहणार नाहीस. मीही राहणार नाही. हे बघ, आपण वृद्धमृत्यूची चादर आपल्या दोघांवरही पसरेल. तुझी अतृप्ती, माझी अपराधी भावना मिटेल. मधुचंद्रमय रात्र, तुझी लग्नाची स्वप्नं, सर्व साध्य होईल. तू फक्त हो म्हण. ' तो खूपच जवळ आला. मंदिरातील अनाकलनीय चित्रांचा, मूर्तींचा अर्थ मला थोडा-थोडा कळू लागला. माझ्या छातीत धडधडू लागले.

गोंधळून मी भावाला हाक मारू लागले. तो म्हणाला, `पूर्ण दिवस व रात्र तुझ्या सहवासात राहण्याचे पैसे घेतले आहेत त्याने माझ्याकडून. त्यामुळे तो इथे येणार नाही. मी एका नक्षीदार खांबाला टेकून रडू लागले. बाहेर दिसणाऱ्या तुळशीच्या झाडाकडे बघू लागले. `तुझी इच्छा नसेल तर राहीले. मी तुला हॉटेलात नाही तर घरी सोडतो. नाहीतर माझ्या घरी चल. '

मी विचार केला. घर, माझं घर कोणतं ? वडिलांचं घर माझं होऊ शकलं नाही. तर मग भावाचं घर माझं कसं होणार? आदित्य म्हणाला, `चल इथंच बसू या. '

त्या मंदिराच्या पायरीवर आम्ही दोघं बसलो. तरुण वयात पुरुषांची भीती वाटायची. अजूनही वाटतेच, पण थोडी कमी झाली एवढंच! ह्या आदित्य पाटलाला तेव्हा केवढा

भाव चढला होता. मी तळमळत असतानाही, तो कधी आला नाही. आता म्हातारपणी त्याला मी हवी होते. चोरट्या सुखासाठी लालसावला होता. तो - `कुणीतरी आपली वाट पाहतेय... आपल्यासाठी अविवाहित राहीलं. ही कल्पना फारच सुखदायी वाटत होती म्हणा. माणसाच्या बेसिक नीडमध्ये एक नवीन मूलभूत गरज असते. कुणीतरी प्रेम करावं. ते प्रेम, अपेक्षा, लग्न, व्यापार सर्वांपलीकडेही असते, ते निरपेक्ष प्रेम, अव्यक्त प्रेम! ' तो म्हणाला.

मी मनात म्हटलं, स्वप्न मलाही होती. मी दगड नव्हते. भावना मला होत्या. लग्न मलाही करायचं होतं. गरज होती, पण सोय नव्हती. कुणाबद्दलही प्रेम, आकर्षण वाटलं नाही, पण चारचौघींसारखा सुरक्षितता देणारा संसार असावा अशी इच्छा मात्र होती. मुलं व्हावी ही मातृत्वाची सबळ भावना होती. एखादा बंगला, त्याला असलेले अंगण, बाहेर झोपाळा, तुळशीवृंदावन ... प्रेमळ नवरा... काहीही नशिबात नव्हतं. स्वतःचे घरटे असावे. म्हणजे फक्त त्याचा अहंकार सुखावत राहावा म्हणून त्याला माझ्या अविवाहित राहण्याचाही आनंद वाटतोय. शी! मला घृणा वाटली. मला आठवलं. जगात कुणीही कुणाला एका सीमेपलीकडे मदत करू शकत नाही. सर्वांनी काठावरून करता येईल इतपत मदत केली. पाण्यात मी बुडतच होते. बहिणीने मदत केली. ती गाढव का होईना नवरा हवा म्हणायची. '

माझेसाठी पूजा, शांती, होमहवन सर्व झालं, पण लग्न जमलं नाही. मी उसासा सोडला. तो हसला. पण रडल्यासारखा वाटत होता किंवा रडेल तर बरं असं वाटत होतं. कारण मी त्याचा खोटेपणा उघड केला होता. त्याचे मुखवट्याआडचे रूप मी जाणले होते. व त्याला ते दाखविणारी मी पहिलीच भेटल्याने त्याला ते प्रथमच दिसले होते.

आदित `मी तुला जगण्यात काहीच मदत केली नाही. तुझी शेवटची इच्छा सांग. '

`त्या सोसायटीत व आमच्या बंगल्यात भिंत घाल. म्हणजे कुणी दुष्ट माझं लग्न मोडणार नाही. '

माझ्या आयुष्यात आदित्य नावाचं कुणीच येणार नाही.

तो पुन्हा हसला, `तू मुलगा असतीस तर या बंगल्यात `काय होणं' तुला आवडलं असतं? वाचनालय, हॉस्पिटल, मॉल... '

`मला आर्ट गॅलरी झालेलं आवडेल. ' - मी म्हणाले.

`आर्टने काय होतं? पोट भरतं? आजार दूर होतात? ' तो.

`हो, होतात. आर्ट - कला माणसाला आनंद देते. सुख देते. ' मी.

`शारीरिक दुखणं अनावर झालं की आर्ट गॅलरी बाजूला असूनही माणूस काही करू शकत नाही. शरीर हे मनापेक्षा श्रेष्ठ असते. ' - तो.

`शारीरिक आजार मनावरच अवलंबून असतात. ' मी.

शेवटी कंटाळून मी म्हणाले, `बघ, स्वप्नं काय विचारतो व भांडतो काय! एक चारोळी ऐक. '

*तू सुखी रहा तुझ्या आयुष्यात*
*मला गाऊ दे माझे वेदनांचे गीत*
*नजरेचे नाते इथे राहू दे डोळ्यांत*
*मलाही जाऊ दे माझ्या वास्तवात*

मी उठून चालू लागले. अंधार पडला होता. एकटेपणाची व अंधाराची सवय होतीच. मी गाडीपर्यंत चालत गेले. आकाशातील रंगांची गर्दी ओसरली होती. तो आदित्य मागून आला. गाडीत आदित्यने पुढच्या सीटचे दार उघडून मला बसण्यासाठी खुणावलं. मी बसले. `पंचवीस वर्षे झाली, वास्तवाशी नातं तर जोडलंच नाहीस आणि म्हणते जाऊ दे वास्तवात' आदित्य म्हणाला. ह्याच पाटीलशी बोलले, म्हणून भावाने तमाशा केला होता. तरीही मी स्वप्नांमध्ये राजकुमार बघत होते. माझ्या आदित्यला बघत होते.

`लायकी ओळखा स्वतःची. तो लग्न करताना हुंडा मागेल. ' भाऊ आदित्यवरून असं डाफरला होता. आज, तोच आदित्य पुढे उभा होता. त्याच्यामुळे मी उद्ध्वस्त झाले होते. त्याच्यामुळे आयुष्यातून उठले होते.

’ठीक आहे. मला मित्र समज’. म्हणत त्याने हात पुढे केला. मी गप्प बसून राहिले.

`भावाने तुला इथे तिथे नाचवून तासाच्या हिशेबाने पैसे कमवले; वडिलांनी हुंडा वाचविण्यासाठी, लग्न न करता ठेवलं. त्या नातेवाईकांना तू,  आयुष्यातील अविभाज्य घटक

म्हणून स्वीकारलं. मला का नाही? ' असं भावनिक बोलून, तो माझ्याशी पुन्हा सलगी ठेवू पाहात होता.

`आता तुला सोबत करायची परवानगी काढली आहे. मी जवळजवळ रिटायर्ड झालो. जाहिरात म्हणून तू माझ्या मुलीच्या हॉस्पिटलमध्ये दाखल होणार आहेस. '

मला भावाचा खूप राग आला. खूप जोरात रडावं, ओरडावं, असं वाटलं, पण अगतिकपणे मी त्याला विचारलं, `तुझी आई कुठे असते? '

त्याने उत्तर दिले, `ती वारले. आता मी छपन वर्षांचा झालो. माझे पण वर जायचे दिवस आले आहेत. '

साठीच्या वराला सहवासासाठी पत्नी पाहिजे, सहचारणी पाहिजे. अशा मॅट्रीमोनीतल्या जाहिराती मला आठवल्या. हो. सवयीने व छंद म्हणून अजून मी त्या जाहिराती वाचते. यातील खोटेपणा, फसवणूक मी अधिक चांगली जाणते.

आदित्य `माझ्या मुलींची लग्न झाली आहेत. त्या हॉस्पिटल बघतात. आता आपण तिकडेच जात आहोत. ' ते हॉस्पिटल आले. दरवाजा वॉचमनने उघडला. गाडी पोर्चमध्ये आली. बंगला सुंदर होता. उंचचउंच वाढलेली ताडाची, नारळाची झाडे होती. बागेत नोकर नातवंडांना खेळवत होता. सर्व सुख असूनही माझ्याबद्दलची लोलुपता ह्याने का ठेवावी? मी सहजप्राप्य होते का? मला माझ्या अविवाहित स्टेटसचे वाईट वाटले. हल्ली ते बऱ्याचदा वाटते. मग मी आपली स्वतःला कामात गुंतवून घेते. एका वृद्धाश्रमात समाजसेवा करते. वृद्धांना, अनाथांना, निराधार मुलं यांना खोटा दिलासा देऊन खोटीच हसते. माझी कीव करणाऱ्या नजरांचीसुद्धा मला आता सवय झाली. खूप श्रम करते म्हणजे थकून झोप लागते.

आताही मी तशी खोटी हसले. मी मॉलमधल्या काचेच्या पलीकडच्या पुतळयासारखी आकर्षक वाटणारी, पण निर्जीव बाहुली होते. कॉम्प्युटरची कालबाह्य झालेली फ्लॉपी होते. प्राणी-पक्षी संग्रहालयातील बघण्यासाठीपिंजऱ्यात ठेवलेली पक्षीण होते.

आदित्य- `आपल्या बरोबरीचे ते हे अमुकतमुक वारले. '

मी `तुला बरीच माहिती दिसते. माझा फारसा कुणाशीही संपर्क नाही. अमेरिकेत येण्यासाठी मदत हवी असली की काही जण फोन करतात. '

` आदित्य आपल्या बरोबरीचे कोण कोण वारले समजले, की आपण अजून जिवंत आहेत, हा आनंद जाणवतो. एक दिवस त्या सुंदर यात्रेसाठी सर्वांनाच जायचं आहे. जीवनाची यात्रा संपली की आत्म्याची यात्रा सुरू होते. मृत्यूची तयारी मी करतोय. ' तो पुढे म्हणाला. `मला मृत्यूची भीती वाटते. मला मरायचं नाही. एवढ्यात तर अजिबात नाही. मला उपभोग घ्यायचा आहे. ' दवाखान्यातील ती शस्त्रं बघून माझे हातपाय थंड झाले.

`मला इंजेक्शनची खूप भीती वाटते. मी नुसतीच बिछान्यावर पडून राहीन. सलाइन वगैरे टोचू नका”आदित्य  हसला.

`ऑफिसतर्फे चाळीशीचे हेल्थ चेकअप केलेस का? ' आदित्य

मी नकारार्थी मान हलवली. नर्सेसनी माझा ताबा घेतला. मित्र म्हणवणारा सुद्धा किती धंदेवाईक? ह्या विचाराने मला वाईटही वाटलं. त्याचवेळी आदित्याच्या प्रोफेशनल आऊटलूकचं कौतुक वाटलं. अशीही मेडिकल टुरिझमची कल्पना आहेच की! भारतात लोक खास औषधोपचारासाठी येतात. अमेरिकेत जवळजवळ साठ टक्के डॉक्टर भारतीय आहेत. मेडिकल टुरेझम असे नाव आहे. रक्त तपासल्यावर संत्र्याचा रस, सॅण्डवीच, सफरचंद असा नाश्ता घेऊन एक स्वयंपाकीण आली. अमेरिकेत नोकरांचा फार प्रश्न असतो. ह्यांना बरे नोकर मिळतात. माझ्याबरोबर तोही नाश्ता करायला बसला. `जेवणाची वेळ आहे, पण नाश्त्यावर भागव. रात्री उशिरा जेवू या. ' तो म्हणाला.

नाश्ता केल्यावर आम्ही जिन्यावरून टेरेसवर गेलो. एक सोफा होता. एक पलंग होता. वर हात केला तर चांदण्या तोडता येतील एवढं आकाश जवळ वाटत होतं. एका बाजूला उंच भिंत होती.

आदित्य `मला नवल वाटतं, तू पंधरा वर्षांत ही जागा विसरलीस? हा सप्तर्षी, हा ध्रुवतारा कुठून दिसायचा आठवतं? ह्या भिंतीपलीकडे काय आहे माहीत आहे? ' मला संदर्भ

लागेना. अचानक मला ते सर्व ओळखीचं वाटू लागलं.

`ही उंच भिंत एका बाजूने घेऊन ती सोसायटी झाकली. हे हॉस्पिटल तुझ्या वाडीच्या जागेवर बांधलं आहे. ' आदित्य

मी गच्चीच्या टोकाला कडेशी जाऊन वाकून पाहिलं. अरे हा तर चौथा मजला. हा ईशान्य कोपरा. इथून आपण सूर्यास्त बघायचो. रात्रीचे गाडीतून येताना विचारात कळलेच नाही. वाट समजली नाही.

`झाडे कोणकोणती आहेत बघून घे. माझ्याही मुलींचे राज्य आहे. कधी जावई बिल्डिंग तोडतील आणि कधी बंगली तोडून टॉवर बांधतील सांगता येत नाही. वाटल्यास नंतर सकाळी बघ. उद्या बघ. 'आदित्य

मी `आत्ताच बघू या. ' एखाद्या लहान शाळकरी मुलीप्रमाणे धावत गेले. जिन्यापाशी गेले. त्याने थांबवले व लिफ्टमध्ये नेले. लिफ्टने खाली आलो. अंधारातही हॉस्पिटलमध्ये व त्या आवारात पुरेसा उजेड होता. पोर्चच्याखाली वेगवेगळया गाड्या रांगेत उभ्या होत्या. पूर्वी मागच्या दारी जिथे विहीर होती तिथे कारंजे होते. मागे सर्वत्र झाडे होती. पामची, अंजीराची, द्राक्षाची, डाळिंबाची, आंब्याची झाडे मागच्या दारी होती व पुढे नारळाचे रक्षक होते.

मागच्या दारी कोपऱ्यात माळयाची खोली होती. मला आठवलं, `या माळयाच्या खोलीत तरी मला राहू दे. मी तुझ्या आधाराशिवाय कुठे जाऊ? ' म्हणून मी भावाच्या पायावर पडून रडले होते व त्याने तिथे राहू देण्याइतकीही दानत दाखवली नाही. मी रात्रभर अंगणात बसून होते. आठवडाभर भाड्याची खोली शोधत खूप फिरले. कित्येक जणांच्या वाईट नजरांना तोंड देत मी कशी तरी अंग चोरून वावरले. भावाइतकाच मला आदित्यचाही राग आला.

आता मोठे प्रेम दाखवतो. तेव्हा कुठे मेला होता? माझं लग्न मोडणाऱ्यांनी माझ्या बेघर स्टेटसचा आनंद लुटला. मी खूपच हताश झाले. रडणं संपले व नवीन दादांकडे गेले. अमेरिकेत आले. हे राधासुता, तेव्हा कुठे गेला होता धर्म? असं म्हणणाऱ्या कृष्णाप्रमाणे ह्या

लोकांना प्रश्न विचारणारा कृष्ण कधी येणार? हा आदित्य (सूर्य) तर काजवा कसा असेल? मी त्या खोलीपासून नजर हटवली. मला ते दिवस आठवले. माझे हाल बघून भराभर त्या गावातील अनेकजणींनी मुलगी नको म्हणून गरोदरपणी गावी जाऊन गर्भलिंगचिकित्सा केली व स्त्री भ्रूणहत्या केली. ह्या स्त्री भ्रूणहत्येला जबाबदार कोण? त्याला दोष द्यावा तर तो परकाच! सख्खा भाऊ जर असा असू शकतो तर परक्यांवर काय हक्क सांगणार? सगळ्यांना सगळं माहीत असतं, पण माणसं जिथे मतलब असेल तिथेच बोलतात. योग्य वेळी गप्प बसतात.

माझी बदनामी सर्वत्र खूप चघळली गेली. `मुलगी नको बाबा', म्हणत माझीच गोष्ट सांगितली गेली. कारंजाच्या कठड्यावर मी बसले. त्या उंच भिंतीपलीकडे ती सोसायटी होती. वृद्ध असाहाय्य म्हाताऱ्यांना त्रास देणारी, झाडे तोडून पर्यावरणाचा घात करणारी, वाईटसाईट बोलून माझं लग्न मोडणारी, मुलींची हत्या करणारी ती सोसायटी तिथे आली नसती तर... भूतकाळ बदलता आला तर... नोकर कारंजासमोर टेबल-खुर्ची ठेवून गेला. दुसऱ्या नोकराने पिठलं, भाकरी, कांदा, ठेचा जेवण आणलं.

तो `हाताने जेवता येते ना की काटा चमचा पाहिजे? आम्ही शेतकरी. आम्हाला भाकरीच लागते. '

मी थोडेसे अन्न चिवडले. त्याचे साग्रसंगीत जेवण झाल्यावर मी विचारलं,

`किती वेळापर्यंतचे माझ्या सोबत राहायचे पैसे दिले आहेस? '

तो - `तुला कंटाळा आला असेल तर सोडतो तुझ्या घरी. '

मी गप्प बसले. पूर्वेला चंद्र उगवू लागला होता.

त्याने माझ्याकडे एकटक पाहात विचारलं, `हॉस्पिटल नको का इथे? हार्ट अ‍ॅटॅक आल्यावर डॉक्टर लागतो. कविता ऐकवली तर पेशंट मरेल. '

मी रागाने त्याच्याकडे बघितले.

तो म्हणाला, `ठीक आहे. माझं हृदय मजबूत आहे. एक कविता ऐकव. मला काहीही कळत नाही साहित्यातलं पण तरीही सांग.'

`स्टेथस्कोप म्हणाला ब्रशला, जीवन म्हणजे काय?

तू श्रेष्ठ की मी श्रेष्ठ ? कला की शास्त्र?' - मी म्हणाले.

`शेवटी काय, कलाही नष्ट, शास्त्रही भ्रष्ट! ' - तो म्हणाला.

आम्ही दोघेही हसलो. त्या प्रशस्त व्हरांड्यात कोपऱ्यात एक संगमरवरी छोटी महीरप होती व आत सप्तश्रृंगी देवीची मूर्ती होती. पुढे तो मोठा माझ्या आईचा शिसमच देव्हारा होता. मी पळत पुढे गेले.

आदित्य म्हणाला, `तुझ्या भावाने सामानासह सर्व विकलं. हा देव्हारा तिथून मीच आणला. देवी मात्र मिळाली नाही. '

मी - `लग्न झालय, नातवंड झाली आहेत. ह्या वयात फ्लर्ट करणं शोभत नाही. '

' आदित्य Fidelity is a brittle word. निष्ठा म्हणजे काय? का हवी ती? लग्नाने शरीरं जुळतात. मनोमीलन होतंच असं नाही. लग्न होऊनही काही काही संसारात प्रचंड एकटेपणा असतो. स्वतंत्र बेटांप्रमाणे माणूस जगत राहतो. `स्वीकार' करावाच लागतो. तू लग्न न झाल्याने एकटी, तर मी लग्न करूनही आज क्षण एकटाच! काही गोष्टींना कारण नसते. कार्यकारणभाव नसतो. '

हा चोर, आदित्य नाटक करतोय की काय म्हणून मी निरखून पाहिले. ह्या वयात ह्याला काय हवे? शरीर? बदल? नावीन्य? विविधता? की हा माझी टर्र उडवतोय; की भावाने ह्याला मला टेस्ट करायला सांगितले आहे?

आदित्यची मित्रांशी पैज लागली आहे का? हा ब्लॅकमेल करेल का?

तो `एक आरती म्हण बघू. पुन्हा येशील न येशील. ही शेवटचीच यात्रा. '

मी `तू आणि आरती ऐकणार? आयुष्यात देवाला हात जोडले नसतील. आता साठीचा झालास.'

अर्थात मीही चाळीशीची झाले. ठीक आहे म्हणते.

*त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे*
*तुझे गीत जाण्यासाठी सूर लागू दे*

आदित्य भरडे आवाजात गाऊ लागला, तो खोकू लागला. म्हणाला, `कधी वाटतं

रात्री झोपेतच आपण मरून जाऊ. अजून खूप वर्षे जगावंसंही वाटतं. '

मी विहिरीवरून उठून गाडीकडे चालू लागले. माझ्या वाईट परिस्थितीत हा आदित्य कधीच मदतीला आला नव्हता. गर्विष्ठ माजोरी नजर घेऊन स्वतःच्या पदाचा, पत्नीच्या पैशाचा माज नजरेत घेऊन फिरणारा हा पाटील आज अगदी आरती म्हण म्हणत होता. काळापुढे, मृत्यूपुढे सर्वांचाच माज उतरतो.

पण तरीही इतकी वर्षे तर ह्याने सुखराज्य केलंच की! मला हेवा वाटावा असं आयुष्य हा जगला, जगतो आहेच! नशीब ज्याचे त्याचे! मला क्षणभर त्याच्या कुटुंबीयांचा हेवा वाटला. अजूनही किती छान दिसतो हा! त्याची ती उर्मट आढ्यताखोर बायको ताठा दाखवत फिरते आणि हा असा वेगवेगळ्या बायकांना तिच्या अपरोक्ष घरी बोलवतो. अभिमान व गर्व माणसे कशाचा करतात? नीती श्रेष्ठ की पैसा श्रेष्ठ? त्या गावाचे आदर्श जोडपे म्हणून त्यांचा म्हणे सत्कार झाला होता.

`आजची रात्र माझं ऐकलंस तर... ' आदित्य पुन्हा आग्रह करू लागला. शेवटी स्वतःच्या मूळ लायकीवरच आला. हा पाटील भोगवादाच्या, शरीराचे लायकीवरच येणार

- एखादे गाणे म्हण की. ' मला क्षणभर खूपच चीप वाटले. तरीही मी म्हटलं.

*`क्यों जिंदगी के साथ हम मजबूर हो गये।'*

`सांग मरण्यापूर्वी जगायचं असतं की मरणाच्या भीतीने जिवंतपणीच मरायचं असतं? वडिलांच्या नावाने आर्ट गॅलरी हवी ना! मग तयार हो. अजून रात्र बाकी आहे. 'आदित्य

क्षणभर वाटलं की हो म्हणावं. ह्याने तरुण वयात, लग्न करण्याची हिंमत केली नाही. जेव्हा मी दुर्दैवाचे जीवन जगले. तेव्हा त्याने जख्मी मला नाकारले. सासरहून मिळणाऱ्या पैशासाठी मला नाकारलं आणि आता आपले उष्टावलेले शरीर, ओसरलेला बहर माझ्यावर लादतो आहे. पुरुष सेकंडहॅण्ड होत नाही असं त्यांना वाटते. पण हा सेकंडहॅण्डच! ह्याच्यावर पहिला हक्क त्याच्या बायकोचा राहील. माझा दुसरा. सेकंडरी लीन! दुय्यम तारण. कदाचित हा हक्क देणार नाही. फक्त एक हुकलेली संधी त्याला पुन्हा मिळवायची आहे. आदित्याच्या

बायकोच्या सुखात मी वाटेकरू म्हणून नको, तर एक चोरून लपून केलेली भानगड म्हणून मी त्याला हवी आहे. प्रेम म्हणून त्याने गॅलरी बांधली नाही. एक मिलियन डॉलर कल्पना त्याला माझ्याकडून मिळाली होती. माझ्या बुद्धिमत्तेचे पेटंट त्याने पैसे न देता खरेदी केले होते. व पैसे कमवत होता व सुखाच्या गाद्यागिर्द्यांवर लोळत होता. त्या माझ्या आई-वडिलांच्या वाड्याच्या जागेवरील आदित्याच्या बंगल्यात माझा अपमान होत होता. प्रायोजित अपमान व तो कार्यक्रम आयोजित केला होता, सख्ख्या भावानेच!

एखाद्या गझल गायकाप्रमाणे मी गाणं म्हटलं.

*हमने देखी है उन आँखों की महकती खुशबू*
*जब तक ना मिले बेवफाई की ठोकर*
*हरेक को प्यार पे नाज होता है।*

आदित्यचा नोकर आला. मी अंग चोरून कोपऱ्यात उभी राहिली. पायाच्या नखाने जमीन उकरू लागले. अजून कितीजणी ह्याच्याबरोबर आल्या असतील. व्यभिचाराचा विखार याने, किती घरी पसरवलेला असेल? जे माझे नाही ते घेऊ नये, हे मी लहानपणापासून शिकले. मग जे आपले नाही ते हिसकून घेणे हा आदित्य कुठून शिकला? सासरच्यांमध्ये वावरून, अणासाहेबांचे सावलीत हा असा झाला, की हा असाच होता. मलाच कळलं नाही. क्षणात मी त्याच्यापासून मनाने दूर गेले होते व काही अंतरावरच वावरू लागले. मनात म्हणत होते, परमेश्वरा माझी विटंबना करू नको.

आदित्य मला स्पर्श करू नकोस.

माझ्या नशिबात जे सुख नव्हते त्याची आस मी व्यक्त केली नाही. आदित्याने मला फसवले म्हणून मी कधी तळतळाट केला नाही, की तक्रार केली नाही. जाता येता तो दिसला, तरीही उदासीत मी रात्र रात्र रडत असे. गांधीजींचे पुतळे, तो दाह मी हळूहळू विसरले. त्याच्या संसाराकडे कायम मी अनिमिष नजरेने बघत असे. विस्मरण ही एक परमेश्वराने दिलेली देणगी आहे. तरीही कधी कधी सर्व मागे पडलेल्या विसरलेल्या गोष्टी सुस्त अजगराने फणा काढून अचानक जागं व्हावं, तशा उफाळून दंश करू लागतात. प्रेम म्हणजे

काय? मी इतकी संकटात असतानाही माझा हालहवाल विचारायला हा आदित्य कधी आला होता? आता त्याला शरीर हवं. तेही फक्त... मजा करायला.

समोरून लांबवरचा गांधीजींच्या पुतळयाजवळचा उजेड डोळयांत शिरत होता. गाडीजवळ मी क्षणभर थांबले. नवी कोरी करोला गाडी होती. मी परदेशात भरपूर गाड्या पाहिल्या होत्या. मला नवलाई नव्हती. पण वरवरचे कौतुक म्हणून मी पाहिलं. आदित्य हसला व म्हणाला, `पहिली गाडी घेतली तेव्हा तुला चक्कर मारायला न्यावं म्हणून मी पूर्ण महिनाभर विचारायची हिंमत करत होतो. पण धैर्य झाले नाही. ही सतरावी गाडी! '

मी म्हणाले, `कितीतरी जणींना तू हेच वाक्य बोलला असशील. '

आदित्याने दुर्लक्ष केले व म्हणाला, `ह्या गाडीचे भाग्य चांगले. तू तिच्यात बसलीस. ' आदित्याने लिफ्टने मला पुन्हा तिसऱ्या मजल्यावर आणलं. नोकर किल्ली घेऊन आला व तो कुलूप उघडू लागला. कुलूप उघडून दार उघडताच, आदित्यने नोकराला जा सांगितलं. आदित्य आत गेला व पुढचे दार उघडू लागला. माझं हृदय धडधडलं. आत नेऊन हा काय करेल? बळजबरीने जवळ ओढेल की... दुसरेच काही... की माझे मूत्रपिंड काढून घेईल. भावाने पैसे घेतलेच आहेत. माझी तक्रार कोण ऐकेल? हा पकडून मिठीत घेईल, मला उष्टावेल. आदित्याची वर्षानुवर्षे माझ्याशी क्षणभर थबकलेली अतृप्त इच्छा, वासना पूर्ण करून घेईल, की मला ... त्याने पुढचा मोठा चार-पाच फळया असलेला दरवाजा उघडला. आत जाऊन आदित्याने लाईट लावला. त्या फॉल्स सिलिंगमधल्या विविध प्रकारच्या लाईट्सच्या प्रकाशात तो मोठा हॉल उजळून निघाला.

विवाहकार्याच्या, शुभकार्याच्या सभागृहाप्रमाणे त्यात विविध प्रकारची चित्रं होती. नक्षीचे खांब होते. ती एक आर्ट गॅलरी होती. एका भिंतीवर एक मोठे कोणार्क सूर्य मंदिराप्रमाणे असलेले चाक ठेवले होते. त्या चाकाच्या मध्यभागी लाऊडस्पीकरचा माईक होता. अनेक चित्रं होती. रंगीबेरंगी, रंगहीन, काही उत्सवी, काही खंडहरमधील चित्रं. जणू जीवनाची विविध रूपं दाखवत होती.

त्या चित्रांमध्ये काही फोटो, माझ्या वाडीचेही होते. काही चित्रं खेड्यातील लोककलाकारांनी काढलेली होती. काही हस्तकलांचेही नमुने होते. कला कळो न कळो, प्रदर्शन करायला मांडणं हा उच्चभ्रू लोकांचा छंद आहे का? पण सारे काही होतं मात्र खूपच सुंदर! मला खूपच प्रसन्न वाटले.

`अजून काही राहीलं? ' आदित्यानं जवळ येऊन मला विचारलं.

माझ्या डोळयांत पाणी जमा होऊ लागलं. तो पुढे म्हणाला, `मी इथे गरीब कलावंतांना फुकट कला प्रदर्शनाची संधी देतो. परत आलीस तर तुझ्या चित्रांचं प्रदर्शन ठेवू किंवा कथ्थकचे नृत्य ठेवू या. '

आदित्य जवळ आला. त्याने मला मिठीत घेण्याचा प्रयत्न केला. पण मी अंग चोरून घेतलं व म्हणाले, `प्रेम म्हणजे खंडणी वसूल करणं? की आर्ट गॅलरी बनवल्याची परतफेड हवी आहे? '

आदित्य म्हणाला, `मी साधासुधा माणूस. शब्दांच्या आड वासना लपवत नाही. ठीक आहे, तुझी इच्छा नसेल तर राहीलं. तुला इच्छा झाली तर कळव. मी युएसएच्या टूरचे निमित्त काढून येईन. मी परदेशवारीत तुझ्या सोबत राहीन. बरेच जण असे करतात कुणालाही कळणार नाही. ईथे भारतातही नाही. तिथेसुद्धा नाही. मरण्यापूर्वी एकदा तरी मला... ' आदित्याने जवळ येऊन माझे केस हातात घेतले. मी पटकन दूर झाले.

मी अगतिक होते. पण मला आपणहून स्वतःला त्या कुटंबाचे वासनेत दुसरे वेऴी, कामआहुतीत बळी जायचं नव्हतं. बुडण्यापूर्वी हात पाय मारायचा प्रयत्न मी करीत होते. माझ्या विरोधामुळे तो गप्प बसला.

कुणाचा तरी फोन आला. `लव्ह यू मिस यू' म्हणून त्याने कट केला. मला आदित्यच्या चारित्र्याचा संशय आला. त्याने त्याच्या गाडीतून मला भावाच्या घरी सोडलं.

भावाने दार उघडलं. मी हॉलमध्ये सोफ्यावर बसले. बाहेर गाडी चालू झाल्याचा आवाज आला. मी हॉलमध्ये सोफ्यावर लवंडले. मला कुणीही जेवण, चहा-पाणी विचारलं

नाही. माझं सामान अजूनही दाराजवळच बेवारस स्थितीत उभं होतं. भावाच्या घरात मी पाहुणी होते. आगंतुक होते.

माझं घर आदित्यच्या मनात होते, पण माझे स्थान आदित्यच्या घरी नव्हतं. जगरहाटीने, जनरीतीने मला एक नवरा मिळावा, एक हक्काचं घर मिळावं अशी जी पद्धती असते त्यात मी बसले नव्हते. ते भावाचंही घर माझं नव्हतं. वडिलांचंही घर माझं नव्हतं. माझं घर कुठं आहे? सकाळी भावाच्या आरडाओरड्याने जाग आली. भाऊ कसली तरी कागदपत्रे घेऊन आला व माझ्यासमोर आपटून म्हणाला, `गुपचूप सही कर. नाटक करू को. तुझ्यावर कुणी तरी बलात्कार करून तुझा खून करायला हवा होता. किती माजली आहेस. फुशारून जाऊ नको. त्या आदित्य पाटीलने शरीर हवं म्हणून तुला हरबऱ्याच्या झाडावर चढवलं असेल. तू आत्महत्या केली असतीस तर मीच मालक ठरलो असतो, ह्या सर्व जमीनजुमल्याचा! तू ऐकेना म्हणून मी तुला हाकलले, घराबाहेर काढलं. तूसुद्धा बावळट होतीस. पटकन गेलीस. अर्थात तू बाहेर गेली नसतीस तर सरळ विहिरीत ढकललं असतं. भावा-बहिणींचे प्रेम म्हणे, आयुष्य म्हणजे काय हिंदी सिनेमा वाटला का? मूर्ख बाई धावत आली भारतात मी बोलावल्याबरोबर'

`काय आहे ते मी वकिलाला दाखवून सही करते. ' मी.

तो आवाज ऐकून वहिनी बाहेर आली. एक तीक्ष्ण नजर टाकून पुन्हा आत गेली.

`सर्व गाव म्हणतं मुलींना शिस्त हवीच . भाऊ असावा तर असाच हवा. बघ, मी तुला हाकलून दिलं, म्हणूनच तुझं परदेशी चांगलं झालं. नाही तर ह्या डबक्यात अशीच सडली असतीस. अण्णासाहेब व बापूसाहेबांची जगात कमी नसते. तिथे तुझा थाट बघ! तुझ्या नशिबी ते सुरक्षित जीवन व स्थैर्य आले, त्याला कारणीभूत मी आहे. मीच तुझं हित जाणलं व केलं. '

भाऊ विचित्र वागल्यावर मी कशी फिरले होते. आठ दिवस पोटात अन्नाचा कण नव्हता. कुणी गैरफायदा घेतला असता तर प्रतिकार करायला अंगात शक्तीच नव्हती. मैलोन्मैल चालतांना कंटाळले असते, तर संधिसाधू पुरुषांनी झडप घातली असती. पण भावाला माझ्या वेदनांशी काही देणे घेणे नव्हते. त्याला फक्त पैसा हवा होता. समाजसुद्धा आवाज न उठवता

गप्प बसला. आहे तो प्रश्न काय फक्त माझ्या घरचा होता? खरेतर चार प्रतिष्ठित नागरिकांनी येऊन निषेध व्यक्त करायला हवा होता. पण `तीचं नशीब', त्यांच्या घरचा प्रश्न, म्हणून सर्वजण गप्प बसले. समाजातल्या वाढत्या स्त्री भ्रूणहत्यांना माझा भाऊ जेवढा जबाबदार आहे. तेवढेच हे गप्प बसून बघणारेही आहेत. आदित्य आणि अण्णासाहेबही जबाबदार आहेत. स्त्री भ्रूणहत्या थांबवण्यासाठी आधी या विकृत मनांची तटबंदी करायला हवी. मला नवल वाटते ते हे की, क्षुद्र फायद्यासाठी, पुढे हेच लोक आज मला परदेशवारीचे माहितीबद्दल विचारत आहेत. त्यावेळी माझ्या घरच्या वडिलांच्या व आईच्या आशीर्वादानेच खूप कुणी माझा गैरफायदा घेतला नाही. माझे भरकटणे, असुरक्षितअवस्था, एकाकीपण ह्याची जबाबदारी खरं तर ह्या भावाच्या चुकांवर जाते. पण तो म्हणतो `माझ्यामुळे चांगलं झालं. ' चांगलं झालं म्हणजे नक्की काय झालं? बाहेरून दिसणारे सुख खरं की मनाची खिन्नमनस्कता खरी? मी यशस्वी की मी एकाकी?

दिव्यांचा लखलखाट खरा, की देवळातील सांजवात खरी?

शेतातील लवलवणारे अंकुर खरे की शेतकऱ्यांची आत्महत्या खरी?

माझ्यावर कुणीतरी बलात्कार करावा, माझा खून करावा किंवा मग मी आत्महत्या करावी, म्हणून याने मला घराबाहेर काढले. ह्या `चांगले होणे' नावाच्या शेल्यात हा भाऊ माझ्यावरचे अन्याय व अत्याचार गुंडाळून मांडतो, सोनेरी तबकात रेशमी वस्त्राखाली दडवला तरी तो खंजीरच असतो.

`मेली असतीस तर पेढेच वाटले असते. ' जिवाजीभाऊ म्हणाला. घराबाहेर हाकलून देऊन चांगले होत असते तर या भावाने बायकोमुलांना का हाकलून दिले नाही? . बहिणीलाच का दिले? अपराधीपण जाणवण्याएवढीही नीती याला शिल्लक नाही? . मी भारतात का आले? मला चकवा झाला होता. माझे डोळे खाडकन् उघडले.

*झूठी तसल्ली के लिए झूठी चमक, झूठा निखार*

*जीवन तो सुना ही रहा, सब समझे आयी थी बहार*

चांगलं होणं म्हणजे काय होणं? असा भाऊ असावा का? भाऊ असा तर दलाल कसे असतील?

चार वाजता वहिनीचे भाऊ व वडील आले. माझा जिवाजीभाऊ आजारी दिसत होता. खोकत होता. दमत होता. वहिनीच्या वडिलांनी विषय काढला. `जिवाजीभाऊंची मूत्रपिंडे खराब झाली आहेत. त्यांना तू तुझे मूत्रपिंड द्यावेस. 'मला धक्काच बसला. अजून किती वसुली बाकी आहे? अजून किती देणं द्यायचं आहं?

वहिनीचा भाऊ म्हणाला, `एकट्याच जगता आहात, ना आगा ना पिछा. मरण्यापूर्वी भावाला मूत्रपिंड द्याल तर त्याचं आयुष्य वाचेल, तो कुटंब वाला आहे. '

`मला कोण बघेल म्हातारपणी? - मी पुटपुटले.

भावाचा मुलगा मोठा झाला होता. तो पुढे आला व म्हणाला,

`शटअप, मोठी आलीय जगणारी, मानकरीन! मेलीस तर कोण रडणार आहे? तुला नाही बघितलं कुणी म्हातारपणी तर मरून जा ना! आमच्या बाबांना जगवायचं आहे! एवढा मोठा खानदानी, श्रीमंत, पुरुष त्याचे जगणे महत्त्वाचे असते. तू काय? '

`त्याला मुलं आहेत, पत्नी आहे. त्यांना जिवाजीभाऊ हवा आहे. तू काय? ' वहिनींचे वडील म्हणाले.

वहिनीचे नातेवाईक आले. ते जिवाजीभाऊ, वडील सर्वजण माझ्यावर मूत्रपिंडदानासाठी दबाव आणू लागले. ह्यांच्या या षड्यंत्रात आदित्यसुद्धा सामील असेल का? एकदा वाटलं गुपचूप आदित्यच्या घरी पळून जावं. मी आदित्यला फोन केला, भेटायची इच्छा मांडली, पण आदित्यने भेटणं टाळलं. माझ्या विरोधाला न जुमानता मला हॉस्पिटलला नेण्यात आलं. पूर्वीच्या आदित्यच्या मुलीच्या हॉस्पिटलमधील टेस्टचे व ह्या टेस्टचे रिपोर्ट मिळून असं ठरलं, माझे मूत्रपिंड भावाला जमतं आहे व तातडीने, मुंबईला मूत्रपिंडदानाची शस्त्रक्रिया करायची ठरली. मला क्षणात समजले, यासाठी जिवाजीभाऊ वारंवार फोन करीत होता. म्हणजे मी परत परदेशी जाण्यापूर्वी शस्त्रक्रिया व रिकव्हरी पूर्ण व्हावी. मूत्रपिंड हवं म्हणून

भावाने बहिणीला बोलवलं होतं.

भाऊ-वहिनींनी मुंबईला जायला स्पेशल गाडी ठरवली. कारण जिवाजीभाऊ आजारी होता, तो सध्या पेशंट होता. मला ऑपरेशनची खूप भीती वाटत होती. एकदा वाटलं, आई-वडिलांचीच चूक आहे. त्यांनी ह्याला उद्दामपणा शिकवला. माझं आयुष्य, निरोगी शरीर जिवाजीभाऊसाठी, वाईट भावासाठी मी वेदीवर वाहत होते. माझ्या समोर दुसरा पर्यायही नव्हता. मदतीला कोण आले होते? कोण येणार होते, घरची, जातीची, कोवळी मुलगी वणवण भटकत होती. तेव्हा उंदरासारखे, बिळात गुपचूप वावरणारे ऊंदिर हे, आता कुठे मदतीला येणार होते?

ते ऑपरेशन पार पडलं. रिकव्हरीचे दहा दिवस मी तळमळत होते. मनानं खचले होतं. आपली माणसं म्हणजे कोणती? आपलेपणाचे नावाखाली खंडणी वसूल करणारी का? रक्तस्त्रावानं मला ग्लानी येत होती. वाटत होतं आता आपण मरणार. त्या ग्लानीमध्ये आदित्य आठवत होता. वाटत होतं ही आदित्य नावाची पनवती, खोटी आशा उगीचच आयुष्यात आली. दवाखान्यातून आम्ही भावाच्या घरी आलो.

भावाचा मोठा मुलगा समोर आला व म्हणाला,

`तू बिनलग्नाची. त्यामुळे आमच्याही लग्नाला त्रास होऊ शकतो. आमचं उच्च घराणं... पुन्हा ह्या गावाशी संबंध ठेवू नका. त्या आदित्य पाटलांना यातले, काहीही एक शब्द जर सांगाल, तर याद राखा. शिवाय सर्व फिक्स डिपॉझिट्स व घर वगैरे घेतलं असेल तर त्याचं नॉमिनेशन माझ्या नावावर करा. खूप त्रास झाला तुमच्यामुळे आम्हाला. लाज वाटते तुमचे नातं सांगायला. '

मी `माझी किडनी घेताना लाज वाटली नाही? '

तो `शटअप' लग्न झालं असतं तरीही तुम्ही, अशा भांडखोर आहात, सासरी नांदला नसता. '

मी ’तुम्ही सासरी तीही तरतूद करायचं ठरवलं होतं का? माझा संसार मोडून

तुम्ही आनंद मानणार होतात का? ' तेवढ्या संतापानेही मला दम लागला.

का आले मी भारतात? हा देश माझा? ही माणसं माझी? देव कुठे राहतो हो? आईदादांची लाडली तळमळत होती.

मला भाच्यानं बसस्टॅण्डवर सोडलं व `बसने मागून या' म्हणाला.

मला तिथे बघून, रस्त्यावरची एक म्हातारी थबकली. जवळ येऊन म्हणाली, `सारिका ना गं तू! कशी आहेस? ' मी त्यांना वाकून नमस्कार केला. म्हातारीने माझ्या डोक्यावर हात फिरवला. `अजुनी लहानखोरच दिसतेस गं! थोडी वाकलीस पाठीत, पण अजून तर तिशी-चाळीशीचीच वाटतेस. तू गेल्यावर गल्लीतील रौनकच गेली. पैशाने श्रीमंत माणसे भरपूर आली. पण मनानं श्रीमंत कुणी आलं नाही. कथ्थकच्या तुझ्या कार्यक्रमाला आले होते. अप्सराच दिसत होतीस. स्वर्गातल्या अप्सरांना जसा शाप असतो तसं हे सौंदर्य शापित राहीलं. त्या पाटलाची आदित्यची वाईट नजर गो तुझेवर, कुत्र्याच्या जातीची माणसे आहेत. ' आजी वास्तव सांगू पाहात होती.

`आजी चारचौघातसुद्धा उठून दिसण्याएवढे रूप मला आता उरलं नाही. पूर्वी तरी मला कुठे भारी कपडे होते. दागिने होते' मी म्हणाले.

`तरीही नागकन्या, देवकन्या दिसायचीस. ये घरात. चहा पी. '- आजी.

मी चहा नको म्हणाले. म्हातारी माझ्या बालपणीच्या आई-वडिलांच्या आठवणी सांगू लागली. `तू पुन्हा येशील तेव्हा मी म्हातारी मेलेली असेन, मी नव्वदीची झाली ना! ' आजी खंतावत पुढे म्हणाली. ' चहा पी. पुढच्या वेळी येशील तेव्हा तुझ्या बालपणीचा हा शेवटचा दुवाही संपेल. नंतर तुला कुणी जवळ घेणार नाही, की केसावरून हात फिरवणार नाही. आमची पिढी संपली. देव माणसं गं तुझे आई-वडील! आता तुझे भाऊ व भाचरे नराधम नाही पण असुरच आहेत. सुरापोटी असूर आला. तुझा दुष्ट भाऊ, भीक मागत मरेल. खरं तर गावानं बहिष्कार टाकायला हवा होता त्याच्यावर बघ. '

मी म्हणाले, `आजी त्याचं वाईट होऊन, माझे गेलेले वाया गेलेलं आयुष्य परत

येणार आहे का? माझं चांगलं होऊ दे. असा शुभ आणि भरघोस आशीर्वाद द्या. '

आजीने माझ्या चेहऱ्यावर अलाईबलाई घेतली. गुलाबाचे फूल दिले, म्हणाली `पूर्वजन्मी मोठ्या राजघराण्यातील शापित राणी असशील हो! तुझ्यासारखी तूच! चांगला नवरा मिळू दे तुला! '.

मी तिथून बाहेर पडले व लडखडत चालू लागले. भावाचा मुलगा अचानक स्कूटरवर पुढे येऊन म्हणाला, `चला बसा, कुणाला तरी काही तरी संशय येईल. मी तुम्हाला मुक्कामापर्यंत सोडतो. आम्हाला आमच्या घरचे अब्रूची चाड आहे. ' पण मी म्हातारीच्या घरासमोरच थांबले. तिथून आदित्यची म्हणजे अण्णासाहेबांची पूर्वी होती ती कोठी दिसत होती.

परदेशातून येतांना, भारतात आणलेल्या सामानातील सर्व कपडे, साड्या वापरून संपल्या होत्या. मला घरी कुणी मदतीला नव्हतं. जखमेमुळे साडी बांधता येत नव्हती. अमेरिकेत ऑफिसतर्फे दिलेला ट्रेण्डी ड्रेस होता. (मिडी फ्रॉक गुडघ्यापर्यंत पोहोचणारा व वर कोट) त्यात कमरेला नाडी बांधावी लागत नव्हती. म्हणून मी तो घातला होता. म्हातारी वाणी आजी नऊवारी चापून चोपून नेसली होती. मला त्या विरोधाभासाचं कौतुक वाटलं. त्याचवेळी एक गाडी बाजूने जाऊन पुढे थांबली. गाडीची काच खाली करून आदित्य बघतच बसला. ह्या ड्रेसमध्ये मी छोटेखानी बारीक चणीची लहान दिसत होते. माझ्या चेहऱ्यावर ऑपरेशनचा थकवा व पेलनेस होता. आदित्यला खरं तर मी त्याच्या मुलीप्रमाणे वाटायला हवी होती. मी त्याच्याहून खूप वर्षांनी लहान होते. तरी तो माझ्याकडे एकटक बघत होता. त्याच्या नजरेत एक असूया, एक विषाद होता. ही परदेशात मजा करीत असेल. हिला कुणीतरी मिळेल. ही अजून तरुण दिसते. असा भाव त्याच्या नजरेतून परावर्तित झाला.

एक क्षण आदित्यच्याजवळ जावं व मिठी मारून रडून सांगावं, `भावानं फसवलं

रे' असं मला वाटलं. पण मी गप्प बसून मान बाजूला फिरवली. पुन्हा माझा विचार बदलला. व मी पळत पळत आदित्यचे गाडीपुढे गेले. वाटले आदित्याच्या मिठीत पडून मनसोक्त रडावे. किती कठोर आहे हे जग हे रडत सांगावं. काय अपेक्षा होती माझी ह्या जीवनाकडून आणि काय नशिबी आलं आहे, त्याचं वर्णन करून दोघांनी अश्रू गाळावे व एकमेकांचे अश्रू पुसावे. माझ्या हातातलं वाटेत पडलेलं गुलाबाचं फूल, आमच्या दोघांमधल्या मधे, बरोबर अंतराच्या मध्यावर होतं. गाडीचं दार उघडून आदित्य खाली उतरला. त्या अंतरापर्यंत चालून आला आणि... .

त्याच्या मागोमाग त्याच्या गाडीतून एक उफ़ाड्याच्या शरीराची बाई, खेडवळ ढंगाचा उच्चार करीत म्हणाली,

`आदित्यसाहेब चला. '

आदित्य त्या गुलाबाच्या फुलावर पाय देऊन उभा होता. तो वळला व म्हणाला, `चेहरा ओळखीचा वाटला म्हणून आलो होतो. '

ती बाई चापलुसी करत म्हणाली, `आदित्यसाहेब अजूनही पाखरू हेरायची सवय सुटली नाही बघा तुमची. विदेशी पाखरू हवं का? '

`नाही नाही' म्हणत आदित्य तिच्या शेजारी गाडीत जाऊन बसला. गाडी धूर उडवत निघून गेली. त्याच्या टाचेखाली गुलाब चिरडला होता. मी स्तिमित झाले होते. रस्त्याच्या कडेला जाऊन मी भकाभक ओकले. भारतीय संस्कृतीचे नातेसंबंध, ती रक्ताची नाती ते अनिभव मला ओकून बाहेर काढायची होती. उल्टी झाल्यावर मी बसून राहीले.

*देवबाप्पा कुठे राहतो हो?*

*प्रेम अस्तित्वात असतं का?*

*की दोन्हीही काल्पनिक गोष्टी आहेत?*

*दोन्ही Fictious Entities आहेत का?*

*चांगली माणसं कुठे गेली?*

*मागून आलेली माणसं कुठून आली?*

*ही नीतिमत्ता त्यांना कुणी शिकवली?*

*कृतघ्नतेची विषवल्ली समाजात कुणी आणून रुजवली?*

*विषाच्या प्याल्याची अमृत म्हणून पूजा करायला समाज कधी शिकला?*

दिशाहीनपणे मी चालू लागले. मला आदित्यने सुद्धा पुन्हा फसवलं होतं की देवाने. जेव्हा मी पुढे जाऊन त्याला सांगावं म्हणून लगबगीने पुढे गेले आणि थबकले तेव्हा गाडीत त्याच्याबरोबर दुसरीच बाई होती. ज्या रस्त्यावरून मी आले तिथूनच परत निघाले. जशी आले तशीच परत आले का? हो की नाही?

शरीराचा एक अवयव घालवून मनाची उभारी, चांगुलपणावरचा विश्वास घालवून मी परत वाटेवर आले. एकाच वनात अनेक झाडे राहतात. प्रत्येक झाड वेगळं असतं. प्रत्येकाचं नशीब वेगळं असतं. माझा ह्या गावात जिवाजी भाऊंबरोबरचा शेवटचाच संबंध होता. कर्मयोग्याप्रमाणे एकटे वाढलेले हे झाड आता ह्या गावातून तुटलं होते. पक्षी उडून गेला. आदित्यबरोबर त्या गाडीत दुसरीच बाई होती. बायको होती की कोण होती, हे मी सांगू शकते ती बायको नाही. पण जरी ती बायको नव्हती, तरी ती तिच्याजवळच्या पुरुषावर अनुरक्त होती. आदित्य म्हणजे फसवणुकीची व्याख्या होता की प्रतीक होता? म्हणजे त्याचे कालचे प्रेम नाटकच होते. मी कोण होते? पाटील कुटुंबात पुढच्या पिढीत, आदित्यरूपी, अण्णासाहेब तयार झाले होते. कदाचित ऑपरेशनची योजना, तयारी यानेच केली असेल. माझ्याप्रमाणे अनेक स्त्रिया त्या घरी, आदित्य आणत असेल. माझे हातपाय गळाले. ऑपरेशनमुळे मी अगतिक झाले होतेच. त्यात समोर गांधीजींचा पुतळा दिसत होता. आधीच्या अत्याचाराच्या दुष्ट आठवणी छळू लागल्या.

त्यात ह्या दुःखाची भर पडली. शिव्याशाप द्याव्या. आदित्यला मारावे. भावाचा खून करावा असं वाटलं. पण मी गप्प बसले. मला आवाज तरी होता का? देवबाप्पा कधी भेटला तर त्याला विचारायचं आहे. त्याचे डोळे बंद आहेत का?

ज्या बहिणीला तासाच्या हिशेबाने कॉलेजांमध्ये, संस्थांमध्ये नाचवले होते. तिला पांघरायला दवाखान्यात एक चादरही त्या भावानं दिली नाही. डास चावत होते. पण मला डासांपासून वाचवायला मच्छरदाणीचाही अधिकार नव्हता. मी मुलगी होते ना! मी चांगली राहीले, पण तरीही माझी किंमत त्यांच्या लेखी तेवढीच होती. मी मिसफिट होते. माझं कुणीही नव्हतं. मीही कुणाची नव्हते. मला आठवले वडिलांची बाकीची जमीन विकण्याच्या मुखत्यार पत्रावर, शपथपत्रावर जिवाजी भाऊंनी, चार साक्षीदारांसमोर सकाळी पुन्हा माझी सही घेण्यात आली. नऊ वाजता भावाने मला मुंबईचे एसटी बसमध्ये बसवून दिलं. तो हसला. देवळात फसवून मला नेले. तेव्हासारखाच हसला. साधारण दहावीस किमी गेल्यावर बस थांबली. लंपट आदित्य पाटील आत आला. त्याने माझ्यासाठी एक बक्षीस आणलं होतं. ते देऊन तो उतरून गेला. आदित्यची शेवटचीच भेट होती व दिलेली भेटही शेवटचीच होती. मी घाईघाईने ते आवरण काढलं. ते बक्षीस होतं `चांदीच्या पिंजऱ्यातील एक मैना. ' मैना घायाळ झाली होती. तरीही बाहेर यायला धडपडत होती. बाजूच्या सीटवरची मुलगी म्हणाली, `मैना थोडा वेळ फडफड करेल. स्वतःला घायाळ करेल, पण लवकरच तिला पिंजऱ्याची सवय होईल. स्त्री जात आहे. नंतर पिंजरा उघडलात, तरीही ती बाहेर जाणार नाही. बाहेरची जनावरं खाऊन टाकतील ना! मैना ह्या भीतीने खचेल, ती पिंजऱ्यातच झुरून मरेल. '

मला वाटलं माझं लग्न झालं असते तर मलाही हिच्याएवढी मुलगी असती. मीसुद्धा माझ्या मुलीला पिंजऱ्यातल्या मैनेप्रमाणे वाढवलं असतं का? सर्वच पिंजरे दिसतात का? सर्वच पिंजरे दुखावतात का? पिंजरा म्हणजे काय? सुख की दुःख? संरक्षण की पारतंत्र्य?

मी बसने मुंबईत आले. भारतातून परत जायचे होते तो दिवस आला. मी तो पिंजरा व्हरांड्यात ठेवला व दार उघडलं. मैना अविश्वासाने बघत बसून राहीली व नंतर उडाली. एअरपोर्टवर ना आदित्य आला ना जिवाजिभाऊ आला. भारत देशाच्या त्या मातीला मी नमस्कार केला. ह्या भारत देशातही माझं कुणी नव्हतं त्या परदेशातही कुणी वाट पाहणारं नव्हतं. कुणी तरी असतं म्हणून जगावंसं वाटतं का? पण तरीही जगायला तर हवंच असते.

विमानाच्या दिशेनं मी माझे बॅगेज ढकलत नेऊ लागले. वाटलं ओझं फारच झालं आहे. थोडं फेकून द्यायला हवं. विमानाच्या शिडीवरून मी कुणी दिसतं का पाहू लागले... माझ्या देशाची जमीन, ते आकाश मी डोळे भरून पाहून घेतले. प्रेमाचा संबंध मेंदूशी असतो का हृदयाशी? की नजरेशी असतो? नजरेनेच मी भारत देशाचा निरोप घेतला.

आदित्यला हवं होतं खरंतर फक्त शरीरच, पण प्रेमाचा बुरखा बुरखा पांघरूनही (!) त्याचा लोचटपणा दिसल्यावर मला माझ्या भूतकाळातील प्रेमाची, ओळखीची आठवण झाली. भूतकाळ म्हणजे काय? जर तो काऴ परत येत नाही, तर त्याला आपण कल्पना मानून सोडून का देत नाही? मी का आले? माझं इथं कोणतं धन पुरलेलं होतं की मी भारतात आले? या देशात मला कुणी आणलं? माझ्या प्राक्तनाने! आयुष्याचा एवढा गहन विचार कुणी करत असेल? मागे परदेशी जाताना मी निराश मनानं गेले. निरीक्षण करू लागले. जीवन प्रवाह, श्रद्धा, विचार, हळूहळू मी ऑफिसमध्ये, अपार्टमेंटमध्ये/ विवाह मंडळाच्या जाहिरातींमध्ये शोधू लागले. जीवनाचे नक्की तत्त्व काय असतं? लग्न म्हणजे काय? फसवणूक म्हणजे काय? शाप म्हणजे काय? आशीर्वाद म्हणजे काय? अजूनपर्यंत मी उत्तर शोधतेच आहे.

कायम सोबत असणारे मित्र असतातच असे नाही, कायम भांडणारे शत्रू असतातच असेही नाही, मग कोणते तत्त्व माणसांना माणसांशी जोडते?

मन श्रेष्ठ की मेंदू श्रेष्ठ? पैसा श्रेष्ठ की प्रेम श्रेष्ठ?

मला ह्या भारतभेटीनं प्रेम सापडलं की वेदना वाढली? हा परका झाला? हा प्रियकर? हे भाऊ? सुखी माणसं इतकी लबाड असतात. दुसऱ्याला, त्याच्या अव्यक्त दुःखाची सुखद वेदनाही, न सोसू देणारी असतात. आदित्यची आजची लबाड खेळी, फक्त एक नवीन शरीर मिळावं म्हणून? मी त्याचा चेहरा आठवून पाहिले. उतारवय लपत नव्हतं, पण अ‍ॅण्टीएजींग लावून ते थांबवायचा प्रयत्न केला होता. आदित्यने ह्याच्या फार्महाऊसवरही माझ्यासारख्या कितीतरी जणींना आणले असेल. मौजमजा करून डिस्पोजेबल सिरींजप्रमाणे फेकून दिले असेल. त्या मुलींना/ स्त्रियांना आपण फसलो असं समजल्यावर कसं वाटलं असेल?

माणसांना, पक्ष्यांना कसे वाटते? उदाहरणार्थ कोकिळेचे घ्या? तर कोकिळीचे घरटे? कोकिळा कावळ्या घरट्यात अंडी घालते व लबाडपणे कावळिणीचा गैरफायदा घेते. कोकिळेचे घरटे कोणते? तिची पिल्लं कोणती? कितीतरी कुरूप स्त्रियांचं लग्न होतं. मग माझंच का झालं नाही. माझं घरटं कुठं आहे? ह्या विचाराने मी अस्वस्थ झाले. कायम की सामाजिक संस्थांच्या कार्यक्रमांत जाते. खूप नाचते. व्यायाम करते. पण मनातील खंत जात नाही. शरीरसुखासाठी माणसं किती खालच्या थराला जातात त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आदित्य पाटील. तर प्रेमात ती किती आध्यात्मिक स्तरावर जातात, याचं उदाहरण ईतर होती. मी मात्र कोरडीच होते.

जीवन म्हणजे पाच फूट देहाचे टिचभर सुख, की तिन्ही लोक व्यापूनही दशांगुळी उरणाऱ्या मनाचं सुख? शरीर जेव्हा हजारोंच्या उपस्थितीत वावरूनही मन मात्र एकाकीपणाचा झेंडा दाखवतं तेव्हा कळतं, जीवन हातातून निसटून गेलं आहे. वार्धक्य सामोरं आलं आहे. पैलतीर दिसू लागला आहे. पूर्वी घरटी विधवा/ घटस्फोटिता/ प्रौढ कुमारिका असे. कुटुंब-कबिल्यात ती सुरक्षित असे व रमतही असे. आता हे आधुनिक जग, प्रत्येक व्यक्ती म्हणजे स्वतंत्र बेट असते. दुसऱ्याची जबाबदारी नको. आदित्यचा प्रस्ताव म्हणजे मला वाममार्गाला वळविण्याची सुरुवात होती. मी तो नाकारला याचं मला दुःख वाटत नव्हतं. पण खेद उरला होता. हा प्रियकर जो मला अप्रिय, अनैतिक काम करायला सांगत होता, त्याचं कधीतरी प्रेम होतं का? मला खरंच तो भेटला होता का?

मी मनोरुग्ण झाले आहे का?

मला स्फिझोफ्रेनिया झाला आहे का? दुभंग व्यक्तिमत्त्वामध्ये मी गेले आहे का? असा कोण कशाला माझ्या आयुष्यात येणार आहे? लबाड, स्वार्थी, मतलबी दुनियेत, आर्ट गॅलरी काढली, तरी तासाच्या हिशेबाने भाड्याने देतात. त्याच गॅलरीत बुफे डिनर, लग्न, वाढदिवसही साजरे होतात. जग शेवटी पैशासाठीच चालतं, पैशाने चालतं. कोण भेटलं मला? माझं अतृप्त स्वप्न? माझी कल्पना? जगातून नष्ट झालेलं खरं प्रेम? सख्खे भाऊ जिवाजी भाऊ

असे वागले. या जगात भाऊ व वडील वैरी होतात हे मी जाणते. तरीही मी वेडी धावत आले भारतात, त्या घरासाठी, कुटंबासाठी; त्या जमिनीच्या ओढीनं. मृद्गंधाच्या आकर्षणाने फसले.

*आज वाटतं*
*आई तुझं लेकरू*
*वेड गं कोकरू*
*रानातले पाखरू*
*रस्ता चुकलेय,*
*रानात फिरतेय,*
*सांग मी काय करु?*

चिमणी, ग्लोबल भटकंती करतेय, पण तिचे चित्त त्या, भारतातील मातीच्या दुभंगलेल्या घरट्याकडे, मातीमायकडेच आहे. का? मी मुलगी आहे म्हणून? मी साधी आहे म्हणून? जगात असे आदित्य, असे पाटील, कित्येक भेटले, पण मी सावरलं, स्वतःला कवचात ठेवलं. कासवाप्रमाणे मन व भावना कवचाच्या आत ओढून दगडाप्रमाणे पडून राहिले.

आज मरण जवळ आल्यावर मी हळवी होते आहे. माझ्या त्या खंबीर मनाचे बुरुज कोसळत आहेत. लोक म्हणत, बरे बाई सहन केले हिने! न करून सांगते कुणाला? काय करू? कुणाला सांगू ? जगायची ओढ माणसाला पुढे खेचते ना! आत्महत्येला एवढे ग्लोरीफाय केलं जातं, पण जीवन माणसाला सर्व परिस्थितीतून तारून नेतं!

*मैं अकेले ही मजे में थी। मुझे आप किसलिए मिल गए।*

उगीच आला आदित्य आयुष्यात! आयुष्यात कधी सुख मिळालं नाही. प्रेमही नाही. आतासुद्धा पुढे आले आहे एक Indecent Proposal (भ्रष्ट प्रस्ताव) एका लबाड माणसाची लबाड खेळी आहे! “सर्व काही विकत घेता येतं” असा अहंकार समाजात कुठून आला? बरं नाटक करून, फसवून, शरीर ओरबाडून आदित्याला हवा होता तो स्वार्थ होता. आदित्याचा अहंकार सुखावणारा एक क्षण आणि तोही प्रेमाच्या बुरख्याआड दडलेला वासनेचा वणवा मला चटके देऊ लागला. वन नाईट स्टॅण्डची फॅशन भारतातसुद्धा आली वाटतं.

परदेशी जाणारे विमान सुरू झालं. शेपटीआडून दिसणारं ढगांचे कापूस

पिंजल्यासारखे पुंज, निळे-पांढरे-करडे आकाश, लाटांचा समुद्र दिसेनासा झाला. मी डोळे पुसले. पुढच्या सीटवरचा माणूस मागे वळून म्हणाला. `एक साहेब तुमच्यासाठी हे देऊन गेले. ' मी गोंधळून गेले. ती एक प्लॅस्टिकची डबी होती. प्लस्टिकच्या छोट्या डबीत कुंकू भरलेलं होतं. त्याच्यावर लिहिलं होतं- युएसए टुरला कधी येऊ? - आदित्य

ते कुंकू होते की आदित्यचे ढोंग होतं? अशा कितीजणींना ह्याने फसवलं असेल? हळदीकुंकवाला लुटावे तशा अशा डब्या लुटत असेल. ह्या चिमूटभर कुंकवासाठी, स्त्रीचा जन्म असतो का? लग्न हे प्रेमासाठी, की आधारासाठी असतं हे न कळून मी गोंधळले. लग्न ही बेडी की बंधन? नक्की काय?

हे कुंकू भांगात भरून मी सौभाग्यवती होणार आहे का? आणि क्षणभराची विवाहित होऊन परित्यक्तेचे जीवन जगणार होते. वास्तवातील नातं व कल्पनेतील नातं किती वेगळं असतं. एकदा वाटलं ही डबी फेकून द्यावी. पण मला हिंमत झाली नाही. डोळयांतून पडणाऱ्या अश्रूंनी ते कुंकू भिजत होतं. माझी आता थोडी वर्षे उरली आहेत. पुढच्या जन्मी बघूया, खरं प्रेम करणारा कुणी भेटला तर देवा पाठव, हा जन्मतर संपत आला.

त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे.

देवा, मृत्यूला तोंड देण्याची हिंमत मला दे.

ह्या जन्मी आता यापुढे कोण भेटणार? मूत्रपिंड दानानंतर आजारपणात, उर्वरित आयुष्य जाईल. एकटेपणाने जगलेले हे आयुष्य, एकटेपणानेच संपेल. बरे झालं वेळीच आदित्य दुसऱ्या बाईबरोबर मला अफेअर करताना दिसला. नाही तर मी पुन्हा आदित्यचे कपटात फसले असते. वासनेच्या वणव्यात होरपळले असते. आज मला आपली माणसे मागे सोडून पुन्हा त्या परक्यांच्या भूमीत अमेरिकेला जायचं आहे.

ती भारतातील माणसं ज्यांना मी आपली समजले, ती तरी माझी होती का? तसे सर्वजण परकेच. शेवटी आपण अदेशी, एकटेच असतो. कुंकवाची डबी दिली होती तो परिचित विचारू लागला, `महाराष्ट्र मंडळात उतरणार का? गाडी घेऊन कुणी येणार आहे का? ' मला

भारतातही कुणी घ्यायला आलं नव्हतं. आणि परदेशातही कुणी येणार नव्हतं. आई-दादांची चिमणी,  भारतात घरट्याकडे परत आली होती, पण पुन्हा उडान घेण्यासाठी लाडली अमेरिकेला निघाली होती. मी पुन्हा अमेरिकेला पोचणार होते. आता ती चिमणी भारतात कधीही परत येणार नव्हती. मी मृत्यूनंतर देहदान करून मोकळी होणार होते. माझा आत्मा प्रस्थान करणार होता. परमेश्वरा! त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे. माझं भारतात आता कुणीही नव्हतं.

शेवटी जेव्हा पैलतिरी नेत्र लागतात तेव्हा कळते सुखाची कस्तुरी मनात होती आणि त्या निरपेक्ष प्रेमाच्या अपेक्षेने आपण यात्रा केली. ती यात्रा सफल करणारे अव्यक्त प्रेम तर फक्त परमेश्वरानेच केले.

त्या चिरंतन प्रेमाला आलिंगन देण्यासाठी शेवटी माणूस म्हणतो.

त्या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे!

शेवटी हा नश्वर देह इथेच राहातो. मातीत मिसळतो आणि आत्मा म्हणजेच, ते परमेश्वररूपी बीज चिरंतन यात्रेला जाते.

................................................................................

## प्रकरण सहावे

परदेशातील त्या जेएफ़के विमानतळावर मी उतरले तेव्हा मी अजूनच गोंधळले. केटीला फोन केला. सरळ तिच्याच घरी गेले. पोचताच मी अंथरून धरले. मला ताप चढला. माझ्या उलट्यांनी जीव हैराण झाला. ऑफिसात, उत्तम कामगार म्हणून पुरस्कारासाठी बऱ्याच जणांचं नाव सुचवलं गेलं. त्यात मी होते, रॉबर्ट होता. मला सध्या कशातही रस वाटत नव्हता. मी प्रेमाची भुकेली झाले होते; पण माझं प्रेम म्हणजे वासना नव्हती. मला ग्रेसी भेटायला आली, `भारतीय म्हणून, अविकसित देशातली असल्याचे दहा मार्क मिळाले, तर तुला बक्षीस मिळेल. पण रॉबर्ट त्याला जास्ती लायक आहे. ' ती म्हणाली. रॉबर्ट बरेच दिवस आला नव्हता. जेव्हा आला तेव्हा मी म्हणाले,

`रॉबर्ट मला बक्षीस नको, पण तू मित्र राहा. माझा शत्रू बनू नकोस. मी तुझ्या स्पर्धेत कधीच नव्हते. '

`तू लवकर बरी हो, म्हणजे बक्षीस मिळो न मिळो, सा शर्यत तूच जिंकशील' रॉबर्ट.

`कशी? ' मी

`तू जिंकलीस तर बक्षीस तुला, हरलीस तर ते संत्र्याचे झाड घरट्यासह तुला बक्षीस देईन. ' रॉबर्ट.

रॉबर्टने माझ्या केसात हात फिरवला व म्हणाला, `सा, कधी कधी तू मला माझ्या फोटोतल्या आईसारखी वाटतेस. पार्टीपुरता पाच मिनिट तुला घेऊन जाईन. माझ्या आयुष्यातील या सर्वोच्च आनंदाच्या क्षणी तू हवी होतीस. सा, कशाला गेलीस भारतात? आजारी पडायला? सांग ना का गेलीस? अगं आई-वडिलांनंतर आधार कुणाचाच नसतो. आपणच स्वतःला सावरायचं पडत झडत उभं राहायचं. मी जन्मताच माझी आई वारली. मी

असाच वाढलो. कुणी मदत करायचे नाही, मी केले असे श्रेय मागायचे. पैसे मागायचे. मित्रमैत्रिणीही अशा अबोल स्वभावामुळे मिळाल्या नाहीत. '

`माझं चुकलं. मला चकवा झाला' मी.

केटी कॉफी घेऊन आली व रॉबर्टला म्हणाली, `तिला रडवू नकोस. ती सांगत नाही. तिचं काही तरी बिनसलं आहे. ' नंतर मला म्हणाली, `सा त्याच्या रागाकडे दुर्लक्ष कर त्याचं प्रेम बघ. '

रॉबर्ट म्हणाला, `सा, आम्ही मित्र नाही का? सांग'

केटीला संध्याकाळी मी म्हणाले, `केटी माझ्याबरोबर डॉक्टरकडे चल'

तिने विचारले, `प्रसूतितज्ञांकडे? अमेरिकेत वैद्यकीय सेवा खूप महाग आहे. '

मी म्हणाले, `नाही गं! मी गरोदर नाही. वेगळाच आजार आहे. '

`मी मैत्रीण नाही का? सांगत का नाहीस? ' केटी.

`नंतर सांगेन'

डॉक्टरने पोटावरच्या जखमेवर ड्रेसिंग केले. आम्ही दोघी घरी आलो. मी म्हणाले `केटी मी उद्याच्या,  रॉबर्टच्या कार्यक्रमानंतर नक्की सांगेन. मला काय झालं ते! केटी पण आपण कायद्यानं काही करू शकत नाही गं! फसवणूक माझ्या नशिबी होती. ' मी रडू लागले.

केटीला वाटलं, माझ्यावर कुणीतरी अतिप्रसंग केला. ती माझ्या पाठीवर थोपटत राहिली, तरीही, तशी ती खूपच सकारात्मक दृष्टिकोनाची होती. केटीसारखी मैत्रीण नसती तर मी नक्कीच मेले असते. प्रत्येक वाईट प्रसंगी देव माझ्यासमोर, बुडत्याला काडीचा आधार असावा तसा कुठलातरी,  काडीचा, छोटासा आधार ठेवत होता. देवाच्या त्या दयेबद्दल आभारच मानायला हवे असुरक्षित मुलींचे रक्षण, सर्वार्थाने देवच करतो. कधी वाटायचं, चांगलं राहून आयुष्यात काहीही मिळाले नाही. आपण रॉबर्टबरोबर लीव्ह-इन रिलेशनमध्ये राहावे पण त्या स्वार्थी विचाराची लाज वाटायची. भारतीय संस्कृतीत जे मंगळसूत्राचे काळे मणी बांधावे लागतात, तो मोह, ते मणी रात्र-रात्र बिछान्यात टोचत राहात. मरण समोर दिसे. कधी असे

वाटत असे, आईने मुलगी म्हणून, मला गर्भातच मारायला हवे होते.

पोटावरची जखम दुखत होती. जिवाजीभाऊ पूर्वीही परका होता. आताही परका होता. हा देश पूर्वीही नावापुरता म्हणण्यापुरता माझा होता. या देशात पूर्वीही माझं कुणी नव्हतं आताही नाही. मला आठवले परदेशातल्या विमानतळावर विमान उतरले तेव्हा मी केटीला फोन लावला व रडू लागले.

ह्य देश कुणाचा? इथे तरी माझं कोण होतं? मी भारतात जन्म का घेतला? केटी मी तुझ्याकडे विश्रांतीसाठी येणार आहे. मी तिच्या घरी पोहोचले. तेव्हा पाय भरून आले होते. तिचा बंगला सुंदर, प्रशस्त होता. उगीचच त्या दरवाजात हसत आदित्य उभा आहे असं मला वाटलं. पण मी तो पापी, पतनाकडे नेणारा, विचार मागे सारला आहे.

एक दिवस पार्टी ठेवली होती. तो आदर्श कामगार पुरस्काराचा कार्यक्रम होता. ऑफिसचे सर्व मित्रमैत्रिणी आले होते. तब्येतीमुळे काम घरी नेण्याची परवानगी दिली. तरी बक्षीस समारंभाच्या दिवशी पाच मिनिटासाठी रॉबर्ट मला ऑफिसमध्ये घेऊन गेला. बॉस म्हणाले, `जे लोक चांगले असतात त्यांचं चांगलं व्हायला हवं. `तिच्या गैरहजेरीत तिची किंमत आम्हाला कळली. आम्ही तिला आमच्या संस्थेची सर्वोत्कृष्ट कर्मचारी हे बक्षीस देत आहेत. बक्षिसाचं पदक मी हातात वर उंच धरलं. टाळयांचा कडकडाट होत होता. माझ्या डोळयांतून घळाघळा पाणी वाहत होतं. आता ह्या देशातून, संस्थेतून मला कुठेही जायचं नव्हतं.

मला सर्वांनी आग्रह केला. भारतीय गाणे म्हण. तिथल्या वातावरणाने मी भांबावून गेले. सगळयांच्या नजरा माझ्यावर खिळल्या होत्या. सिनेमात जसे नायिका पार्टीत केंद्र बिंदू असते. अगदी तसेच, याक्षणी घडले होते. मी मराठी गाणं म्हटलं.

*मुका आंधळा मी बहीरा*
*पडेन का तुझिया डोळा*
*जखमी होऊन आलो आहे तुझ्या मंदिरात*
*राहू दे घरटे माझे तुझ्या अंगणात*
*शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात*

तिथून मी गाडीने घरी आले आणि पुन्हा मृत्यूचे अप्रिय जीवनाचे विचार छळू लागले. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातली मी म्हणजेच सारिकाने महाविद्यालयीन शिक्षण घेतले. त्याचवेळी निवडणुकीच्या माहोलातून धामधुमीतून माझी ओळख व भेट आदित्य पाटील नामक तरुणाशी झाली. तो दुर्दैवाने अण्णासाहेब पाटील या प्रतिष्ठिताचा, नातेवाईक होता. पुढे प्रचारातून आम्हाला एकमेकांचा प्रासंगिक सहवास लाभला. प्रेम जडले. मला स्वप्नातला राजकुमार भेटल्याचा आनंद झाला. अन् हा आनंद क्षणभंगूरच ठरला. माझी स्वप्न कुस्करली गेली. वासनेतून मी दुभंग पावले. आणि मग या प्रसंगानंतर प्रेम विखारी असल्याचा मला अनुभव आला. गावाचा, गावातल्या माणसांचा मला उबग आला. आपले म्हणविणारे दूर गेले. घरातल्यांनीसुद्धा मला दूर लोटले. मी हतबल झाले. पावलोपावली ठेचकाळले. दत्तक गेले. एकटी जगले.

मोठ्या धीरानं अमेरिकेत आले. तिथे स्थिरावतानाही माझा भूतकाळ माझी पाठ सोडत नव्हता. इथेच मला रॉबर्ट भेटला. केटी, ग्रेसी अशा चांगल्या मैत्रिणी भेटल्या. त्यांच्या बरोबर माझं नवं मैत्र जुळलं. हरवलेला आनंद पुन्हा चेहऱ्यावर उसळू लागला. पण नियती तिचे डावपेच ठरलेले असतात. त्या डावपेचामुळेच मला भावाचे कारणाने, भारतात जाणेसाठी परदेश सोडावा लागला. मातृभूमीत आले तेव्हा सगळेच बदललेलं होतं. पुन्हा माझ्याशी जुनं सख्य जुळवून भाऊ-वहिनींनी मूत्रपिंडाची मागणी केली. आणि इथून माझ्या जीवनाची थांबलेली फरफट नव्याने भीषण स्वरूपात सुरू झाली. कुणीच माझ्या बाजूने नव्हते. आदित्य पाटील इथेही खूप वर्षांनी समोर आला, पण त्यांची मूळ खल प्रवृत्ती कायम होती. या चक्रात अडकलेली मी पुरती हतबल झाले. मूत्रपिंडदान-खंडणी वसुली झाली. मला जीव नकोसा झाला. आधाराचे हात नाहीसे झालेले होते. मग परदेशी परत जाणं हाच एकमेव पर्याय समोर होता. कटू अनुभव, वेदना यांना तिलांजली देत, मी सारिका रॉबर्ट, केटी यांच्या सान्निध्यात रमले. मी स्वतःचं अवघडलेपण लपवले.

तरीही मी अंथरुण धरलं. केटी म्हणाली, `माझेकडे, खूप दिवस राहिलीस. कधी जाणार आहेस. ? '

`केटी तू मला हाकलून देऊ नको. मला अगदी बरं नाही. माझ्या भावाने माझं मूत्रपिंड घेतलं आहे. माझं मेजर ऑपरेशन झालं आहे. मी तुला सांगणार नव्हते, पण मला वेदना सहन होत नाहीत. मला दुःख असह्य झालं आहे. मी उगीच भारतात गेले. केटी मी आता जगणार नाही. ' त्या दिवशी केटी ऑफिसला गेली नाही. तिने माझेसाठी, घरून काम करायची परवानगी काढली.

मूत्रपिंडाचं कळताच केटीला शॉक बसला. ती रडू लागली. मी म्हणाले, `मला भावानेसुद्धा लुबाडले? केटी, काही माणसं मेली तरीही डोक्यात जिवंत राहतात विचारांच्या रूपाने. काही हृदयात भावनांच्या रूपाने. तर काही भूताने पछाडावं तशी ती जीवनभर पछाडत राहतात. अण्णासाहेब मरून काही वर्षे झाली. तरीही त्यांनी केलेले अत्याचार मला आयुष्यभर छळतात. ' मी जवळजवळ नैराश्याच्या झटक्यात गेले. जीव जाईल वाटू लागले. केटीला काय करावं सुचेना. मी फसवणुकीच्या आगीत जळत होते. `तू आधी का सांगितलं नाहीस! ' केटी म्हणाली व माझे पाय दाबत बसली.

माझ्या ऑफिसमधल्या कामाला रॉबर्ट व केटी मदत करत होते. लॅपटॉपवर काम करायलाही शरीरात त्राण नव्हतं. रॉबर्टने विचारलं, `सा, नक्की काय झालंय तुला? सांगशील का? ' मला त्याला काय सांगू आणि कसं सांगू हा प्रश्न पडला होता. मी मनातून पार खचले होते. आता याक्षणी, या इथे या केटी, रॉबर्ट या दोघांशिवाय भक्कम आधार कुठे होता? माझ्या गप्प बसण्यानं त्याने वेगळाच तर्क काढला. बहुदा सा ही आई होणार असेल! अनवेड मदर. तिथल्या परदेशी, वातावरणात यात काहीच अशक्य नावीन्य किंवा कुतूहल नव्हतं.

`हे बघ, तुला आता सांगणं अवघड जातंय ना! ठीक आहे. नंतर बोलू. अगोदर तब्येतीची काळजी घे. '

रॉबर्ट. ने केटीला हळूच कानात म्हटलं, `तिचं अॅबॉर्शन करून घे. '

केटी त्याच्या बोलण्याकडे पाहतच राहिली. त्यावर प्रतिक्रिया काय द्यायची हेच तिला कळेना. रॉबर्ट किती सहज बोलून गेला. मग मीच बडबडत राहिले. `केटी माझं ऑपरेशन

झालं, ठीक आहे. पण त्यानंतर कुणीच माझी काळजी घेतली नाही. मला आराम हवा होता. औषध वेळेवर देणारं हवं होतं, परंतु माझ्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष झालं. माझा भाऊ माझं मूत्रपिंड घेऊन जगला आणि मी मात्र कृश झाले. मी मरायला टेकले. दोन दिवस ग्लानीतच गेले.'

एक दिवस रॉबर्ट आला. मला डॉक्टरकडे चल म्हणाला. मी टाळलं. केटी बाहेर आली व रॉबर्टला म्हणाली, `मी एक सांगते. तुला सांगू नको असे `सा' ने सांगितले होते. तरीही सांगते. '

केटीने रॉबर्टला त्यांच्या फास्ट इंग्रजीत माझ्या किडनी ऑपरेशनबद्दल सांगितलं. धक्का बसून रॉबर्टने तोंडाचा आ वासला व त्याच्या निळया डोळयांत पाणी तरळलं. त्याने तोंडावर हात ठेवला. आत येऊन तो माझ्याजवळ बसला व सरळ मला त्याने दोन हातावर मला उचललं आणि दारातून रस्त्यावर घेऊन आला. जाणारी टॅक्सी थांबवली. कंपनीतर्फे मोठ्या हॉस्पिटलमध्ये ठेवलं. मी म्हणाले,

`रॉबर्ट सर माझ्याकडे पैसे नाहीत. ' मी.

`तू माझी मैत्रीण आहेस. '

`पैसे खूप लागतील सर. कुठून आणाल? ' मी.

'कंपनीकडून बिल मिळालं नाही तर मी माझी किडनी देऊन पैसे जमवीन. मी तुला मरू देणार नाही. ' रॉबर्ट ठामपणे म्हणाला. दररोज रॉबर्ट येत असे.

जेवण खाण, औषधे, विश्रांती, मानसोपचार घेऊन माझा पुनर्जन्म झाला. नंतर फॉलोअप औषधोपचार व विश्रांतीने बरं वाटलं. आमची तिघांची घट्ट मैत्री झाली. रॉबर्टने मला एक दिवस माझ्याशी लग्न करशील का म्हणून विचारलं. माझं मन अव्यक्त असा आक्रोश करू लागलं. `रॉबर्ट माझ्या आयुष्यात यायला तुला खूप उशीर झाला. ' मी

मी कोषात शिरलेले पाहून रॉबर्ट म्हणाला.

`तुला मी आवडत नसेल तर, मी पैसे खर्च केले त्याची परतफेड म्हणून हो म्हणू

नकोस. तुझी इच्छा नसेल तर नाही म्हण. मी तुझा मित्र राहीन. ' तू पवित्र आहेस याचाच मला खूप आनंद झाला आहे. मला तू गरोदर वाटलीस. माझं मन अस्वस्थ झाले. ' रॉबर्ट म्हणाला,

`माझे पहिले प्रेम आदित्य होतं. पण तो माझा भूतकाळ होता. लग्न झाल्यावर निर्लज्जपणे पत्नीला फसवून चोरून मारून माझ्याकडे तो शरीर मागत होता. माझ्यासारख्या अनेकींकडून शरीराची अपेक्षा करणारा, आदित्य प्रेमाच्या लायक होता का? आदित्य स्वतः सुखी आहे. मी त्याला विसरायला हवं. पण केवळ तडजोड म्हणून लग्नाला हो म्हणायला माझं मन तयार नव्हतं. मी रॉबर्ट कडून दोन दिवस मागून घेतले. त्या रात्री उशिरापर्यंत मी कॉम्प्लेक्समधल्या झोपाळयावर बसले आणि नवल झाले. समोरच्या झाडाखाली नेहमी जिथे आदित्य उभा असायचा भास व्हायचा, तिथे आज रॉबर्टचा भास झाला. थोड्या वेळाने रॉबर्ट आला व म्हणाला `दोन दिवसांऐवजी दोन वर्ष विचार कर, पण आता घरी जाऊन विश्रांती घे, बरी हो. '

रात्रभर एक रात कीडा किरकिर आवाज करीत होता. जाग आली की तो आवाज मेंदूपर्यंत कापत जातो. असे वाटे, एवढासा छोटा कीडा पण प्रतिकार करतो. आवाज उठवतो. इतरांना जागे करतो.

भुशासारखा बारीक बर्फ पडल्याचा चुकचुक आवाज येत होता. पण छतावरचं साठलेलं बर्फ जमून त्याचे तुकडे रस्त्यावरच्या अंगणातल्या पानांवर पडले की मोठा आवाज होत असे. रात्र हा माझा सगळयात वाईट पार्ट असे. रात्री पाणी प्यायला, उठायला सुद्धा, मी घाबरत असे. देवाने अशा भित्र्या मुलीवर एकटं राहायची वेळ आणावी? फोबियावर डॉक्टरचे औषध घ्यावं की काय?

पण कशाकशावर औषध घेणार?

इथे विदेशात औषधोपचार महागही आहेत.

मी एवढी सैरभैर का झाले. मला गावातल्या कुणाची दृष्ट लागली की कुणी चेटूक केले? छे! चेटूक, ब्लॅक मॅजिक अशा अंधश्रद्धांवर विश्वास ठेवू नये! मनातील दोन व्यक्तींचे द्वंद्व चालू होते. भारतीय सारिका, विदेशी सा शी भांडत होती. विजय कुणाचाच होत नव्हता. रॉबर्ट

आला. मला म्हणाला,

`रिलॅक्स. तू नाही म्हटलंस तरी चालेल. प्रेम म्हणजे काया की छाया? Presence की Absence? की दोन्ही! माझंच चुकलं. मी तुला प्रपोज केलं. '

`मला स्वतःला निर्णय घ्यायला भीती वाटते. ' मी

`माझ्यावर सोड. ऑफिसमधले निर्णय सोडतेस तशीच! ' तो.

`ऑफिसचे निर्णय सोपे असतात. irrevesible नसतात. ' मी.

`खरं आहे. एकदा हात पकडला की सोडायचा नाही हं. ' तो.

त्याचे निळे डोळे खूपच गहीरे वाटत होते; समुद्रासारखे, आकाशासारखे. मी त्याच्याकडे एकटक पाहिलं.

`मी तुला खूप त्रास देते ना? ' मी.

`तुलासुद्धा त्रास होतोच आहे ना! मला त्रास होतो आहे, कारण तू दुःखी आहेस. चांगुलपणावर तू विश्वास टाकायला तू घाबरते आहेस. ' रॉबर्ट.

एक बरं होतं. विदेशात कुणी कुणाच्या खाजगी गोष्टीत बिलकूल लक्ष घालत नाही. मी भारतात सीतापूरला असते तर, मला बदनामच केलं गेलं असतं. कामानिमित्त बायकांचं घराबाहेर पडणं जर आपण स्वीकारलं, तर स्त्री-पुरुषांमधली कामानिमित्त झालेल्या ओळखी व मैत्री आपण का स्वीकारली नाही? परदेशात तसं नव्हतं.

रॉबर्टने त्याच्या वडिलांचा आलेला मेल मला वाचायला दिला.

रॉबर्ट.

`माझा चॉकलेट बॉय आता स्वतःचं लग्न ठरविण्याएवढा मोठा झाला. ह्याचा मला खूप आनंद झाला. तुझ्या आईच्या मृत्यूनंतर मी तुला आईप्रमाणे सांभाळलं. तुझे आईवडील मीच झालो. तुझी भावी पत्नी भारतीय आहे, याचा मला आनंद वाटला. भारतीय स्त्रिया खूप चांगल्या पत्नी असतात. एक गोष्ट सांगतो, थोडे उशिरा लग्न करण्यात धोका असतो.

तो म्हणजे आपले विचार हट्टी झालेले असतात. फार तडजोड करावी लागते. भारतीय स्त्रियांचा दुसरा गुण म्हणजे त्यांची सहनशीलता होय. अगदी कोसळेपर्यंत सहन करत राहतात. तुझ्या आईनेही तेच केले. योगायोगाने दोघी भारतीय आहेत. `सा'च्या तब्येतीची काळजी घे. तुझी निवड मला पसंत आहे. चर्चमध्ये तुमचं साधेपणानं लग्न करूया.

मी ऑस्टिनला येईन.

तुझा डॅडी. '

मला भीती वाटली. माझ्याबद्दल काही वेडेवाकडे कळले तर हे सर्वजण मला झिडकारतील. मी झोपले. स्वप्नात मी दादांशी गप्पा मारत होते. दादा म्हणाले, `इतिहासात खास उल्लेख आहे की, शिवाजी महाराजांकडे भेट म्हणून एकदा देखणी सुभेदाराची सून आणण्यात आली होती. पण छत्रपती शिवाजी महाराजांनी तिला सन्मानाने साडी-चोळी देऊन आदराने स्वगृही पाठवले. शिवाय त्यांच्या मुखातले उद्गार सुप्रसिद्ध आहेच,

अशीच आमुची आई असती सुंदर रुपवती
आम्ही सुंदर झालो असतो वदले छत्रपती'

त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या देशातील लाडक्या लेकीची ही गोष्ट आहे. ही लाडली तुमच्या घरची? तुमच्या शेजारची? तुमच्या बघण्या ऐकण्यातली? इतका संघर्ष करणारी मी लाडली अबला कशी म्हणता येईल? स्त्रीही अबला की सक्षम?

सारिकाचा हा संघर्ष स्त्रीचा की संस्कारांचा! या कथेत जेव्हा जेव्हा सारीकावर अन्याय झाला व सारिका लढाईत हरली! घायाळ झाली! धारातिर्थी पडली! ती हार कोणाची होती? तिची? की समाजाच्या संस्कारांची? सद्‌गुणांची की समाजाच्या निष्क्रियतेची? असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासलेले अनेकजण अनेक सारिकांचे, लाडलींचे आवाज दाबण्यासाठी पुढे आले असतील. लौकिकार्थाने जिंकले असतील, पण तो विजय, राक्षसी विजय होता. त्यात हार माझी नव्हती. तर समाजाची होती. अशा लाडलीला छळणाऱ्या हातांना, मारणाऱ्या गुंड हातांना, शिवाजी महाराजांनी हात तोडण्याची शिक्षा फर्मावली होती. आता शिवाजी महाराज नाहीत. आपल्या सर्वांनाच ते काम करायचे आहे.

मी रॉबर्टला सर्वकाही सांगितले. अण्णासाहेबांच्या माझ्यावरील अत्याचाराबद्दलही सांगितले. रॉबर्टने एक ग्रीटिंग आणले. त्यात लिहिले होते.

`सर्व हरवले तरी उरतो त्याला भविष्यकाळ म्हणतात. '

मी तो मजकूर वाचला आणि माझी अस्वस्थता थोडी कमी झाली. मी सा, सारिका, माझेतील लाडली सुखावली. प्रेम म्हणजे काय? इच्छा, जपणूक, वेदना, सहनशीलता, दुःख की एक पत्ता माहीत नसलेले लिहून ठेवलेले पत्र? माझ्यावर कुणीतरी खूप प्रेम करतं ही सुखावणारी भावना! ब्रेनमध्ये शिरलेला घातक खोपडी व्हायरस? की श्वासातील सुगंध? रॉबर्ट त्याच्या विलाकडे वळला. ग्रेसी कारमधून `रॉब्ज' म्हणून हाक मारत उतरली. तिने बेडकाच्या कातडीसारख्या डिझाईनचा ड्रेस घातला होता. घट्ट व उत्तान वेशभूषेत ती अधिकच स्मार्ट दिसत होती. विचित्र हावभाव, हातवारे करत ती रॉबर्टच्या विलात त्याच्या पाठोपाठ शिरली. माळी विलाच्या दारात उंच वाढलेल्या कंपाऊंडची झुडपे कापत होता.

रॉबर्टने त्याला बहुतेक घरी जायला सांगितलं. कारण तो माऴी त्याची सायकल घेऊन, चष्मा सावरत निघून गेला. मी केटीला म्हणाले, `रॉबर्ट. लहान आहे ह्याच्याशी लग्न केलं तर हा तरुण मुलींबरोबर जाईल ही भीती घेऊनच मला त्याच्या बरोबर वावरावे लागेल. '

केटी म्हणाली, `त्याला तरुण मुलींबरोबर जायचं असतं तर तुला लग्नाबद्दल त्याने कशाला विचारलं असतं? '

मी अडखळत म्हणाले, `भारतात म्हणतात, सुशिक्षित स्वयंपाकीण हवी म्हणून परदेशी लोक, भारतीय मुलगी करतात. '

केटी म्हणाली, `छे, तुला माणसं ओळखता येत नाहीत. अगं त्याला काही मुलींची कमी नाही. तो तुझ्यात गुंतला आहे. हे बघ, माझा नवा मित्र येणार आहे. मी जाते. ' मी कॉम्प्लेक्सच्या बागेत बसून राहीले. काही वेळाने पुन्हा माझे घरी रॉबर्ट आला. रॉबर्टने माझ्यासाठी टिफीन आणला होता. बाहेर वादळी हवामान होते. `तू होकारच दिला पाहिजे हा माझा आग्रह नाही. आपण मित्र होतो; मित्र राहू. आपण दोघेही इतके साधे आहोत की, असे कुठे

आपण रिलेशनमध्ये राहणार आहोत. ' आम्ही माझ्या निवासस्थानाकडे चालू लागलो. थोडी चक्कर येत होती. त्याने मला हाताने आधार दिला. त्या आधारात चोरट्या स्पर्शाची हाव नव्हती, शरीर संबंधाचे मागणं नव्हतं, की वासना नव्हती. लहान बाळासारखे मऊ मऊ हात आणि ओलसर थंड थंड स्पर्श होता. जो मला सुखाचे आश्वासन देत होता.

रॉबर्टने मला माझ्या रूममध्ये पोहोचवले. बाहेर बर्फ पडू लागला होता. त्याने मला स्लीपिंग बॅग (झोपायची चेन असलेली दुलई) मध्ये झोपायला लावलं. गरम कॉफी दिली. औषधं दिली. लॅचचं दार ओढून, रेनकोट घालून, बर्फातून,  तो त्याच्या विलाकडे रवाना झाला. जाताना त्याने रूमहिटर चालू केला. थोडं गरम वाटू लागलं. माझ्या उशाशी त्याने एक टोस्ट सॅण्डवीच ठेवलं होतं. रॉबर्ट माझा कोण होता? माझं मनसुद्धा याची काळजी करू लागलं. बॉयफ्रेण्ड म्हणून नव्हे, तरी मित्र म्हणून मला त्याला गमवायचं नव्हतं. पण मी हलूसुद्धा शकत नव्हते. एवढा प्रचंड थकवा आला होता. झोप डोळयांवर येत होती. स्वप्नात आई-दादा दिसले.

मी आईला म्हणाले, `आई मला रात्री अंधाराची खूप भीती वाटते ग! आई मला मिठीत घे ना! ' आईने मला जवळ घेतल्याचं जाणवलं. ती म्हणाली, `धर्म माणुसकीचा असतो. तू गणपतीला पूजते. तो जीझसला पूजतो. बाकी माणूस सर्वत्र सारखाच असतो. ' मला झोपेतही जाणवलं. या घरात खायला काहीही नव्हतं. रॉबर्टने काही आणलं नाही तर,  उद्या उपासमारीने मरायची वेळ येईल.

मी आईला म्हटले, `आई, मी काय निर्णय घेऊ? '

आई म्हणाली, `कधी कधी आपल्याच मनाचा आवाज ऐकून आपण फसतो. तर कधी मनाचा आवाज न ऐकण्याने फसतो. देवाने हे दान दिले आहे, रॉबर्टला स्वीकार, तुझ्या शेतकरी दादांचे डोळे निळे घारेच होते ना! '

रॉबर्ट माझ्या लेकीला सुखात ठेवेल.

मला जाग आली. बाहेर खूपच जोरात बर्फ पडू लागला होता. बर्फाच्या तुकड्यांचा खडखड आवाज येत होता. मी अंधारात, डोळे फाडून फाडून बघितलं. उतरत्या

पानांच्या झाडांवर बर्फाचे खडे जमले होते तर जमिनीवर बर्फाची चादर अंथरली होती. रॉबर्टचा विला, दिसेनासा झाला होता. मला रॉबर्ट व्यवस्थित पोहोचला की नाही याची काळजी वाटू लागली. दुसऱ्या दिवशी संपूर्ण दिवस घराबाहेर पडता आलं नाही. फ्रीजमधील एक पावाचा तुकडा ओव्हनमध्ये भाजून जामबरोबर खाल्ला. पिझ्झा ऑर्डर केला. त्यांनी बर्फामुळे पाठवू शकत नाही, असं सांगितलं. केटीचा फोन आला. ती म्हणत होती, तुझे तू बघ, मला रडत आयुष्य काढायचं नाही. माझा मित्र मी बदलते. नाही पटलं सोडते. पुन्हा बदलते. नोकरी सुटली. रडत नाही. सोळाव्या वर्षांपासून मी स्वतंत्र हॉस्टेलवर राहते. माझा भाऊ जिवंत आहे, की नाही, मला माहीत नाही. माझ्या आईवडिलांना फोन करते. कधीतरी ख्रिसमसला जाते. पण मला फारशी कुणाची आत्मीयता नाही. मी वर्षानुवर्षे ट्राय अॅण्ड एररमध्ये मित्र शोधते. मला रॉबर्टने लग्नाचं विचारलं असतं तर मी पूर्ण ऑफिसला पार्टी दिली असती बघ! तू कर काय ते.

केटी दुसरे रात्री आली. तिचे ते रोजचंच रुटीन झालं होते. लिपस्टिक लावली. कसल्या तरी गोळया खाल्ल्या आणि जायला निघाली. मला म्हणाली, `बरी हो, यायचं का डिस्कोमध्ये? ' व हसून बाय करून निघाली.

आज रॉबर्ट आला नाही. रॉबर्ट बर्फाखाली सापडला की काय? की याला न्युमोनिया झाला? आज हा आला नाही? मी केटीला फोन केला, `केटी रॉबर्ट आला नाही. '

केटी म्हणाली, `तुझं दुर्मुखलेलं तोंड बघायचा त्याला कंटाळा आला असेल. ग्रेसीबरोबर गेला असेल. '

मी म्हणाले, `केटी तू मला समजून घे. '

केटी म्हणाली, `ठीक आहे. मी काय करू मग आता? '

`येताना जेवायला काहीतरी आण. शिवाय एखादं स्वेटर आण. भावाने इम्पोर्टेड सर्वच कपडे ठेवून घेतले. मफलरसुद्धा नाही माझ्याजवळ. '

मला हे केटीला सांगायला लाज वाटली. खरं तर भावाला वागायला लाज

वाटली नव्हती. मला सांगायची का वाटावी? पूर्ण दिवस बर्फ पडत होता. एकाकीपण खायला उठले. वाटलं संपवावं हे आयुष्य! ह्या वेदना, हे दुखणं पूर्ण संपावं. पुन्हा झोपले. स्वप्नात नवीन दादा दिसले. म्हणाले, `झाशीची राणी लढत राहा. ' बहीण आठवली. प्रेम करणारी, पण सासरच्यांना घाबरून, मदत करू न शकणारी, साधी स्त्री होती. भावाच्या धाकाने दवाखान्यातसुद्धा, भेटायला आली नव्हती. ऑफिसमधल्या उत्सुक-अनुत्सुक, कुतूहलमिश्रित साधे लोक, ठीक नजरा आठवल्या. मी दिवसभर पडून होते. पाय चालत नव्हते. या जगात चांगल्या माणसांचे वाईट का होते?

माझ्या नकारानंतर रॉबर्ट जर निघून गेला तर माझे काय हाल होतील याची झलक मी दोन दिवस पाहिली. पुन्हा एकदा `अलकेमिस्ट' वाचायला घेतली. गुराखी खजिना शोधतच होता. खजिना कुठे होता? वादळ शमले. तोच पोलीस व्हॅनचा आवाज आला. समोरच्या अपार्टमेंटमध्ये पोलीस आले. एक शववाहिनी, बर्फातून कशीतरी वाट काढत आली. एक एकटी राहणारी वृद्धा काल झोपेतच वारली होती. बर्फाच्या माऱ्याने अनेक घरटी पडली होती. घायाळ पक्षी जमिनीवर मरून पडले होते. काही झाडे तुटली होती. एक दिवस ह्या वृद्धेप्रमाणे मीही झोपेतच जाईन. पुढे रॉबर्ट ग्रेसीबरोबर लग्न करेल. जग तसेच चालू राहील. माझे ह्या जगात कोण आहे? झाडाच्या ढोलीतून एक घुबड होते. ते त्याच्या थिजलेल्या नजरेने माझ्याकडे बघत होतं. आयुष्याचं अटळ सत्य, मृत्यू हेच आहे, हेच जणू ते मला सांगत होतं. निसर्ग कंटाळलेल्या अवघडलेल्या गरोदर स्त्री प्रमाणे शांत बसला होता.

सकाळ-दुपार-संध्याकाळ काहीच फरक कळत नव्हता. माझ्या आयुष्यात तरी कुठे तीन काळ आले, एकसुरी एकच काळ, वाट बघण्याचा, दुःख करण्याचा असा आला. संध्याकाळी थोडा थोडा सूर्य दिसला व नंतर पुन्हा गडद रात्र आली. एकाकीपणाची रात्र आली. रात्रीच्या अंधारात, मला खूप भीती वाटू लागली. स्वतःच्या जवळ असलेल्या लॅचकीने, दार उघडून रात्री उशिरा केटी आली. सकाळी मला रागावू लागली. `भूतकाळातून बाहेर ये मूर्ख बया! अगं असं स्थळ, असा रॉबर्टसारखा मित्र, असा लाईफ पार्टनर शोधून सापडणार नाही. हो म्हण. नालायक व्यक्तीवर प्रेम करून फसलीस.

काल रात्रभर रॉबर्टच्या विलात लाईट जळत होता. हा रात्रभर नेटवर काम करतोय की काय, मी मनात म्हटलं; मीही नकळत गुंततेय की काय? माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी रॉबर्टने दिलेली त्याच्या आईची साडी नेसले. कपाळावर कुंकू लावलं. शांतपणे मी आई दादांच्या फोटोला नमस्कार केला. आईने दिलेली, कधी न घातलेली, खोटीच कोल्हापुरी चिंचपेटी, गळयात घातली आणि रॉबर्टच्या विलाकडे चालू लागले. निसर्गाने कूस पालटली होती. कालच्या भयाण थंडी नंतर, बर्फवृष्टीनंतर, मंदसे कोवळे ऊन पडत होते. पृथ्वी सुस्नात, गर्विष्ठ सौदर्यवतीसारखी दिसत होती. वारा आळोखे पिळोखे देऊन झाडांना गुदगुल्या करीत होता. कालचा दिवस विसरून, निसर्गसुद्धा सूर्यनारायणाच्या नव्या किरणांचे स्वागत करीत होता. पक्षी सूर्योदयाचा आनंदोत्सव साजरा करीत होते. त्यांचा आवाज, बर्फ वितळून वाहणाऱ्या, पाण्याच्या ओहोळांच्या आवाजात मिसळत होता.

मी राबर्टच्या विलाच्या दरवाजावरची बेल वाजवली. नोकराने दार उघडलं. मी आत गेले. माझ्या आयुष्यातील नवीन पर्वाची सुरूवात होत होती. पूर्वेला सूर्य उगवत होता. लाल-सोनेरी प्रकाश पसरला होता. माळी अंगणातील बागेतील, झाडांवरचा बर्फ झटकत होता. वाऱ्याने पडदे हालत होते. मी कधीही रॉबर्टच्या घरी गेले नव्हते. त्यामुळे त्याची खोली कुठे आहे. मला कळेना. मी जिन्याने वर गेले आणि टेरेसवर जाऊन उभी राहिले. टेरेसच्या कोपऱ्यात दोन्ही हात पसरून रॉबर्ट उभा होता. मी त्याच्या अगदीजवळ जाऊन उभी राहीले. इतकी जवळ की त्याच्या हृदयाची स्पंदने ऐकू येत होती. तो म्हणाला, `सा, आता मात्र हे घर, सा, आजपासून तुझे झाले शेवटचे घरटे! झाड तुटले तरीही सोडायचं नाही. प्राण गेला तरी आपण एकमेकांपासून दूर व्हायचं नाही. ' आम्ही दोघं हसत होतो, रडत होतो. रडता रडता हसत होतो. लख्ख सूर्योदय झाला होता मी रॉर्बटच्या मिठीत शांतपणे विरघळत होते. मला जीवनमित्र मिळाला होता. मला माझं घरटं मिळालं होतं. नवीन पंख मिळाले होते. आमचं लग्न

चर्चमध्ये करायचं ठरले. थाटात पार पडले. मी रॉबर्टला म्हणाले, `शेवटचं घरटं माझं तुझ्या अंगणात! '

रॉबर्टच्या वडिलांनी खास आमच्या लग्नानिमित्त आम्हाला नवीन कोरी गाडी बक्षीस दिली व म्हणाले, `सा, मला मुलगी मिळाली आणि शिवाय माझा हरवलेला मुलगाही मिळाला आणि हो, चारपाच वर्षे राहा इथे. नंतर गावच्या आपल्या फार्महाऊसवर या! ' शेती हा परमेश्वराजवळ जाण्याचा सर्वात जवळचा मार्ग आहे. सृजनाचा आनंद आहे. रॉबर्ट वडिलांना म्हणाला, `हिला पक्ष्यांची घरटी बघायला फार आवडतं. तिला बरं वाटलं की आम्ही येऊ. तिची इच्छा असेल तर ती नोकरी सोडेल. ' पांढरा लग्नाचा झगा घालून शेतकरीदादांची परीराणी, आईची लाडली, नवीनदादांची झाशीची राणी रॉबर्टची पत्नी झाली.

शेवटचे स्वतःचे घरटे होते. माझ्या पतीच्या अंगणातील माझे शेवटचे घरटे होते. आमचे दोघांचे घरटे होते.

लाडलीचे स्वतःचे घरटे होते

. सहा ऋतूंचे सहा सोहळे त्यातच भान हरावे

या जगण्यावर, या जन्मावर शतदा प्रेम करावे.

घरटे जरुर बांधावे.

देवा राहु दे घरटे माझे तुझे अंगणात!

□□□□□

# ई साहित्य प्रतिष्ठान

माणूस किंवा कोणताही सजीव संवेदनशील असतो. त्याच्या डोळयांसमोर कोणी तडफ़डत असेल तर तो आपोआप धावून जातो. म्हणून तर संकट्काळी आपण किंकाळी फ़ोडतो. कारण आपल्याला वाटते की आपली किंकाळी ऐकून, आपला टाहो ऐकून कोणी न कोणी धावून येईल. आपल्या रक्तातील लाखो करोडॊ वर्षांच्या शिकवणीचा तो भाग आहे. संकट काळी टाहो फ़ोडणं आणि दुसर्‍याच्या संकटात धावून जाणं हे आपल्या रक्तात असतं.

पण सध्याच्या व्यापारीकरणाच्या युगात नेमकी याच्याविरुद्ध शिकवण दिली जात आहे. समाज एका असंवेदनशीलतेच्या दिशेला वाटचाल करतो आहे. शेतकरी मरतो आहे, मरेना का? स्त्रियांवर अत्याचार होत आहेत, होईनात का? 'जोवर आपल्या स्वतःपर्यंत संकट येत नाही (आणि ते येणारच नाही अशी खात्री आहे) तोवर मजा करून घ्या" अशी प्रवृत्ती वाढते आहे.

अशा वेळी समाजाला समाजभान यावे, संवेदना आणि सहवेदना जागी व्हावी हे काम उत्कृष्ट दर्जाचे साहित्य करते. प्रस्तुत पुस्तक तसेच आहे. आपण हे पुस्तक वाचा आणि इतरांना वाचायला द्या.

ई साहित्य प्रतिष्ठान दर महिन्याला अनेक उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करते. आपण त्यांचे सभासद व्हा. आणि आपल्या ओळखीच्या सर्व मराठी साक्षरांना या अभियानात सामिल करून घ्या.

आमचा पत्ता :esahity@gmail.com

अधिक माहितीसाठी भेट द्या :www.esahity.com

आपले नम्र
टीम ई साहित्य